महाराष्ट्राचे शिल्पकार

# ग्रामोद्धारक राष्ट्रसंत तुकडोजी



डॉ. सुभाष सावरकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# ग्रामोद्धारक
# राष्ट्रसंत तुकडोजी

डॉ. सुभाष सावरकर

**पुस्तकाचे नाव** : महाराष्ट्राचे शिल्पकार ग्रामोद्धारक राष्ट्रसंत तुकडोजी

**लेखक** : डॉ. सुभाष सावरकर

**प्रथमावृत्ती : २०१९**

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

**प्रकाशकाधीन**

**मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

**किंमत : रु. ३१७**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

पूज्य गुलाबराव महाराज, पूज्य गाडगे महाराज आणि पूज्य तुकडोजी महाराज यांना आधुनिक महाराष्ट्रातील संत असे ओळखले जाते. खरे ही त्रयी म्हणजे विदर्भाने महाराष्ट्राला दिलेली देणगीच आहे. या त्रयीतील तुकडोजी महाराज यांचे डॉ.सुभाष सावरकर यांनी लिहिलेले प्रस्तुत चरित्र महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे वतीने प्रसिद्ध करताना मंडळाला समाधान वाटत आहे. डॉ. सुभाष सावरकर यांचे पिताश्री सुदामराव हे तुकडोजी महाराजांच्या निकटवर्तीयांपैकी एक होते. त्यामुळे स्वाभाविकपणे पूर्ववयात सुभाषजींनाही तुकडोजी महाराजांचा सहवास लाभला व त्यांच्या विचारांवर महाराजांचा प्रभावही पडला. स्वतः सुभाष सावरकर यांच्या वैचारिक मांडणीतही या प्रभावखुणा स्पष्ट दिसतात. अशा अधिकारी व्यक्तीने लिहिलेले महाराजांचे चरित्र मंडळाने प्रकाशित करण्याचा योग जमू दिल्याबद्दल डॉ.सावरकर यांचे मनापासून आभार.

**डॉ. सदानंद मोरे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(अर्पण पत्रिका)

**राष्ट्रसंतांचे सांगाती**
**जनसारस्वत 'सुदाम' सावरकर**
**यांच्या**
**भक्तिपूत जननिष्ठेप्रति**
**सादर समर्पित**

# लेखकाचे मनोगत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आयोजित 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या प्रकल्पाअंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवन-कार्याचे विहंगम दर्शन घडविण्याचे सौभाग्य मला लाभले याबद्दल मी मंडळाचा सदैव ऋणी राहीन.

राष्ट्रसंतांच्या संपर्कात अर्धी हयात घालविलेले व त्यांचे सखे-सांगाती म्हणून श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या कार्यकलापांमध्ये मौल्यवान सहभाग नोंदविलेले जनसारस्वत 'सुदाम' सावरकर हे माझे वडील. माझ्या जन्मापासून तर राष्ट्रसंतांच्या निर्वाणापर्यन्तच्या २३ वर्षांत या ना त्या रूपात मी देखील राष्ट्रसंतांच्या व्यक्तित्व व कार्याशी मनाने जुळत गेलो होतो. मात्र मुळात विज्ञानाचा विद्यार्थी असल्याच्या अहंकारामुळे आणि अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर वर्षभरात राष्ट्रसंतांच्या निर्वाण प्रसंगाचा लाखो लोकांना बसलेला धक्का अनुभवल्यामुळे त्यांचे विभूतिमत्व जोखण्यासाठी म्हणून त्यांच्या व्यक्तित्व-कर्तृत्वाकडे चिकित्सक दृष्टीने पाहाण्याचा छंदच मला जडला. त्याउलट वडिलांची भूमिका प्रायः राष्ट्रसंतांचे सांगाती वा भक्त अशीच राहिल्यामुळे माझ्या अपरिपक्व दशेत त्यांच्याशी माझे कधीकधी मतभेद-क्वचित वादही होत असत. परन्तु राष्ट्रसंतांच्या निर्वाणानंतर १२ वर्षांनी जेव्हा त्यांनी 'जीवनयोगी' लेखनाचा बृहद् चरित्रप्रकल्प अंगिकारला तेव्हा त्या प्रकल्पाचा साक्षीदार व प्रकाशन व्यवस्थापक म्हणून एकामागोमाग अकरा खंडांचे परिशीलन करताना राष्ट्रसंतांच्या बहुआयामी व्यक्तित्वाकडे तसेच असामान्य कर्तृत्वाकडे पाहाण्याची अभूतपूर्व दृष्टी मला लाभत गेली. आणि या दृष्टीतूनच

त्या काळी माझ्या 'आत्मा', 'व्हायरस', 'आहुती' या कादंबऱ्या जशा लिहिल्या गेल्या तसेच 'राष्ट्रसंत आणि ग्रामगीता', 'ग्रामगीतारहस्य : स्पंद-१, स्पंद-२ व स्पंद-३' हे समीक्षाग्रंथ आणि 'जनभाषेच्या शोधात' हा लहानसा भाषाविज्ञानाचा शोधग्रंथ सुद्धा-प्रकल्प समाप्तीनंतरच्या १५/१६ वर्षांत माझ्या हातून लिहून झाला. अर्थात् माझ्या या साऱ्या लेखनाचे श्रेय राष्ट्रसंतांनी नावारूपास आणलेल्या अभिनव सांस्कृतिक चळवळीला व राष्ट्रसंत-सांगाती संतचरित्र संशोधक 'सुदाम'जींनी राष्ट्रसंतांप्रति अर्पिलेल्या भक्तिपूत निष्ठेलाच द्यावे लागणार आहे.

महाराष्ट्रातल्या वऱ्हाड प्रांतातील अमरावती-मोर्शी मार्गावरील यावली या छोट्याशा खेड्यात एका चंद्रमौळी झोपडीत ३० एप्रिल १९०९ च्या पहाटेस एक औलिया जन्मास आला, ज्याचे नामकरण माधानच्या प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराजांनी आकोटच्या हरिबुवांच्या उपस्थितीत केले- 'माणिक' हेच ते नाव! पुढे हे झाकले माणिक जसजसे जगाच्या रंगमंचावर प्रकट होत गेले तसतसे भारतीय जननायकांना आपापल्या उणीवांचे दर्शन घडत गेले. आपल्या ५९ वर्षांच्या आयुष्यात माणिक उर्फ तुकड्या हा 'राष्ट्रसंत' पदवीने नावाजला गेला आणि देशविकासार्थ एका आगळ्या जीवनमार्गाचा मोहरा ठरला. वयाच्या १४/१५ व्या वर्षी गृहत्याग करून किशोर माणिक रामटेकच्या तपोभूमीत दाखल झाला आणि हठयोगाची साधना करून व पुढे नीरी, गोंदोडा, ताडोबा, रामदिघीच्या वनप्रदेशात तसेच चिमूरच्या जनप्रदेशात मुक्त संचार करीत आपल्या अभूतपूर्व भावभंगिमांनी जनमनाचा ताबा घेत 'देवबाबा' बनून राहिला. भारतीय जनमानसाच्या सामूहिक नेणिवेतील आस्था जागवीत त्याने संतांच्या भक्तिचळवळीतील गुरुच्या अधिष्ठानावर एक अभिनव सांस्कृतिक चळवळ नावारूपास आणली व भक्तितत्त्वाला विवेक-विज्ञानाची जोड देऊन गुरुदेवभक्तांचे हजारो शाखांचे एक प्रचंड संघटन या भारत देशात अस्तित्वात आणले.

भारताच्या पारतंत्र्याची बंधने झुगारण्यासाठी महात्मा गांधींनी पुकारलेली कायदेभंगाची चळवळ असो किंवा 'खेड्याकडे चला!' हा तरुणाईला दिलेला आर्जवी संदेश असो;- गांधी विचार खऱ्या अर्थाने विदर्भात आत्मबळानिशी रुजविला तो या 'देवबाबा' तुकडोजींनी! त्यांच्या 'भारत छोडो'- च्या घोषणेवर चिमूर, आष्टी, यावली, बेनोडा सकट साऱ्या विदर्भात बेचाळीसची क्रांती

पक्षोपपक्षांच्या प्रेमी भक्तांनिशी घडवून आणीत तिचे नेतृत्व केले ते 'देवबाबा' तुकडोजींनी! नागपूर परिसरातील बलोपासक आखाड्यांचे भक्कम संघटन उभारून जनमनात क्षात्रतेज जागविले ते तुकडोजींनी! गांधी हत्येनंतर नागपूर-विदर्भात उसळलेल्या जातीविद्वेषाच्या फुफाट्यातून जनतेला सहीसलामत बाहेर आणले ते तुकडोजींनी! खंजरी भजनाच्या ताललयीवर गावोगावी हजारोंचा जनसमूह नागासारखा डोलवला तो तुकडोजींनी!

गांधीजींचा पाठिंबा नसताना साने गुरुजींनी पंढरपुरात अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्यासाठी जे उपोषण केले त्याची यशस्वी सांगता केली ती तुकडोजींनी! विनोबांच्या भूदान चळवळीला ११ दिवसांत ११ हजार एकर भूमी मिळवून देऊन तीही चळवळ यशस्वी केली ती तुकडोजींनी! गांधी स्मृतिदिनांच्या निमित्ताने आमगाव (गोंदिया) परिसरातील १०० गावे व हैदराबाद संस्थान सार्वभौम भारतात विलीन करण्याची पूर्वपीठिका म्हणून वडी (मराठवाडा) परिसरातील ७५ गावे आदर्श करून दाखविली ती तुकडोजींनी! भारतीय खेड्यांमधून अलुतेबलुतेदार शहरांकडे स्थानांतरित झाल्याने खेड्यांची औद्योगिक वीण उसवली जाऊन कृषिवलांचे अर्थकारणच नव्हे; तर समाजकारण, राजकारण आणि संस्कृतिकारण उद्ध्वस्त होत गेले असता खेडी पुनरुज्जीवित करण्यासाठी 'ग्रामगीता' ह्या बहुआयामी संजीवनी मंत्राची रचना केली ती ग्रामोद्धारक तुकडोजींनीच!

१९५५ मध्ये जपान येथील विश्वशांति परिषदेच्या आमंत्रणावरून तेथील धर्मपरिषदेत सहभागी झाले असता विश्वशांतिसंबद्ध तत्त्वचिंतनाच्या व भविष्यलक्ष्यी दृष्टीच्या बळावर १८ देशांच्या प्रतिनिधी मंडळाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष निवडले गेलेले संत-कलावंत-तत्त्वज्ञ तुकडोजी! पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.राजेन्द्र प्रसाद, डॉ.राधाकृष्णन्, ना.गुलझारीलाल नंदा, डॉ.चिंतामणराव देशमुख, लोकनायक जयप्रकाश नारायण,-इतकेच काय पंतप्रधान लालबहादूर शास्त्री व श्रीमती इंदिरा गांधी, ना.यशवंतराव चव्हाण आदि देशपातळीवरील सर्व महत्त्वाच्या नेत्यांच्या दृष्टीत गौरवाचा विषय झालेले राष्ट्रसंत तुकडोजी!- आणि श्रीगुरुदेव सेवामंडळ शाखांच्या माध्यमातून सामुदायिक ध्यान-प्रार्थना, खंजरी भजन तसेच ग्रामगीताप्रणित कार्यकलापांतून ग्रामनवनिर्माणाचा ध्यास घेतलेले राष्ट्रसंत तुकडोजी! याच तुकडोजींनी १९६० च्या संयुक्त महाराष्ट्राच्या

चळवळीत राष्ट्रीयतेची दृष्टी अबाधित राखीत विदर्भवादी राजकीय चळवळीऐवजी महाराष्ट्रवादी आचार्य अत्रे, डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्याच बाजूला भक्कम पाठिंबा दिला होता!

सन् १९६२ च्या चीन आक्रमणकाळात देशभरातील भारतीय सुरक्षा समितीच्या शाखांचे व पुढे पाकिस्तानने लादलेल्या सन् १९६५ च्या युद्ध परिस्थितीतही सीमेलगतच्या कॅम्पमध्ये जाऊन उस्फूर्त अशा स्फूर्तिदायी भजनांनी भारतीय सैनिकांचे मनोबल उंचावले ते एकमेव संतकवी तुकडोजींनी! त्याचप्रमाणे सन् १९६८ च्या कोयना भूकंपातील आपद्ग्रस्तांना जीवनावश्यक रसद पुरवणारा शांतिदौरा काढणारेही एकमेव संत तुकडोजीच!

एकंदरीत, विश्वमानवतावादी अशा या संतयोद्ध्याने नव्या भारताच्या व नव्या महाराष्ट्राच्याही जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. अशाप्रकारे सन् १९४२ व १९४७ च्या दरम्यान राजकीय-सामाजिक अस्मिता कमावलेल्या स्वतंत्र भारताच्या विकासप्रक्रियेला ग्रामोद्धाराची नेमकी दिशा पुरविणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजीच्या व्यक्तिमत्वात अनेक बहुवांछित दालनांचा नैसर्गिक समन्वय साधला गेला आहे. त्यांपैकी निदान काही महत्त्वाच्या दालनांचे विहंगदर्शन घडविण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न आहे, तो गोड करून घ्यावा ही सुज्ञ वाचकांना नम्र विनंती.



**(डॉ. सुभाष सावरकर)**
जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी,
अमरावती-४४४६०५.
मो. ९८६०४५१०७५

# एक : उदय

महाराष्ट्रातील संतपरंपरा ही १३ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत मानण्यात येते. वारकरी संतांची ही दिव्य परंपरा सतराव्या शतकात खंडित झाली असल्याचे विद्वान अभ्यासकांनीही जणू मान्यच करून टाकले आहे; आणि १७ व्या शतकातील संत कवयित्री बहेणाबाईंच्या 'ज्ञानदेवे रचिला पाया...तुका झालासे कळस' या अभंगाचे उद्धरण वा अवतरण हा त्या मान्यतेचा आधार मानला आहे. परन्तु संतकवी तुकारामांनंतरही महाराष्ट्रातील ही संतपरंपरा खंडित झाली नाही ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. मध्यंतरीच्या दोन शतकांमध्ये असाधारण प्रभावशाली संतकवी निपजले नसल्यामुळे त्या काळात संतपरंपरेचा विकास न होता केवळ विस्तारच होत आला हे खरे. पण १९/२० व्या शतकांत विदर्भ विभागात जन्मलेल्या लोकसंत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या दोन समाजप्रबोधक संतांनी मध्ययुगीन संतपरंपरेचा विकासही साधल्याचे दिसून येते. हा विकास समजून घेण्याकरिता नव्या काळाच्या संदर्भात या दोन संतांच्या जीवन व कार्याचा सखोल अभ्यास होणे क्रमप्राप्त आहे.

लोकसंत गाडगेबाबा हे कर्मयोगी संत तथा लोकप्रबोधक होते. मात्र त्यांचे एक कीर्तन आणि समकालीन अभ्यासकांनी लिहिलेली त्यांची चरित्रे तेवढी आज उपलब्ध आहेत. उलट राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे कृतिशील जनप्रबोधक व कवीही होते; त्यामुळे त्यांची कवने, भजने, अभंग, भाषणे, लेख तथा प्रवचने विपुल प्रमाणावर उपलब्ध आहेत. इतकेच नव्हे तर समकालीन सहकारी अभ्यासकांनी लिहिलेले त्यांचे चरित्रग्रंथ तथा आठवणीदेखील उपलब्ध आहेत. भारताच्या स्वराज्यप्राप्तीपूर्वी २१ वर्षेपर्यंत केवळ आपल्या अद्‌भुत खंजरी वादनाच्या आणि क्रांतिकारी भजनांच्या बळावर विदर्भ पिंजून काढलेल्या या हठयोग्याने स्वराज्यप्राप्तीनंतरही सुराज्य प्रस्थापनेचे कंकण बांधले; आणि नेपाळपासून नेफापर्यंत आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भारत पिंजून काढला. खंजरी भजनाच्या जादूबरोबरच वाचासिद्धी आणि मौलिक चिंतन यांच्या बळावर स्वामी विवेकानंदांप्रमाणे सर्वधर्मपरिषदेसाठी परदेशात जाऊन व तेथे १८ देशांच्या धर्मविचारकांचे दमदार नेतृत्व करून त्यांनी भारतीय संस्कृतीचा ठसा

भारताबाहेर देखील उमटविला. मात्र या अनमोल अभ्याससामुग्रीकडे मराठीतील विचारवंतांनी लक्ष दिलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. अलिकडच्या दहापाच वर्षांत मात्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कर्तृत्वाचे आणि चिंतनाचे महत्त्व विद्वानांना तीव्रतेने जाणवू लागल्याचे दिसून येते. त्याचबरोबर केन्द्र तथा राज्य शासनाने अलिकडे स्वीकारलेली समाजविकासाची धोरणे (उदा. ग्रामस्वच्छता, हागणदारीमुक्ती, तंटामुक्ती, पंचायत राज कायद्याअंतर्गत ग्रामसभेची धारणा, व्यसनमुक्ती, महिलोन्नती, वृक्षारोपण, कृषिसुधार, सहकारी तत्त्वावर शेतीमालाचे संस्करण-विपणन, अस्पृश्यता निवारण, यात्रासुधार, बळीप्रथानिर्मूलन, अल्पबचत गटनिर्माण, सामुदायिक ध्यान-प्रार्थना, वाचनालय, गावतळे-शेततळे-बंधारे-धरणे यांद्वारा जलसंधारण इत्यादि) ही प्रायः या दोन संतांच्या शिकवणीतून आलेली असल्यामुळे राजकीय-सामाजिक दृष्ट्या देखील त्यांच्या आचार-विचार-उच्चारांना असाधारण महत्त्व येऊ लागले आहे. तरीही महाराष्ट्रातल्या विद्वान अभ्यासकांनी राष्ट्रसंत तुकडोजीच्या साहित्याच्या तथा कर्तृत्वाच्या अभ्यासाकडे किमान ५० वर्षे दुर्लक्ष केले आहे, हे मान्यच करावे लागते.

या दुर्लक्षामागे कारणे अनेक आहेत. ज्या विदर्भात ते जन्मले आणि वाढले तो लगतच्या मराठवाडा-खानदेश प्रमाणेच शेकडो वर्षे निजामाच्या आधिपत्याखाली होता. इतकेच काय, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही १३/१४ वर्षेपर्यंत तो हिंदीभाषी मध्यप्रांताचा भाग राहिला होता; आणि विदर्भातील नागपूर ही तर मध्यप्रांताची राजधानी होती! त्यामुळे हिंदी आणि मराठी या भाषाभगिनींचे नागपूर-विदर्भ परिसरात सारखेच चलन होते. शिवाय राष्ट्रसंत तुकडोजी हे ब्रह्मभट्ट (भाट) जमातीचे अपत्य होते. त्यामुळे पाऊणशेच्यावर प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या पुस्तकांमधील अधिकतर उत्कृष्ट रचना या खडी बोली हिंदीतून अवतरल्या आहेत आणि त्यांच्यामागील शीघ्रकवित्व आणि उत्स्फूर्तता हे गुण ब्रह्मभट्टांच्या कबित्तरचनेशी नाते सांगणारे आहेत. मध्यप्रांतात सर्वबाबतीत प्रगत असलेला विदर्भ प्रांत हा १९६१ मध्ये महाराष्ट्रात विलीन झाला आणि राजकीय दृष्ट्या मुंबईच्या आणि सांस्कृतिक दृष्ट्या पुण्याच्या दावणीला बांधला जाऊन आपले मूळ तेज आणि महत्त्व हरवून बसला! शिवाय १३ ते १७ या शतकांदरम्यानची

तेजस्वी संतपरंपरा पुणे-मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र परिसरात होऊन गेलेली; सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांचे देदीप्यमान पर्वही पुणे-कोल्हापूर-रायगड-कोकण-सातारा-सांगली या भागांतच भरभराटीस आलेले; अठराव्या शतकातील पेशव्यांची राजवट आणि भोसले राजांची गादीही पुणे-कोल्हापुरात नांदलेली; एकोणीसाव्या शतकात महात्मा जोतीराव फुले आणि अन्य समाजसुधारकांनी आणलेली प्रभावी जागृतीही त्याच परिसरात दुमदुमलेली; सत्यशोधक चळवळी व कम्युनिस्ट धोरणाच्या शेतकरी-कष्टकऱ्यांच्या भांडवलशाहीविरोधी चळवळीही प्रायः त्याच परिसरात विकसित झालेल्या. त्यामुळे गेल्या किमान दोन दशकांतील आधुनिक ज्ञानाचे आणि प्रगतीचे केन्द्रही मुंबई-पुणे-पश्चिम महाराष्ट्र हेच बनून राहिले आणि मराठवाडा, खानदेश तथा वऱ्हाडपासून या झाडीमंडळ-गोंडवनापर्यंतचा विदर्भ हे भूभाग या केन्द्रांपासून दुरावल्यामुळे राजकीय तसेच अन्यही दृष्टींनी अविकसित/दुर्लक्षित राहिले.

अशा या दुर्लक्षित विदर्भातील एकेकाळची ‘सोन्याची कुऱ्हाड’ असलेल्या वऱ्हाड प्रदेशात अमरावतीपासून उत्तरेकडे १५-१६ मैलांवर वसलेल्या यावली या ३-४ हजार लोकवस्तीच्या गावात नामदेव (बंडोजी) गणेशपंत इंगळे (ठाकूर) आणि मंजिरी (मंजुळा) या दरिद्री दांपत्याच्या पोटी ३० एप्रिल १९०९ रोजी पहाटेस एक असामान्य तेजस्वी अर्भक जन्मास आले. त्याच्या जन्मकाळी तर निसर्गाने अक्षरशः रौद्ररूप धारण केले होते. वैशाखाच्या प्रखर वणव्यात २९ एप्रिलच्या संध्येपासूनच ढगांचा गडगडाट आणि विजांचा लखलखाट सुरू झाला होता. त्यानंतर सुरू झाले जिद्दी वाऱ्याचे आणि पाऊसधारांचे थैमान! कौलारे आणि गवतपेंड्यांनी अर्धवट शाकारलेल्या त्या झोपडीत उत्तररात्रीपर्यंत पाऊस शिरून पाणी तुंबू लागले. भरीस भर म्हणून वावटळीच्या झोक्याने झोपडीचे छप्परही वरचेवर उडून गेले. बंडोजींनी तरटाचे पडदे बांधून कसाबसा बाळ-बाळंतिणीपुरता आडोसा करून दिला- आणि पहाटेपहाटेसच मंजुळेने त्या तेजस्वी मुलाला जन्म दिला! योगायोगाने त्या मुलाच्या बारशाला माधानचे प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज आणि आकोटच्या नरसिंह मंदिरातील विदेही वृत्तीचे संत हरिबुवा उपस्थित होते. या संतद्वयाच्या उत्स्फूर्त उद्गारातून अभावितपणे जुळून आलेले ‘माणिक’ हे जन्मनाव त्या बाळाला देण्यात आले.

मायमंजुळेचे माहेर अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील तिवसा गावापलीकडे २ कोस आत असलेले वरखेड हे गाव होते. तिचे वडील तुकारामबुवा घोड्यावर बसून यावलीला आले आणि बाळाचा टवटवीत मुखचंद्र पाहून लगबगीने वरखेडला परत देखील गेले. याचे कारण वरखेडचे विदेही सत्पुरुष परमहंस आडकोजी महाराज यांच्या कृपाप्रसादाने अर्थात् त्यांनी मंजुळेच्या मुखात हट्टाने पिळलेल्या आंब्यामुळे मंजुळेला पुत्ररत्न झाले आहे ही श्रद्धाच त्यांना वरखेडला खेचत होती. त्यामुळे पत्नी बजाबाईला सोबत घेऊन ते आडकोजी महाराजांच्या दर्शनाला गेले आणि नातू झाल्याची वर्दी त्यांना दिली. हे आडकोजी महाराज पुढे राष्ट्रसंत तुकडोजींचे गुरु म्हणून प्रसिद्धी पावले.

वर्धा जिल्ह्यातील तैलंगरायाची आर्वी येथील एका सधन कासाराच्या घरी सन् १८२१ साली जन्मलेल्या आडकोजी महाराजांची अवस्था कधी बालवत्, कधी जडवत् तर कधी पिशाच्चवत् असे. आणि ही परमहंस अवलियाची अवस्था त्यांना प्रदान केली ती आर्वीच्या प्रसिद्ध महिला संत मायबाई यांनी! भटकत भटकत वयाच्या साठीनंतर ते वरखेडात आले तेव्हा त्यांचे कपडे विटून–फाटून नाहीसे झाले होते आणि देहाचेही भान त्यांना उरले नव्हते. परमहंस दशेला पोहोचलेल्या आडकोजी महाराजांनी वरखेडच्या मंदिरात जो मुक्काम ठेवला तो थेट १९२१ मध्ये वयाची १०० वर्षे पूर्ण करून संजीवन समाधी घेईपर्यंत! तान्ह्या माणिककडे परमहंस आडकोजी महाराजांच्या 'प्रसादाचा आंबा' म्हणून पाहाण्याची दृष्टी जशी मंजुळेच्या आईवडिलांना लाभली तशीच ती सव्वा महिन्यानंतर माणिकला महाराजांच्या पायावर घालताना मंजुळेला आणि तिची सासू तानाबाईलाही लाभली. त्यावेळी शिशु माणिकला प्रेमाने पोटाशी घेऊन महाराजांनी त्याच्या बालमुखात जवळच्या तांब्यातील भाकरीचा तुकडा भरवला आणि टाळ्या वाजवीत ''तुकड्या–तुकड्या'' म्हणून आनंदघोष सुरू केला. समर्थ आडकोजी महाराजांनी त्यावेळी उच्चारलेले 'तुकड्या' हेच नाव बालमाणिकने पुढे अंगीकारले.

माणिक उर्फ तुकड्याची माय मंजुळा ही साधीभोळी भक्तिमती होती. अठराविश्वे दारिद्र्यातही असंतोष किंवा चिडचिड तिच्या गावी नव्हती. पती बंडोजीबाबाचे घरात लक्ष नसे; तरी तिची तक्रार नसे. प्रसंगी बाहेर जाऊनही ती मजुरीची कामे करीत असे. अत्यंत मधुर स्वरात ती संतमहात्म्यांची अर्थगर्भ पदे

तन्मयतेने गुणगुणत-गात असे. त्यात बालमाणिक म्हणजे तिच्या आनंदाचे एकमेव निधान होते. मात्र गर्भार अवस्थेत सकस आहार न मिळाल्यामुळे तिच्यात जीवघेणी अशक्तता आली होती. त्यातच पाणी ओढताना ती तोल जाऊन विहिरीत पडली आणि कंबरभर पाण्यात रात्रभर कुडकुडत राहिली. तिला दुसऱ्या दिवशी बाहेर काढले तशी ती बेफाम बनली. गावठी इलाज केल्यानंतर कशीबशी सामान्य स्थितीत तर ती आली; पण त्या साऱ्या जीवघेण्या धक्क्यांनी तिचे दूध आटले ते कायमचेच! परिणामी माणिक दोन वर्षांचा झाला तरी त्याची अंगकाठी किरकोळच राहिली. आईचे विलक्षण भोळेपण, सोयीसुविधांचा अभाव आणि बिनतोड दारिद्र्य यांच्याशी झुंजतच माणिक हळुहळू मोठा होऊ लागला. रांगू लागला. रांगता रांगता इवलाल्या पावलांवर उभा झाला आणि आपल्या काटकुळ्या कायेचा तोल सावरत पाऊल-पाऊल चालू लागला. अडीच वर्षांच्या माणिकला घरी ठेवून बाहेरचे काम आटोपून घेण्यासाठी माय मंजुळा त्याचा एक पाय जात्याच्या पाऊला बांधून ठेवी. पण बालमाणिक तो पाऊ ओढत ओढत आतल्या खोलीतून बाहेर दारापर्यंत आणून आईची वाट पाहात दारात उभा राही. धैर्य आणि काटकपणा हा असा बालपणीच माणिकच्या अंगात भिनला होता.

तीनचार वर्षांचा झाला तेव्हा माणिक त्याच्या घराजवळच्या जाणुजीबुवाच्या बोहलीवर जाऊन खेळत बसे. पिता बंडोजीसुद्धा प्रचंड अशा वटवृक्षाची सावली असलेल्या त्या पारावर खेळायला माणिकला अडवीत नसे; कारण तिथे त्यांच्याच इंगळे (ठाकूर) वंशातल्या पुराणपुरुषाची समाधी असल्याची त्याची धारणा होती. मात्र शैशवाचा काळ लवकरच संपला. यावलीचे वडिलोपार्जित घर आणि आकाजी पाटलांचा आश्रय गमावल्यामुळे मायलेकांना बंडोजीच्या मागून फरफटत चांदूर बाजारला जावे लागले.

चांदूर बाजारला गावाबाहेरच्या मठाशेजारी मारुतीच्या मंदिरात भारतीबुवा नावाचे सत्पुरुष राहात असत. ते छंदगायनात निपुण होते. सहा वर्षांच्या माणिकची गोड गळ्यातली भक्तिगीते ऐकून बुवा प्रभावित झाले; आणि त्यांच्या भजनछंदामुळे आकर्षित झालेल्या माणिकलाही भजन/छंद गात मठातच राहाणे आवडू लागले. तेथील शाळेत 'तुकडी' वर्गात बंडोजींनी त्याचे नाव टाकले खरे; पण शाळेतील शिक्षणापेक्षा स्वतः रचलेली पदे किंवा मुखोद्गत भजन-गीते

गाण्यात त्याला अधिक रुची वाटू लागली. शाळेतली मुले जशी त्याच्या भजनांच्या नादी लागली तसे कालांतराने शिक्षकदेखील त्याची भजने आत्मीयतेने ऐकू लागले. मात्र माणिक सात वर्षांचा झाला; आणि बंडोजीच्या मनात यावलीला परत जाण्याची हुक्की आली.

विंचवाचे बिऱ्हाड घेऊन बंडोजी परत यावलीला आले खरे; पण पूर्वीचे घर गमावल्यामुळे चिमणाबुढीच्या जागेत एक साधीसुधी झोपडी बांधून ते राहू लागले. झोपडीच्या मागे पडक्या खंडारात सर्पांची मोठमोठी वारुळे आणि कैचणाने भरलेला उकिरडा होता. तिथे माणिकचे मन रमेना. तो एक तर पूर्वीच्या त्या जाणूजीबुवाच्या बोहलीत जाई किंवा नदीच्या पात्राशेजारी रमे. त्याहून अधिक तो रमे गावाबाहेरच्या शिवमंदिरात. दिवसा/रात्री–वाटेल तेव्हा माणिक तिथे जाऊन बसे आणि अंतरंगात देवदर्शनाची तळमळ घेऊन खुशाल भजन करी. देवदर्शनाची त्याची तळमळच शब्दबद्ध होऊन भजनरूपात अवतरू लागली आणि त्याचे देवपिसे घट्ट करू लागली. पुढे पुढे शाळेच्या निमित्ताने माणिक घरातून निघे खरा; पण थेट देवळातच जाऊन बसे.

कितीदातरी शिवपिंडीला कवटाळून बसलेल्या माणिकला बंडोजींनी पाठीवर धपाटे देऊन उठविले असेल, पण माणिकची परिपाठी बदलली नाही. शेवटी बंडोजींनी शाळेसमोरच त्यांचे शिंपीकामाचे दुकान थाटले. मग मात्र माणिकला शाळेत जाणे भाग पडू लागले. त्यामुळे माणिक दिवसेंदिवस बेपर्वा, धीट आणि खोडकर होऊ लागला. मात्र त्याच्या खोडकरपणाचे पर्यवसान इतरांना मारण्यात नव्हे तर स्वतः मार खाण्यात होई. भटकणे, शाळेत कधीच वेळेवर न जाणे ही कारणे मार खाण्यासाठी पुरेशी असत. वर्गात कधी बसलाच तरी त्याचे लक्ष गुरुजींकडे नसे. मात्र विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तो बिनचूक देई. त्यामुळे गुणही त्याला सर्वाधिक मिळत.

गावात कोणी कीर्तनकार आला की माणिक हटकून हजेरी लावीत असे. कोणी कितीही हिडीफिडीस केले तरी कीर्तन पूर्ण झाल्याशिवाय तो उठत नसे. कितीतरी धार्मिक ग्रंथांचे श्रवण त्याला अशा पर्वणींमधून घडले आणि त्याचे अंतरंग उमलत गेले. मग मंदिरात, जंगलात, पडक्या खंडारात– अगदी स्मशानातसुद्धा सवंगड्यांना सोबत नेऊन हरिदासी शैलीतील त्याची बालकीर्तने सुरू होत आणि

रंगत. कालांतराने शाळेजवळच्या एका छोट्या देवळात त्याला हनोतीबुवा नावाच्या ब्रह्मानंदी साधूचा शोध लागला. त्या साधूच्या भजन-गायनाच्या व खंजरीवादनाच्या कौशल्याने माणिक स्तिमित झाला आणि त्याचेकडून खंजरीची एकेक गत त्याने परिश्रमपूर्वक शिकून घेतली. पण त्याचबरोबर हनोतीबुवाने माणिकच्या ईश्वरभक्तीशी धूम्रपानाची लत जोडून दिली आणि माणिकला बिडी ओढण्याचे व्यसन लावून दिले.

आपल्या भक्तिबळाने मित्रांच्या मनातून भूतप्रेतांचे भय पळवून लावण्यासाठी बाल माणिकने स्मशानात नेऊन प्रेतांच्या उंचवट्यांवर रात्रभर निजून दाखविले. पुढे इन्फ्ल्युएंझाची साथ आली आणि स्मशानात सर्वत्र प्रेते जळताना दिसू लागली; तेव्हा माणिकला जीवनाची क्षणभंगुरता वेढत गेली आणि वैराग्यविचार अधिकाधिक घट्टपणे रुजत गेला. सवंगड्यांनीच बंडोजीकडे त्याच्या स्मशानसंचाराची तसेच उष्ट्या बिड्या ओढण्याची चुगली केली. त्यामुळे तशी बंडोजीने त्याचे हातपाय बांधून त्याला झोपडीच्या छताशी टांगून दिले; आणि त्याला अन्नाचा कणही न देण्याबद्दल मंजुळेला ताकीद दिली. तरीही बालमाणिक मजेत हसून हसून झोके घेत राहिला. तेव्हा मात्र परिसरातील लोकांनी बंडोजीला सांगितले- 'याला बाहेरची बाधा झाली !'

झाले. अंगारे-धुपारे झाले. कडक 'देवी' झाली. नागोबाचा संचार झालेल्या 'भगता'कडे जाऊन अघोरी उपाय झाले. शेवटचा उपाय म्हणून देऊरवाड्याच्या नरसिंगबुवाच्या मंदिरात बंडोजी त्याला घेऊन गेले. पण तिथे त्यांना आकोटचे तेच संत 'हरिबुवा' भेटले आणि त्यांनी बंडोजीला खडसावले- ''मूर्खा ! हा माणिकबाळ कोण याची ओळख तुला नाही. त्याचा अधिकार मोठा आहे. खबरदार त्याला असा त्रास दिलास तर !''- तेव्हा कुठे बंडोजीचे भय दूर झाले आणि बालभक्त माणिकच्या ईश्वरभेटीच्या तळमळीला पदोपदी प्रतिरोध करणारे अडथळेही दूर झाले.

यावलीच्या जगन्नाथ महाराज मठात सातळीकोतळीकर नावाचे रामदासी साधूपुरुष राहात असत. ते मूळचे कोकणातले होते. ज्ञानसाधनेची तळमळ आणि जनसेवेची तीव्र इच्छा यांबरोबरच उत्कृष्ट वीणावादनामुळे त्यांचेकडे लोक सहज आकर्षित होत. माणिकही त्यांच्याकडे आकृष्ट झाला. त्याने त्यांच्याकडून भजनाचा

खराखुरा छंद घेतला आणि त्याबरोबरच सुसंस्काराचे धनही त्याने आत्मसात करून घेतले. या संस्काराच्या प्रभावातून बालमाणिकने वयाच्या आठव्या वर्षीच एक काव्यरचना केली : 'घे करुणा ! घे करुणा ! घे करुणा रुक्मिणीरमणा।।'

उग्र तामसी प्रकृतीच्या बंडोजीला माणिकचे देवपिसेपण सहन होईना. शाळेत जायला नको; दुकानात येऊन कामात हातभार लावायला नको; – तर फुकट खाऊ घालायचे तरी कशासाठी? म्हणून बंडोजीने त्याला घरातून हाकून लावले आणि ''तो काही कामधंदा करू लागल्याशिवाय त्याला जेवू घालू नको!''– अशी सक्त ताकीदच मंजुळेला दिली. काही दिवस मित्रांनी आपापल्या घरी नेऊन त्याला खाऊ घातले खरे; पण 'आपल्याला आईबापाने मोकलले'– या विचाराने माणिकचे मन हादरवून टाकले आणि तो यावली सोडून मामाच्या गावाला– वरखेडला जायला निघाला. मोतीराम उमप या सोबत्यासह २२ मैलांचे अंतर पायी कापून तो वरखेडला तर पोहोचला; पण मामाच्या घरी न जाता थेट आडकोजी महाराजांच्या मंदिरात जाऊन त्याने महाराजांच्या पायावर लोटांगण घातले आणि तीन दिवसपर्यंत त्यांच्याच छत्रछायेखाली राहिला. त्या तीन दिवसांत त्याला तीव्रतेने जाणवले की कामाला घाबरून आपण मायला सोडून इथे पळून यायला नको होते. मग तो पुन्हा यावलीला येऊन पोहोचला आणि आईला निश्चयाने म्हणाला– ''आता मी काम करून पैसा कमवीन.''

आणि खरोखरच मग सकाळी गावफेरीला आजोबाची चौपदरी झोळी घेऊन तो फिरू लागला. कीर्तन करून, कबित्त गाऊन तो एक एक पैसा कमावू लागला. आपल्या स्वतंत्र शैलीत कविता, भजने, अभंग गाऊन तो लोकांना रिझवी आणि शिधा पदरात पाडून घेई. दुपारी आईसोबत निंदण–खुरपणी–वेचणी या शेतीकामाला जाई. त्यातच झाडावर चढणे, घोड्यावर बसणे, पाण्याखालून दूरवर पोहत जाणे, विविध वाद्ये वाजविणे, दुस्तर योगासने करून दाखविणे ही कौशल्ये जशी त्याने आत्मसात केली, तसेच शिवणकलेतील कौशल्यही त्याने सहज आत्मसात केले; आणि बंडोजीसोबत तो दुकानातही जाऊ लागला. मात्र पाठ वळली की कोणत्याही कापडाच्या पिशव्या–चंच्या–बटवे शिवून गरजू म्हाताऱ्या–कोताऱ्यांना ते वाटून देऊ लागला. घरी असताना एकदा तर देव्हाऱ्यातली चांदीची हनुमंताची मूर्ती त्याने गावच्या आखाड्यात स्थापन करण्यासाठी म्हणून मोतीराम

पवार या मित्राला देऊन टाकली ! बंडोजींना हे कळले मात्र; त्यांची तळपायाची आग मस्तकाला गेली. घरी येऊन मंजुळेवर त्यांनी सारा राग काढला. तिला शिव्यांची लाखोली वाहून लाथाबुक्क्यांनी बुकलून काढल्यावर तिरीमिरीतच ते माणिकच्या शाळेत गेले व शाळेतून त्याचे नाव काढून टाकून मगच घरी परत आले. घरी येऊन माणिक आणि मंजुळेला धक्के देऊन घराबाहेर काढले आणि त्यांचे बोचके बाहेर फेकून त्यांना वरखेडला निघून जाण्यास फर्मावले. नाइलाजाने दोघे मायलेक वरखेडची वाट पायीपायीच तुडवीत निघाले.

वरखेडला माय मंजुळेचे आईवडील निवर्तल्यामुळे निपुत्रिक गोविंदमामाचा संसार भिक्षाटनाच्या आधारावर कसाबसा चालला होता. त्यात मंजुळा-माणिकची भर म्हणजे दुष्काळात तेरावा महिना! पण मंजुळेने मोलमजुरीची कष्टाची कामे करून भावावर आपला भार पडणार नाही याची दक्षता घेतली. शिवाय माणिकचे नाव शाळेत टाकण्याचाही आग्रह धरला. माणिक आता वरखेडच्या शाळेत नियमित जाऊ लागला. भजन-कीर्तन, सत्संग, परिश्रम आणि खोडकरपणाची उर्मी हे सारे सांभाळून देखील शाळेचा अभ्यास त्याने मागे पडू दिला नाही. शाळेचे मुख्याध्यापक श्री. बळीरामजी वानखडे यांच्या मनावर त्याने उत्तम छाप पाडली. यावलीतल्याप्रमाणे चौपदरी फिरवून व भजने-कबित्ते गाऊन भिक्षा मागण्याचीही परिपाठी चालविली. त्याशिवाय कुठे झाडलोट करणे, कुणाचे पाणी भरून देणे, कुणाची मोळी आणून देणे, कुणाचे दाणे वेचून देणे, कुणाचे मूल खेळविणे, पत्रावळ्या शिवणे किंवा गुरे वळणे- यांतूनही श्रमाचा मोबदला घेऊन तो माय मंजुळेला मदत करू लागला. त्याच कालावधीत मुख्याध्यापक वानखडे गुरुजींच्या घरचा ग्रंथसंग्रह त्याला उपलब्ध झाला आणि त्याने त्यातले निवडक ग्रंथ उत्कटतेने वाचून काढले.

वरखेडमधल्या या काळात माणिकचा भजन-लेखनाचा छंद अधिकच भरास आला. त्याच्या लेखी ते 'काव्य' नव्हते; तर खवळलेले चित्त स्थिर करण्यासाठी विद्रोही मनाचे ते आक्रंदन होते; तसेच अन्यायाविरुद्ध विश्वनियंत्याकडे दाद मागण्याचेही ते एकमात्र साधन होते. काव्याचे कथित 'जाणकार' मात्र माणिकची टिंगलटवाळी करीत त्याला 'भोंदू भगत' म्हणत. म्हणून मग देवाची किंवा देवप्रतिमेची औपचारिक पूजा टाळून तो मानसपूजा करू लागला;

लोकान्त टाळून एकान्तात आपल्या चिंतनाला वाट काढून देऊ लागला. कधी पश्चिमेकडल्या गावशेतामध्ये, कधी मुंज्याबुवाच्या समाधीकडल्या शिवमंदिरामध्ये, कधी चंद्राकार नदीच्या कपारीमध्ये तर कधी वर्धाकाठच्या वाळूमध्ये तो ध्यान लावून बसू लागला आणि तिथल्या सुंदर एकान्तात भजन-संकीर्तनात रंगून जाऊ लागला.

अशा या अस्थिर जीवनप्रवाहातही १९२२ च्या मार्च मध्ये तो चौथ्या वर्गाच्या परीक्षेत उत्तमरीत्या उत्तीर्ण झाल्याचे कळले आणि माय मंजुळेचे हृदय भरून आले. तशातच यावली वरून निरोप आला- 'बंडोजीची प्रकृती अचानक बिघडली; ताबडतोब निघून या!' झाले. मनाने काहीसे सावरलेले ते मायलेक वरखेड सोडून यावलीला परत आले.

बंडोजीची प्रकृती ताळ्यावर येतायेताच त्यांनी विचार केला, चौथा वर्ग सहज पार केलेला माणिक असाच पुढे शिकल्यास हुद्देदार होईल. मात्र त्यासाठी त्याला यावलीतून काढून अमरावतीला त्याच्या आत्याकडे पाठविले पाहिजे. झाले. माणिकला सोबत घेऊन बंडोजी अमरावतीला भाजीबाजार परिसरात राहाणाऱ्या त्यांच्या नात्यातल्या बहिणीकडे आले आणि माणिकला तिच्या सुपूर्द करून मोठ्या समाधानाने यावलीला परतही गेले. मात्र माणिकला तेथील उच्चभ्रूंच्या कैदेत पडल्यासारखे झाले. स्वतःच्या ठायी उपजत असलेला मनमौजी लहरीपणा व अवखळ खोडकरपणा बाहेर काढायला तिथे मुळीच वाव नव्हता. त्यामुळे तेथे त्याला गुदमरल्यासारखे होऊ लागले. गुदमर असह्य झाली म्हणजे तो मध्येच यावलीला जाऊन थडके; कीर्तने, योगासने, पोहणे, कुस्त्या, आट्यापाट्या, घोडेस्वारी, दंढारीतली सोंगे, मोहरमच्या सवाऱ्या- अशा उन्मुक्त कार्यकलापांत चार दिवस बुडून जाई आणि पुन्हा मग नाइलाजाने अमरावतीस परत जाई.

जुन्या अमरावतीच्या त्या परिसरात यावलीच्या आकाजीबापूंचा वाडा आणि हरिश्चंद्र पाटलाचा वाडा माणिकचा चाहता बनला होता. तिथली मातब्बर मंडळी माणिकच्या भजन-गायन तथा काव्यकळेने मोहित झाली होती. त्यांतल्या चिंतामणराव लोहकरे यांनी विजयादशमीस होणाऱ्या कुळाचाराच्या उत्सवासाठी माणिकने लोहकरे कुटुंबासोबत रामटेकला यावे-असा आग्रह धरला. माणिक मोठ्या आनंदाने त्यांचेसोबत गेला. पांढरा स्वच्छ सदरा, डोईवर लाल साफा,

गुडघ्यापर्यंत नीटनेटके धोतर आणि अंगावर चोपून पांघरलेली शुभ्र चादर या पोषाखातल्या माणिकच्या मुद्रेवरील सात्त्विक भाव पाहून रामटेकची ज्येष्ठ मंडळी अतिशय प्रभावित झाली. त्याच्या आर्त भजनगायनाला लाभलेली खंजरीची थाप तर श्रोत्यांना वेड लावून गेली! 'राजास जी महाली सौख्ये कुणा मिळाली'– या 'झोपडी' कवितेच्या ओळींनी तर सारेच मंत्रमुग्ध झाले. माणिकच्या व्यक्तिमत्वाने आणि भजनी कळेने लोहकरे कुटुंबातील आदरणीय वृद्धांचे हृदय तर जिंकलेच पण समवयस्क व तरुण तसेच प्रौढही माणिकचे जिव्हाळ्याचे सोबती बनले. श्री.सदाशिवराव किंमतकर या सत्यशोधकी बाण्याच्या लोकप्रतिनिधीने बहुजन समाजाच्या सेवेसाठी त्यांच्या सोबतीने कार्य करण्यासाठी बारा वर्षे वयाच्या माणिकला आमंत्रणही दिले; परन्तु ''पुरेशा अभ्यासाअभावी तसेच गुरुच्या तशा आदेशाविना आपला प्रस्ताव तूर्त स्वीकारता येत नाही''– म्हणून माणिकने त्याला साभार नकार दिला.

तसा गुरु आडकोजींचा लहरी सहवास माणिकला पुढे फार काळ लाभला नाही. त्यांच्या देहाने शंभर वर्षे पूर्ण करताच १९२१ च्या कार्तिकातील त्रिपुरारि पौर्णिमेला त्यांनी संजीवन समाधी घेतली; आणि त्या समाधिसंस्कारादरम्यान सद्‌गुरु श्रीसमर्थांनी माणिकला स्नेहार्द्र दृष्टीतून शक्तिसंक्रमणाची अनुभूती दिली. माणिकचे वय त्यावेळी केवळ १२ वर्षांचे होते. गुरुवियोगाच्या दुःखाने माणिक वेडापिसा झाला. त्या मनःस्थितीत समाधीजवळच त्याने तीनचार महिने रात्रंदिवस धरणे धरले. त्यातच त्याला अंतःसूचना मिळाली– ''भक्ती कर...श्रीहरीचे अतिप्रेम धर !''

भक्तिमार्गाचा खरा पाठ पंढरपूर येथेच मिळेल या स्फुरणाने मग कुठलीही पूर्वतयारी न करता माणिक सरळ पंढरपुरास निघाला. अमरावतीस येऊन त्याने रेल्वेचा डबा गाठला. जवळ तिकीट नाही, खिशात पैसा नाही, पोटात अन्न नाही, अंगात धड कपडे नाहीत, चेहऱ्यावर रया नाही– अशा परिस्थितीत तिकीट चेकरच्या ठोकरा खात तो पंढरपुरास पोहोचला आणि तिथेही धक्क्यावर धक्के खात लोकप्रवाहाबरोबर पांडुरंगाच्या पायाशी जाऊन थडकला. पण तिथेही पांडुरंगाचे पाय न सोडल्यामुळे बडव्यांचे बडगे खाऊन खाऊन निश्चेष्ट पडला. अखेर त्यातल्याच एका बडव्याला दया आली आणि त्याने माणिकला आश्रय दिला व

मुक्कामी ठेवून घेतले. माणिकनेही तेथे राहून मनसोक्त पांडुरंग दर्शन घेतले. नारायण गुरुंची पालखी घेऊन आलेली यावलीची भक्तमंडळी माणिकला यात्रेत भेटली. 'पुंडलिकाचा आदर्श ठेवून आईवडिलांप्रति कर्तव्य पार पाड'– असा हितोपदेश देऊन गेली. तो हितोपदेशच प्रसादाप्रमाणे अंगी भिनवून माणिक जन्मभूमी यावलीस परतला.

यावलीत पोहोचताच त्याला कळले, बंडोजींनी शिलाई मशीन चिंचखेडला नेऊन ठेवली होती आणि चैनीसाठी ते आपल्या धनिक मित्रांसोबत मुंबईला निघून गेले होते. माणिकने घेतलेल्या मशीनचेही हप्ते थकले होते आणि नवे दुकान थाटण्याची तर ऐपत नव्हती. त्यामुळे काही दिवस सालोरा गावी कृष्णाजी पाटलाकडे त्याने शिवणकामाची नोकरी केली. पण नंतर गावी येऊन घरीच स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. त्याचे मित्र कुठून कुठून कामे आणून देत आणि माणिक ती शर्थीने भराभर पूर्ण करी. अशाप्रकारे मशिनचे थकित हप्ते तर त्याने भरलेच; शिवाय मशीन स्वतःच्या मालकीची होण्यासाठी आवश्यक ती मजलही गाठली. पुढे दोन महिन्यांच्या परिश्रमातून माणिकने शिलाई मशीनचे सारे हप्ते चुकविले आणि वर मायमंजुळेसाठी एक सुंदर सोन्यामोत्याची नथही घडवून घेतली. मुलाच्या परिश्रमातून घडवली गेलेली ती नथ पाहून त्या माऊलीचे हृदय भरून आले. तशीही माणिकची श्रमसेवा तिला आनंदविभोर करून गेली होतीच; शिवाय गावोगावी भटकताना माणिकने आईची जबाबदारी ज्या मित्रांकडे सोपवली ते ती उत्तमप्रकारे निभवीत असल्यामुळे मायमंजुळा सुखात होती.

मात्र दिवसेंदिवस वाढत चाललेली माणिकची मानमान्यता खुपणारे नत्थुबुवा महानुभाव किंवा हनोतीबुवा यांनी माणिकचा बालमित्र मोतीराम उमप याच्या डोक्यात भलभलते विकल्प भरून त्याच्याकरवी माणिकची परीक्षा घेण्याचा चंग बांधला; आणि माणिकच्या तळहातावर कापूरवड्या ठेवून आणि त्या पेटवून त्याच्या 'साधुत्वा'च्या निश्चितीसाठी अग्निपरीक्षा घेतली. निर्विकार चेहऱ्याने व मिटलेल्या डोळ्यांनी माणिकने जळण्याची वेदना सहन करून आपल्या साधुत्वाची ग्वाही तर दिलीच; पण तळहातावर टरारून आलेला फोड मायमंजुळेच्या नजरेत न येऊ देण्यासाठी त्याला जणू रामलीला करावी लागली. पुढेही, यावलीच्या जुन्या हनुमान मंदिरात माणिक ध्यान लावून बसला असता 'सोनारबुवा' नावाच्या

वावदूक साधूने माणिकच्या मांडीवर कापराची मोठी वडी ठेवून ती स्वतः काडी लावून पेटवली. मांडीवर मोठा फोड आला तरी माणिक काही समाधीतून जागा झाला नाही. जागा झाल्यानंतरही कसलाच आरडाओरडा न करता तो शांतपणे निघून गेला. नंतर त्या जातिवंत द्वेष्ट्यांनी गावातल्या शिवालयात माणिकला प्रवेशच करता येऊ नये यासाठी पुजाऱ्याशी संधान बांधले, तसे पुजाऱ्यानेही त्याला मंदिरातून धक्के मारून काढून दिले. तेव्हा मात्र माणिक अस्वस्थ झाला आणि त्याने प्रण केला– 'देव तरी माझ्यासाठी मंदिर सोडून मैदानात आला पाहिजे नाहीतर मी तरी या बंदिस्त देवाला सोडून मोकळ्या मोठ्या देवाकडे धाव घेतली पाहिजे!'– आणि तेव्हापासून तो मोकळ्या रानावनातच तासन्‌तास आपली भजने–कीर्तने करू लागला.

अमरावतीजवळच्या सावंग्याला गुढीपाडव्यास अवधूती संप्रदायाच्या शेकडो भजनी दिंड्यांची रीघ लागे. संपूर्ण समतेचे उपासक असलेल्या त्या भजनींच्या लेखी देवमूर्तींनाही स्थान नसे. कृष्णाजी महाराज अवधूत यांच्या स्मरणाप्रीत्यर्थ मंदिरात केवळ गादी हेच अधिष्ठान ठेवलेले असे. माणिकने ते पाहिले आणि असा तो 'मोकळा देव' त्याला मनापासून भावला. सावंग्यावरून तो थेट अमरावतीला हरिश्चंद्र पाटलाच्या वाड्यावर येऊन थडकला. त्यावेळी वाड्याला गणेशोत्सवानिमित्ताने यात्रेचे स्वरूप आले होते. गणेश मूर्तीपुढे रात्री आणि दिवसादेखील माणिकचे खंजरी भजन झणकारू लागले. त्याच धामधुमीत धनराज ओळीतल्या मारूती मंदिराच्या पटांगणात एका महायज्ञाचेही आयोजन होते; ह.भ.प. मुंगळेकर महाराज हे त्या यज्ञाचे प्रेरक होते. ब्राह्मणवाडा– भगतच्या धुमाळ पाटलांनी बाजीराव पाटलांना सोबत घेऊन महाराजांना माणिकचा परिचय 'तुकड्या' या नावाने करून दिला, तेव्हा मुंगळेकर महाराज म्हणाले– ''तुकड्या काय म्हणता? महाराज म्हणा, बुवा म्हणा ! ही व्यक्ती सामान्य नाही, महान आहे. बलाढ्य आहे!..'' तेव्हापासून १५ वर्षे वयाच्या माणिकला 'लहान बुवा' म्हणून सारे संबोधू लागले. आश्चर्य तर पुढे घडले. यज्ञसमाप्तीच्या सोहळ्यात यज्ञाची पूर्णाहुती होताच मुंगळेकर महाराजांनी वीणा खाली ठेवून नमस्कार केला; आणि अग्रपूजेसाठी सर्वत्र नजर फिरवीत घोषणा केली– ''माणिकदेव उर्फ लहान बुवाला व्यवस्थापकांनी आणून या प्रमुख गादीवर बसवावे.'' मग मुंगळेकर

महाराजांनी प्रसन्न मुद्रेने माणिकची पूजा करून त्याच्या कंठात पुष्पमाला घातल्या. समाप्तीनंतर पाटलाच्या वाड्यात माणिकसोबत फलाहार करताना उद्धव महाराज म्हणाले- ''गडे हो ! ही साधीसुधी दिसणारी व्यक्ती पुढे जाऊन फार बलाढ्य विभूती होणार अशी चिन्हं मला दिसताहेत!'' मेजवानीनंतर पंढरपूरच्या कार्तिकवारीसाठी निघालेल्या उद्धवबुवांनी माणिकला कडकडून मिठी मारली. त्याच्या या अपवादभूत सन्मानाने उपस्थित उच्चभ्रूंच्याच नव्हे तर खंद्या विरोधकांच्याही हृदयांत हळुहळू पालट होत गेला.

कार्तिक पौर्णिमेला मायमंजुळेसह माणिक वरखेडला गेला; आणि उभयतांनी सद्गुरुंचे समाधिदर्शन घेतले. आरती, पंचपदी, पालखी, मिरवणूक, दहीहांडी या सर्व कार्यक्रमांत माणिकने आस्थेने भाग घेतला. पण सारा वेळ त्याच्या मनात एक प्रश्न खळबळत होता- 'मातापित्याच्या सेवेचा कर्तव्ययोग किंवा गावकऱ्यांचे हृदयपरिवर्तन यातून माझ्या जीवनाचे साफल्य होईल का?'... मात्र वरखेड ते यावली या प्रवासादरम्यान त्याचा काहीएक निर्धार पक्का झाला. मग त्याने दुसऱ्याच दिवशी मशीन विकून सत्यनारायणचे मोठे आयोजन केले व त्या निमित्ताने भुकेल्यांना अन्नदान केले. भजनाने त्याचा समारोप करताना त्याने स्पष्ट केले- ''मी कितीही श्रम करू शकतो; पण मला त्याची गरज नाही. खाईन थोडे पण काम करीन भरपूर- तेही असेच, जे माझ्या देश व धर्माला उपयोगी होईल!''

माणिकने मशीन विकून पैसे असे उधळून टाकल्याचे जेव्हा बंडोजीबाबाला कळले तेव्हा तिरीमिरीतच ते यावलीला आले आणि मंजुळेला त्याचा जाब विचारला. इतकेच नव्हे तर ''माणिक तुझी नथसुद्धा उडवून टाकील'' म्हणून छद्मीपणे त्यांनी तिच्याकडे नथीची मागणी केली; आणि तिने टाळाटाळ करताच लाथाबुक्क्यांनी मारून तिच्याकडून त्यांनी ती नथ हिसकावून नेली. मात्र मित्रासोबत पायटांगीने परत जाताना भर बाजारात एक उद्दाम सांड त्यांच्या मागे लागला; व त्याने पायटांगीच्या बैलावर हल्ला केला. बंडोजी उतरू लागले तसे त्या सांडाने त्यांनाच धडक दिली आणि चांगले चेचून काढले. मात्र परत झोपडीकडे जाण्याची बंडोजीची हिंमत झाली नाही उलट सोबतच्या मित्राला विनंती करून ते उपचारासाठी अमरावतीच्या दवाखान्याकडे तडक निघून गेले.

थोड्याच दिवसांत यावलीत प्लेगची साथ आली. लोकांनी आपापली

घरे सोडून गावाबाहेर झोपड्या बांधल्या. माणिकनेही मित्राच्या मदतीने रामरावबापूंच्या चिंचबनात साधी टुमदार झोपडी उभारली. मात्र एकाएकी बंडोजीबाबा अमरावतीहून निघून थेट त्या झोपडीवर आले; माय मंजुळेला त्या झोपडीतून हुसकून दिले आणि माणिकसह शेजारच्या झोपडीत रात्र काढायची आज्ञा केली. त्यांच्यासोबत शहरातून काही आंबटशौकीन पाहुणे होते आणि त्यांच्यासाठी बंडोजींनी तमाशा आणला होता. माणिकला हे कळले आणि त्याने त्या साऱ्या कामातुरांची खोड मोडण्याचे ठरविले. भरपूर चिंध्या आणि रॉकेल घेऊन झोपडीच्या चारी कोपऱ्यांवर त्याने बोचकी पेटवून दिली. आग पाहून आतल्या तमाशाखोरांचे धाबे दणाणले आणि जो तो जिवाच्या आकांताने झोपडीच्या दारातून बाहेर पडायला धावू लागला. बंडोजींच्या ध्यानात आले, ही सारी करतूत तुकड्याचीच! माणिक मात्र त्या रात्रीच काय, दुसऱ्या दिवशीही कोणाला दिसला नाही. रात्रभर जंगलातल्या एका प्रचंड झाडावर बसून तो विचार करीत राहिला : 'आई-बापाच्या सेवेचा असा आंधळा आदर्श जपणे काय कामाचे?' विचाराच्या वादळाने त्याचे डोके भणभणले तसा झाडावरून भल्या पहाटे उतरून तो वरखेडच्या दिशेने पायपीट करीत निघाला. गुरुमहाराजांच्या समाधीपुढे लोटांगण घालून जिवाच्या आकांताने उत्तर मागू लागला. माणिकच्या डोक्यात विवेकाचा प्रकाश प्रखर होत गेला आणि त्याच्या हृदयातूनही एकच निर्धार बाहेर आला-गृहत्याग.

*चल सोड घराची आस। बनु नको दास। मनी विषयाचा।*
*घे प्रेम-कमंडलु चिमटा वैराग्याचा।।*

दुसऱ्या दिवशी पहाटेस तो वरखेड स्टँडवर आला. त्याची तांबारलेली औलियासारखी चर्या पाहून एका ट्रक ड्रायव्हरने त्याला अमरावतीला आणले. हरिश्चंद्र पाटलाच्या वाड्यावर त्याचे स्वागत झाले. खोदखोदून विचारल्यावर त्याने सांगितले- ''दिल अब उचट गया। जाते जाते आप लोगोंसे बस मिलने आया।'' हरिश्चंद्र पाटील, बाजीराव पाटील आदींनी गृहत्यागापासून परावृत्त करण्याचा निकराचा प्रयत्न केला. त्यावेळी माणिक गप्प बसला खरा; पण रात्री सारे झोपेत असताना तो उठला आणि त्याने थेट यावलीची वाट धरली. यावलीला तो सरळ वामनराव अहेरेंच्या झोपडीवर गेला. त्याचे सारे प्रेमीजन तिथे आले होते. माणिकने साऱ्यांना सांगितले- ''गुरुमहाराजांच्या आज्ञेवरून मी यात्रेला

जात आहे. माझ्या माघारी मायची चिंता तुमच्याकडे!...''

गृहत्यागाचा मनोदय त्याने मायमंजुळेला तेवढा सांगितला आणि समजाविले– ''गुरुमहाराजांच्या चरणीच तू मला अर्पण करून टाकले आहे ना! त्यांच्याच आज्ञेने मी जात आहे; तर मग दुःख कशाला?''

लहान बालकाप्रमाणे रात्रभर माणिक मंजुळामातेच्या कुशीत झोपला आणि पहाटेच्या साखरझोपेत सारे मग्न असता तो हळूच बाहेर आला– जन्मभूमीचा त्याग करण्याच्या दृढ निश्‍चयाने. त्याला हवे होते ते उग्र विराट वनदर्शन, पर्वतकडे, वाघ–सिंह–अस्वल यांनी दाटलेले अरण्य! आणि मग भुईवर खुरडणे त्यागून नव्या निर्धाराने त्याने मुक्त आकाशात झेप घेण्याचे निश्‍चित केले. भल्या पहाटेस यावली परिसरातून माणिक बाहेर पडला. मुख्य सडकेवर येताच त्याला महादेवाची गाणी गाणारा जनसमूह दक्षिणेकडून उत्तरेकडे जात असलेला दिसला. ते सारे शिवभक्त सालबर्डीच्या छोट्या महादेवाकडे दिंडी घेऊन निघाले होते. २१ फेब्रुवारी १९२५ रोजी महाशिवरात्रीच्या त्या मुहूर्तावर त्या भक्तांचा मागोवा घेत माणिक यावलीपासून दूर दूर निघाला.

* * * * *

## दोन : साधना

महादेवाचा पोहा दक्षिणेकडून उत्तरेकडे चालला होता. स्त्री-पुरुष आळीपाळीने महादेवाची गाणी म्हणत होती. ''हर बोला! हरहर महादेव!'' हा उद्घोष वारंवार ऐकून माणिक त्यांच्यासोबत निघाला. पोहा छोट्या महादेवाला निघाला होता. मोठा महादेव म्हणजे मध्यप्रदेशातील चौरागड. छोटा महादेव म्हणजे बैतुल व अमरावती या जिल्ह्यांच्या सीमारेषेवर सातपुडा पर्वताच्या कुशीत वसलेलं पुरातन श्रेत्र सालबर्डी. मोर्शीपासून ५ मैलांवर असलेल्या त्या क्षेत्रातील एका प्रचंड शिळेवर आसन मांडून माणिक ध्यान करू लागला. अस्वल, वाघ आदि रानटी पशूंची पर्वा न करता त्याने तेथे काही दिवस काढले. परन्तु आदिवासी टोळ्या तसेच अन्यही यात्रेकरू दर्शनाला येत आणि गर्दी करू लागत. यात्रा संपताच माणिक वरखेडकडे निघाला. गुरु आडकोजींचे दर्शन घेऊन नागपूर व नंतर रामटेकच्या जंगलात जाण्याचा त्याने निश्चय केला आणि वरखेडच्या दिशेने त्याची पावले एका अननुभूत आनंदात पडू लागली.

मिळेल तिथे झऱ्याचे-मोटेचे पाणी प्यायचे, भिक्षेचे अन्न खायचे आणि भक्तिगीते गात भारल्या मनाने पुढे जायचे-असा त्याचा मनमौजी प्रवास सुरू झाला. वरखेडला पोहोचताच समाधीकडे जाऊन सद्गुरुच्या पादुकांवर मस्तक ठेवून तो समाधीजवळ ध्यानस्थ बसला. त्याच्या हृदयात जणू नवीन शक्ती संचरली. नव्या स्फूर्तीने पुन्हा नमस्कार करून तो वारे भरलेल्या वासराप्रमाणे धावतच निघाला. वर्धा नदीच्या पात्रात उडी घेऊन पोहतच त्याने पैलतीर गाठले. श्यामजीपंतांच्या तळेगावला त्याने गडावर मुक्काम केला. रस्ता वाकडा करून सेलू घोराडला केजाजी महाराजांच्या नामसमाधीचं दर्शन घेऊन तो पुढे निघाला. वाटेवरल्या हिंदू, जैन, मुस्लिम यांच्या एकेका पवित्र क्षेत्राला काही काळ थांबून मगच तो पुढे निघत होता. नागपूरला ताजुद्दीन बाबांच्या दर्शनाला जाताजाता रात्र झाली. माणिकला पाहाताच ''आडकोजी का बेटा आया रे!''- म्हणून बाबांनी थाळीतले प्रसादाचे दाणे माणिककडे फेकले. माणिकने ते भक्तिभावाने वेचले आणि नमस्कार करून तो रामटेक मार्गावर पुढे निघाला.

बारा कोसांवरच्या रामटेक क्षेत्री माणिक तिसऱ्या दिवशी जाऊन

पोहोचला. रामटेक क्षेत्र म्हणजे धर्मप्रभा आणि सृष्टिशोभा यांचा मनोहारी मेळ. वराह, नरसिंह, वामन अवतारांप्रमाणेच नागार्जुन, कालिदास या प्रतिभावंतांचे, बौद्ध- जैन-महानुभाव-वैष्णव-शैव आदि पंथांचे तसेच वाकाटक-गुप्त-यादव-भोसले या राजवंशीयांचेही प्रेरणास्थान म्हणून रामटेक प्रसिद्धच आहे. त्याआधीच्या रामटेक भेटीत माणिकने रामराजाचे मुख्य मंदिर, नगारखाना-गोकुळ दरवाजा, पिंडदानाकरिता रामगडाच्या तळाशी उभारला गेलेला अंबाळा तलाव, धूम्रेश्वर मंदिर, वराह मंदिर, नृसिंह मंदिर ही स्थाने पायाखालून घातली होतीच; आता नव्याने सिंदूरगिरी- रामसागर परिसरातून फिरून व तलावात मनसोक्त जलक्रिडा करून त्याने कर्पूरवापी, सिंदूरवापी, वामन मंदिर, भोगाराम देऊळ आणि चक्रधरांचे ओटे यांचेही दर्शन घेतले आणि वननिरीक्षणानंतर नागार्जुन टेकडीवर रात्रीची विश्रान्ती घेतली.

दिवसा विशाल अशा राम सागराजवळची पुरातन स्थाने शोधायची, सिंदूरगिरीच्या दऱ्याखोऱ्या धुंडाळायच्या आणि मग कुठल्यातरी प्रशांत जागी बसून देवाला हृद्गत ऐकवायचे- असा त्याचा दिनक्रम सुरू झाला. सृष्टीतील रम्यभीषण देखावे त्याच्या देवपिसेपणात भरच घालत होते. व्याकुळता अशी की-

*बेचैन तुझ्याविन जीव जसा, जणु गायिस पाहत वत्स फिरे।*
*तडपे नच पाणि मिळे राहण्या, त्या मासळिचा जणु प्राण हरे।।*

दररोजचे भिक्षाटन मात्र त्याला कंटाळा आणी. पुढे दर दोन दिवसांनी खाली वस्तीमध्ये तो भिक्षाटनासाठी जाई. त्याची आर्त भक्तिगीते लोकांचे चित्त वेधून घेत. पुढे पुढे तर एक दिवसाची भिक्षा तो आठ-आठ दिवस कोरडीच खाऊ लागला. राहाण्यासाठी म्हणून त्याने पडक्या 'कापूर बावडी'ची जागा निवडली. कड्याच्या पायथ्याशी असलेल्या त्या पायऱ्यापायऱ्यांच्या चौकोनी विहिरीत पडकी भुईघरे, माजलेल्या वृक्षवेली, वन्य प्राणी व हाडासापांचे अवशेष अधूनमधून दिसत होते. आवश्यक ती सफाई करून दिवसभराच्या ध्यान-चिंतनासाठी त्याने हक्काची जागा करून ठेवली. रात्र पडल्यावर मात्र तो नारायणटेकडीकडे जाई आणि मोकळ्या हवेत विश्रान्ती घेई. पुढे तर भिक्षाटनाचा कंटाळा येऊन कवठा-बेलाच्या किंवा चिंच, निंब, गुंजेच्या कोवळ्या पानांवर तो गुजराण करू लागला.

पण त्याचा विपरित परिणामही लवकरच दिसून येऊ लागला.

बद्धकोष्ठतेतून पोटशूळ बळावला आणि माणिक तापाने फणफणला. पण काळजी घेणार कोण? औषधे तर दूर; तिथे अन्न नाही की पाणी नाही. केवळ ईश्वरावर भार टाकून दिवस काढल्याविना गती नाही. कधी चिंतन कधी ग्लानी– अशा अवस्थांमधून हेलकावत माणिकचा आजार शेवटी ओसरला आणि हळुहळू पालेमुळ्यांवरून तो भिक्षाटनापर्यंत त्याने पुनश्च झेप घेतली.

वनसंचारात रानडुक्कर, लांडगे, वाघ समोरून आले की माणिक झाडावर चढे. एकदा तर समोर वाघ येऊन उभाच राहिला तेव्हा माणिकने डोळे मिटून देवाचा धावा केला. वाघ हळुहळू निघून गेला. सर्प आणि वानर यांचे स्वभावधर्म जाणून त्यांच्याशी कसे वागावे हे तो अनुभवाने ठरवू लागला व स्वतःची संकटे निवारू लागला. त्यामुळे अलिकडे तर त्याला अरण्याची भितीच वाटेनाशी झाली. उलट संतसज्जनांमार्फत देवाचे दर्शन कधी होईल याचाच ध्यास त्याने धरला होता; आणि त्यामुळेच अलिकडे गुरु आडकोजी महाराजांची त्याला फार आठवण येऊ लागली. कारण त्यांनीच एकदा माणिकला सांगितले होते–''एक संतच तुला मार्ग दाखवील.''

देवदर्शनासाठी व्याकुळ झालेला माणिक पहाटेस देवबावडीजवळच्या एका शिळेवर बसला असता दुरून खडावांची चाहूल लागली आणि थोड्याच वेळात घोटीव बांध्याचे एक तेजस्वी तपस्वी माणिकच्या पुढ्यात उभे होते ! भारल्यासारखा माणिक उभा झाला आणि त्याचे हात आपोआप जोडले गेले. माणिकच्या मस्तकावर हात ठेवून तपस्वीने विचारले– ''अरे, तू आडकोजी का बेटा है नं? प्रभू की खोज में ऐसेही निकल पडा रे?'' माणिकने मान डोलावली, तेव्हा त्याचा हात धरून तपस्वी बोलले– ''प्रभू क्या बाहर बैठा है रे पगले? वह तो घट-घट का निवासी है। बिना योग के उस का संयोग कहाँ?... चल मेरे साथ, मैं तुझे योगविद्या सिखाता हूँ।''

चेटूक झाल्यासारखा माणिक त्या यतीच्या मागोमाग देवबावडीच्या भुयारी मार्गाने निघाला. ते एका प्रशस्त गुंफेत शिरले. चहुओर वृक्षलतांची झाडी आणि मध्यभागी एक जळती धुनी. योगीराज एका बाजूच्या व्याघ्रचर्मावर बसले आणि समोर माणिकला बसवून कमंडलूमधील तीर्थ त्यांनी माणिकच्या हातावर दिले. म्हणाले– आदिनाथांपासून चालत आलेला हठयोग शिकवीन. कुंडलिनीचे

उत्थापन, षट्चक्रभेदन आणि सहस्रारचक्रायोगे ज्योतिर्मय ब्रह्माचे दर्शन घडवून देईन..! तुझी पूर्वतयारी बालपणापासूनच होत आली आहे. शुचिर्भूत तनमन, सहज स्वाभाविक नियमन, प्रदीर्घ एकासन, जलकुंभक हे तर साधले आहेसच; शिवाय प्रत्याहार, त्राटक आणि सगुणध्यान हा तर तुझा छंदच झाला आहे. अजपाजप श्वासोच्छ्वासातून साधला आहेस, तसा प्रकाश आणि नादही अनुभवले आहेत. सगुण ध्यान, भावसमाधी, मंत्रयोग आणि नादयोग आधीच तुला साधला आहे. तेव्हा त्यांच्या पुढचा हठयोग निश्चितच आत्मसात करता येईल.

त्या योगीराजाने त्याच्याकडून प्रारंभी शरीरशुद्धीच्या क्रिया करवून घेऊन सिद्धासने व प्राणायामाचा अभ्यास उजळून दिला. नंतर केवल-कुंभक साधण्याचा अभ्यास करवून घेतला. शिष्याच्या प्रगतीचा वेग अजमावून त्या सिद्धयोग्याने हठयोगाच्या दुस्तर क्रियांना आरंभ केला व दोन महिन्यांच्या सलग कालावधीत त्याच्याकडून ब्रह्मरंध्रात शिवशक्तियोग साध्य करवून घेतला. माणिक कितीतरी वेळपर्यंत त्या आत्मानंदाच्या समाधीत मग्न होता! १७ वर्षे वयाच्या माणिकचंद्राची ती पूर्णता पाहून त्या तपस्वी योगगुरुचा हृदयसागर उचंबळून आला. कालान्तराने त्याच्या टाळूवर स्पर्श करीत योगगुरुने अवरोहणाचा आदेश पोहोचविताच बेभान माणिकचे भान हळुहळू प्राणाबरोबर प्रथम भ्रुकुटिमध्यात व नंतर खाली खाली उतरत पिंडात येऊन पूर्ववत् स्थापन झाले.

माणिकची योगसाधना आता पूर्ण झाली होती आणि एका अभूतपूर्व अनुभवाअन्ती पुनश्च सामान्य जीवनप्रवाहात नव्या चेतनेसह त्याचे पुनरागमन झाले होते. श्रद्धापूर्ण हृदयानिशी माणिकने त्या अद्भुत योगगुरुच्या चरणी मस्तक ठेवले. ''बालक, मैं संतुष्ट हूँ। तुम्हारा कारज अब सिद्ध हुवा है। अब तुम इच्छानुसार चाहे जहाँ जा सकते हो। पर ध्यान रहे, अभ्यास निरंतर जारी रखना।'' हे गुरुवचन ऐकून नि त्या सिद्धाचे आशीर्वाद घेऊन माणिक त्यांच्या त्या योगगुंफेतून बाहेर पडला. जे साध्य करण्यासाठी साधकांना १२-१२ वर्षे तपश्चर्या करावी लागते तो हठयोग त्या सिद्धगुरुच्या कृपेने त्याने वयाच्या सतराव्या वर्षीच आत्मसात केला होता. अर्थात् त्यामागे त्याची तीव्र जिज्ञासा आणि शुद्धबुद्ध जीवनशैली ही शिदोरी होतीच! त्या सिद्ध योगगुरुने दोन महिन्यांच्या त्या कालावधीत माणिकला निवडक कंदमुळे व शुद्ध निर्झराचे पाणी यांवरच ठेवले होते. त्यामुळे आता त्याची

काया कात टाकलेल्या नागाप्रमाणे तेजःपुंज बनली होती. त्या समर्थ योगेश्वराच्या योगकुंजातून बाहेर आल्यावर माणिकने नागार्जुन स्थानावर काही वेळ घालविला व नंतर नारायण टेकडीवरील किल्ल्यात मुक्काम ठेवला. नारायणस्वामीच्या संजीवन समाधीपुढे किंवा कोपऱ्यातील भुयाराआत माणिकने उजळणी अभ्यास सुरू ठेवला. प्राणांचे आवागमन अभ्यासाने सुलभ होत गेले व तो प्रायः योगानंदात मग्न राहू लागला. कधी माधुकरी मागून आणावी, तर कधी गुरुने निर्देशिलेल्या वनस्पतींच्या कंदमुळांवर निर्वाह करावा असा त्याचा दिनक्रम सुरू झाला. जनसंपर्क वाढू नये याची काळजी घेणे अभ्यासाच्या निकडीपोटी त्याला जरुरीचे होते. त्यामुळे रामटेक गावात भिक्षा मागणे तर त्याने पूर्णपणे बंदच केले होते.

असे असले तरी वामन लोहकरे आणि अन्य मित्रमंडळी एकदा माणिकदेवास भेटण्यास रामगडावर आली. माणिकदेवाने त्यांना जंगलातील कंदमुळे खाण्यास दिली. सर्व म्हणाले–''आम्हाला जंगलच्या चाऱ्याने भूक जात नाही,'' तेव्हा माणिकदेव म्हणाले, ''तुम्हाला चमचमीत असे काही पाहिजे असेल.'' इतक्यात एका मंदिरातून एक स्त्री उतरली–तिने सांबारवड्या आणल्या होत्या. माणिकदेवाने त्यातली एक घेऊन बाकी सर्वांना वाटून दिल्या. सर्व आश्चर्याने पाहातच राहिले. आता पाणी प्यायला जवळ काहीच नव्हते. जवळच एक कोरडी विहीर होती. तेथे सर्वजण आले. माणिक काटकीने खोदू लागला. एक दगड बाहेर आला व तेथून पाण्याचा थंडगार झराच लागला. सर्वजण पाणी पिऊन तृप्त झाले. माणिकदेव पळत सुटला आणि नारायण टेकडीच्या अंधारलेल्या भुयारात गडप झाला. तिथं जाण्याची कुणाची हिंमत झाली नाही. घरी गेल्यावर हा चमत्कार मुलांनी सांगितल्यावर वयोवृद्ध श्री.दामोदर चांद्रायण देखील माणिकच्या भेटीस गेले. ते स्थान भुजंगाचे समजले जाते, म्हणून माणिकदेवाने त्यांच्या विनंतीवरून समोरील ओलसर जागेतला एक दगड जमिनीतून बाहेर काढला. त्याच्या खालून एक गहूवर्णी साप सळसळत वर आला. चांद्रायण व मुले थक्क झाली. माणिकला त्यांनी रामटेक गावात नेले. भजन गाण्याचा आग्रह धरला. माणिकने दोन भजने म्हटली, इतकेच नव्हे तर रामटेकला भिक्षाटनास येण्याचेही मान्य केले व तो परत रामगडकडे गेला.

कोजागरी पौर्णिमेच्या सुमारास माणिक चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा

तालुक्यातील चिमूरजवळील नेरी-भूतेश्वर गावचे रहिवासी श्री.कृष्णराव भुते यांचेसोबत गोंडवनात आला. नेरी हे पाचशे घरांचे गाव चिमूरपासून १४ मैलांवर आहे. कृष्णराव भुते हे या गावचे मालगुजारी-मुखत्यार होते. गावाच्या आजुबाजूस रम्य टेकड्या असून गेंडुराचिंचोला नदी आहे. कृष्णरावांचे वाड्यात राहायचे व भोवतालचे जंगलात फिरून यायचे, गुराख्यांच्या मुलांसोबत भजने म्हणायचे, नदी तलावात पोहायचे- अशा स्वच्छंदी कृतींद्वारे बालगोपालांमध्ये माणिकने एक आगळवेगळे चैतन्य निर्माण केले. श्रीमंत कृष्णरावांच्या घरचा हा 'अवलिया' लोकांच्याही आकर्षणाचा व चर्चेचा विषय झाला. कृष्णरावांची भाविक पत्नी लक्ष्मीताई यशोदामातेच्या भूमिकेतून माणिकला श्रीकृष्णच मानायची. माणिकला ती 'देवा' किंवा 'देवबा' म्हणूनच संबोधीत असे. लोकही त्या तरुण देवबाबाच्या दर्शनाला गर्दी करीत. कृष्णराव श्रद्धापूर्वक माणिकदेवाला स्नान व भोजन घालीत. माडीवरील एक स्वतंत्र खोली सजवून त्यांनी त्याची राहाण्याची उत्तम सोय करून दिली होती. कधी जनांत तर कधी वनांत असा त्याचा मुक्तसंचार येथे सुरू झाला.

लोहाऱ्याच्या एका आदिवासी भक्ताने माणिकदेवास घरी येण्याचे आमंत्रण दिले. पण आपल्या हातचे अन्न कसे चालेल? म्हणून त्याने पीठकूट देऊन त्यांनाच स्वयंपाक करण्याची विनंती केली. माणिकदेवाने त्याच्या समाधानासाठी स्वयंपाक करण्याचा प्रयत्न तर केला पण मध्येच त्यांना भावसमाधी लागली नि भाकरीबरोबर हातही तव्यावर पोळू लागला. भाविकाला फार दुःख झाले. भाजलेल्या हाताला सहद लावीत तो गहिवरून म्हणाला, ''बाबाजी ! तुम्ही देवच आहात जी !'' माणिकदेव म्हणाला, ''देवानं धान्य केलं. त्याला कायचा बाट जी ? मानसाले ढोराचं दूध चालते न् मानसाची भाकरच का बा नाही चालाची?'' हे शब्द ऐकताच त्या गृहस्थाने आपल्या दवडीतली भाकर माणिकदेवाच्या ताटात वाढली. साक्षात् देवच आपल्या घरी जेवतोय्, असा त्याला अपूर्व आनंद झाला. तिथल्या देवळात ताट वाजवून माणिकदेवाने भजने म्हटली. कुणी ढोलकी तर कुणी टाळ आणले. लोकांना त्या बालसंताने जणू वेड लावले! दुसरे दिवशी पहाटेस ते गुराखी मुलांसोबत नेरीकडे निघाले. रस्त्यात चारपाच माणसे व एक स्त्री होती. ती रडत होती. तिला माणिकदेवाने विचारले तेव्हा ती म्हणाली,''नागपुरी माझ्या मुलाला फासीची शिक्षा होणारा आहे का जी!'' त्यावर

माणिकदेव म्हणाला ,''अजी, ती फासी तं कवाचीच तुटली जी !'' कुणालाच खरं वाटेना. ती माणसे नागपूरला जाऊन आली तेव्हा माणिकदेवाचे शब्द खरे झाले होते. त्या माणसाला फाशीच्या शिक्षेतून सहीसलामत मुक्त केले गेले होते. सर्व आश्चर्याने थक्क झाले व माणिकदेवाला शोधू लागले; पण माणिक मात्र कुणालाच दिसला नाही.

अडाणी गोंडगोवाऱ्यांच्या संगतीत माणिकदेवाला आनंद वाटत असे. एका झोपडीत भिकरी नावाचा गोंड आजारानं कण्हत होता. तेथे जाऊन माणिकदेवानं त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याचा ताप बरा केला व त्यास आडकुजी महाराजांचे नाव घेऊन डोळे बंद करण्यास सांगताच त्याची पंढरपूरला जाण्याची इच्छा पूर्ण केली. सर्व पंढरपूर त्याला दिसू लागले व कधी न पाहिलेल्या आडकुजी महाराजांचेही दर्शन झाले. डोळे उघडले तर माणिकदेव निघून गेले होते. काही दिवसानंतर भिकरी जेव्हा वरखेडच्या यात्रेला आला तेव्हा प्रत्यक्ष आडकोजीबाबाची मूर्ती पाहून त्याला आश्चर्य वाटले. कारण त्याने स्वप्नात पाहिलेली मूर्ती हुबेहूब अशीच होती.

माणिकदेवाने आत्मचिंतन करून ठरविलं की, 'योग याग विधी येणे नोव्हे सिद्धी । पापाची उपाधी दंभधर्म ।।' हे जे ज्ञानदेवांनी म्हटले, तेच खरे आहे. म्हणून सगुणरूपातील ईश्वरदर्शनासाठी तो तळमळू लागला. त्याने हठयोग बाजूला सारून आता भक्तियोगाची कास धरली. जनताजनार्दनाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा मानली. योग समाधीतील शून्यवत् निर्गुण त्याला संतुष्ट करू शकले नव्हते. कथा–कीर्तनांमधून ऐकले होते की, देवाने अमुकाला दर्शन दिले, तमुकाशी तो बोलला, त्याचं अमुक काही काम केले. तेव्हा तो आपल्यालाही प्रत्यक्ष दिसावा, समक्ष आपल्याशी बोलावा, असं त्याला कां वाटू नये? याच उत्कंठेतून तो देवाला विनवीत होता.

मोखाळ गावच्या एका साधूने देवबाबाला सांगितले, ''आमच्या गावी एका बाईजवळ भोजपत्रावर लिहिलेला ग्रंथ आहे. तो ती कुणाला पाहू देत नाही. तो मिळाला तर तुम्ही अवश्य वाचा.'' माणिकदेव त्या बाईकडे आले. तिने तो ग्रंथ माणिकदेवाला दिला. त्याची मोडी लिपी होती. तो ग्रंथ बैलगाडीतून नेरीला वाहून नेऊन माणिकदेवाने भूतेश्वर मंदिरात वाचला. वैराग्यबोध व वेदांतबोध

वाचून माणिकदेवाच्या पूर्वार्जित संस्कारांना उजाळा मिळाला. ग्रंथ वाचून होताच त्या बाईकडे त्याने तो परत पाठवून दिला.

'मी'चा शोध म्हणजे आत्मचिंतन. आत्मचिंतनाने 'तत्त्वमसि' महावाक्याचा अनुभव येतो. आत्मसाक्षात्कार झाल्यावरच राजयोग साध्य होतो. मग साधक आंनदरूप होऊन आनंदसागरात रममाण होतो. याप्रमाणे माणिकदेव आता 'याचि देही' जीवन्मुक्तीचा आनंद लुटू लागला. कृष्णराव भुते यांचेकडेच न राहाता मिळेल तिथं दोन घास खाऊन तो अरण्याकडे धावू लागला. तपोवन गोंदुडा हे तेथून आठ नऊ मैल दूर होते. श्री पुरुषोत्तमराव फडणवीस हे तेथील पाटील होते. त्यांची आत्या मैनाबाई ही फार वजनदार महिला होती. तेथील सृष्टिसौंदर्य पाहून माणिकदेव प्रसन्न झाला. माणिकदेवाला साक्षात्कार झाला–'सूर्य हा माझा डोळा. वायु, प्राण, आकाश हे हृदय नि पृथ्वी हे माझं शरीर. विश्वाच्या कणाकणात व्यापलेल्या परमात्मरूपाशी आपला आत्मा समरस झाल्याशिवाय स्वानुभवाचा खरा आनंद मिळू शकत नाही.' आपल्या या अभ्यासासाठी गोंदुडा गावाजवळ माणिकदेवाने एक निसर्गगुंफा बनविली होती. आजूबाजूच्या वनात दाट झाडी व जाळी होत्या. अशा लताकुंजात त्याचा तासन् तास एकाग्र अभ्यास चालत असे. शेवटी त्याला शोधण्यास पाटीलबुवा माणसे पाठवीत.

'सो ऽ हम्' पेक्षा 'दासो ऽ हम्' हा भावच माणिकदेवाला अधिक आवडत असे. 'भक्तीच्या सुखस्वातंत्र्यी मोक्षही तुच्छ संतासी'–या सूत्रानुसार 'मुक्तीवरील भक्ती'चीच कास माणिकदेवाने धरली होती. याप्रमाणे आपला स्वरूप साक्षात्कार तो देवभक्तीच्या भाषेतूनच व्यक्त करीत होता. आणि मनमौजीपणाने अवधूतवत् सर्वत्र क्रीडा करीत होता. अहंकार होऊ नये म्हणून गुरुला सर्वस्व मानत होता. आपण फक्त जगण्याकरिताच जन्मलो नसून आपणाला काही तरी महत्त्वाच्या घटना घडवून आणायच्या आहेत, असे लहानपणापासूनच माणिकदेवाला वाटत होते. म्हणून त्याने कष्टाची परकाष्ठा केली. दुःख सहन केले. तेव्हाच 'आत्मवत् सर्व भूतेषु'चा अर्थ त्याला कळला. 'आत्मरूपाचे चिंतन । तोचि मुख्य साधु जाण।।'

वयाला सतरा वर्षे पूर्ण झाली तेव्हा गोंदुडा वनातून माणिकदेवाने भयानक अशा ताडोबा अरण्यात प्रवेश केला. आज लांब रुंद ४० x १० मैलांचे हे वाघांचे

वसतिस्थान 'राष्ट्रीय अभयारण्य' म्हणून प्रसिद्ध आहे. तलावाकाठी एका खारडीत एक अस्सल वाघ उभा असलेला त्याला दिसला. माणिकदेव तेथेच उभा राहिला. रात्रीचे वेळी श्वापदे पाणी पिण्यास तलावावर येत असत. त्यांचे तो निरीक्षण करू लागला. गोंड-कोरकू त्याला नमस्कार करून कंदमुळे आणि भातभाकर दिवसा देत असत. त्याने मारोतीच्या देवळात मुक्काम केला. चार पाच दिवसांनी अकस्मात माणिकदेवाच्या हृदयी जीवनकर्तव्याची सुस्पष्ट जाणीव स्फुरू लागली. रात्री त्याच्या हृदयाकाशात जणू मेघगर्जना घुमली...'हठयोग, राजयोग, प्रेमयोग एवढ्यातच परिपूर्ती झाली असं समजू नकोस. यापुढे तुला खरा कर्मयोग म्हणजे जीवनयोग आचरला पाहिजे...' माणिकदेव या विवेकवाणीपुढे नतमस्तक झाला. अकल्पितपणे त्याचे मुखातून भावपूर्ण उद्‌गार निघाले - "तू दाता मी दीन भिकारी, दे इतुके वरदान!"

आपल्या जीवनाची पर्वा न करता जगाला सर्वस्व लुटून द्यावे, हेच आपले जीवितकार्य असल्याचा साक्षात्कार माणिकदेवाला झाला आणि त्याचा उचंबळता उत्साह मुक्त कंठानं गीत गाऊ लागला- "चलाना हमें नाम गुरुका चलाना।" जगातील क्रूरतेवर प्रेम हेच औषध आहे असे माणिकदेवाला वाटत होते. या दिव्य प्रेम भावनेमुळे 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' असे संरक्षक कवच सर्वत्र त्याच्या प्रत्ययास येत होते. ताडोबाच्या जंगलात गोंड-कोरकू लोक एकदा माणिकदेवाजवळ जमा झाले. तो म्हणाला, "कुठलेही वाघ वा नाग सर्वांवर एकदम तुटून पडत नाही." इतक्यात एक वाघ तेथे आला तेव्हा माणिकदेव एकतारीवर भजन गात होता. त्यानं डोळे उघडले तर वाघ खुशाल समोर बसून भजनाचे स्वर तल्लीनतेनं ऐकत होता. त्याची मुद्रा सौम्य शांत होती. जणू तो म्हणत होता, 'मित्रा! आणखी ऐकव गड्या एक भजन!' आणि माणिकदेवाने आपले मंजुळ स्वरझंकार पुन्हा वातावरणात उधळले. तेव्हापासून तो वाघ रोजच त्याच्या जवळ येऊन बसायचा. माणिकदेव त्याच्या पाठीवरून हात फिरवायचा. कधी बरोबर फिरणे, एकमेकांना कवटाळणे, एकप्रकारे कुस्ती खेळणे सुरू झाले. त्यातच एकदा तर वाघाचा पंजा माणिकदेवाच्या डाव्या खांद्याजवळ लागला होता. साप, विंचू, विषारी इंगळ्या तासन् तास निरखत बसणे हा सुद्धा माणिकदेवाचा आवडता छंद होता. त्यांना मारलेले त्याला आवडत नसे.

नेरी गावात दोन पाटलांमध्ये वाद होता. त्यांचे भांडण मिटवावे म्हणून माणिकदेव तेथे आला. त्याने दोघांनाही समजावले. दुसरे दिवशी सकाळी दोन्ही पक्ष मारामारीच्या तयारीनिशी दाखल झाले. दोन्ही बाजूंना काठ्या, कुऱ्हाडी दिसत होत्या. केव्हा काय होईल सांगता येईना. वातावरण तंग झाले. औत शेतात घालण्याचा क्षण आला व बाचाबाचीने उग्र रूप घेतले. तितक्यातच जवळच्या जंगलातून माणिकदेव पुढे आला. त्याच्यासोबत त्याचा वाघमित्र होता. त्याला पाहाताच सारे लोक घाबरले. काही पळू लागले. माणिकदेव म्हणाला, ''गडे हो ! थांबा. जो कोणी अन्यायाने दुसऱ्यावर हल्ला करील त्यालाच माझा हा दोस्त पकडून खाणार आहे! त्यापेक्षा ज्याचं त्याला द्या अन् तंटा मिटवा.'' त्याप्रमाणे सर्वांनी कबूल केले नि वाद मिटला. माणिकदेवानं दोन्ही पक्षांना शपथ घ्यायला लावून गावाकडे रवाना केले आणि तो सुद्धा आपल्या त्या 'मित्रा'सह वनात निघून गेला.

नेरीत हां हां म्हणता ही वार्ता पसरली! परंतु माणिक भिकाला जंगलात सोडून परस्पर 'सात बहिणीच्या पहाडा'कडे निघाला होता. नेरी वरून हा सुंदर डोंगर केव्हापासून तरी माणिकदेवाला खुणावत होता. तेथे सातबहिणी गुप्त झाल्याची लोककथा प्रसिद्ध असून देवस्थानात चहूकडे भोळे भाविक लोक कोंबड्या बकऱ्यांचे बलिदान करीत. जागोजागी रक्ताची थारोळी साचलेली दिसत. त्यामुळे माणिकने तेथून काढता पाय घेतला. शंकरपूर परिसरातील आंबाई निंबाईचं देवस्थान त्यानं पाहिलं. डोंगरगावावरून मुक्तागिरीचं नि तिथल्या सीतेच्या न्हाणीचं देखील त्याने निरीक्षण केलं. तेथून तो नेरीला आला. तिथे प्रेमीजनांसोबत त्याच्या बालक्रीडा व भजनांना बहर आला.

नेरीत एक दांभिक साधू टेकडीवर उतरला होता तो लोकांना गव्हाचं पीठ मागायचा व रात्री धुनीत 'पानगे' भाजून गुपचूप खायचा. त्याच्या दर्शनाला कृष्णरावांनी देवबाबाला नेलं होते. आपला प्रतिस्पर्धी आला म्हणून त्याने नाराजी व्यक्त केली. माणिकने त्याच्या दंभाचा पर्दाफाश केल्याने गावातील लोकांच्या नजरेतून तो लवकरच उतरला व गाव सोडून पळून गेला.

नेरीत पंजाबी फकीर मुल्ला 'नादुशहा' होता. तो देव दाखवतो म्हणून त्याचे नादी बरेच लोक लागले होते. तो भोळ्याभाबड्यांना गोड बोलून जाळ्यात

ओढणारा नशेबाज मुल्ला होता. नेरीत गांजाचे दुकान होते. बापूजी शेणमारे कलार यांचा मुलगा महादेव हा माणिकदेवाचा प्रेमी. त्याच्याकरवी माणिकदेवाने गांजाच्या दुकानातून तीन तोळे गांजा आणला आणि नादुशहाचे अड्ड्यावर जाऊन रात्रभर तो गांजा फुंकत बसला. पण देवाची कुठे पडछायाही दिसेना. तेव्हा माणिकदेवाने फकीराचे मनगट धरून विचारले, ''बता तेरा खुदा कहाँ है! भगवान के नामपर व्यसन की गंदगी फैलाता है पगले ! भोलेभाले लोगों की आँखो में धूल झोकता है मूरख !'' त्याचा तो संतप्त अवतार पाहून नादुशहाची बोबडी वळली व तो धूम पळत सुटला.

एक म्हातारा मांत्रिक माणिकदेवाकडे मुद्दाम आला आणि म्हणाला,''आज अमावस, सनवार अन् पाटलाकडची बारातीन बी आजच मेली. तिले जागं करावाचं. नंतर विधी सांगनं माहा काम ! मी पिशाच्चयोनी कडून तुलसीदासाला जसं रामदर्शन झालं तसं तुम्हाला दाखवतो. आहे बाबाजी तयारी?'' माणिकदेव लोकभ्रमाचं फोलपण दाखविण्यासाठी रात्री त्या मांत्रिकासोबत गेला. बाळंतिणीला पुरलेल्या ठिकाणी मांत्रिकानं मंत्र पुटपुटत पूजाविधी केला. त्याच जागेवर बाळंतिणीची अशुभ खाट टाकून त्यावर माणिकदेवाला दक्षिणाभिमुख ध्यानस्थ बसविले नि विशिष्ट मंत्राचा जप करण्यास सांगितले आणि माणिकदेवास सोडून मांत्रिक परत आला. सकाळी देवबाबा मांत्रिकाकडे आला व म्हणाला, ''भूतप्रेतांकडून देव दिसला असता तर साधुऋषी कशाला योगतपस्या करीत बसले असते? अन् भुतांचाच आधी उद्धार झाला नसता का जी? फजूल आहेत जी हे आडमार्ग! देव का बाजारचा भाजीपाला आहे बाबाजी ?'' तो मांत्रिक पुरता शरमिंदा झाला!

देवबाबाला एका अजीजखाँने 'ब्रह्ममाया एक' सांगून आपल्या अड्ड्यावर नेले. ''ब्रह्म जर सर्वांठायी आहे तर मुसलमानात ते नाही का ? मग आमच्या हातचं खाल्ल्यानं आपण बाटणार आहात काय?'' असा युक्तिवाद करून घरी जेवायला नेले व बकऱ्याचे मांस पुढे करून म्हणाला, ''आप तो वेदान्ती हो. तो आपके वेदान्त की 'समभावना' कहाँ है?'' माणिकदेव म्हणाला, ''खानसाब! हमारी समता मक्खीके जैसी नहीं है, जो मिठाई और मैला एकही चावसे खाती है!'' अजीजखाँला ते शब्द लागले. तो म्हणाला, ''क्या दूसरी तरकारीके मानिंद

ये भी पंचभूतोंकी चीज नहीं?'' आता माणिकदेव उठून उभा राहिला व उद्गारला, ''तो क्या आप सूअरका गोश्त भी पकायेंगे?'' अजीजखाँ निरुत्तर झाला. तेव्हापासून माणिकदेव उर्फ देवबाबा भोंदू साधूमहंतांपासून दूर राहू लागले.

कांही लोक स्वत:च्या स्वार्थासाठी दुसऱ्याला विषही पाजायला भीत नाहीत. नेरीच्या शाळेत चिमूरनिवासी यज्ञेश्वर बेतावार नावाचे शिक्षक होते. त्यांचा मुलगा आजारी होता. एक कानफाट्या गोसावी अचानक गावात आला व त्याने 'देवबाबाला विषारी जडीबुटी देऊन देवाला अर्पण केल्याशिवाय तुझा मुलगा वाचणार नाही' म्हणून मास्तरला सांगितले. पत्नीच्या आग्रहाने व पुत्राच्या मोहाने मास्तर तयार झाला. माणिकदेवाने शिवमंदिरातील भजन संपल्यावर पाणी मागितले तेव्हा मास्तरने तो विषारी प्याला दिला. तो देवबाबाने तर पिऊन टाक ला पण सोबत श्री.नारायण दिवाणजींचा मुलगा होता, त्याने छलांग मारून मास्तरच्या हातचा प्याला हिसकला. तो काळा ठिक्कर पडला होता. यज्ञेश्वर मास्तर भांबावून अश्रुपूर्ण नेत्रांनी माणिकदेवाच्या पाया पडला व पश्चात्तापदग्ध मनाने त्याने सारे कबूल केले. म्हणाला–''माझी सर्व इस्टेट गेली तरी बेहत्तर पण मी तुम्हाला मरू देणार नाही !'' त्याला निश्चिंत राहायला सांगून माणिकदेवाने शांतपणे घरी पाठविले. म्हणाला– ''मला काहीही होणार नाही!'' नेरीच्या गजाननराव जोशीने वैद्यांकडून माणिकदेवावर उपचार करविले. तीन दिवस माणिकदेवाला १०५ डिग्रीपर्यंत ताप होता. त्वचेचा कोंडा निघत राहिला. चिमूरचा सब इन्स्पेक्टर श्री.लाखकर चौकशीसाठी आला; पण माणिकदेवाने मास्तरला माफ करण्यास सांगितले व हसून खंजरीवर भजन सुरू केले. योगसाधनेने व गुरुदेवाच्या कृपेने शरीरातून घामाच्या धारा वाहून माणिकचा ज्वर उतरू लागला. प्राण तर वाचले पण विषाचा अंश पुढे वर्षानुवर्षे माणिकदेवाच्या शरीरात भिनून राहिला आणि त्यातून वेळोवेळी कुपथ्यवश अनेक आजार प्रकट होत गेले. यज्ञेश्वर मास्तर मात्र तेव्हापासून माणिकदेवाचा परमभक्त बनला.

माणिकदेवाची प्रकृती झपाट्यानं सुधारत होती. एके रात्री कोणाला न सांगता माणिकदेव कृष्णरावाच्या मकानाबाहेर पडला. दोन मैलांवर म्हसली गावात श्रीमंत सीतारामजी वैद्य यांचे घरी आला. दुसरे दिवशी रामदिघी अरण्याकडे निघाला. झाडीत श्रीराम, मारुती व शंकर यांची लहान देवळे होती. सीताकुंड

म्हणजे एक दीर्घाकार विहीर होती. पौष महिन्यातील सोमवारी खानगाव, रारेगाव, चिचोड्डी आदि दोन-तीन मैलांवरील खेड्यांमधूनच नव्हे तर वरोरा-चिमूर-चंद्रपूरवरून सुद्धा दर्शनार्थी यात्रिक इथे यायचे. दररोज माणिकदेव नवनव्या भागात फिरत असे. क्वचित एखादा तपस्वी देखील त्याला दिसायचा. त्यानंतर माणिकदेव दहाबारा मैलांवरील ताडोबा महारण्याकडे पुनश्च वळला. महारण्याच्या गर्भगुहेत त्याने मुसंडी मारली व स्वच्छंदपणे वनविहार करीत एका गुहेत आसन ठोकून समाधिसुखात तो निमग्न झाला.

दोन दिवसांनंतर जयपूरचा एक खानदानी राजवंशी लवाजम्यासकट त्या अरण्यात शिकारीसाठी आला होता. फिरता फिरता गुहेच्या तोंडाशी त्याला माणिकदेव ध्यानस्थ दिसला. नेत्र उघडताच त्यांनी नम्रपणे ओळख विचारली. तेव्हा माणिकदेव म्हणाला- ''मेरा नाम तो बस तुकड्या है। जीवदशा में पूरा कौन होगा?'' सर्वांनी माणिकदेवाचे चरणी श्रद्धाभराने मस्तके नमविली आणि आपल्या पाडावाजवळ चालण्याची विनंती केली. तसेच खुद्द म्होरक्याने - 'राजस्थानात आमचेकडे राहून सेवा करण्याची संधी द्या'- अशी विनंती केली. परंतु उत्तरादाखल माणिकदेवाने त्याला सुनावले, ''क्या इन्सान इतना खूँखार है, कि बेचारे जंगली जीवों को जंगल में भी वह रहने देना नही चाहता?.. ये भगवानके प्यारे जीव कितने सुंदर हैं, इनका विनाश करना क्या आप छोड नहीं सकते?'' त्या संस्थानिकाचे डोळे अश्रूंनी भरून आले, कंठ दाटून आला. त्याने त्या बालयोग्याच्या पायावर हात ठेवून गहिवरल्या गळ्याने उद्गार काढले-''स्वामीजी! मै सौगंध खाता हूँ, आजसे कभी शिकार नही खेलूँगा! आपने मेरी आँखे खोल दी!''

पाच सहा मैलांवरील खडसंगी गावात तंबू, डेरे ठोकून त्या संस्थानिकाचा मुक्काम होता. तेथून दुसऱ्या दिवशी फळे, मेवा आदि खाद्यसामुग्री त्याने सेवकांकडून पाठविली; पण कालची ती गुहा आता सुनसान दिसत होती. शिपायांनी स्वामीचा चहूकडे शोध घेतला, पण कुठेच मागमूस लागेना. इतक्यात वाघाने खाल्लेल्या एका तरुण मुलाचे रक्तबंबाळ पाय व विच्छिन्न हाडे रस्त्याच्या मध्यात पडलेली त्यांना दिसली. ते दृश्य पाहाताच तो राजवंशी संस्थानिक शोक करू लागला. सेवकाकडून चंदनादि वृक्षाच्या काड्याकाटक्या गोळा करवून त्याने त्या देहावशेषांचे तिथेच दहन केले आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी ते अरण्य सोडले.

आजूबाजूला जंगलात 'तुकड्याजी योगी वाघानं फाडून खाल्ला!'–अशी वदंता पसरली. कोलारा खेड्यात माणिकदेवाच्याही कानी ही वार्ता आली. त्या भागात 'तुकड्या' म्हणून त्यास ओळखत नसत, तर 'देवबाबा' म्हणत असत. माणिकदेवाची क्रिडावृत्ती जागृत झाली... त्याने चिमूरला जाऊन भालचंद्र तुंपल्लीवारांकडून एक पोस्टकार्ड मिळवले व बंडोजीबाबांना शोकसमाचार लिहून कळविला की, 'तुमचा तुकड्या जंगलात वाघानं खाल्ला. नशिबी होतं तसं झालं. तुम्ही समाधानी असा. काही दुःख मानू नका...'

यावलीत ते पत्र पोहोचताच मंजुळामाता व बंडोजी यांना फार दुःख झाले. रिवाजाप्रमाणे 'तिसरा दिवस करून सुतकातून मोकळे व्हा'–असे गावकरी म्हणू लागले. परंतु मंजुळा मातेला तर हे शब्दही ऐकवेनात. तिने नथ मोडून बंडोजींना चंद्रपुरास पाठविले. त्यावेळी बंडोजीचे गुरु तरोडेकर घोंगडे महाराज चंद्रपुरात असल्याचे कळले. त्यांची मदत होईल असे बंडोजीला वाटले, म्हणून ते लगबगीने निघाले. चंद्रपूरचे श्री.सोनबाजी हूड हे घोंगडे बुवाचे शिष्य होते. त्यांचेकडे जाऊन बंडोजींनी घोंगडेबुवांना पत्र दाखविले आणि एक रुपया रोजाने एक गोंड बरोबर घेतला. आठ–नऊ कोसांवर चिचोड्डी खेडे लागले. तेथून २ मैलांवर त्या गोंडाने शिवमंदिराजवळ त्यांना नेऊन सोडले व तो परत फिरला. तिथला एक तपस्वी म्हणाला, ''एक छोरा नंगधडंग रूप में मैने इस पहाडी में देखा था। था सोलह सालका, पर वह पहुँचा हुआ महात्मा था। उसे कौन खा सकता है? वह तुमको शायद नेरीके पटेल के घर मिलेगा।''

सात–आठ कोसांवर चिमूरला पोहोचताच बंडोजीबाबा लोकांना विचारू लागले पण 'तुकड्या'ला कुणीच ओळखत नव्हते. मात्र तुकड्या–माणिक–भजन गाणारा व बिडी ओढणारा–असा खुलासा केल्यावर एकजण म्हणाला,''अरे हाँ! ते होय! ते तर आमचे देवबाबा! ते आण्याजी तुंपल्लीवाराकडं सापडतील. चला माझ्या बरोबर!'' बंडोजीला घेऊन तो आण्याजीकडे आला. त्यांनी बंडोजीची उत्तम व्यवस्था केली. स्नान–भोजन झाल्यावर तिथेच विश्रांती घेण्यास सांगितले. दुसरे दिवशी सोबत माणूस देऊन तीन–चार मैलांवरील तुकूम गावी त्यांना पाठविण्यात आले.

श्रीमंत श्रीहरिबापू बेगडे मालगुजार यांच्या भव्य वाड्यात सकाळीस

माणिकदेवाच्या स्नानाचा सोहळा चालू होता. बंडोजींनी माणिकदेवास पाहिले. श्री.बेगडे आदि सज्जनांनी बंडोजींना समजावले की, ‘‘देवबाबा येतो म्हणतात, तुम्ही मुळीच चिंता करू नका. आम्ही त्यांना जरूर आणून घालू. मातुश्रींना समजावून सांगा, धीर द्या.’’ आणि भोजनानंतर त्यांना दमणीतून सुमारे १० कोसांवरील कानपा स्टेशनवर पोहोचवून दिले गेले.

यावलीस माणिकदेवाचा कुशल समाचार ऐकून मंजुळामातेला जणू पुनर्जीवन मिळाले. गावातील सोबत्यांनाही आनंद झाला. इकडे मदनापूरच्या पाटलाने माणिकदेवास आपल्या गावात नेले. तिथे तीन आठवड्यांत मारोतीचे मंदिर बांधण्यात आले. मूर्तीची स्थापना व आखाड्याचे भूमीपूजन त्यांच्याच हस्ते झाले. त्याही गावाचे गोकुळ बनले.

तळोधी स्टेशनापासून एक मैलावर गायमुख क्षेत्र आहे. तेथे एका आंब्याच्या झाडाखाली माणिकदेव ध्यानस्थ बसला असता एक सर्प त्याच्या अंगाला वेढून डोक्यावर फणा काढून डोलू लागला. थोड्या वेळाने एक ठाणेदार दर्शनासाठी तेथे आला असता गुराख्याच्या मुलांनी त्याला माणिकदेवापर्यंत आणून सोडले. तो देखावा पाहून सर्व आश्चर्यचकित झाले. दरोग्याने हातचा दंडुका आपटीत हातहूत केलं आणि मुलं ‘देवबा-देवबा’ करीत ओरडू लागली. तेव्हा तो सर्प सरसरत आंब्याच्या झाडावर निघून गेला. दरोग्याच्या मनात आदरभाव वाढला. त्यांने श्रद्धापूर्वक पदस्पर्श करून आपल्या घरी चालण्यास आग्रहच केल्यामुळे माणिकदेव त्याच्या घरी गेला.

उसेगावच्या सज्जनांच्या आग्रहावरून मारोतीचे देवळात माणिकदेवाचा भजनाचा कार्यक्रम झाला. जवळच देवीचे देऊळ होते. लोकांनी देवीला नवस करून बोकड कापले. ते माणिकदेवाला कसे आवडणार? तो म्हणाला,‘‘आईला तिच्या मुलाला कापून खायला दिलं, तं ती खरंच खाईन काय?’’ लोक म्हणाले, ‘‘कशी खाईन बावाजी!’’ माणिकदेवाने समजावले,- ‘‘तसंच देवीही बकऱ्याला खात नाही. तुम्हीच मारता, तुम्हीच खाता. हे पाप आहे. तुम्ही देवीला दही-भाताचा नैवेद्य द्या, नाहीतं तुमच्या कुळामध्ये दिवा राहाणार नाही.’’ पाटलांनी ‘देवीचा कोप होईल’- म्हणून शंका घेतली, तेव्हा माणिकदेव म्हणाला, ‘‘मी स्वत: या देवीला इथून उचलून दुसरीकडे स्थापन करतो. जर तिनं मला त्रास दिला

तं मी हारलो; नाही तर देवी हारली असं समजा!'' असे म्हणून माणिकदेवाने स्वत: देवीला तेथून हलवून दुसरीकडे नेऊन ठेवले आणि तेथे तिची रीतसर स्थापना करून कोंबडे बकरे कापणे बंद केले. देवीदेवता-भूतप्रेतं सुद्धा देवबाबाला घाबरतात, अशी त्याची कीर्ती सर्वत्र पसरली.

तिरखुरा येथील श्री. नानाजी पाटलांच्या पत्नीला पिशाच्चबाधा झाली व ती थयथयाट करू लागली. माणिकदेवाचा भजनाचा कार्यक्रम सुरू होता, तो थांबवून ठेवून माणिकदेव सरळ आत गेला. पाटलीणच्या कानशिलात भडकवून देताच ती पूर्ववत् सामान्य झाली. त्या क्षणापासून तिचे घुमणे, हातपाय आपटणेही बंद झाले.

चिमूरच्या डॉ.अत्रेला शिकारीची सवय होती व ते त्यात बहादुरी समजत असत. ते महाराजांना सोबत घेऊन एकदा शिकारीला गेले. एक वाघीण आपल्या पिलांना पाजत असता ते बंदुकीचा नेम धरून गोळी झाडणार तोच त्यांच्या हाताला माणिकदेवाने धक्का दिला. गोळी आकाशात गेली. वाघीण वाचली व चवताळून डॉक्टरकडे येऊ लागली. साक्षात मृत्यूच समोर आलेला पाहून डॉक्टर म्हणाले- ''देवबाबा, वाचवा, वाचवा!'' माणिकदेवाने त्याचेकडून शपथ घेतली-''यापुढे शिकार करणार नाही.'' महाराजांनी वाघिणीकडे एकटक पाहाताच ती परत जाऊन पिलांना चाटू लागली. परतीच्या वाटेवर डॉक्टरांनी चालता चालता बंदूक तलावात टाकून दिली.

मांगलगावला माणिकदेवाचा कार्यक्रम झाला. विठोबा पाटलाने मेटेपारा गावी दैत्य मोठा प्रबल झाल्याचे सांगितले. म्हणून माणिकदेवाने हनुमंताच्या मंदिरात येऊन नमस्कार केला व तेथेही भजनाचा कार्यक्रम ठरविला. दिवस उजाडेपर्यंत भजन गाऊन माणिकदेवाने लोकांच्या मनातून दैत्याचे भय काढून टाकले.

चिमूर परिसरात असे प्रसंगानुरोधाने माणिकदेवाचे अनेक भक्त झाले होते. घरोघरी त्याला आमंत्रण असे. चिमूरजवळ झटीगावाला जाण्याची त्याला इच्छा झाली. तिथे आदिवासींची चारपाच घरे होती. चिमूर येथून ४ मैलांवर आंबोली गावात धुनीबुवाचे देवस्थान जागृत समजले जात असे. ४० गावांचा कारभार पाहाणारे तेथले मालगुजार मोतीरामबापू जमीनदार माणिकदेवाच्या दर्शनाला आले व आग्रहानं त्याला पिंपळनेरीला घेऊन गेले. बाबू शिरभैये हा

तिथला एक विद्यार्थी त्यांचा भक्त झाला. तिथेच माणिकदेवाने आदिवासींसोबत टकळीवर कापसाचे सूत काढण्यास सुरुवात केली होती.

चिमूर येथे गुरुपौर्णिमेच्या दिवशी १५ जुलै १९२६ रोजी 'माणिक प्रासादिक समाजा'ची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. तेथे 'ॐ जय सद्‌गुरुदेवा' ही आरती व वारकरी तसेच खंजरी भजनाचा कार्यक्रम होऊ लागला. परिसरातल्या गावोगावी सुद्धा माणिकदेवाच्या प्रभावाने लोकांना परमार्थाचे वेड लागले.

अशाप्रकारे लोकसंपर्क चालू असतानाच श्री.कृष्णराव भुते यांनी महाराजांना काशीयात्रेला नेले. मात्र तेथील अस्वच्छता आणि गैरशिस्त पाहून ते उबगले. पुढे दिवाळी आटोपल्यानंतर नेरीच्या श्री. लक्ष्मणराव गुरुजी सोबत महाराज पंढरपूरला गेले. तेथे ह.भ.प.धुंडा महाराज देगलूरकर यांची दृष्टी माणिकदेवावर पडली आणि त्यांच्याही हृदयात स्नेहभाव जागृत झाला. तिथून माणिकदेव वरखेड क्षेत्री परतले, कारण कार्तिकी पौर्णिमेस गुरुदेवांची पुण्यतिथी होती. संत लहानुजी महाराज कित्येकांजवळ बोलले होते की-''आमचा लहान भाऊ, आडकोजी बाबाचा लेक कविनारायण चांद्याच्या जंगलात आहे. आमच्या समद्यापरस त्याचं काम मोठं होणार!'' वरखेडच्या महाप्रसादानंतर ठरल्याप्रमाणे माणिकदेव जन्मभूमीच्या दर्शनासाठी यावली येथे आला असता त्याचा बालमित्र जग्गू माणिकदेवाला अरे कारे बोलू लागला, हे पाटलांना आवडले नाही. पण 'मित्रप्रेमात पेचपाच नसतो'- असे माणिकदेवाने त्यांना समजावले. श्री.गुलाबराव लोणे गुरुजी, श्री.वामनराव अह्रेरे वगैरे प्रेमी मंडळींनी चिमूरच्या पाहुण्यांसाठी स्वयंपाक पाण्याची नि निवासाची नीट व्यवस्था केली. माणिकदेवाने आठपंधरा दिवस यावलीतच राहायचे ठरविले. बंडोजी मात्र एकटेच चिंचखेडला राहिले. यावलीत भजन व भेंड्या खेळण्यात चांगले दिवस निघून गेले. त्यातही विशेष म्हणजे कांदा-बेसन व भाकरी-चटणी हे माणिकदेवाचे आवडते भोजन त्यांना मिळत होते. मंजुळामातेजवळ पंधरा दिवस राहून महाराज पुन्हा चिमूरला आले. सद्भक्त रामचंद्र कामडी तापाने फणफणत असल्याचे कळले, तसा माणिकदेव तडक त्याच्या घरी गेला व त्याला गच्च मिठी मारून पडला. घामाघूम होऊन त्याचा ताप जाऊन तो ठणठणीत बरा झाला.

मार्गशीर्ष पौर्णिमेला माणिकदेव शंकरपूरच्या परिसरात गेला. तेथून डोमा

गावी गेला. श्रीमती शेवंताबाई मोकाशीकडील एक्क्याच्या निमित्ताने दुसऱ्या दिवशी गोपाळकाला झाला. नंतर माणिकदेव पिंपळगावला गेला. तिथे मारोतीच्या मंदिराजवळ 'बाहेरची बाधा' झालेला एक माणूस निपचित पडला होता. पुजारी देवाजवळ कापूर जाळत होता. त्या माणसाच्या पत्नी व पुत्राचा आक्रोश सुरू होता. माणिकदेवाने पायाचा अंगठा त्याच्या पाठीवर किंचित दाबला. लगेच त्याच्यात हालचाल सुरू झाली. सर्व आनंदित झाले. 'बाबा कुठे गेले...कुठे गेले'– म्हणून बाबांचे पाय धरण्यास लोक गर्दी करू लागले पण तोवर माणिकदेव दूरवर पळून गेला होता.

नागपूर नगरीतही माणिकदेवाची कीर्ती एव्हाना पसरली होती. नेरीच्या कृष्णरावांची ज्येष्ठ कन्या वत्सला हिचा विवाह नागपूरच्या ख्यातनाम जोशी घराण्यात झाला, तेव्हा माणिकदेवाला त्यांनी सोबत नेले होते. चिमूरला माघ महिन्यातील घोडायात्रेला सुद्धा ते घेऊनच गेले. तेथून पिंपळनेर येथे येताना एक दांडू रस्त्यात सापडला, तो घेऊन ते मोतीरामबापू बिरजे यांचे घरी आले. त्यांची पत्नी सुंदराबाई हिला त्यांनी बेभान दशेत पाहिले. त्याने पाणी घेऊन तिच्या तोंडावर मारले तशी ती किंचाळून गोंडी भाषेत बडबडू लागली. माणिकदेवाने दंडुका घेऊन विचारले ''तू जातेस की प्रसाद देऊ?'' ती म्हणाली, ''नाई जाणार जी!'' अन् माणिकदेवाने सपासप दंडुक्याने मारण्यास सुरुवात करताच ''जातू नं बावाजी! जातु नं जी!'' म्हणाली. तिला मार सोसवेना. सुंदराबाई बेहोश झाली. महाराजांनी हात आवरला. शुद्धीवर आल्यावर मात्र तिला काहीच आठवेना. तिने महाराजांना नमस्कार केला. तिच्या मानगुटीवरचे भूत कायमचे पळाले!

रामदिघीस यात्रेला घोंगडेबुवांचे दर्शन झाले. त्यांच्या आज्ञेवरून उन्हात चार तास काम करीत असता माणिकदेवाला ताप आला. तो पुढे विकोपास गेला. त्या आजारातच तुकाराम बीजेला माणिकदेवाने 'आनंदामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ सांगायला सुरुवात केली. इतरांनी लिहिण्याचे काम केले. ग्रंथ साडेतीनशे ओव्यांचा झाला.

माणिकदेव प्रेमीजनांच्या भेटीसाठी अमरावतीला गेला, तेव्हा एका मुसलमान शिपायाने महाराजांचा वेष व लहरी हावभाव पाहून त्याला सिटी कोतवालीत आणले. रस्त्यातच न्यायाधीश मंगलमूर्ती कारमधून जात होते, ते

थांबले व त्यांनी माणिकदेवाला स्वतःच्या कारमध्ये घेतले. शिपाई पाहातच राहिला. अलिकडे यावली, अमरावती व वरखेड असा क्रमच ठरून गेला होता. तुकूमचे श्रीहरि बेगडे नाईक यांचेकडे साडेचार हजारांचा घोडा घेतला होता, तो कुणाला बसू देत नसे. पट्टीचे घोडेस्वार देखील त्याच्यावर स्वारी करण्यास घाबरत. पण माणिकदेवाने त्याच्या दांडगाईवर विजय मिळवून थेट स्वारी केली होती. माणिकदेवाला अश्वपरीक्षा उपजतच असावी; तसेच पुराणी न टोचता बैलांवरही त्याचे उत्कृष्ट नियंत्रण होते. पिंपळनेरीचे मालगुजार मोतीरामबापू जमादार यांचेसोबत माणिकदेव शंकरपट पाहाण्यास गेला व स्वतःच सारथी बनून चढाओढ जिंकूनही आला.

समर्थ श्री आडकोजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवात (कार्तिक पौर्णिमा, १९२७) माणिकदेवाच्या भजनांनी आगळा रंग भरला पण त्याच्या मनातला विषाद लपला नाही. अजूनही समर्थांची पुण्यतिथी टीनटपरी मोडक्या छताखाली होते, याबद्दलचा तो विषाद माणिकदेवाने वरखेडच्या कर्त्याधर्त्यांसमक्ष व्यक्त केला. म्हणाला– ''यापुढे तरी गुरुमहाराजांना झोपडीत ठेवू नका, नाहीतर आपल्यालाच झोपडीत राहाण्याचा प्रसंग येईल.'' पण कर्त्याधर्त्या कार्यकर्त्यांनी खोटीनाटी कारणे देऊन त्याकडे दुर्लक्ष केले. त्याचा परिणामही लवकरच त्यांना भोगावा लागला, कारण कधी नव्हे ती ग्रंथींच्या सन्निपाताची साथ दोन महिन्यांतच वरखेडला उमळली आणि वरखेडवासीयांना अक्षरशः रानात झोपड्या बांधणे भाग पडले!

कार्तिकीनंतर बालमित्र ड्रायव्हर विश्वासराव काळे यांच्या मोटारीतून माणिकदेवाने कान्होली दर्यापूरपासून वरूड–पांढुर्णापर्यंत फेरफटका मारला. आपल्या अभिनव लीलांनी अनेक मित्र जोडीत व योगायोगाने संत मायबाईच्या आर्वी धामी आनंद वर्षवीत त्यांनी हा धावता दौरा संपविला आणि तिथून पुन्हा चिमूरच्या अश्वयात्रेसाठी प्रयाण केले. तिकडे चंद्रपूर जिल्ह्यातल्या गावागावांमधून हा जीवनयोगी माणिकदेव आपला अद्‌भुत चित्प्रकाश फैलवीत निरंतर भ्रमण करीत होता. परिसरातील श्रद्धाशील जनतेला त्यांच्या त्या 'देवबाबा'विषयी अभूतपूर्व आत्मीयता वाटू लागली होती.

* * * * *

## तीन : लोकसंग्रह

यावलीपासून वरखेडपर्यंत, तिथून रामटेकच्या वनप्रदेशात, रामटेकहून पुढे नेरी-चिमूर-गोंदुडा या झाडपट्टीतील गावांत, तिथून रामदिघी-ताडोबा-सातबहिणी आदि घनघोर जंगलात-आणि तिथून पुन्हा गावगाड्यातल्या जनसामान्यांतः माणिकदेवाच्या अशा साऱ्या प्रवासात झाडीमंडळाशी जणू त्याची जीववेल सहज गुंफली गेली. नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यांनंतर पुन्हा अमरावती-वरखेड-यावलीशी त्याचा संबंध येऊन त्याच्या साधनेचे एक वर्तुळ पूर्ण झाले. या दरम्यान मंजुळा मातेपासून आरंभलेली त्याची मातृभक्ती जगन्मातेच्या अंचलापर्यंत विकसित होत गेल्याचे दिसून आले. अवतारी युगपुरुषांप्रमाणेच संत/भक्ताचेही व्रत मानवधर्माचे रक्षण व दुष्कृतींचे निवारण हेच असल्याचे माणिकदेव मानत असून तेच व्रत यापुढे सर्वतोपरी अंगीकारण्याचा त्याचा निर्धार झालेला जाणवत होता. या निर्धारानुसार गोंदुडा, रामदिघी, सातबहिणी, ताडोबा या परिसरांतील आदिवासी वस्त्यांमध्ये त्याने सहजभावाने आपल्या जीवितकार्याचा प्रारंभ केलेला होता. मात्र हठयोगानंतरच्या प्रेमयोगाकडे, नंतर चर-अचर निसर्गातल्या सगुण दर्शनाकडे, सगुण दर्शनाकडून ग्रंथनिविष्ट 'आनंदामृत' मधील वैराग्य व वेदान्तबोधाकडे, वेदान्त दर्शनाकडून ज्ञानमय राजयोगाकडे, आणि त्यातून 'आत्मप्रभावा'च्या समाधिअवस्थेकडे आणि समाधिअवस्थेच्या अनित्यतेतून मायावी सृष्टीतील विश्वसाक्षात्काराकडे- अशा ज्ञानभूमिकांच्या पूर्णावस्थेकडे झालेला माणिकदेवाचा मानसप्रवास त्याला अखेरीस मुक्तीवरील भक्तियोगाकडे घेऊन आला आणि या 'जीवनयोगा'चा अंगीकार करून माणिकदेव अखंड 'जीवनयोगा'च्या साक्षात्कारी अवस्थेत जगात वावरण्यास सिद्ध झाला. या अभिनव जीवनयोगाच्या साधनापूर्तीसाठी तो भविष्यलक्ष्यी कार्ययोजना आखू लागला.

या भविष्यलक्ष्यी कार्ययोजनेत देशभरातले आत्ममग्न साधुसंत, बहुधर्मी भक्तगण, रूढ धर्मप्रणित उपासक, सुशिक्षित विद्वज्जन, सत्त्वशील समाजधुरीण, वरिष्ठ ग्रामनेते, धनिक व्यापारी, शेतकरी-कष्टकरी जनसामान्य, गावकुसाबाहेरचे अस्पृश्य, भटके व आदिवासी हे गावगाड्यापलीकडले जीव- अशा साऱ्या

सज्जनांना मानवतेच्या सूत्रात गोवणे हे त्याचे लक्ष्य होते. त्याचबरोबर या साऱ्यांच्या एकीकरणासाठी तरुण कार्यकर्त्यांची फौज उभारणे व ज्येष्ठांबरोबरच पुढील पिढीच्या किशोर-बालकांनाही सहभागी करून घेणे आवश्यक होते. वयाच्या १८ व्या वर्षी परिणतप्रज्ञ झालेल्या माणिकदेवाने जीवनयोगाचा दुस्तर घाट चढण्यास प्रारंभ केला. पुढे वयाच्या पंचविशीपर्यंत मानव समाजाच्या विविध थरांमध्ये त्याने सज्जनांची मांदियाळी कशी उभारली आणि कुंपणावरल्या उच्चभ्रू मंडळीच्या जाणिवांमध्ये देखील परिवर्तन कसे घडवून आणले हे जाणून घेणे उद्बोधक ठरेल.

१९२७ च्या कार्तिकी पौर्णिमेला वरखेडला परतला तेव्हाच माणिकदेवाच्या अवस्थेत झालेले क्रांतिकारी परिवर्तन त्याच्या मित्रांना तसेच ज्येष्ठांनाही तीव्रतेने जाणवले आणि त्याचे 'माणिक', 'माणिकदेव' इतकेच काय पण 'तुकड्या' हेही संबोधन गळून पडून तुकडोजी, तुकडोजी महाराज, महाराज या आदरणीय नावाने तो ओळखला जाऊ लागला. मात्र भजनांच्या नाममुद्रेतील तुकड्या, तुकड्यादास, यावलीवाला तुकड्यादास हा संबोध आता व्यवहारातही रुळत गेला व गुरुने दिलेल्या नावाने आता स्वतःला तो तुकड्या, तुकड्यादास म्हणवून घेऊ लागला.

वरखेडला १९२७ च्या कार्तिक पौर्णिमेची गुरु आडकोजींची पुण्यतिथी संपन्न करून तुकडोजी महाराज अमरावतीला हरिश्चंद्र पाटलाच्या वाड्यावर गेले तेव्हा त्यांची तेजस्वी संतमुद्रा पाहून सारेच चकित झाले. दुसऱ्याच दिवशी बाजीराव पाटलांच्या मोटारीने ते यावलीला परतले. यावलीतल्या साऱ्या बालमित्रांना अत्यंत सुखद धक्का देऊन ते थेट माय मंजुळेच्या पुढ्यात जाऊन बसले. आठ-दहा दिवस यावलीतच काढून त्यांनी प्रेमी जनांना भजनांचा लाभ दिला आणि माय मंजुळेची जबाबदारी पुन्हा बालमित्रांवर सोपवून माणिकदेवाने चिमूरकडे प्रयाण केले. मात्र मनातली कार्यउर्मी स्वस्थ राहू देईना. त्यांचा बालमित्र विश्वासराव काळे यांनी मग स्वतःच्या मोटारीतून महाराजांना कितीतरी गावांमधून फिरवून आणले.

प्रथम ते अमरावती जिल्ह्यातील कान्होली, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, चांदूरबाजार, रिद्धपूर, मोर्शी, वरूड या गावी तर नागपूर मार्गावरील पुसला, पांढुर्णा, काटोल आदि गांवी गेले. नंतर अकोला, यवतमाळ जिल्ह्यांतून त्यांनी फेरफटका मारला. वरूडच्या 'न्यू इंग्लिश हायस्कूल'चे कलाशिक्षक श्री.गणपतराव करिये

हे ब्रह्मानंद-कबीर आदींची भजने म्हणत. त्यांनी माणिकदेवाचे खंजरीवरील भजन ऐकून स्वत: दोन भजने श्री केदारेश्वर मंदिरात गाइली. तरुण पोरसवदा अशा तुकडोजी महाराजांची छबी त्यांचे ह्रदयावर कायमची अंकित झाली ती त्यांच्या खंजरीवादनाच्या अद्भुत कौशल्यामुळे व भजन-गायनाच्या असामान्य शैलीमुळे.

परतोडा गावचे श्रीमंत धर्माजी यादव यांच्या कन्येचा 'साखरपुडा'असता त्यांनी वरखेडहून तुकडोजी महाराजांना तसेच संन्यासी श्री सुभानगिरीबाबा व आर्वीचे कापड व्यापारी श्री.रामचरणलाला यांना घरी बोलवून नेले होते. तिथेही महाराजांच्या भजनाने सारेच प्रभावित झाले. सन् १९२८ च्या मकरसंक्रातीच्या दुसऱ्या दिवशी महाराज आर्वीस आले. तेव्हा रामचरणलाला, बाबुलालजी महाराज, नारायणदास जोहरी आदि भक्त परमगुरु मायबाईच्या दर्शनास आले व तिथे भजनाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी महाराजांच्या गायनवादन कौशल्याने ते सारेच स्तिमित झाले.

चिमूरला बाबाजीची घोडायात्रा असल्यामुळे अण्णाजी तुंपल्लीवार, नानाजी बेगडे, अण्णाशास्त्री अलोणी यांनी महाराजांना चिमूरला नेले. शेकडो भक्त महाराजांच्या सत्संगाचा लाभ घेऊ इच्छीत. चिमूरचे बालाजी संगीडवार, भालचंद्र बळवंत बालाजी हे त्यांचे सोबतच राहात. बोडघ्याचे पाटील, जानकीप्रसाद लाला, लाखांदूरचे सेठ मदनगोपाल भैय्या वगैरे प्रतिष्ठित मंडळी आपापल्या भागात नेऊन त्यांच्या कार्यक्रमांचा व बालक्रिडांचा आनंद लूटत होते. यातून लोकसंग्रहाबरोबरच महाराजांचे कार्यक्षेत्र झपाट्याने विस्तारत होते. महाराज पवनी, मार्कंडेश्वर याही क्षेत्रांना भक्त व प्रेमींसह भेट देऊन आले.

वरखेडला एक शास्त्री भागवताचा पाठ करीत होते. त्यांनी महाराजांची कीर्ती ऐकून भेटण्याची इच्छा व्यक्त केली. ते ब्राह्मण होते; तर महाराज भाट. जिना चढताना त्यांनी मनात जे जे विचार आणले ते ते महाराजांना माडीवर आपल्या जागीच कळले व त्यांचे स्वागत करताना महाराज म्हणाले, ''शास्त्रीजी आपने अपने दिमाग में-मेरा मान होगा या अपमान ?-बैठायेगा या खडा रखेगा?- ऐसा ख्याल नहीं लाना चाहिए!'' शास्त्रींनी उठून महाराजाचे पाय धरले व म्हणाले, ''मुझे जिन अंतर्यामी गुरु की तलाश थी, मैने उन्हें पा लिया। अब मैं आपको नही छोडूंगा । अब आप स्वामी और मैं सेवक ।'' महाराजांनी त्यांना आपल्या ह्रदयाशी

कवटाळले आणि त्यांच्यावर सद्गुरुच्या पूजेचे कार्य सोपवले. ते भागवत पठनासोबत हे पूजाकार्य तेवढ्याच निष्ठेने अखंडपणे करीत राहिले. सन् २६ नोव्हेंबर १९२८ च्या सद्गुरु आडकोजींच्या पुण्यतिथीचा काला व महाप्रसाद झाल्यावर महाराजांनी सर्व प्रतिष्ठितांची सभा बोलावली आणि मंदिर बांधकाम समिती स्थापन केली. नंतर ते कौंडण्यपूरला निघून गेले. तेथे काला कीर्तन व दहीहांडीची परंपरा संत गाडगे महाराजांचे हस्ते सुरू झाली होती. तेथे महाराजांच्या भजनाचा कार्यक्रम झाला.

जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीसाठी वरखेडचे श्रीमंत श्री.दादासाहेब बोके व तिवसा येथील श्रीमंत श्री.भीमराव दादा देशमुख हे उभे होते. ते प्रचारासाठी वरखेडला आले असता महाराज म्हणाले, ''अरे ! फिरण्याची काय गरज?'' ते भीमरावदादांना थेट बोके यांचे दिवाणखान्यात घेऊन गेले. दोघे एकमेकांचे प्रतिस्पर्धी असूनही बोकेकडील फराळपाणीही त्यांना स्वीकारावे लागले. नंतर त्यांना बाहेर आणून महाराज पुन्हा म्हणाले, ''इथून सरळ आपल्या गावाला जा. इथे फिरण्याचे काहीच कारण नाही !'' त्याप्रमाणे श्रद्धापूर्वक प्रणाम करून दादा निघून गेले. त्यांना हे कोडे उमगेना. निवडणुका झाल्यावर मात्र त्यांना महाराजांच्या सर्वांगीण प्रभावाचा अंदाज आला. कारण विरोधी उमेदवारांपेक्षा दुप्पट मते मिळवून भीमरावदादा निवडून आले होते. तेव्हापासून ते महाराजांचे परम भक्त झाले.

दि.११ जानेवारी १९२९ रोजी महाराज पुन्हा वरखेडला आले असता त्यांना मंदिर समितीच्या शिथिलतेचा खेद वाटला. अखेर स्वत:च पुढाकार घेऊन त्यांनी शेषराव बोके, रामभाऊ तिवसकर, रामकृष्णदादा बोके आदींना समजावून गुरुमंदिराचा सुमुहूर्त आणि रामनवमीचा कार्यक्रम तबला, पेटी व खंजरी भजनाने आरंभ केला आणि पुढे १६ जून १९२९ च्या पहाटेस मंदिराचा पाया खोदण्याचा रीतसर मुहूर्त केला.

पंढरपूरची आषाढीवारी करून महाराज चिमूरला आले. तेथे 'उकडगिरीबुवा'च्या समाधिस्थानाचा जीर्णोद्धार करून त्यांनी तेथे नामसप्ताहाला आरंभ केला. 'देवबाबा'च्या सप्ताहाचे नाव ऐकताच लोक दूरदुरून येत.

चिमूरच्या 'माणिक प्रासादिक बाल समाजा'च्या वतीने या श्रावण

वद्यातच 'श्रीतुकड्यादासकृत भजनावली' या पहिल्या ३०२ भजनांच्या पॉकेट साईज हिंदी भजनावलीचे प्रकाशन दि.२७ ऑगस्ट १९२९ रोजी करण्यात आले. तिथून ते हिवरखेडला, तेथील अध्यात्मचर्चा संपन्न करून बग्गी यात्रेला भेट देऊन, तिथून जावरा व चांदूरच्या विद्वत्सभेत शंकासमाधान करून व पांडुरंगदास 'रामायणी' यांचे आतिथ्य स्वीकारून मोर्शी येथे आले. मोर्शीच्या राम मंदिरात भजनांचा कार्यक्रम होता. त्यात ॲड. भाऊसाहेब इंगळे, पत्रकार सबनीस यांच्या उपस्थितीत महाराजांचे उत्स्फूर्त भाषण झाले. इथूनच सामाजिक आणि राष्ट्रीय प्रबोधनाकडे वळून महाराज आम जनतेला भजनासोबतच भाषणातूनही मार्गदर्शन करू लागले. त्यांच्या त्या भाषणात जातीयतारहित निर्मळ मानवतेचा-बंधुभावाचा संदेश होता. लोकजागृती तर व्हावी पण जातिभेदाला जातिद्वेषाचे स्वरूप येणे योग्य नव्हे ही त्यांची भूमिका होती. कारण त्या काळात महात्मा जोतिबा फुले यांची 'सत्यशोधक चळवळ' ही ब्राह्मणेतर पक्षात रूपांतरित झाली होती आणि जातीय जाणिवा हळुहळू जातीय संघर्षात परिणत झाल्या होत्या. अनेक जहाल नेते 'प्रांतिक ब्राह्मणेतर परिषदां'मधून सिंहगर्जना करू लागले होते. अ.भा. पातळीवर 'ब्राह्मणेतर काँग्रेस'चे अधिवेशन तर प्रचंड गाजले. प्रतिक्रियारूप ब्राह्मण नेत्यांनी १९२६-२७ मध्ये अमरावती-अकोला-मोर्शी येथे प्रभावी अधिवेशने घेणे सुरू केले होते. अशाप्रकारच्या या चळवळीने शहरे व खेडी या सर्वांमधल्या वातावरणात जातिभेदांची भयंकर कटुता माजणे साहजिकच होते. अशा त्या तंग वातावरणात तुकडोजीबाबांसारख्या अवलियाने भजन करतानाच जातीयतारहित निर्मळ मानवतेचा व बंधुभावाचा संदेश द्यावा याला काही आगळे महत्त्व होते.

महाराजांच्या भजनांमध्ये ज्ञान, वैराग्य, भक्ती, योग आदि आध्यात्मिक विषयांबरोबरच सामाजिक सुधारणेचे विषय देखील आधीपासून डोकावत होते. त्यांच्या भजनांमुळे समाजोन्नतीचे एक आगळे चैतन्य महाविदर्भात खेळू लागले होते. गावागावातून सत्प्रवृत्तीची लाट उसळू लागली होती. एक्के, सप्ते, मास, चातुर्मास, शिबिर- यांच्यातील अन्नदानाच्या प्रचंड उपक्रमांमुळे समाजातल्या सर्व थरांच्या लोकांत एकात्मतेला पोषक असलेली नवी जागृती उमलू लागली होती. या सामाजिकतेबरोबरच महाराजांच्या विचारांत राष्ट्रीय भावनेचा पदरही अलिकडे दिसू लागला होता; कारण तीर्थयात्रा व भजन कार्यक्रमांच्या निमित्ताने

ते देशभराचे जीवन पाहात होते आणि प्राचीन भारताचे वैभवशाली चित्र रंगवून त्याच्या तुलनेत वर्तमान भारताच्या दुर्दशेची मीमांसा करताना हजारोंच्या श्रोतृसमुदायाला ते विचारत होते–

*'अवकळा अशी कां आली भारता तुझ्या देहाला?*
*किति धनिक तुझे कुल होते...(पण) भिक्षेची वेळच आली !'*

त्यांनी धर्मकर्माच्या नि भावभक्तीच्या भाषेतूनच जनांना रुचेल–पचेल अशा हळुवार पद्धतीनं त्यांना राष्ट्राभिमुख करण्यास सुरुवात केली होती. भावभक्तीच्या अवगुंठनातील राष्ट्रीय भजनांनी महाराज हजारो स्त्रीपुरुषांना जागृत नि संस्कारित करीत होते. धर्मभोळ्या बहुजन समाजात राष्ट्रप्रेमाची ज्योत हलक्या हातानं पेटविण्यासाठी महाराजांची ही शैलीच समायोजित नि अचूक परिणामकारी ठरत चालली होती !

एकदा महाराज तरुण विद्यार्थ्यांना घेऊन बैलबंडीतून ताडोबाच्या सहलीसाठी निघाले. रस्त्यात रात्रीला डाकूंनी अडविले. परंतु सर्व विद्यार्थ्यांनी डाकूंवर हल्ला करून त्यांना झाडांशी बांधले व रात्री तेथेच महाराजांनी भजन करून त्यांना पश्चात्तापाने चांगले नागरिक बनण्याची प्रेरणा दिली. ते डाकू जणू वाल्याचे वाल्मीकि झाले व त्यांनी महाराजांची क्षमा मागितली.

डिसेंबर १९२९ च्या शेवटी महाराज काशी व प्रयागतीर्थावर गेले. प्रयागातील अक्षयवट, भारद्वाज, वेणीमाधव आदींचे दर्शन घेऊन महाराज चित्रकूटला आले. लोकांचे अज्ञान व अंधश्रद्धा पाहून महाराजांनी भजनाद्वारे लोकांत जागृती निर्माण केली. तेथून अयोध्या व नेपाळची यात्रा केली. महाशिवरात्रीनंतर तेथून ते मथुरा वृंदावनास गेले, नंतर नागपूरला परत आले. तेथे रघुनाथराय पत्तरकिने या नीलसिटी हायस्कूलमधल्या १७ वर्षे वयाच्या कार्यकर्त्या विद्यार्थ्याला त्यांनी आपलेसे करून घेतले.त्यानंतर लिहिदा येथे झालेल्या संत संमेलनात ते भोलेबम महाराज, एकनाथ महाराज (आमला), लाहू महाराज (निंभी), नागोराज महाराज (कवठाळ), परशरामबाबा (ब्राह्मणवाडा) आदि दहाबारा संतांसोबत सहभागी झाले. गोपाळकाला व नगरभोजन झाले. तिथून कवठाळ, शिरसोली येथेही प्रेमीमंडळीच्या आग्रहावरून महाराज जाऊन आले.

वरखेडचा रामनवमी उत्सव झाल्यावर अवधूत या क्रांतिकारी संप्रदायाचे

संत हेंगळूजी महाराज यांचे पुण्यक्षेत्र जळगाव येथे श्री.दादासाहेब बोके यांनी महाराजांना नेले. मथुरेचे ब्राह्मण पं.गोपालराव चौबे यांनी महाराजांची वेदान्त तत्त्वानुसार परीक्षा घेतली खरी; पण महाराजांचे भजन ऐकल्यावर ते देखील नतमस्तक झाले;- इतके की पुढे ते वरखेडलाच काशीक्षेत्र मानू लागले. महाराजांनी अनेक तीर्थक्षेत्रे पाहिली आणि आपल्या भजनांमध्ये संतांचा उल्लेख केला. तीर्थांनाही पावन करणारे संत हे तीर्थाहून थोर आहेत हे महाराजांनी समजावून दिले, हे त्यांचे आगळे वैशिष्ट्य होय. त्यानंतर हयात असलेल्या संतांचे दर्शन घेत ते श्रीमंत बोके यांच्या गाडीतून मित्रमंडळीसह निघाले. अचलपूर जवळचे विदेही संत उकिरडेबाबा, अंजनगाव सुर्जीचे शंकरराव जगताप (उर्फ घोंगडेबुवा), लाखनवाडीचे खुशालबाबा, चौसाळ्याची संत जनाबाई, भुलोडाचे संत लष्करीबाबा, जोडमोहाचे खटेश्वर महाराज,धामणगाव (ता.पुसद) चे मुंगसाजी महाराज, कारंजा (घाटगे) चे दादाजी महाराज, बेलकुंड येथील श्रीरामानंद स्वामी या विदर्भातील आत्ममग्न संतांना भेट देऊन व रामानंद स्वामींकडे ३ दिवस राहून महाराज पंढरपूरच्या आषाढी यात्रेसाठी प्रेमीजनांसह निघाले. तिथून त्यांना श्रीमंत आबाजी नाइकांनी पवनी (चंद्रपूर) च्या कार्यक्रमासाठी आणले.

इ.स.१९२९ च्या लाहोर अधिवेशनात 'भारताला संपूर्ण स्वातंत्र्य' मिळवून देण्याचे ध्येय उद्घोषित झाले! दि.६ एप्रिल १९३० रोजी महात्मा गांधींनी दांडीयात्रा काढून मिठाचा सत्याग्रह केला आणि सर्व देशभर कायदेभंगाची लाट उसळली! गांधीजींच्या चळवळीला विदर्भात आणि गोंडवनातही जो प्रचंड प्रतिसाद मिळाला त्याचे श्रेय महाराष्ट्रातल्या विद्वान-लेखक-बुद्धिजीवी आदिकांना नसून ते संतपरंपरेला आहे. त्यातही सिंहाचा वाटा देशाला देव मानणाऱ्या संत तुकडोजींचाच असल्याचे स्पष्ट दिसते. 'देश स्वतंत्र असेल तरच धर्माचे रक्षण करता येते. धर्म म्हणजे समाजधारणेची योजना. उघडच देशभक्ती व देवभक्ती भिन्न राहू शकत नाहीत' ही महाराजांची भूमिकाच होती. म्हणूनच समाजात पडलेले भिन्नभिन्न तुकडे जोडणे हे तुकडोजी महाराजांचे ध्येय होते. राष्ट्रभावनेच्या संस्कारदानाने जनमनात क्रांतीचे रंग भरण्याचे कार्य महाराजांनी मोठ्या कौशल्याने घडवून आणले.

चंद्रपूर जिल्ह्यांतील उदयोन्मुख नेते व वक्ते त्याकाळात महाराजांच्या

भजन–मंचावरून त्यांच्याच पाठिंब्याने जनतेशी खुशाल संपर्क साधायचे. श्री. मा.सा. कन्नमवार, दे.भ. श्री दीनदयाल गुप्ता, चिमूरचे श्री तुकाराम बालाजी चन्ने हे महाराजांना भेटून लोकजागृती करीत. महाराज म्हणत, ''देश अन् देव हे काही भिन्न नाहीत. सत्य सोडून का परमार्थ साधत असतो?'' त्यामुळे सर्व लोक सत्याग्रहात आनंदाने भाग घेऊ लागले. एकूण महाराजांनी १९३० च्या स्वातंत्र्याच्या महत्त्वाच्या चळवळीत विविध प्रकारे प्राण ओतला. वीर वामनराव जोशी, डॉ. हरिहरराव देशपांडे, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, श्री. ना.रा. बामणगावकर आदि प्रमुख काँग्रेस नेत्यांनी अमरावती जिल्ह्यातील मोठ्या गावी व्याख्यानांद्वारे लोकजागृती नि स्वयंसेवक नोंदणी सुरू केली होती. २० जून १९३० च्या जिल्हा कार्यकर्ता परिषदेत जंगल सत्याग्रहाची कल्पना यवतमाळ जिल्ह्यातील लोकनायक बापूजी अणे यांनी मांडली आणि १० जुलैला पुसदला त्यांनी पहिला जंगल सत्याग्रह केला. मोझरीला रामभाऊ देशमुख, अनंतराव ठाकूर, त्र्यंबकराव कठाळे, चंद्रभानजी पाटील आदि कार्यकर्ते सत्याग्रहाकरिता आले. १२ जुलैला पवनी वरून महाराजही वरखेडलाच मुक्कामी आले.

वरखेडवरून महाराज ओंकारेश्वर व खंडवा निवासी दादाजी धुनीवाले यांच्या दर्शनासाठी गेले. सोबत वरखेडचा बालमित्र कृष्णराव भुते होता. अमरावती, भुसावळ, खंडवा या भागात फिरून बडवाह गावात त्यांनी दादाजी धुनीवाले महाराजांची भेट घेतली. तेथून मोटरकारने ओंकार–मांधात्याला पोहोचले. नर्मदाकाठची सर्व तीर्थे त्यांनी पाहिली. त्या प्रसन्न वातावरणात महाराजांनी कांही भजने लिहिली. तेथे भगवान मायानंद चैतन्यांची भेट झाली.नंतर महाराज उज्जैन नगरीत आले. उज्जैन नगरी म्हणजे विक्रम राजाची राजधानी, भर्तृहरी व कालिदास या कविवर्यांचे स्फूर्तिधाम, श्रीकृष्णाच्या सांदिपनी गुरुचे ज्ञानपीठ! त्या उज्जैनवरून महाराज रेल्वेने जयपुरास गेले व तेथून त्यांनी पुष्करराज, जोधपूर, चित्तोडगड व उदयपूर पाहून जोधपूर जवळची गालव ऋषीची तपोभूमीही पाहिली. तेथून थेट अजमेर पाहिले व तेथून चिमूर व नेरीला परत आले.

गणेश चतुर्थी आली. चिमूरला काँग्रसचे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनेक कार्यकर्ते महाराजांना भेटायला आले. सत्याग्रही शिबिरांमध्ये सुद्धा महाराजांना पुढे करण्यात येई. चिमूरला सत्याग्रही शिबिरांत 'झूठी गुलामशाही

क्या डर बता रही है'– अशी भजने गाऊन महाराज सत्याग्रहींचा उत्साह द्विगुणित करीत.

*'क्योंकर भटक रहा है भारत वतन हमारा?*
*अंधे बने हैं सारे, नहिं ग्यान का उजारा।।*
*परतंत्र आँख कीन्ही, स्वातंत्र्यता न लीन्ही।*
*बाँधे से बंध रहे हैं, समझे नही इशारा।।...'*

तसेच– *'ईश्वर! हमारो भारत आजाद कब रहेगा?*
*जालिमसे छूटकरके आनंदमें नहेगा।।*
*बाँधे गुलामी से हम, कुछ भी स्वतंत्र नाही।*
*कंटक यह सीसपर का कब पाप से बहेगा?...'*

अशा या भजनांतून महाराज जेव्हा ''तुकड्या के सीर कर्जी, यह भार कब सहेगा?'' असा प्रश्न विचारतात तेव्हा देवपिसे घेऊन गृहत्याग केलेला हा औलिया देशाच्या प्रश्नाशी किती एकरूप झाला होता हे दिसून येते. ''जल को भी मोल लीन्हा, जनवर की भूख छीना'' अशा शब्दयोजनेतून मीठ उत्पन्न करणारे पाणी आणि जनावरांचे खाद्य गवत– त्यांच्या सत्याग्रहाची भूमिका या औलियाने उचलून धरली असल्याचे स्पष्टच होते. मात्र सत्ताधाऱ्यांच्या पोलिसांना त्यांच्या भजनांमधून आक्षेपार्ह असे काही शोधता येईनाच. उदा.–

*'हिंदभूच्या लेकरांनो! स्वस्थ कां बसता असे?*
*भारताचे ग्रहण हे नेत्रीं तुम्हा बघवे कसे?*
*................................*
*दास तुकड्या सांगतो, काढा घरातुनि आळसा।*
*काव्य बनवा आपुले, स्वातंत्र्य जैं लाभे तसे।।'*

यासारख्या भजनांत आक्षेपार्ह काय दाखविता येईल? शिवाय वरिष्ठ देशी अधिकारी हे सारे महाराजांचे प्रेमीच होते. त्यामुळे सब इन्स्पेक्टर धरमसिंग सारख्या स्वतंत्रता आंदोलनाच्या दुश्मनांना हात चोळत बसण्याविना गत्यंतर नव्हते. या भजनांत महाराजांचा ज्वलंत देशाभिमान, त्यांचे मातृभूमीविषयीचे व स्वातंत्र्याबाबतचे निस्सीम प्रेम, भारतीय बांधवांचे अज्ञान, दौबल्य नि परधार्जिणी वृत्ती यांबाबत आंतरिक कणव, गुलामगिरीची आणि दुष्टभ्रष्ट इंग्रज सत्ताधाऱ्यांच्या शोषक सत्तेची

मनस्वी चीड या गोष्टी स्पष्ट होतात.

इंग्रज सत्ताधाऱ्यांचा धार्मिक भजनांना विरोध नव्हता; सभाबंदी, भाषणबंदी मात्र होती. त्यामुळे गणेशोत्सवाप्रीत्यर्थ महाराजांच्या भजनाचा जाहीर कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे. खंजरीवरील भजनाला तुफान गर्दी राहायची. त्यामुळे सब-इन्स्पेक्टर धरमसिंग महाराजांना म्हणाला, ''महाराज! कुछ गडबड हुयी तो आप पर उसकी जिम्मेदारी रहेगी।'' चंद्रपूरचे सर्कल डी.एस्.पी. महाराजांना ओळखत होते. त्यांनी धरमसिंगास टरकावून लावले. धरमसिंह सारख्या ज्या काही अधिकाऱ्यांनी महाराजांवर बालंट आणण्याचे प्रयत्न केले ते असेच असफल राहिले.

दि.३ सप्टेंबर १९३०ला महाराज प्रथम मोझरीत आले. मोझरीचा गणेशोत्सव त्याकाळी प्रभावी व्हायचा. गावोगावच्या स्त्रीपुरुषांची रीघ लागायची. रामराव भाऊ, गोपाळराव पाटील, अभिमानजी टाले आदींनी तयार केलेल्या बालचमूंचे मैदानी मर्दानी खेळ व कीर्तने व्हायची. महाराजांचे वरखेड व मोझरी जाणेयेणे सुरू होते. कात्यायनशास्त्री व काशीकरशास्त्री हे तर महाराजांचे भक्त झालेच पण संपूर्ण मोझरीच महाराजांच्या भजनी लागली. येथूनच राष्ट्राच्या पायाभरणीस आरंभ झाला. दि. ५ नोव्हेंबर १९३० ला गोपालकाला-महाप्रसाद व भजनादि कार्यक्रम संपन्न झाले.गोपालकाल्याच्या मुहूर्तावर रामचरण लाला व बाबूजी शिरभैये यांनी छापलेल्या हिंदी भजनावलीचे प्रकाशन वरखेडला झाले- 'श्रीसंत आडकुजी महाराज कृपादान-प्रासादिक तुकड्यादासकृत भजनावली'.

श्री दादाजी धुनीवाल्यांच्या निर्याणयज्ञात महाराज खंडवा येथे जाऊन आले. वरखेडला परतल्यावर त्या प्रीत्यर्थ कापूर जाळण्यात आला. नंतर ५ डिसेंबर रोजी भजन, गोपालकाला, महापंगत, ज्ञानचर्चा आदि कार्यक्रम झाले. अंतोऱ्याचे लोकनेते श्री काशीराव दादा गौरखेडे यांनी महाराजांना अंतोऱ्याला नेले. अंबिकापूर, खंबीत, बेलोरा, देलवाडी, जोलवाडी या गावी जाऊन वर्धाजलात महाराज मनसोक्त पोहले. सैदपूरच्या चिंचवनात वनभोजन करून परतताना खडकी, परसोडा, भारसवाडा, भिष्णूर आदि गावांना देखील महाराजांनी भेटीचा लाभ दिला आणि नवनव्या समाजगटांशी स्नेहसंबंध सुदृढ केला.

महाराजांनी अलीकडे भाविकांत राष्ट्रीय प्रचार सुरू केला होता कारण

इंग्रजी सत्तेने दडपशाही, जुलूम, लाठीमार, गोळीबार, वटहुकूम आदि अस्त्रे परजून देशातले कायदेभंगाचे ८८ हजार सत्याग्रही तुरुंगात डांबून जनतेला त्रस्त करून टाकले होते. अशा परिस्थितीत एकात्मता आणि राष्ट्रीय भावना जपणे आवश्यक होते.

चिमूरनिवासी सेठ गुलामहुसेन हे धनिक व्यापारी महाराजांचे भक्त होते. त्यांच्या घरी महाराजांनी मौलाना आशकभाई सौदागर यांचेशी कुराणावर चर्चा केली. ''धर्म में कोई जबरदस्ती नहीं है। खुदा की ओर से सच्चाईका रास्ता जाहिर हो चुका है, जो चाहे मौमीन (सदाचारी) बने, जो चाहे काफिर (दुष्ट किंवा नास्तिक) बने । सच्चाईका प्रचार और उपदेश जरूर करना चाहिए ।''- असे सांगून त्यांनी चिमूरच्या मुस्लिमांच्या मनातील संकुचितता झाडून टाकली; तर चाँद मियांनी महाराजांच्या सत्संगात चिवडा पार्टी घडवून आणली. या सर्वांमुळे धर्मपंथांचा भेदभाव व माणसामाणसांचा विटाळ नकळतच विस्मृत होत होता. नंतर घाटावरील आदिवासी खेड्यांत परिभ्रमण करून वाघोडा नि मूलतापी करून महाराज वऱ्हाडात परत आले. त्याच सुमारास 'जनताजनार्दन' या सदभिरुचिसंपन्न नाटकाचे दिग्दर्शनही त्यांनी यावलीच्या बालमित्रांच्या आग्रहास्तव केले.

चिमूरला बालाजी संगीडवार यांनी महाराजांना चतुर्मास्यासाठी बोलावून घेतले. सर्वश्री पांडुरंगदासजी खेरडे ('रामायणी'), गणपतराव वानरे, रामभाऊ चर्जन, चंपतराव कावलकर आदि चांदूर, आमला-वाठोड्याचे एक डझन कार्यकर्ते चिमूरला गेले होते. संपूर्ण चातुर्मास्यात यज्ञेश्वरगुरुजीच्या माडीवरच महाराजांचा मुक्काम होता. बारा-तेरा दिवस सोमवती अमावस्येला २१ ऑगस्टला सूर्यग्रहणानिमित्त महाराजांबरोबर गंगास्नान तसेच पोळा व तान्हापोळा त्यांनी अनुभवले. चातुर्मास्याच्या पंक्तीत स्पृश्यास्पृश्यतेला मुळीच वाव नव्हता. ब्राह्मण, महार, मुसलमान सर्वच एकत्र भोजनाला बसले होते व महाराज प्रेमीजनांत बंधुत्वाचा धागा विणीत होते. सर्व देवबाबांची अपत्ये : या भावनेतून जातिभेद बोथट होत गेले. यातून काही अतिशय महत्त्वाच्या पुरोगामी बाबी साधल्या गेल्या. उदाहरणार्थ, ज्ञानचर्चेमुळे खऱ्या धर्माचे स्वरूप व ज्ञान लोकापुढे आले. धार्मिक माध्यमांतून बहुजन समाजाची भावात्मक संघटना झाली. गरीब व श्रीमंत जवळ येऊन एकत्र काम करू लागले. त्यांच्यात सहभाव जागला. भांडारघरात आदिवासी

लोक वावरू लागले. अस्पृश्यता नाहीशी होऊ लागली. सहभोजनास चालना मिळून जातीयता नष्ट होऊ लागली. राष्ट्रीय व सामाजिक जागृतीला पोषक अशा धर्मतत्त्वांची महाराजांनी जागृती केली.

'गुरुमहिमाष्टक' व 'श्रीकृष्णगीत'चे रचयिते कवी दामोदर सावरकर हे १९३२ मध्ये भीतभीतच महाराजांशी भेटले ते त्यांच्या शिक्षकामार्फत. आमल्याचे पांडुरंगदास खेरडे (रामायणी) यांचेसोबत वनगमनाची परवानगी मागून ते उज्जैनकडे जाऊन आले. वनगमनानंतर एक महिनाभर ऊन, क्लेश, दगदग नि भूक यांनी तीनचार महिन्यांत शरीर आतून दग्ध झाले आणि आमला विश्वेश्वर मुक्कामी ४२ दिवसांचा भीषण विषमज्वर व कॉलऱ्याची हगवण लागून १६ वर्षे वयाचे शिरजगाव (मोझरी) चे दामोदर तीनदा देह थंड पडून मृत्यूच्या दाढेतून वाचले. आश्विनात मोझरीच्या देवी मंदिरातील सप्ताहासाठी ते महाराजांच्या दर्शनाला गेले असता त्यांचा कृश देह पाहून महाराज म्हणाले, ''अरे, तू तर मूर्तिमंत 'सुदाम'च झालास!'' तेव्हापासून 'दामोदर' या कृष्णनामाऐवजी महाराजांनी दिलेले 'सुदाम' हे भक्तनाम साहित्यिक सावरकर यांनी धारण केले; आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत ते चालवले.

१९३३ मध्ये बालाजी संगीडवार यांच्या हट्टाग्रही भूमिकेमुळे चिमूरला पहिला चातुर्मास्य घेण्याचे ठरविण्यात आले. भोजनव्यवस्था बाबुराव बेगडेंकडे देण्यात आली. प्रतिदिनी हजारो लोक जेवून जात. गावकऱ्यांनीच नव्हे तर आदिवासींनीही त्यात कृतिशील सहभाग दिला. गावोगावच्या दिंड्या रोज येत व दर्शन घेऊन हजेरी लावत. स्पृश्यास्पृश्यतेला कुठेही थारा नव्हता. याच चातुर्मास्यात महाराजांनी 'अमृतलहरी' (अभंग) लिहिल्या. 'पंचरत्न' हे गद्य प्रकरणही लिहिले. खऱ्या धर्माचे स्वरूप आणि सामाजिक-राजकीय स्थितीचे भान या चातुर्मास्यात जनसामान्यांना पुरतेपणी येऊन चुकले.

पुढे १९३४ मध्ये वरूड येथे आयोजिलेला सप्ताह, नंतर मोझरी येथे चातुर्मास्य आणि पंढरपूरची कार्तिकवारी या गतिविधी आटोपल्यावर तळेगाव (श्यामजीपंत) येथे महाराजांनी 'खादी वस्त्र भांडार' चे उद्घाटन केले. १५ ऑगस्ट रोजी आष्टीच्या गांधी चौकात तिरंगा ध्वज फडकवून भजनांचा दणदणीत कार्यक्रम संपन्न केला. 'हिंदभूच्या भाविकांनो आत्मबल मिळवा आता', 'रक्त हे देशभक्तीचे

उसळवा वीरशक्तीचे आपल्या'- अशा गर्जना करून समाजाची भ्याड वृत्ती झुगारण्याचा त्यांचा प्रयत्न होता. या वर्षीच्या सद्गुरु आडकोजी पुण्यतिथी सोहळ्यात 'लहर की बरखा' ही त्यांची खडी बोलीतील प्रदीर्घ रचना प्रकाशित करण्यात आली.

महाराजांच्या जीवनात १९३५ साल हे सुवर्णाक्षरांनी अंकित झाले ते त्यांनी स्वतःवर ओढवून घेतलेल्या व पूर्णतः निभावून नेलेल्या महारुद्र यज्ञामुळे! मांगरूळी (ता.मोर्शी) येथील सद्भक्त मारवाडी ब्राह्मण पंडित हरिनारायण पालीवाल यांनी रामटेकला मंदिर बांधले होते. एक्के-सप्ताह व अन्नदान करण्याचा त्यांना छंदच होता. ते मोर्शीवरून वरूड गावी गणपतराव करियेकडे आले व त्यांना विनंती करून महाराजांकडे पिंपळ्याला आले. महाराज त्यावेळी श्रीमंत आबूशेठ चांडक यांचेकडे होते. पालीवाल यांनी सालबर्डीला महारूद्र यज्ञाच्या आयोजनाची घोषणा तर केली होती, पण एवढे विराट कार्य सांभळण्याची आपली ताकद नाही हे जाणवून ते महाराजांना भेटले व ती जबाबदारी हातापाया पडून त्यांनी महाराजांवर टाकली. आपद्धर्म म्हणून महाराजांनी ती स्वीकारली. जेवढी जबाबदारी मोठी, तेवढा महाराजांचा हुरूप वाढायचा ! कोणते काम कोणास द्यावे हे त्यांची पारखी दृष्टी ठरवायची. गोपाळराव वाघ, विश्वासराव काळे आदिंना त्यांनी वर्गणीबरोबरच कार्यकर्ती माणसं गोळा करण्यास सांगितलं. त्यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

नीळकंठराव आणि अमृतराव झळके हे चुलत भाऊ. यांच्यात कित्येक दिवसांपासून वाद सुरू होता. महाराजांनी त्यांच्यात एकोपा करून दिला व त्यापायी नीळकंठरावांच्या सांगण्यावरून स्वतःची बिडी सोडली. महाराजांचा जनमानसावरील वाढता प्रभाव सहन न होऊन महाराजद्वेष्ट्या ॲड.अकर्ते यांनी म. गांधीजींना पुढे करून महाराज ढोंगी असल्याचे म्हटले, तेव्हा गणपतराव करिये त्यांच्या अंगावर धावले असता महाराजांनी अडविले,'यज्ञ म्हणजे शुद्ध ढोंग' अशी त्यांनी वृत्तपत्रातही महाराजांची बदनामी करणे सुरू केले. देशभक्त जगदीशराव साळवे व महात्मा गांधी यांचा दाट परिचय असल्याने त्यांनी महाराजांची गांधीजींशी भेट करून दिली. गांधीजींनी चौकशी अधिकारी नेमला. सखोल चौकशीअन्ती ॲड. अकर्ते यांच्या अपप्रचाराचा फुगा आपोआप फुटला! ह्या सर्व भानगडींच्या पार्श्वभूमीवर यज्ञ सुरूच होता.

सालबर्डीच्या महारुद्र यज्ञात धान्याची पोतीच्या पोती येत आणि त्यात काही रोख रक्कमही निघत असे. परिसराचे वातावरण मंगलमय नि भारल्यासारखे पवित्र झाले होते. हजारो लोक रोज यज्ञात हजर राहात होते. संतसंमेलने व ज्ञानदान सत्रे सुरू होती. कीर्तन, भजन व आरत्यांनी १९ दिवस आनंददायी वातावरण सुरू होते. पण ॲड. अकर्तेसारखे अवसानघातकी पुढारी 'नदीचे पाणी दूषित होत आहे'–अशी आरडाओरड करीत यज्ञात विघ्न आणू पाहात होते. त्यांनी मोर्शीच्या तहसीलदारांकडे तशी तक्रार केली.

सब–इन्स्पेक्टर धरमसिंग व ॲड्.अकर्ते यांच्या कारवायांमुळे खरे तर सर्व कार्यकर्ते चिडले. पण महाराजांनी वॉट्सन नामक इंग्रज डी.सी कडे योग्य कार्यकर्त्यांना पाठविले. त्यानुसार डी.सी. स्वत:च चौकशीकरिता आले. भीमरावदादा, नीळकंठराव झळके आदिंनी त्यांना वस्तुस्थितीचे दर्शन घडविले. पाणी स्वच्छ राखण्याची व्यवस्था, पखालीची कतार, प्रचंड मेळावा, शेकडो स्वयंसेवकांचा प्रबंध, लांबच लांब कोठ्यांतील भरपूर सामुग्री हे सारे पाहून ''ओ माय गॉड!'' हे आश्चर्योद्गार सहजच डी.सी.च्या मुखातून बाहेर पडले. तुकडोजी महाराजांची ओळख करून देताच डी.सी. नकळत उद्गारले,''ओ, रिअली ही इज!..नो डाऊट!!..''

श्री.नारायणराव साबळे या स्वयंसेवक द्वारपालाने डी.सी. ला यज्ञमंडपात प्रवेश करण्यास अडविले, कारण जोडे काढल्याशिवाय आत जाता येत नसे. ''साहेब माफ करा. महाराजांच्या हुकूमात मी येथे उभा आहे. नियम म्हणून आपणास ही विनंती आहे.'' या त्याच्या विनम्र हरकतीबद्दल वॉट्सन साहेब खुश झाले! जोडे बाहेर काढून ठेवून त्यानी ५ रूपयांची नोट त्या स्वयंसेवकास आग्रहाने दिली. महाराजांच्या कार्यकुशलतेवर डी.सी. खुष होऊन गेला; सर्कल इन्स्पेक्टरची हजेरी घेतली व पाण्याची डंकीन सुरू करण्याची परवानगी दिली. तसेच बैतुल जिल्ह्याचे कलेक्टर 'मॅक्डोनल हिल' यांनीही संमती दिली. विरोधकांचे सारे लक्ष्यभेदी बाण याप्रमाणे वाया गेले. या यज्ञात १०,४५० कार्यकर्ते विनामूल्य खपत होते. कशाचीच न्यूनता नव्हती. २,००० सेवक–सैनिक व तीनशे कुटुंबे बारा दिवस सारखी राबत होती. ३,००० स्वयंपाकी व ५,००० वाढपीही खपत होते. एकंदर अकरा लाख लोक त्या महारुद्र यज्ञात जेवून गेले. उरलेले धन व

धान्य विविध लोकसेवी संस्थांना वाटण्यात आले.

इकडे वरखेड येथे मंजुळामातेचे बंधू गोविंदराव निवर्तले आणि त्यांची भावजय माहेरी निघून गेली. त्यावेळी हरिगोविंद कडूंनी मंजुळादेवीला स्वगृही आणले. त्यांना ज्वर होता; पण ज्वराचे कारण लक्षात येत नव्हते. त्यांना सालबर्डीच्या एका श्रीमंत भक्ताकडे ठेवण्यात आले. तेथील यज्ञाची व्यवस्था पाहून ती आनंदाने वेडी झाली. एक हुद्देदार चौकशी ऑफिसर सालबर्डीला आला व एकांतात महाराजांना प्रश्न विचारू लागला. महाराजांनी त्याला शांतपणे उत्तरे दिली. ऑफिसर खुष झाला व जलपान करून निघून गेला. यज्ञाच्या कामात व्यत्यय आणणाऱ्या काही दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी मात्र धमक्या देणे सुरू केले. काहींनी अधिकाऱ्यांना भडकवणे सुरूच ठेवले होते. काहींनी पहाडातील झाडांना आग लावली. त्यावेळी स्वयंसेवकांनी सावध होऊन आग विझविण्याची व्यवस्था केली. पण एका म्हातारीची झोपडी पेटून ती ओरडत महाराजांकडे आली. तिला महाराजांनी नवीन झोपडी, भांडीकुंडी व वर्षभराचे धान्य देवविले. यज्ञ दि.४ मार्च रोजी पूर्ण झाला. आदल्या दिवशी दि.३ मार्चला महाशिवरात्री निमित्ते विशेष कार्यक्रम ठेवले गेले होते. त्यादिवशी शिर्रीच्या तानसा सावजींनी संपूर्ण यात्रेला फराळ दिला.

महारुद्राच्या समारोपप्रसंगी मंजुळा मातेला सद्भक्तांनी मेण्यात घालून मंगलवाद्ये वाजवीत मोठ्या थाटाने यज्ञवेदीजवळ आणले. तो तिच्या जीवनाचा सर्वात सुखद पळ होता. यज्ञाची पूर्णाहुती झाल्यावर सर्वजण नदीवर स्नानासाठी गेले. मंत्रोच्चारपूर्वक विधीनुसार गंगापूजन झाले. महाप्रसादानंतर महाराजांच्या सुश्राव्य भजनांचाही प्रसाद सर्वांना मिळाला. पं. हरिनारायण पालीवाल यांनी वैशाख शु.३ ला टाळांच्या गजरात सुरू केलेल्या नामजपयज्ञाची परिसमाप्ती फाल्गुन शु. प्रतिपदेला महाराजांचे हस्ते झाली. उरलेल्या निधीतून महाराजांनी सालबर्डी क्षेत्रात गोरक्षण संस्था, वेदशाळा, धर्मशाळा व भव्य आश्रम निर्माण केला. आसुरी वृत्तीवर दैवी प्रवृत्तीचा विजय, हे या यज्ञाचे स्वरूप होते.

* * * * *

## चार : संयोजन

सालबर्डीच्या महायज्ञामुळे महाराजांच्या आगळ्या व्यक्तिमत्वाची विलक्षण उत्कट जाणीव लाखो लोकांना झाली; पण रात्रंदिवस दगदग आणि सारखे जागरण पचवीत आजारातही त्यांनी ते प्रचंड कार्य पूर्णत्वास नेल्यामुळे विश्रांतीची निकड जाणून हिवरखेडचे आयुर्वेदाचार्य श्री.ढोमणे यांनी आग्रहाने त्यांना घरी नेले. पण लवकरच वरूडचे श्री.गणपतराव करिये यांनी त्यांना जरूड व वरूडकडे नेले. त्यामुळे विश्रान्ती ऐवजी प्रेमी भक्तगणांकडेच त्यांचा वेळ गेला. तिथून मायमंजुळेच्या भेटीस महाराज वरखेडला गेले.

वरखेडात श्रीमंत जानरावजी बोके यांच्या वाड्यात मंजुळाआईला आणले होते. तिची प्रकृती सालबर्डीच्या प्रवासामुळे खालावली होती. सद्गुरुंच्या समाधिदर्शनानंतर मंदिराचे बांधकाम पाहून महाराज मोझरीला आले. तिथे वनभोजनाचे आयोजन करून त्यातच त्यांनी धर्मसेवाश्रमाची स्थापना करण्याचा प्रस्ताव ठेवला. उपस्थित मंडळींना महाराज म्हणाले, ''गडे हो ! मानवजन्म जितका दुर्लभ तितकाच क्षणभंगुर आहे. म्हणून प्रत्येकाने चालू परिस्थितीतच तातडीने सत्संग साधून जीवनाचे सार्थक केले पाहिजे. त्यासाठी भजने व आरत्यांना एक उत्तम स्थायी रूप देऊन माणसांची प्रगती साधण्यासाठी या परिसरात हा आश्रम उभारायची माझी इच्छा आहे.''

स्व.श्रीमंत चंद्रभानजी ठाकुर यांचे दत्तकपुत्र रावसाहेब आणि त्यांची आई गंगाबाई ठाकुर यांनी चार एकर जमीन श्रीगुरुदेव धर्मसेवाश्रमास रीतसर दान दिली. सन् १९३५ च्या वर्ष प्रतिपदेच्या शुभमंगल मुहूर्तावर प्रात: काली नरनारींनी ती भूमी स्वच्छ करून संडासंमार्जन केले व रांगोळ्या घातल्या. एक उंच भगवा ध्वज मध्यभागी रोवण्यात आला. तेथे बांबूच्या कमच्यांची भिंत गढीच्या पांढऱ्या मातीनं लिंपून आश्रमाची प्रमुख पर्णकुटी तयार करण्यात आली. तिच्या आतल्या भिंतीशी गुरुदेवाचे अधिष्ठान ठेवण्यात आले. प्रार्थनेसाठी अनकवाडी-मोझरी-शेंदोळ्याचे शेकडो लोक उत्साहाने येऊ लागले. पहिले आश्रमीय म्हणून 'सुदाम' सावरकर आणि पांडुरंगदास 'रामायणी' हे आश्रम परिसरात झोपड्या बांधून राहू लागले.

महाराजांची प्रकृती झपाट्याने सुधारू लागली. त्यांनी चहा व बिडी

अजिबात सोडून दिली होती.भक्तगण फळ-फळावळ आणीत. मूलतापीचे शुद्ध जल, फलाहार व नियमित दिनचर्या यामुळे दोन महिन्यांत त्यांचे रोडावलेले शरीर बलवान व भरदार दिसू लागले. त्यांचे वजनही ७० पौंडांवर आले. मोझरीचे प्रेमी तरुण श्री.नारायणराव बोडखे महाराजांच्या प्रकृतीची नीट काळजी घेत होते. भगवान दशमुखे या तरुणाने सुटीच्या या दिवसांत त्या वाड्यातच शारीरिक शिक्षणाचा कॅम्प घेतला. त्याच दिवसांत मूलतापी घाटावर फिरताना महाराजांनी 'अभंग शतकावली'चे एकशे एक अभंग लिहिले.

नागपूरला ॲड. द.मा. गडकरी यांचे घरी महाराजांना नेण्यात आले तसेच श्रीमंत राजाबाळ चिटणीस, न्यायमूर्ती पुराणिक, न्यायमूर्ती नियोगी, श्रीमंत दाजीसाहेब बुटी, गोस्वामी महेशपुरीजी आदींच्या बंगल्यावर सुद्धा महाराजांचे स्वागत सोहळे संपन्न झाले. त्यानंतर पंढरपूरला अकरा दिवस खंजरीवर भजनाचे कार्यक्रम झाले. गोपाळपुरीला काल्याचे प्रसंगी भारूड गायनात नि फुगड्या खेळण्यात देखील महाराजांनी भाग घेतला. गाडगे महाराजांनी आग्रहपूर्वक निमंत्रित करून त्यांना स्वत: धर्मशाळेत नेले. १६ जुलै ची गुरुपौर्णिमा अविस्मरणीय झाली. तेथून सोलापूर, केडगाव देहू आदि तीर्थे करून महाराज घृष्णेश्वर, दौलताबादला आले व वेरूळची लेणी पाहिली. बावीस दिवसांच्या या दौऱ्यात अनेक विद्वान प्रेमीभक्त लाभले होते. तोंवर भक्तांनी श्रद्धापूर्वक दिलेले रेशमी सदरे, भरजरी धोतर व इतर वस्त्रे महाराज घालीत. पण या दौऱ्यापासून महाराजांनी खादी वापरायला सुरुवात केली व अनुयायांनाही खादीभक्त बनविले.

अमरावतीला गांधी चौक व नेहरू मैदानात गणेशोत्सवात महाराजांचे भजनाचे कार्यक्रम झाले; तर विजयादशमीला आष्टीला व्यायामशाळेत उत्सव झाला.

नागभीडच्या भाकरे बुवांचे निर्याण १९३५ मध्ये झाले तेव्हा महाराज अंत्यविधीसाठी हजर राहिले होते. १० नोव्हेंबर कार्तिक पौर्णिमेला वरखेड येथे ते काल्यासाठी गेले. विश्वासरावदादा काळे यांनी आपली फोर्ड गाडी महाराजांना अर्पण केली होती. ड्रायव्हरसुद्धा नेमून दिला होता. महाराजांचा ड्रायव्हर चिमूरचा बाळाराम याने महाराजांना आपली व्यथा सांगितली. त्याची स्वत:ची बहीण परिस्थितीवश वेश्याव्यवसायात पडली पण तिच्या कन्येने मात्र या व्यवसायात

पडू नये असे त्यांना वाटत होते. म्हणून त्या मुलीला वणी येथे श्रीमती नर्मदाताई सपकाळ या शिक्षिकेकडे शिक्षणासाठी ठेवले होते. त्या मुलीला चांगला वर मिळेना. कारण पूर्वेतिहासामुळे लोक बुजत. महाराजांनी एका अनुरूप मुलाशी त्या मुलीचा विवाह लावून दिला.

दि.९ डिसेंबर १९३५ च्या दत्तजयंतीच्या उत्सवाला महाराज पुसदा येथे कार्यक्रमाला गेले असता तेथून शिरसोलीला आले. तेथे गोपालकाल्याच्या मोठ्या पंगती बसल्या. आष्टीचे शामरावदादा मोकदम हे १९३२ पासूनच 'आरती मंडळ' माध्यमातून महाराजांच्या कार्याशी जुळलेले होते. आष्टी परिसरातील अंतोरा, भिष्णूर, खडकी या गावांमध्ये तर महाराजांचे कितीतरी निष्ठावंत भक्त तयार झाले होते. क्रांतिकारी प्रेरणेतून शिस्तबद्ध कार्य करणाऱ्या शामरावदादा मोकदम यांना तुकडोजी महाराजांमध्ये सच्च्या गुरुचे दर्शन घडले ते महाराजांनी त्यांच्या शंकांचे सहज समाधान करून दिल्यानंतर. स्वर्ग-नरक, पाप-पुण्य आदींचे जीवनसंलग्न अर्थ सांगून महाराजांनी अस्सल जीवन जगण्याच्या शैलीवरही प्रकाश टाकला. ते म्हणाले - ''सृष्टी ही बहुरंगी नाटकशाळा आहे. या मंचावर तुम्ही आपल्या स्वभावाला व परिस्थितीला अनुसरून जो काही 'पार्ट' करणार तो उत्तम वठवा आणि जे कराल ते जगाची कल्याणदृष्टी पुढं ठेवून करा. त्याचबरोबर 'ते पात्रच मी'- असं समजून त्याच्या आसक्तीत वा अभिमानात बंदी होऊ नका. स्वत:ची वेगळीक जाणा, एवढंच!''

शामरावदादांनी १९३३-३४ पासून महाराजांच्याच प्रेरणेने सुरू केलेल्या आरती-प्रार्थनेला १९३५ अखेरीस शिस्तबद्ध नामरूप दिले : 'श्रीगुरुदेव धर्मसेवा आरती मंडळ'. त्यांचे काम क्रांतिकारकांच्या शिस्तबद्ध पद्धतीने सुरू होते.

दि.२८ डिसेंबर १९३५ रोजी काँग्रेसच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली. भारतभर सुवर्णमहोत्सव साजरा झाला. अकोल्याच्या ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी महाराजांना आवर्जून आमंत्रण दिले. इकडे मंजुळा देवीची प्रकृती खालावली होती. महाराज वरखेडला परत आल्यावर त्यांनी भजनाचा कार्यक्रम ठेवला. तशातच मायमंजुळेचे निर्याण झाले. बुधवार दि.२२ जाने.१९३६च्या ब्रह्ममुहूर्तावर महाराजांनी माडीवरच्या गवाक्षातून अखंड शंख फुंकला. सर्वांना शोकवार्ता कळली. तिसरे प्रहरी पिंगळा नदीच्या काठी मायमंजुळेच्या पार्थिवाचे दहन करून

रक्षा वर्धेत नेऊन सोडण्यात आली.

पौष-माघात प्रयागचा अर्धकुंभ होता. मातेच्या अस्थी पवित्र त्रिवेणी संगमी गंगार्पण करण्यासाठी महाराजांनी प्रयाण केले. सोबत बंडोजीबाबा, रामराव भाऊ, गोपाळराव वाघ, बापुराव केचे इत्यादी बरीच प्रेमी मंडळी गेली होती. नौकेत बसून त्रिवेणी संगमावर मंजुळामायचे अस्थिविसर्जन करण्यात आले. पंड्याकडून विधी आटोपला तसा महाराजांनी स्वतःचा जरीकाठी दुशाला एका म्हाताऱ्या ढीवराला पांघरून दिला. पंड्या त्यावर बिथरला तेव्हा 'दया धरम का मूल है'- म्हणून त्याला महाराजांनी व्यवस्थित समजावलं. कुंभमेळ्याचे निरीक्षण केल्यावर श्री.जयेंद्र पुरीजींची भेट घेतली व ते वरखेडला परत आले.

दि.२८ फेब्रुवारी १९३६ ला नागपूर येथे श्रीमत् रामकृष्ण परमहंसांच्या जन्मशताब्दीला महाराजांना आमंत्रण होतं. त्याप्रसंगी महाराजांची कितीतरी भजने झाली. दुसऱ्या दिवशी श्रद्धानंद अनाथालयातील मुलांची त्यांनी भेट घेतली.

आष्टीला २ मार्चला आरती मंडळ व गोरक्षण कार्यासाठी सभा घेण्यात आली. गोपाळराव वाघ हे काँग्रेस कार्यकर्ते व आरती मंडळ यांच्यामधला दुवा होते. तसे गोरक्षण, सूतकताई, व्यायाम, भजन या दैनंदिन उपक्रमांपेक्षाही आपद्ग्रस्तांची सेवा आणि सत्कार्याला सहयोग हा शामरावदादांच्या नेतृत्वाखालील आरतीमंडळाचा ठळक विशेष होता. महाराजांना सभेचे अध्यक्ष करण्यात आले होते. मोझरीच्या 'श्रीगुरुदेव धर्मसेवाश्रमा'त दि.२४ मार्च रोजी वर्षप्रतिपदेचा उत्सव साजरा करण्यात आला. त्यात गोवध बंदीचा प्रचार करण्यात आला. नागपूरला 'हिंदी-हिंदुस्तानी परिषद' आयोजित करून महात्मा गांधींना प्रथमच बोलविण्यात आले होते. अध्यक्षपदी डॉ.बाबू राजेंद्रप्रसाद होते. अ‍ॅड्.अकर्ते यांनी महाराजांविरुद्ध अपप्रचार चालूच ठेवला होता. त्यामुळे श्री.हरकरे यांचे मध्यस्थीने यावेळी महाराजांशी म.गांधीजींची प्रत्यक्ष भेट करून देण्यात आली. दे.भ.टिकेकरांच्या धंतोली येथील बंगल्यावर महाराजांची भजने झाली. महाराजांच्या आत्मीयतापूर्ण भजनांमध्ये गांधीजी इतके हरवून गेले की स्वतःच्या मौनव्रताचे विस्मरण होऊन त्यांनी ''और कहिए महाराज''-म्हणून फर्माईश केली!

दि.९ जून १९३६ ला महाराजांचा मुक्काम मुलताई (जि. बैतुल) येथे ताराबाई वाघोडेकर यांचे बंगल्यावर होता. आचार्य दादा धर्माधिकारी यांचे काका

श्री भाऊसाहेब धर्माधिकारी यांनी अस्पृश्यता पालनावर उलट चर्चा केली. त्यांच्या मते अस्पृश्यता पाळणे हे हिंदूंच्या आचारधर्माचे अंग आहे. महाराजांनी मात्र ती अंध रूढी असल्याचे सांगत आपली असहमती कायम ठेवली. तेथून जरूड येथे श्री. जगदीशराव हे त्यांचे सोबत होते. जरूडकर श्री.तात्यासाहेब देशमुखांनी भजनाचा कार्यक्रम ठेवला होता. तेथून ११ जूनला महाराज हिवरखेड येथे आले. महाराजांना ब्राह्मणधार्जिणे मानून विरोधकांनी म.गांधींकडे जी तक्रार केली होती तिच्या चौकशीसाठी नागपूरचे वीर बापूराव हरकरे यांची नियुक्ती झाली. त्यांनी दोन्ही बाजूंचा विचार करून म. गांधींना अहवाल सादर केला. त्यावरून गांधीजींचे मत महाराजांबद्दल अधिक निर्मळ झाले व हे सगळे आरोप गैरसमजूत अथवा द्वेषांतून उपजले असा त्यांनी निर्णय दिला. विरोधकांची हवा निघाली, कारण विरोधक ॲड्. ज.सि.अकर्ते हेच मुलांकडून खोट्या साक्षी देणारे दुष्प्रवृत्तीचे होते. शेवटी ते असे उघडे पडल्यावर अकर्ते यांनी म.गांधीजींची व तुकडोजी महाराजांची क्षमा मागितली. महात्मा गांधींनीही त्या प्रकरणाबद्दल महाराजांकडे खेद व्यक्त करून महिनाभरासाठी सेवाग्राम आश्रमात वास्तव्यास येण्याची महाराजांना विनंती केली. त्यानंतर चातुर्मास्यासाठी महाराज पंढरपूर यात्रेला विठ्ठल दर्शनासाठी गेले. जोग महाराजांचे संतशिष्य ह.भ.प. व्यंकटस्वामींची भेट घेतली व त्यांच्याच आग्रहावरून त्यांच्या मठात भजनाचा कार्यक्रम केला, तो दोन तास रंगला. दि.८ जुलै ला महाराज मोझरी चातुर्मास्यासाठी परत आले.

दि.१४ जुलै १९३६ रोजी दुपारी ४ च्या सुमारास महाराज वर्ध्यापासून ५ मैलावरील सेवाग्रामला आश्रमात दाखल झाले, तेव्हा गांधीजींची सूतकताई चालू होती. म.गांधींसोबत त्यांची पत्नी कस्तुरबा, राजकुमारी अमृत कुंवर, श्रीमती लीलाबेन, नात कु. मनू गांधी, नातू कनुजी व सरहद गांधी, अब्दुल गफारखाँ, त्यांचा एक मुलगा व मुलगी, श्रीमती मीराबेन, मुन्नालालजी, सेक्रेटरी श्री.प्यारेलालजी, आश्रम व्यवस्थापक श्री. बलवंत सिंहजी, डॉ. आर्यनायकम्‌जी आणि काम करणारे अनेक हरिजन राहात होते. तुकडोजी महाराज देखील त्यांच्यात राहू लागले. ते सुमारे महिनाभर तेथे राहिले. त्या वास्तव्यात म.गांधींच्या मनावर महाराजांनी अमीट छाप पाडली. सेवाग्राम आश्रमातील दिवस पहाटे चारपासून आरंभ होत असे. सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद आदिंशी

महाराजांचा येथेच परिचय झाला. कधी कधी पंडित जवाहरलाल नेहरू आश्रमात येत. महाराज कुराणावर चर्चा करीत. त्यांचे भजन व कीर्तन यांत तर सर्वच मुग्ध होत. गांधीजी 'लहर की बरखा' नि 'अनुभव प्रकाश भजनावली' मोठ्या आस्थेने वाचत.

दि.२४ जुलै रोजी महाराजांची प्रकृती बरी नव्हती. म.गांधी सूत कातत होते. महाराजांनी भजन सुरू केले. स्वत: गांधीजी महाराजांना कोमट पाण्यात फक्त निंबूरस व सैंधव मीठ देत. त्यांचे भोजन व दूध बंद केले होते. १०४ डिग्री ताप असल्यामुळे महाराजांना उठण्याची देखील गांधीजींनी मनाई केली होती. मलेरियाचा ताप ३ डिग्रीच्या वर चढला असताना देखील महाराजांनी एक भजन म्हटलं होतं. आश्रमात गांधीजी शिस्त पालनाकडे विशेष लक्ष देत. स्वराज्य प्राप्तीसाठी– विशेषत: खेड्यांतील सुखदु:खाकडे त्यांचे लक्ष अधिक असे. म. गांधींची भूमिका मूलतः आध्यात्मिक असून राजकारण हा तिचा केवळ एक पैलू होता.

दि.१३ ऑगस्ट रोजी महाराज आश्रमचे वास्तव्य संपवून वर्धेस आले, तेव्हा सर्वांची अंत:करणे भरून आली होती. वर्धेहून आर्वी व तेथून ते आष्टी येथे आले. तेथून दि.१७ ऑगस्टला मोझरीस आले व रामरावभाऊंकडे उतरले. सर्वांच्या भेटी झाल्यावर दि.२० ऑगस्ट १९३६ गुरुवारी रोजी सकाळपासून महाराज गुरुकुंज आश्रमात राहू लागले.

महात्मा गांधी व महाराज या दोन्ही संतहृदयी पुरुषांचे एकमेकांवर अपार प्रेम जडले असले आणि दोघांचेही ध्येय एकरूप असले तरी, महाराजांचा नि आपला मार्ग सर्वस्वी एक नाही याची जाणीव महात्मा गांधींना सुद्धा होती. महाराज हे स्वयंप्रेरित आत्मनिष्ठ असे स्वयंप्रज्ञ व्यक्तिमत्व होते.

१९३६ चा संपूर्ण चातुर्मास्य त्यांनी मोझरीच्या गुरुकुंज आश्रमातच घालविला. तेथे महाराज सायं आरतीतील पसायदानानंतर १५ मिनिटे हिंदीत प्रवचन करीत असत. ज्ञान, भक्ती, वैराग्य, सत्संग, सात्त्विक दिनचर्या, प्रार्थना अशा विषयांवरच ही प्रवचने असायची. त्यातून नवे विचार नि एकेक समर्पक दृष्टांत महाराज द्यायचे. त्यांच्या वाग्गंगेने शिस्त, शांतता, गांभीर्य, पावित्र्य, प्रेम यांसह सेवाश्रमाचा कण न् कण जणू न्हाऊन निघत असे. महाराजांना पांडुरंग सबनीस

यांनी आंग्ल भाषेचे काही शब्द व विठ्ठलराव सोनार या नामांकित पहेलवानानं मल्लविद्येचे काही डावपेच शिकविले व आश्रमात 'व्यायामशाळा' सुद्धा सुरू केली. शंका-समाधान, नामधून नि गीताध्ययनाचे कार्यक्रम होत. दि. २५ ऑक्टोबर रोजी विजयादशमी निमित्ते अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि.७ नोव्हेंबर रोजी सकाळी एकनाथी भागवत, दासबोध व गीताध्ययन यांचा समारोप झाला. दि.८ नोव्हेंबर रोजी अखंड वीणा समाप्ती व गोपालकाल्याचे प्रवचन झाले.

दि.२३ नोव्हें. १९३६ रोजी वरखेड येथे संत श्री गाडगेमहाराज यांचे पहिलेच कीर्तन होते. त्यांनी सभामंडपात न जाता नदीकाठची गलिच्छ जागा झाडून तिथेच मुक्काम ठोकला. २९ नोव्हेंबर रोजी कौंडण्यपूरला यात्रेत महाराजांचे भजन-भाषण झाले. ३ डिसेंबर रोजी मंगरूळ दस्तगीरला ब्रह्मनिष्ठ श्री गणपति महाराजांची यात्रा कार्तिक पौर्णिमेपासून पाच दिवसांची असता भक्तांनी महाराजांना तिथे नेले होते. तिथे वर्णवाद आणि जातिवादाच्या विरोधात क्रांतिकारी पावले उचलल्यामुळे गणपति महाराज आणि गावकरी यांच्या सुरू असलेला संघर्ष महाराजांनी सामोपचाराने मिटवला. तेथून दि.७ डिसेंबर रोजी जावरा गावी श्री.रंगनाथ बुवांनी महाराजांना आग्रहाने आपल्या घरी नेले होते. दि.१० डिसेंबर ला लाखांदूरच्या सप्ताह समारोपासाठी महाराज गेले. ''जन्मजातीवरून कोणाला ही उच्चनीच समजता कामा नये; मानवाला मानव म्हणूनच ओळखलं पाहिजे.''- असा उपदेश समारोप प्रसंगी महाराजांनी भक्तगणांना केला.

दि.५ जाने. ३७ ला कानपा स्टेशन गावी भजनासाठी दूरदुरून मंडळी आली होती. सहभोजनाचा कार्यक्रम झाला. तिथेही ''उच्च व नीच भेदभाव अजिबात सोडून द्या''- असे महाराज म्हणाले. दि.२६ जानेवारी१९३७ ला कारंजा(घाडगे) येथील श्री दादाजी लटारे महाराजांच्या पुण्यतिथिप्रीत्यर्थ महाराजांचा कार्यक्रम होता तेव्हा 'लहर की बरखा' पुस्तकाची द्वितीय आवृत्ती प्रकाशित झाली. निवडणुकीच्या धुमश्चक्रीत महाराजांनी देशाच्या हिताचा विचार सर्व पक्षांना समजावून सांगितला. प्रामाणिक, सेवाभावी, त्यागी, विचारी व योग्य अशा कार्यकर्त्यांनाच देशकार्याची संधी द्यावी- ही काळाची गरज आहे; किंबहुना हा समाजधर्म आहे असे त्यांनी पटवून दिले. काँग्रेस, राष्ट्रीय पक्ष, ब्राह्मणेतर पक्ष

आदि पक्ष निवडणुकीला उभे होते. 'छिपे हो कहाँ कष्टहरी कन्हैया'-अशी देशाच्या दुःखाला समयोचित वाणी देणारी महाराजांची भजने सर्वांच्याच हृदयाची पकड घेत होती.

दि.९ जून १९३७ ला वरूड येथे 'सनातन हिंदुधर्मा 'चे एक अधिवेशन धर्माधिमानी हिंदू मंडळींनी आयोजित केले होते. त्याचे अध्यक्षपद महाराजांना देण्यात आले होते. महाराजांनी अध्यक्षपदावरून स्व-संस्कृती न अभ्यासताच अन्य संस्कृतीची गुलामी स्वीकारणाऱ्या झापडबंद वृत्तीचा निषेध केला. धंदेशिक्षण, शारीरबल, जीवनोपयोगी कला, देशरक्षणाची उर्मी आणि नम्रतापूर्ण वर्तणूक यांचेवर त्यांनी विशेष भर दिला.

यावर्षीच्या चातुर्मास्यासाठी महाराजांनी नागठाणा जंगल निवडले. भोजन व्यवस्था ताई वाघोडकरांकडे, तर कार्यक्रम व्यवस्था पांडुरंगदास रामायणीवर सोपविण्यात आली होती. ३० युवक कार्यकर्त्यांवर प्रशिक्षणाचा भार होता. १९ ऑक्टोबरला या चातुर्मास्याचा समारोप झाला. या चातुर्मास्य समारोपात महाराजांची 'समाज की भूल' व 'अस्पृश्यता निवारण' ही व्याख्याने विशेष प्रेरक ठरली.

महाराज दर चातुर्मास्यात पंढरपूर नासिक व त्र्यंबकेश्वर आदि तीर्थांना जात असत- तसे यावेळीही ते जाऊन आले. २५ जुलै १९३८ पासून मोझरीच्या आश्रमात चातुर्मास्य सुरू झाला. १७ ऑक्टोबर रोजी त्यांचा समारोप झाला. दि.१७ ऑगस्ट ला गोकुळाष्टमीच्या मुहूर्तावर सेवाश्रमातच 'श्रीकृष्णगीत' या पुस्तकाचे महाराजांच्या हस्ते प्रकाशन झाले. 'श्रीकृष्णगीत' या भक्तिपर गीतिकाव्यसंग्रहाचे लेखक 'सुदाम'जी यांचा चारपाच प्रेमीजनांच्या उपस्थितीत विवाह झाला; आणि घरून नेलेल्या डब्यांनी सहभोजन पार पडलं ! पत्नी मिळवती, म्हणून त्यांच्या आर्थिक विवंचना कांहीशा मिटल्या व लेखन-प्रवचनाद्वारे प्रचारकार्य करण्यास त्यांना वेळ मिळू लागला.

सततच्या धावपळीमुळे महाराजांचा पोटशूल उमळला. त्यातच त्यांना पाठं झालं. दादासाहेब बोके यांनी आग्रहाने महाराजांना अमरावतीस आणून प्रसिद्ध डॉ. मुदलीयार यांचे उपचार सुरू केले. कारण त्यांना दगदगीमुळे उठणे-बसणे देखील मुश्किल झाले होते ! डोकेदुखी व पित्त प्रकोपाबरोबरच डाव्या डोळ्यात

विंचवाच्या दंशाप्रमाणं तीव्र वेदना सुरू झाल्या होत्या. नंतर महाराजांना नागपूरला नेण्यात आले. दि.३० जुलै १९३९ रोजी नागपूरहून महाराजांनी डॉक्टरांच्या हस्ते महात्मा गांधींकडे पत्र पाठविले.

दि.१६ ऑगस्ट १९३९ रोजी महाराज वरखेडला आले व त्यांनी स्वहस्ते चातुर्मास्यारंभ करून दिला. मोझरीस धावती भेट देऊन अमरावतीस मुदलीआर आदींनी पुन्हा त्यांच्या प्रकृतीचे निरीक्षण-परीक्षण केले. गावोगावचे असंख्य सद्भक्त त्यांना भेटायला दररोज येत असत. दि.३० सप्टेंबर १९३९ पासून महाराज वरखेडच्या चातुर्मास्यात संमीलित झाले. दि.६ नोव्हेंबर १९३९ ला चातुर्मास्याची सांगता झाली.

देशांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांशी, त्यातील श्रेष्ठ पुढाऱ्यांशीही महाराजांचे आपुलकीचे संबंध होते. स्थानिक प्रसिद्ध काँग्रेसचे व आर्यसमाजाचे थोर कार्यकर्ते श्री.रघुनाथराव वातकर यांनी महाराजांना म्हटले, ''एका धनवान मेहतराचे घर निघालेली एक बाई आता पस्तावली आहे. तिला लहान मुलं आहेत. पतीचीही तिला परत घेण्याची इच्छा आहे; पण धैर्य नाही. म्हणून आपण समाजाचे गैरसमज दूर करून तिला शुद्ध करून घ्या.'' हे ऐकून महाराजांनी त्या पतिपत्नीची पुन्हा भेट घडविली व नव्याने त्यांचा प्रपंच सुरू करून दिला.

महाराज प्रवासातही एक दृष्टी वरखेडकडे ठेवीत असत. दु:खितांची काळजी वाहणं हा तर त्यांचा स्वभावच होता. 'आपत्ती ही भक्ताची कसोटी असते... आपत्तीने भक्त अधिक निर्भय, अधिक उन्नत होतात'- ही तर त्यांची शिकवणच होती. प्रवासात देखील महाराजांचे पत्रांसोबत भजन व अन्य लेखनही सातत्याने सुरूच असे.

आमला विश्वेश्वरला 'श्रीकृष्ण व्यायाम शाळे'च्या वार्षिक उत्सवाचे महाराज अध्यक्ष होते. वरूडची गोरक्षण संस्था, गावोगावची आरतीमंडळे, नाशिकचे भोसला मिलिटरी स्कूल, संगमनेर, जामगाव, दर्यापूर असे ते सतत परिभ्रमण करीतच होते. दि.१७ मे १९४० रोजी अकोल्याचा कार्यक्रम करून महाराज उज्जयिनीला गेले. कारण मोझरीचे श्रीमंत रावसाहेब ठाकूर यांचा विवाह उज्जैनच्या मालतीबाईशी व्हायचा होता. 'जानवसा' उज्जयिनीचे महालात होता. तेथे एका विहिरीत वऱ्हाडचे पाहुणे पोहण्यासाठी उतरले असता त्यात एक सर्प

फणा काढून मुलांकडे पाहात होता. मुले घाबरली, तेव्हा महाराजांनी धीर देत गंभीरपणे सूचना दिली– ''जहाँ के वहाँ चुप रहो । वह कुछ नही करेगा । वह बेचारा बाहर जाना चाहता है।'' खरोखरच तो मोठा सर्प सरसर वर येत निमूटपणे निघून गेला.

आष्टीला राष्ट्रधर्मप्रचारक गोपाळराव वाघ आणि अन्य देशभक्त तरुणांनी महाराजांचे स्वागत व सत्कार केला. बँडच्या निनादात गणवेषांतील शिस्तबद्ध स्वयंसेवकांनी सलामी दिली. त्यावेळी महाराजांचे हस्ते तिरंगी ध्वज फडकविण्यात आला व महाराजांनी भाषण दिले : ''स्वावलंबन हेच खरं स्वराज्य आहे; राष्ट्र ध्वज सर्वांना एकत्र येऊन राष्ट्रासाठी बलिदान देण्यास सांगतो''–हा त्याचा सार. नागोराव मोरे, लक्ष्मणराव वाघ, मोतीरामजी होले इ. मंडळी त्यावेळी हजर होती. या कार्यक्रमाच्या यशस्वितेत आरती मंडळाचा महत्त्वाचा वाटा होता.

दि.९ जुलै १९४० ला महाराजांनी पंढरपूर गाठले. लोकसंत गाडगे महाराजांची कार्यशाळा, श्री कैकाडी महाराज धर्मशाळा, श्री गुंडोजी महाराज–बंडोजी महाराज–बंकटस्वामी आदींचे मठ, श्री निवृत्तीनाथ मठ, श्री सावता मठ, श्री महिपती मठ, श्री ज्ञानेश्वर मठ, श्री राममंदिर, श्री तपकीरबुवाचे समाधी मंदिर, श्री रुक्मिणी माता मंदिर, गोपाळपुरी, गरुड खिडकी, आपटे हायस्कूल, महाराष्ट्र गायन विद्यालय, प्रल्हाद भजन मंडळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तसेच श्री.ज्ञानेश्वर बडवे, विठ्ठल बडवे, श्रीमंत होळकर, म्हसने पाटील, अत्रे वकील, चाणे वकील इत्यादींच्या निवासस्थानी महाराजांचे खंजरी भजन पंढरपुरात गाजत होते. त्यांचा थोडा सुद्धा वेळ रिकामा जात नव्हता. महाराज म्हणायचे, ''भांड्यात एका वेळेस एकच पदार्थ राहू शकतो तसेच व्यसनविकारांनी मलीन झालेले आपले रोमरोम भक्तीला राहायला जागाच देत नाही.''

दि.१९ ऑगस्ट १९४० ला सरदार होळकरांच्या आग्रहावरून शिंगणापूर क्षेत्री महाराज गेले, तेथे शिवलिंग व विष्णुलिंगावर त्यांचे हस्ते अभिषेक करण्यात आला. सर्वांची भोजने झाली. एकतारीवर महाराजांचे भजन झाले. दुसरे दिवशी सकाळच्या आरतीनंतर महाराजांनी दहा अभंग लिहिले. नंतर माळासरायचा आडवा मारोती, वेळपूरचा खंडोबा, एकचक्र गावचा अर्धनारीनटेश्वर पाहून वाकडीला त्यांनी श्री.लक्ष्मणबुवांच्या समाधीचे दर्शन घेतले. मार्गात सौ.सरदारबाईंच्या जिज्ञासेमुळे

मंदिराचा जीर्णोद्धार करणाऱ्या अहिल्याबाई होळकरांविषयी विशेष माहिती दिली. तेथून सारे पंढरपूरला आले. ''पंढरपुरात राहूनही जर आपली आचारशुद्धी, विचारशुद्धी झाली नाही तर देव कुठे राहिला? तो कोसो दूर जातो. अन्यथा तो सर्वत्र भरलेलाच आहे. म्हणून संतांच्या उपदेशाप्रमाणे आचार शुद्ध करणे महत्त्वाचे आहे''–हे त्यांचे उद्‌गार होत.

जत संस्थान हे ११९ गावांचे छोटेसे संस्थान. तेथील राजे विजयसिंहराव डफळे व राणी पुतळाराजे यांनी आपला वकील पंढरपूरला पाठवून आग्रहाने महाराजांना उत्सवासाठी बोलावून घेतले. दि.२४ ऑगस्ट १९४० रोजी रात्री ११ वाजता श्री.रामचंद्र कोडापे, रामभाऊ सावंत, नामदेव बिजवे, पंचभाई यांचे सोबत महाराज टांग्याने स्टेशनवर गेले आणि सकाळी ८ वाजता जतसंस्थान येथे पोहोचले. सायंकाळी महाराजांचे भजन व दासगणू महाराजांचे कीर्तन झाले. रात्री श्रीकृष्ण जन्मोत्सव संपन्न झाला. ३१ ऑगस्टपर्यंत महाराजांचा मुक्काम जतसंस्थानात होता.

दि.१ सप्टेंबर १९४० ला पिठोरी अमावास्येला महाराज पहाटेसच पंढरपूरला आले. तेथून दि.३ सप्टेंबरला कुर्डुवाडीस आले. तेथून शिखांचा दरबार पाहाण्यास नांदेडला आले. यापूर्वी अकोल्याच्या शीखपरिषदेत महाराजांचे भजन ऐकलेल्या एका शीख तरुणाने आत्मीयतेने गुरुद्वारातील मुख्य महंताची महाराजांशी भेट करून दिली. काही वेळ पारमार्थिक सुखसंवाद झाला. नंतर रेल्वेने निजामाबाद व नंतर आरमोर येथे भजन करून महाराजांनी दि.८ सप्टेंबरला अकोल्यास येऊन श्रीरामसेठ अग्रवाल यांचेकडे मुक्काम केला. दि.९ सप्टेंबर ला खंजिरी भजन झाले. दि.१० सप्टेंबरला अमरावतीवरून वरखेडला जाऊन त्यांनी बांधकामाचे निरीक्षण केले. त्याबाबत कार्यकर्त्यांशी विचार विनिमय केला. गावोगावीच्या गणेशोत्सवांत भजने गाऊन दि.१८ ला यवतमाळचे श्री.माधवराव देशमुख, श्री.पारवेकर, श्री.गरुड यांचेकडे त्यांनी विविध कार्यक्रम केले.

महाराजांनी दसऱ्याला रेडा मारण्याची अमानुष प्रथा बंद करण्याबाबत सर्वांना मार्गदर्शन केले. विजयादशमीला त्यांनी शिस्तबद्ध नि सोज्ज्वळ असेच स्वरूप दिले! अमरावतीला हिंदुमहासभेच्या अधिवेशनाला गेले असता श्री.बाबासाहेब खापर्डे, श्री.बापूजी अणे यांच्याशी संपर्क साधून दि.२१ ऑक्टोबरला ते पुलगावास गेले. दीपावलीत सुद्धा प्रकृती ठीक नसूनही लेखन,

शंका समाधान, भागवत, दासबोधादि विवेचन हे कार्यक्रम महाराज अविराम चालवीतच होते.

चिमूरला डिसेंबर १९४० मध्ये क्रीडासंमेलन व चातुर्मास्य समारोप झाला. आचार्य अत्रे यांना नागपूर मुक्कामी महाराजांचे भजन-भाषण ऐकण्याचा योग आला. ते म्हणाले- ''महाराजांचे खंजरी वादन म्हणजे एक विलक्षण चमत्कार आहे... हे केवळ कवी नाहीत; तर देदीप्यमान गायकही आहेत!..''

१९४१ च्या उदयकाळी महाराज बोडघा (जि.चंद्रपूर) येथील वार्षिकोत्सवाच्या सप्ताहात गेले व विविध कार्यक्रम करून नागपूरला परतले. जानेवारीच्या मंजुळामातेच्या स्मृतिकार्यक्रमास ते वरखेडला गेले, त्यानंतर अमरावतीवरून धारणी येथे कार्यक्रमास गेले.

दि.२८ जाने. १९४१ रोजी महाराज दारव्हा गावी श्री शिवाजी जयंती प्रीत्यर्थ अध्यक्ष म्हणून गेले असता त्यांनी हजारो उपस्थितांना शिवाजीचा आदर्श समजावून सांगितला व स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले. तेथून ३० जानेवारीला ते यवतमाळला आले. तेथे 'ब्रह्मभाट समाज' या संस्थेच्या अधिवेशनाला हजर राहून त्यांनी मार्गदर्शन केले. दि.५ मे १९४१ ला वरूड येथे जाऊन श्री.गणपतराव करिये यांच्या विस्कटलेल्या संसाराची घडी नीट बसवून दिली. ''तीव्र इच्छा केली तर इच्छित वस्तू मिळेल पण वस्तूची इच्छा सोडल्यानं वस्तू मिळेलच असे नाही;- मात्र त्याच्या प्राप्तीइतका आनंद जरूर मिळेल. कारण इच्छेपोटी वाढलेली तळमळ निश्चितच संपून जाईल''- हा विचार यावेळी त्यांनी दिला.

चिखलदऱ्याच्या आदिवासींच्या सुधारणेचा प्रश्न लक्षात घेऊन तेथे १५ दिवस वर्ग घेण्यात आले.१० मे १९४१ पासून हे वर्ग सुरू झाले. २५ मे रोजी महाराज नागपूरला गेले. १ जुलै रोजी वरखेडवरून मोझरीला आले. १३ जुलै रोजी ते अमरावतीला श्री.दादासाहेब बोके यांच्या बंगल्यावर उतरले त्यावेळी कवी प्रा. मा. ल. व्यवहारे महाराजांच्या संपर्कात आले व महाराजांनी त्यांना श्रीकृष्णावर कविता लिहिण्यास सांगितले.

२४ जुलै रोजी चिमूरचा दुसरा चातुर्मास्य संपन्न झाला. या दरम्यान महाराज नागपूर, वर्धा, सोलापूर, जत संस्थान इ. ठिकाणी फिरून तरुणांना प्रेरणा देऊ लागले-''तरुणांनो! तुमच्या तरुण रक्तावरच समाजाचे व राष्ट्राचे स्वातंत्र्य

अवलंबून आहे''- या शब्दात त्यांनी तरुणाईला जागविले. या चातुर्मास्यात जे काही पेटले तेच १९४२ च्या सत्याग्रहात फळास आले हे लक्षणीय आहे.

अच्युत श्रीधरपंत वकील हा किशोरवयीन मुलगा वरूड येथे ब्राह्मणपुरीत राहात होता. जन्म सन् १९२७ मधला. सन् १९३९ पासून दत्त मंदिरात त्याला अनेकांनी पाहिले होते. त्याच भागात तालुकदारांच्या वाड्यात महाराजांचे आत्मीय श्री.'सुदाम' सावरकर राहात. त्यांनी अच्युतची आर्त दशा जाणून त्याला पत्र देऊन महाराजांकडे धाडले. महाराजांची भेट वरखेडला घेऊन ''मला राम दाखवा!''- असा त्याने हट्ट धरला. महाराज म्हणाले, ''साधकाने आपली वैराग्यवृत्ती सोडून जराही बहिरंग प्रेमाला बळी पडू नये!'' हेच पुढे अच्च्युत महाराज म्हणून प्रसिद्धीस आले. श्री 'सुदाम' सावरकरांना ते पथदर्शी मानत; तर तुकडोजी महाराजांना गुरुस्थानी मानत.

ऑगस्ट १९३९ पासून सुरू झालेल्या जागतिक युद्धाने १९४१ पर्यंत अक्राळविक्राळ रूप धारण केले होते. इंग्रजी सेनेने भारताला युद्धाच्या खाईत लोटून जीवनावश्यक वस्तूंची लूट चालवली होती. 'हे युद्ध संपल्यानंतर इंग्रज सरकार भारताला स्वातंत्र्य देणार असेल तर आम्ही युद्धकार्यात सहयोग देऊ'- हे काँग्रेसचे म्हणणे धुडकावून इंग्रजी शासन भारतात नंगा नाच घालत होते. युद्धविरोधात प्रचार करणारे वैयक्तिक सत्याग्रही कायदेभंगाच्या कलमाखाली तुरुंगात डांबले जात होते. महात्मा गांधी 'हरिजन' मधून परिस्थितीचे गांभीर्य जनतेला समजावत होते; तर संत तुकडोजी महाराज आपल्या भजनांमधून विराट स्वाहाकाराचे दर्शन घडवून भारतीय तरुणांची, धनिकांची आणि सत्ताधाऱ्यांची मानवता जागवण्याचा प्रयत्न करीत होते-

*-'अति उग्र भानुच्या ज्वाला। ना सहन होति जनतेला।।...'*
*-'अन्न स्वहा, माणूस स्वहा, जडवस्तू साऱ्या स्वहा।*
*स्वहाचे यंत्र सर्वदा स्वहा।।'*
*-'नच अन्न मिळे गरिबा-मजुरा। रडताति मुले पडती धरणी।।'*
*-'बघ शेतकरी चिंतातुर हे। नेताति लुटोनी द्रव्य बळे।।'*

आणि अशाही परिस्थितीत, युद्धाने हवालदिल झालेल्या जनांच्या हृदयी धैर्य निर्माण करण्याचे कार्य त्यांची भजने उत्कृष्टपणे करीत-

*–'संघर्षातुन न्याय देइ तू, साक्षी भूदेवते।*
*जयाचे हक्क तया देइ ते ।।...'*
*–'पळणाऱ्या वाहनातुन, जळणाऱ्या वस्तूंतुन*
*सत्ययुगाचाच ध्वनी प्रकट होऊ दे।।*
*मंगलमय सुदिन अता त्वरित येऊ दे।।...'*

महाराज बहुशः ज्ञान भक्ति वैराग्याची भजनेच गात असले तरी यावेळी मात्र ते राष्ट्रीय उठावाची भजने प्रामुख्याने गायचे. भजनोत्तर भाषणातूनही आध्यात्मिक नि धार्मिक शंकासमाधानाहून अधिक सामाजिक व राष्ट्रीय विषयांवर भर देऊन ते प्रवृत्तिधर्माला विशेष उजाळा द्यायचे. दररोज हजारोंना क्रांतीचे अग्निमंत्र खुलेआम सुनवायचे– पण तेही अतिशय हिकमती–हिकमतीने. आंग्ल सत्तेविरुद्ध भावना भडकवणारी क्रांतिप्रवण अशी एक दोन भजनं म्हटली की त्यावर लगेच भावभक्ती व प्रेमशांतीची भजने गाऊन ते पांघरूण टाकून देत.

'स्वस्थ कां बा भारता ! बघशी कुणाची वाट तू?'...'गुलामी अब नही होना, हमारे प्रिय भारत में'– अशा भजनांनंतर 'मैं ढूँढ रहा हूँ श्याम को, गये कौन गली गिरधारी?' असे एखादे भक्तिपर, नंतर 'कुठवरी भोगशील मौजा?'– असं एखादं वैराग्यपर, नंतर 'सजनी, बसंत दिलमन भाई'– असं निसर्गपर नंतर 'हरिजन हरीसमान है' असं सामाजिक –अशी भजनांची सप्तरंगी लयलूट ते करीत असत. अर्थात् सर्वांनी संघटन साधून हिकमती–हिकमतीने देशाला स्वतंत्र करणे हाच यावेळी महाराजांचा प्रिय धर्म होता व त्याचीच द्वाही ते प्रतिदिन हजारो–लाखो लोकांत फिरवत निघाले होते.

दि.१७ डिसें. १९४१ पासून ब्रिटिशांची हार होऊ लागली. दि. २० एप्रिल १९४२ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा संदेश जपानच्या बर्लिन नभोवाणी वरून प्रसारित झाला. परंतु ब्रिटिशांनी त्यावरही बंदी घातली. देशाभिमानाची ज्योत अंत:करणात तेवत असली तरी तिची ज्वाला ओठापर्यंत येऊ न देण्याची खबरदारी घ्यावी लागत असे. महाराजांच्या समोरही तीच परिस्थिती होती. तशात चिमूरच्या एका मुस्लिम परिषदेचे उद्घाटनही महाराजांनी केले.

* * * * *

## पाच : क्रान्ती

१९३०-४० या दशकात भारतीय शिक्षितांमध्ये 'क्रांती' ही संज्ञा कळीची झाली होती ती रक्तरंजित फ्रेंच व रशियन क्रांतीच्या पार्श्वभूमीमुळे. क्रांती झाल्याविना या देशाचा अभ्युदय शक्य नाही असे जाणते मानत. पण तुकडोजी महाराजांना अभिप्रेत क्रांती वेगळीच होती. 'समाजहितासाठी संघटित समाजाने शांततापूर्ण विधायक मार्गाने आवश्यक परिवर्तन घडवून आणणे म्हणजे क्रांती. रक्तपिपासेऐवजी त्याग व सेवाभाव हा तिचा पाया असून सेवा, प्रेम, सत्य यांचे सुप्त सामर्थ्य जागे करणे हीच तिची रीत होय. अर्थात् क्रांतिकार्य ही एक आध्यात्मिक साधनाच असून क्रांतिनेत्यांमध्ये व त्यांच्या अनुयायांमध्ये सत्ता-संपत्तीपासून दूर असलेली अस्सल नैतिक प्रेरणा असल्याखेरीज खरी क्रांती घडू शकत नाही'- ही ती भूमिका. याच भूमिकेमुळे संत तुकडोजी महाराजांनी प्रारंभकाळी अनुभवसागर, अनुभवप्रकाश, अनुभव प्रसाद, अनुभवामृत, आनंदामृत, स्वानंदामृत, आत्मविकास, आत्मप्रभाव, लहर की बरखा, स्फूर्तितरंगावली- अशा आध्यात्मिक परिवेशातून क्रांतीची ऊर्जा प्रकट केली. १९३० नंतर मात्र 'जीवन-ज्योती, जीवन जागृती, समाज-संजीवनी, क्रांतिदीप, क्रांतिवीणा' या समाजाभिमुख रूपांमध्ये प्रकट होत ती जनमनात लोकोद्धारक चैतन्य प्रसृत करू लागली. 'दहशतीऐवजी सुसंस्कारांनीच स्थायी सुपरिणामी क्रांती होऊ शकते'- अशी त्यांची त्यामागची भूमिका होती.

गावोगाव फिरून ते वेगवेगळ्या थरांमधील भारतीय माणसांचे सत्त्व जोखत त्यांच्यातल्या एकात्मतेच्या केन्द्रबिंदूचा शोध घेत होते. कारण त्यांच्या मते, क्रांतीद्वारे जगाचा तोल सुवर्णमध्यावर आणूनच जगाला शांती लाभत असते. मात्र हे काम एकट्याने होणारे किंवा एकट्याकरिताच करायचे नसल्याने 'सर्वांमुखी मंगल बोलवून'च ते साधावे लागते. आणि म्हणूनच महाराज सन् १९२५ पासूनच कार्यसंयोजन आणि जनसंघटन करीत आले होते; भजन-कीर्तन, आरतीमंडळे, व्याख्याने, आश्रम संयोजन आणि लोकसंस्करण तथा नियंत्रण- ही साधने व माध्यमे ते त्यासाठी योजीत होते; भजनांमधील संकेत ग्रामीणांना कळावे म्हणून भजनापूर्वी व नंतरही भाषणाद्वारे स्पष्टीकरण करीत होते. समाजाला नवसमाज

घडविण्याची प्रेरणा देताना ते आवर्जून सांगत असत– ''आमचा राम हा 'राम' असावा आणि आम्ही मात्र कायम 'गुलाम' राहावे असे नको; तर रामराज्य स्थापन करणारे शिपाईच आम्ही बनलो पाहिजे.'' अशा जाहीर वक्तव्यांप्रमाणेच शंकासमाधान, सुसंवाद, पत्रलेखन आदींमधून एकेका व्यक्तीलाही ते ह्याच दिशेने प्रेरित करीत आले होते : ''धर्म म्हणजे कर्तव्य. त्याला उत्तम रूप देण्यासाठी जे तत्त्वज्ञान आहे ते केवळ व्यक्तिजीवनाच्या 'मुक्ती'साठीच नसून देश उत्तम चालावा व त्याकरिता माणूस उत्तम घडावा यासाठीही ते जरूरी असते. तेव्हा भक्तिवान माणसाने देशाच्या सेवेत आळस करून कसे चालेल?..'' त्यामुळेच भिन्न भिन्न धर्म-पंथ-पक्षांच्या समूहांमध्ये तसेच थोर थोर नेत्यांच्या सभा-संमेलनांमध्ये जाऊन व्याख्याने वा प्रवचने देताना महाराजांना पूर्वतयारीची गरज भासत नसे; तरीही प्रत्येक ठिकाणी त्यांचे प्रबोधन हजारोंची मने जिंकीत व जनप्रवाहाला त्यांच्या नव्या दिशेने वळवीत वाहवून नेत होते!

पंढरपूर, जत संस्थान आणि वरखेड चातुर्मास्य या प्रसंगी महाराजांना स्फुरलेल्या ७०१ श्लोकांचे संकलन 'स्फूर्तितरंग' या शीर्षनामाने जानेवारी १९४२ मध्ये प्रकाशित झाले; त्यातील विविध वृत्तांमधील श्लोकांमध्ये प्रसाद आणि रसवत्ता ठळकपणे जाणवत होती. महाराज शीघ्रकवी होते. एखादा अर्थगर्भ प्रसंग पाहून वा ऐकून देखील ते उत्स्फूर्त काव्यरचना करीत. सामाजिक, ऐतिहासिक इतकेच नव्हे तर पौराणिक क्षेत्रातील राष्ट्रधर्माच्या प्रतीकांना-वीरश्रीच्या आदर्शांना ते भजन-कीर्तन-प्रवचनादि माध्यमांतून जनतेपुढे आणीत असत व श्रीकृष्णभक्तांनो! आर्यसुतांनो ! वीरशैवांनो! वारकऱ्यांनो ! रामदासपुत्रांनो! नीतिधैर्यकरांनो ! शक्तिदूतांनो! ऋषिसाधूंनो! श्रीमंतांनो! हे गरिबांनो !- अशा प्रेरणादायी आवाहनांसह ज्वलंत संदेशही देत असत. श्रद्धाशील भारतीयांची नाडी नेमकी ओळखून त्यांच्या श्रद्धास्थानांना उजाळा देत नवे राष्ट्रीय चैतन्य सर्वांच्या हृदयात निर्माण करण्याचा प्रयास सन् १९३० च्या आंदोलनात आयोजित क्रांतिकारी शिबिरांपासूनच महाराजांनी सातत्याने चालवला होता. सन् १९३६ पासून योगासने, कुस्त्या, लाठी-भाला यांसकट व्यायामाला वळण देण्यासही त्यांनी प्रारंभ केला होता. राजकारणी नेते राष्ट्रमुक्तीसाठी आपापले प्रयत्न करीत असतानाच महाराज इकडे जनतेची क्रांतिप्रवण मानसिक तयारी करण्यात निरंतर

गढलेले होते.

२५ फेब्रुवारी १९४२ रोजी 'बेलापूर साखर कारखान्या'त महाराजांच्या भजन भाषणाचा भव्य कार्यक्रम झाला. त्यात आध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय चेतनेची भजने म्हणतानाच लोकश्रद्धा जागवून ब्रिटिश सत्तेला धक्का देणारे एक क्रांतिकारी भजन त्यांनी आवेशपूर्ण शैलीत म्हटले-

*अब काहेको धूम मचाते हो। दुखवाकर भारत सारे।*
*आते हैं नाथ हमारे।।*

..................

*भारत अब हिन-दीन भया रे ! ना कोई यार सताओ।*
*करनी के फल पाओगे। गर प्रभुका देश बिगारे।।*
*वीरों में हिंमत आवेगी। ले तलवार कट्यारे।*
*दौड दौड कर गज-घोडों पर। रणकंदन कर डारे।।*
*झाडझडूले शस्त्र बनेंगे। भक्त बनेगी सेना।*
*पत्थर सारे बाँब बनेंगे। नाव लगेगी किनारे।।*
*तुकड्यादास कहे अब भूलो, वह दिन आये हमारे।*
*सब दुनिया के पालनकर्ता उनके हैं हम प्यारे।।*
*आते हैं नाथ हमारे।।*

कार्यक्रम आटोपल्यानंतर लोकनेत्यांनी अर्थ विचारला असता श्रीरामाच्या वानरसेनेचा हवाला देत इंग्रज सरकारच्या आसुरी सत्तेतून लोकांना मुक्त करण्याचे काम सामान्य जनतेतील शूरवीरच करणार आहेत असे त्यांनी सांगितले. नष्ट होत चाललेल्या इथल्या नैतिक-आध्यात्मिक संस्कृतीला उजाळा देणारे हे भजन बेलापूरच्या हजारो श्रोत्यांच्या मनांवर तर ठसलेच; शिवाय पुढे राजनांदगाव, जबलपूर, नागपूर येथल्याही लक्षावधी तरुण श्रोत्यांना त्याने वेड लावले. ह्या भजनासोबतच 'कही मानो भारत बासिंदो ।', 'ऐ हिंदोस्तां के भाइयों। मत भूल में देर गुजारो।' 'कही मानो ना मानो ना, फिर पछताओगे यार।' अशीही अनेक भजने ते प्रवाहाच्या ओघात गाऊन जात. निकट भविष्यातील भीषण दृष्य त्यांना दिसत होते; पण जनतेत भय-नैराश्य उत्पन्न व्हावे हे मात्र त्यांना मान्य नव्हते. त्यामुळे ''गमला मला हरि आला। आला से भारतभूला।।'' हे द्रष्ट्याचे स्वप्न

महाराज सर्वत्र पेरीत निघाले होते. तसेच ''अब आता है कर्तार मेरा। घोडेपर कसी सवारी कंबर में तलवार धरा।।' किंवा 'घाबरला का तरुण गड्या रे ! तुझा पुढारी आला...चक्र सुदर्शनवाला। दुष्ट जनांना ठार कराया, साधूसज्जन हृदयि धराया, तुकड्या म्हणे धावला।।'- अशी सुष्ट शक्तींच्या आगमनाची वार्ता सर्वत्र प्रसृत करीत निघाले होते.

महाराजांची ही क्रांतिप्रेरक भजने त्याकाळी सर्वतोमुखी झाली होती. रेल्वेतले, बस स्टँडवरचे, वस्त्यावस्त्यांतले भिकारी-भराडी सुद्धा रस्तोरस्ती ती गात असत. महाराजांच्या या भजनांतून हिंदुत्वाऐवजी राष्ट्रीयत्वाचा संस्कार होई; सत्य-अहिंसेच्या जपाऐवजी तेजस्वी शौर्यसामर्थ्याचा निनाद ऐकू येई. त्यामुळे काँग्रेस, रा.स्व.संघ च काय, समाजवादी मंडळींनाही स्फुरण चढत असे. आरती मंडळ, श्रीगुरुदेव सेवामंडळ यांच्याशी संलग्न तरुण-प्रौढ लोकच नव्हेत तर शासनाचे सी.आय.डी. सर्कल इन्स्पेक्टर कृपाशंकर बाजपेयींसारखे कितीतरी अधिकारीही महाराजांच्या त्या भजनांमुळे मंत्रमुग्ध होऊन देहभान विसरत असत.

असे हे महाराजांचे क्रांतिजाणिवेचे प्रचारचक्र वेगात सुरू होते. अगदी नेताजी सुभाषचंद्रांच्या नवोदित 'आजाद हिंद सेने'चे स्मरण करून देऊन स्वराज्य प्राप्तीची ईर्ष्या जागविणारी 'ये कौन खडे हैं यार, लगा ये कतार, नये दमवाले ! जय हिन्द के नारे डाले।।' अशी भजने सुद्धा सहज गातागाता ते प्रवाहित करीत. ज्याप्रमाणे नेताजी सुभाषचंद्रांनी जपानमध्ये आघाडीवर लढणाऱ्या ब्रिटीश सेनेतील भारतीय नौजवानांना आत्मसात् करून आपल्या 'आझाद हिंद फौजे'त भरती करून टाकले होते, त्याप्रमाणेच महाराजांनी आपल्या कौशल्याने व प्रभावाने ब्रिटिश सत्तेचे खांब असलेल्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांना व ऑफिसरांना सुद्धा आपलेसे करून घेतले होते.

२७ मार्च १९४२ ला गोंदुड्याला तपोगुंफेजवळच रामनवमीप्रीत्यर्थ प्रचंड जनसमुदायात महाराजांनी काल्याचा कार्यक्रम केला. तेथे लतागुंफेत शिवमूर्ती स्थापना करून तपोभूमी महोत्सव देखील सुरू केला.

दि.१७ एप्रिल १९४२ रोजी इंदूरला श्री शिवाजी जयंती निमित्ताने महाराजांचा भव्य कार्यक्रम झाला. त्याच सुमारास गोस्वामी महेशपुरीजींच्या मधुकर या सुपुत्राचा शुभविवाह हैद्राबादला व्हायचा असल्यामुळे त्यांना जाणे भाग पडले.

हैद्राबादचे श्रीमंत गोस्वामी मुकुंदगिरी यांची कन्या उर्मिला हिचेशी झालेला मधुकरचा विवाह सोहळा अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर राजेशाही पद्धतीने झाला. परतीच्या प्रवासात सिकंदराबादहून येणाऱ्या गाडीची प्रतीक्षा करीत असता दहाबारा गुंड रिझर्व डब्यात घुसू लागले. गुंडांचा म्होरक्या नवरीच्या बेंचवर बसू लागला. महाराज काहीच न बोलता त्याला आडवे गेले. त्यामुळे नववधूच्या दागिन्यांची लूट करण्याचा इरादा सोडून तो गुंड मौल्यवान भेटीने भरलेल्या बॅगांकडे वळला. महाराज त्या पेट्यांसमोर उभे राहिले तेव्हा गुंडाने जंबिया काढला. सर्व घाबरून गेले. महाराजांनी त्याच्या कपाळावर खडावाच्या लाथेचा जोरदार प्रहार करताच तो डब्याबाहेर पडला. त्याचे साथी खवळून उठले. ते डब्यात घुसू पाहायचे. पण त्यांच्या पायातील सारी शक्तीच संपली होती. शेवटी तो गुंड रेल्वे पोलिसाकडे जाऊन म्हणाला– ''देखो ! इसी पहलवानने मुझे मारा। गाडी आगे नही जायेगी।'' रेल्वे पोलिसाचा निरुपाय झाला. तो खास गुंड अर्थात् राजगुंड होता. निजामाच्या कोणत्या तरी बेगमचा भाऊ! त्याची टोळी राजरोस चोऱ्यामाऱ्या करायची ! त्यामुळेच त्या काळात 'मुगलाई' शब्द बेबंदशाही, भिती व अत्याचाराचा द्योतक बनला होता. चौकशीअंती सब इन्स्पेक्टरला सर्व कळले. त्याने महाराजांची कडक हजेरी घेण्याची बतावणी करून त्याबद्दल दबक्या स्वरात महाराजांचीच क्षमा मागितली व गाडी रवाना करून दिली. एका विचित्र पेचप्रसंगाचा असा नाट्यमय शेवट झाला. सारी वरात आनंदाने व सुरक्षितपणाने नागपुरात परत आली. 'अंगावरी आले। तोवर जाईल साहिले।। माझे संतापले मन। परपीडा ही देखोन।।' हे संतश्रेष्ठ तुकारामांचे वचन महाराजांनी खरे करून दाखविले.

त्यांच्या मार्गदर्शनाने खेडोपाडी आखाडे, लाठी काठी, तलवार चालविण्याचे वर्ग भरू लागले. म. गांधींची आत्यंतिक 'अहिंसा' महाराजांना कधीच मानवली नाही, म्हणूनच महाराजांनी आपल्या स्वतंत्र विचारानुसार असे शस्त्रसज्जता शिकविणारे वर्ग चालवून वीर तरुण तयार केले होते. असे असले तरी गांधीजींकडे उणा शब्द येईल असे महाराज चुकूनही बोलत नसत. १ मे १९४२ मध्ये मोझरीच्या धर्मसेवाश्रम परिसरात एका 'राष्ट्रधर्म शिक्षण वर्गा'ची योजना महाराजांनी प्रत्यक्षात आणली. त्यासाठी विदर्भातून २०० स्वयंसेवक निवडण्यात आले. ठाकुरबागेतील या वर्गाचे संचालन श्यामरावदादा मोकदम यांचेकडे, शिबिर

व्यवस्थापन दर्यापूरच्या बाबा रेडीकरांकडे, बौद्धिकांची जबाबदारी मामा क्षीरसागरांकडे, गीतापाठ तुकारामदादा भुस्काडेंकडे, तर आयुर्वेदाची जबाबदारी आर्वीच्या डॉ. दिवेंकडे व संगमनेरच्या कुर्डुकर शास्त्रींकडे देण्यात आली. अंबादास हेडाऊ, रामराव देशमुख, दुबे गुरुजी हे लाठीकाठी, भाला-तलवार-जंबिया, व्यायाम आणि मैदानी खेळांचे प्रशिक्षण देत. सात्त्विक दिनचर्या, भजन-प्रार्थना, महाराजांचे तेजस्वी विचार यांमुळे हा वर्ग फार प्रभावी ठरला. पारतंत्र्याची चीड आणि स्वातंत्र्याची चाड पेरणारी भजने स्वयंसेवकांच्या हृदयात उतरली.

यावर्षी आषाढी एकादशी दि.२४ जुलै १९४२ ला आली होती. म्हणून ते वरखेडवरून पंढरपुरास गेले. व्यास पौर्णिमेपर्यंत महाराजांची अमोघ स्फूर्तिदायी भजने पंढरपुरात गाजली. वरखेडला आल्यावर पुन्हा त्यांचे तुफानी दौरे सुरू झाले. आतापर्यंत २०० गवांमध्ये त्यांची आरती मंडळे व २५०० प्रचारक तयार झाले होते.

-'नौजवान ! जाग जाना रे! अब तो नींद त्याग जाना रे।।'- अशा प्रेरणादायी भजनांमधून महाराज गावागावाला निर्वाणीची सूचना देत वादळवाऱ्यासारखे सतत फिरू लागले. 'मुर्दे जगा दूँ शब्द से'- अशा प्रतिज्ञेने 'येणारी निकराची वेळा प्राणपणाने साधा'- असा इशारा ते सर्वांना देत सुटले. 'करा अथवा मरा' हा मंत्र अन्य कोणी उच्चारण्याआधीच 'मरणाची बाजी लावण्याचा संदेश महाराज दररोज भजन-भाषणांतून सर्वांना देतच चालले होते : 'रणांगणी मरणेच बरे परि पापीजनांना भिऊ नका', 'करि कृतार्थता मातेची। पर्वा न ठेव मरणाची', 'मरणे बरे भूमीवरी परदास्य ना हो माणसा'-हेच ते अग्निमंत्र होत.

दि.८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत ऑल इंडिया काँग्रेसची ऐतिहासिक महत्त्वाची विराट सभा भरली. 'भारत छोडो!' चा प्रस्ताव पास झाला. 'छोडो भारत !' 'क्विट इंडिया','करो या मरो!' या घोषणांनी आकाश थरारून टाकले. ब्रिटनचे प्रधानमंत्री मि. चर्चिल कट्टर साम्राज्यवादी होते. त्यांच्या धोरणानुसार दि. ९ ऑगस्टच्या पहाटेसच अनपेक्षितपणे झडप घालून म.गांधी आदि सर्व नेत्यांना गुप्तपणे डांबून ठेवण्यात आले. या दडपशाहीमुळे जनता संतप्त झाली. क्रांतीचा वणवा पसरत गेला. पं. नेहरू-पटेल आदींच्या अनुपस्थितीत बाबू जयप्रकाश-लोहिया आदि सोशालिस्ट नेत्यांनी हातभार लावला. गांधीजींची घोषणा व

भाषणाची प्रत घेऊन आरतीमंडळाचे लक्ष्मणराव मोकदम आष्टीस पांडुरंग सव्वालाखे यांचेकडे आले. तीन दिवसांतच देशभरात क्रांतीचा वणवा पेटला. महाराज वरखेडहून आष्टीला घोड्यावरून आले. परसोड्याचे पाटील श्री.गंगाराम बळीरामजी गोरे यांना महाराज म्हणाले, ''पुढचा आठवडा आणीबाणीचा आहे.'' दुसऱ्याच दिवशी महाराज आरतीमंडळ सदस्यांसोबत चिमूरला जायला निघाले. ते जसजसे पुढे पुढे निघाले तसतसे इकडे बंड सुरू झाले. तळेगाव, खरांगणा, वर्धा व हिंगणघाट येथे एकानंतर एक असा भडका उडत गेला. महाराज चिमूरला १३ ते १६ तारखेपर्यंत होते. सोबत श्यामरावदादा मोकदम, रामचंद्र जवळेकर, महादेव बिजवे, नारायण बोकडे व ग.दे.निकम होते. १६ ऑगस्ट १९४२ च्या रविवारी नागपंचमीला सत्याग्रहाचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुरोधाने दि.१४ व १५ ला चंद्रपूर चातुर्मास्यात महाराजांची दणदणीत भजने झाली. खंजरी कडाडली तशी सत्याग्रहींमध्ये वीरश्री संचरली. १६ ला महाराज चिमूरला भेट देऊन चंद्रपूरला परतले तसे चिमूरला लगेच क्रांतियुद्ध पेटले. पुढे लष्कराचा हैदोस होऊन २५ व २७ ला पोलीसांनी ३०० लोकांना चंद्रपूरच्या सेंट्रल जेलमध्ये बंदी बनविले.

दि.१६ ऑगस्ट याच दिवशी आष्टीलाही क्रांती झाली. शिरसोली, वडाळा, भारसवाडा, परसोडा इ. पंधरासोळा गावांत गोळीबार झाला. चिमूर-आष्टी प्रमाणे यावली-बेनोडा वरूड येथेही क्रांती झाली. हिंदू-मुसलमान, गरीब-श्रीमंत एक होऊन या जनक्रांतीत सामील झाले होते. लाठीमार, गोळीबार, जेल भरो-यांनी वातावरण भारलेले होते.

दि.२७ ऑगस्ट १९४२ रोजी महाराजांनाही चंद्रपूर येथे अटक झाली व दि.२८ ऑगस्टला त्यांना नागपूरच्या तुरुंगात टाकण्यात आले. स्थानिक जनतेत असंतोष उसळल्यामुळे महाराजांना नागपूरहून रायपूरला पाठविण्यात आले. प्रथम श्रेणीचे बंदी म्हणून त्यांना सर्व सोयी उपलब्ध होत्या. सेवेसाठी सेवकही देण्यात आला होता. परंतु महाराज स्वतःचे कपडे स्वतः धुवायचे. दि.२८ ऑक्टोबर १९४२ रोजी महाराजांनी श्रीमान गोस्वामी महेशपुरीजीस तुरुंगातून पहिले पत्र लिहिले. नोव्हें.१९४२ च्या बलिप्रतिपदेस महाराजांनी दुसरे पत्र वरखेडला दि.५ नोव्हेंबर रोजी लिहिले. वरखेडच्या पुण्यतिथी महोत्सवात समारोपादाखल महाराजांचा संदेश पांडुरंगदास 'रामायणी'नी वाचून दाखविला. महाराजांनी मात्र

सद्‌गुरुंच्या पुण्यतिथीचा उत्सव तुरुंगातच मोठ्या उत्साहाने साजरा केला. भजन व गोपालकाला झाला तेव्हा रायपूरच्या तुरुंगाला भक्तिमय कृष्णमंदिराचे स्वरूप आले होते.

तुरुंगात महाराजांचे अनेक प्रमुख नेत्यांशी संबंध आले. प्रत्येकाच्या मनावर त्यांची वेगळीच छाप पडली. तुरुंगातील वास्तव्यात त्यांनी 'सुविचार स्मरणी' च्या ७०१ सूक्ताचे लेखन वृत्तपत्रांच्या चिठोऱ्यांवर केले. चार महिने त्यांनी तुरुंगवासाचा अनुभव घेतला आणि वाढत चाललेल्या लोकक्षोभामुळे शुक्रवार दि.४ डिसेंबर १९४२ रोजी महाराजांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले.

तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांना उद्‌ध्वस्त झालेले जनजीवन व जनतेची पराभूत बेदिली टळटळीतपणे दिसून आली. त्यावर उपाययोजना काय करावी याचे चिंतन करून दि. १७ जाने. १९४३ ला महाराजांनी 'विश्वशांती नामसप्ताह' सुरू करून त्याची रविवार दि.२४ जाने. १९४३ ला समाप्ती करावी असा संदेश जाहीर केला. सर्व वृत्तपत्रांत वं. महाराजांच्या नावाचा डंका वाजला. तुरुंगाबाहेरील अनेक राष्ट्रीय नेते, धर्ममार्तण्ड, साधुसंत, लोकाग्रणी, विद्वज्जन यांनी संपूर्ण भारतातून महाराजांच्या या योजनेला एकदम उचलून धरले. महाराजही स्वत: गावोगावी फिरत होते व सांगत होते, ''सज्जनांनो ! गंभीरता आणि सत्यसंकल्पवृत्तीचा जेथे संग्रह असतो तेथेच दैवी शक्ती वसत असते.'' प्रार्थनेचे महत्त्व हे प्रार्थनेकरिता नसून ज्या देवाची प्रार्थना करावी त्या देवाचे बल, शील, उदारत्व व अमर्याद समत्व प्राप्त करण्यासाठीच असते; फक्त फुले वाहून मुले मागण्यासाठी नव्हे. 'विश्वशांती' हा शब्द त्याकाळी ब्रिटिश सत्तेचा कोप बोथट करून टाकण्यास जसा समर्थ होता तसाच 'नामसप्ताह' हा शब्द त्रस्त जनतेसाठी त्यांच्या भावना फुलवून तिला धीर देण्यास उपयुक्त होता.

विश्वशांति नामसप्ताह म्हणजे आत्मविश्वास, बंधुभाव व औदार्यादि गुणांचे बीज पेरणारा एक महान प्रशिक्षण वर्गच होता ! पीडलेल्या व हवालदिल झालेल्या भारतीय जनतेला त्या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे उत्तम नवजीवन लाभले. तिच्यात नवा कार्योत्साह व अमोल सामुदायिक भाव संचरला व महाराजांना 'जनसम्राट' ही पदवी लाभली. या सप्ताहात देशभरातील गोर-गरिबांना, दीनदुबळ्यांना अन्नदान करण्यात आले. अश्राप जिवांना सुख देणं हा उपकार नसून

ज्यांचे आपण शोषण केले त्यांची ही सेवा–म्हणजे आपल्याच पापांचे क्षालन करणारी देवभक्ती आहे, अशी दृष्टी महाराज सर्व धनिकांना देत होते. कलकत्ता शहरातील धान्यसंग्रह करणारे खुशालचेंडू आणि आंग्ल सत्तेची सूडबुद्धी व कुटिल नीती यांमुळे पसरलेल्या कृत्रिम दुष्काळात लाखोंनी जनता अन्नावाचून मरत होती. म्हणूनच म. गांधींनी फेब्रु. १९४३ मध्ये स्थानबद्ध अवस्थेत २१ दिवसांचा उपवास केला होता. दरिद्री जनतेची सेवा, त्यांच्या आत्म्याची तृप्ती हीच खरी ईश्वर सेवा आहे, असे महाराजांनी या सप्ताहाच्या कार्यान्वयनाद्वारे धनिकांना समजावले होते.

दि. ४ फेब्रुवारी १९४३ ला वरखेडक्षेत्री माता मंजुळादेवीचा पुण्यमहोत्सव संपन्न झाला. त्यानंतर दि.५ एप्रिल १९४३ रोजी श्री संत पाचलेगावकर महाराजांच्या हस्ते 'श्रीगुरुदेव' मासिकाचा प्रथमांक समारंभपूर्वक प्रकाशित झाला. विशेष म्हणजे ५ मे १९४३ रोजी अमरावतीच्या 'धर्मदाय कॉटन फंड' च्या भव्य इमारतीत तुकडोजी महाराजांनी 'श्रीगुरुदेव औद्योगिक शिक्षण वर्गा'च्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. या वर्गाचे संचालन श्री. मामासाहेब लोंढे व श्यामरावदादा मोकदम यांनी सांभाळले. 'श्रीगुरुदेव औद्योगिक शिक्षण वर्गा'त ३०० विद्यार्थ्यांनी धंदेशिक्षण घेतले. त्यांची दिनचर्याही आखीव होती. दि.१ जून १९४३ रोजी या वर्गाच्या समारोपप्रसंगी सर्वांगीण उन्नती या विषयावर महाराजांनी मार्गदर्शन केले. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात विस्कळित झालेल्या आरती मंडळाचे पुनरुज्जीवन महाराजांनी श्यामरावदादा व द.वा.तायडे यांच्याद्वारा करवून घेतले व १० ऑगस्ट १९४३ पासून ते अकोल्याच्या चातुर्मास्यात गेले. यावर्षीचा चातुर्मास्य २ ऑगस्ट १९४३ पासून अकोल्यास सुरू झाला. श्री गाडगे महाराजांनी सुद्धा कार्यक्रमाला भेट दिली होती. तेथे 'वेद पौरुषेय कि अपौरुषेय' असा महाराजांना अकोल्याच्या काही विद्वानांनी प्रश्न केला. त्यावर महाराजांनी उत्तर दिले, ''थोर विद्वज्जन हो! कोणी म्हणतात वेद ऋषींनी रचले, ते पुरुष होते म्हणून वेद पौरुषेय. पण कुणी म्हणतात,वेद ही ईश्वरी वाणी आहे. ईश्वर काही पुरुष नव्हे, म्हणून वेद अपौरुषेय! आता प्रश्न असा उभा राहातो की ईश्वरी वाणी काही आकाशात गडगडली नाही. ती कुणातरी ऋषीच्या हृदयातच स्फुरली असणार! म्हणजेच मानवी शरीराच्या माध्यमातूनच प्रगट झाली असणार, तर मग तिला पौरुषेय म्हटलं तर काय बिघडते ? दुसरा प्रश्न हा येतो की, वाटेल त्याच्या हृदयातून वा मुखातून ही वेदवाणी प्रकट होऊ शकते

का? नाही! इंदियवृत्तींच्या स्वैर उर्मीवर ताबा मिळवून त्यांना जागीच मुरविल्याखेरीज वेदाची शुद्ध उर्मी अंत:करणात प्रगट होणं केव्हाही शक्य नाही. आणि वेदाची शुद्ध उर्मी अंत:करणात उदित झाल्याशिवाय केवळ बहिरंग वैदिक आचरणाला सर्वोत्तम आनंदानुभवाचं फळ येऊ शकत नाही. शुद्ध वृत्तीचाच पुरुष ईश्वरमय होतो; तेव्हाच त्याच्या तोंडून ऋचा प्रकटतात. अर्थात् या असामान्य स्थितीतून जे उद्‌गार बाहेर पडले त्यांना पुरुषाचे उद्‌गार कसे म्हणता येतील! म्हणजे ती अपौरुषेय वाणीच झाली! वेद म्हणजे ज्ञान! वास्तविक वेदाचं तत्त्वज्ञान हे जगाबरोबरच उदयास आलेलं आहे असं म्हणणंच अधिक बरोबर होईल. कारण तत्त्वज्ञान कुणीही निर्माण करीत नाही. विजेचा शोध लावला किंवा वनस्पतीमध्ये जीवत्व सिद्ध केलं, याचा अर्थ त्यांनी विद्युत किंवा जीवत्व निर्माण केलं असा असू शकत नाही. म्हणूनच ऋषी वेदांचे 'निर्माते' नसून 'द्रष्टे' आहेत. वेदातील आवाज हा ऋषीचा असला तरी अर्थ त्यांचा नाही व ते ज्ञानाचे 'कर्ते' स्वत:ला मानू शकत नाहीत. तो देहाचा आवाज नसून देवाचा आहे... देहेंद्रिय वृत्तींतून नव्हे तर विश्वव्यापी वृत्तीतून ते उद्‌गार बाहेर पडले आहेत आणि म्हणूनच त्यांना 'अपौरुषेय' किंवा 'ईश्वराचे नि:श्वास म्हणणं अधिक सार्थ व समर्पक ठरते, असं मी समजतो... ज्ञान हे अनादि असून विश्वाच्या मूलतत्त्वाशी समरस झालेली प्रत्येक व्यक्ती त्याचा साक्षात्कार करून घेऊ शकते, असा सिद्धान्त आहे. म्हणूनच श्री ज्ञानेश्वर महाराजांनी संतांबद्दल म्हटलं आहे,'तयांचे बिसाट शब्द । सुखे म्हणो येती वेद!' आणि श्री तुकोबारायांनी उद्‌घोष केला आहे-'वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा। येरांनी वाहावा भार माथा।' अशीच माझी अल्पशिक्षित माणसाचीही श्रद्धा आहे.'' हे त्यांचे विवेचन ऐकून विद्वानांचा अहंगंड पाण्यातल्या ढेकळाप्रमाणे विरून गेला व ते मुग्ध मनाने आभार मानून म्हणाले- ''आम्ही धन्य झालो !''

श्री.श्यामरावदादा मोकदम यांची शिस्त अतिशय कठोर म्हणून प्रसिद्ध होती, पण पित्याच्या कडकपणाबरोबर मातेची कणव देखील त्यांच्यात पुरेपूर होती. नारळाप्रमाणे वरच्या कठीण कवचाआत प्रेमळ हृदयाचा गोडवा असल्यामुळेच सारे छात्र त्यांचेवर मन:पूर्वक प्रेम करीत; आणि तरीही आपले काही चुकू नये म्हणून सदा वचकून असत. त्यांच्या दृढ संस्कारांनी असंख्य तरुण

आजीवन महाराजांचे कार्यकर्ते बनले. या चातुर्मास्यात 'श्रीगुरुदेव सेवामंडळा'ची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. महाराजांनी सामुदायिक प्रार्थना प्रणालीत गीताधर्मी, वारकरी,आनंदमार्गी, शीख, हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुसलमान आदि सर्व धर्म-पंथांच्या उपासना पद्धतींचा मेळ सुबुद्धपणे घडविला होता. सेवामंडळ हा त्यामुळेच एक नमुनेदार बगीचा बनला होता. जे जे उत्तम दिसेल ते ते एकत्र आणून त्याला सुंदर व समृद्ध केले जात होते. महाराजांनी सामुदायिक प्रार्थनेलाच सेवामंडळाचे हृदय, सेवात्मक कार्याचे स्फूर्तिकेन्द्र नि संघटनेचे अधिष्ठान बनविले होते.

दि.११ नोव्हेंबर १९४३ रोजी कार्तिक पौर्णिमेचा महोत्सव संपन्न करून महाराज कौंडण्यपूर यात्रेला गेले. पुढे १५ मे पासून ३० मे १९४४ पर्यंत धार्मिक प्रचारकांचा वर्ग घेण्यात आला तो लाखांदूर (भंडारा) येथे. या वर्गात नागपूर, भंडारा, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा, अकोला, वर्धा, बालाघाट तसेच छत्तीसगड आदि ठिकाणांहून आलेल्या २०० सेवकांनी भाग घेतला होता. महाराज अत्यंत सोप्या, मार्मिक नि गोड शब्दांत सर्वांना समजावून देत. या वर्गात स्वागतपद्धती, प्रचारपद्धती, रामधून, बैठकीची योजना, सार्थ गीतापाठ, धर्म इ. विषयांचे तात्त्विक भूमिकेसह शिक्षण देण्यात आले.

दि.३० जुलै १९४४ रोजी विदर्भ भूषण प्राणाचार्य पुरुषोत्तम शास्त्री हिर्लेकर यांच्या सल्लेने अमरावती येथे विशेष कार्यास आरंभ झाला. 'गुरुदेव मुद्रणालय' या नावाने अमरावतीस प्रेस स्थापन करण्यात आला.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराजांचे २२ ऑगस्ट ला इगतपुरी, २६ ला जबलपूर, २७ ला शिवणी व २९ ते ३१ ला यवतमाळ जिल्ह्यांतील काही ठिकाणी महाराजांचे भजन व भाषणाचे प्रभावी कार्यक्रम झाले. २ सप्टेंबरला यवतमाळ येथे श्री य. खु. उर्फ आप्पासाहेब देशपांडे यांच्या एकसष्ठी निमित्ते तुकडोजी महाराजांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. संत मेहेरबाबा व पारशी समाजाला नागपूर येथे महाराजांनी धार्मिक मार्गदर्शन करून भजनाचा कार्यक्रम केला.

यावर्षीचा 'श्री समर्थ आडकोजी महाराज पुण्यतिथी सप्ताह' कार्तिक शुद्ध सप्तमी पासून पौर्णिमेपर्यंत झाला व काला नि महाप्रसाद संपन्न झाला. नित्याप्रमाणे गाडगेबाबा ऐन वेळेवर आले व हाती खराटा घेऊन त्यांनी गावगल्ली

झाडली. वरखेडचा मार्ग खडा–गोटा–कचरा मुक्त करून त्यावर पाणी शिंपडून रांगोळ्या घातल्या. त्यानंतर गाडगेबाबांचे कीर्तन झाले.

२१ जुलै १९४४ रोजी वरखेड येथे 'श्रीगुरुदेव औषधालया' चे उद्‌घाटन झाले. प्रत्येक तालुक्यातील ५ गावांत धर्मार्थ औषधे वाटण्याची योजनाही श्रीगुरुदेव सेवामंडळाने हाती घेतली.

वर्ष १९४४ चा चातुर्मास्य पिंपळा–नारायणवार (जि.छिंदवाडा) येथे १ ऑगस्ट १९४४ पासून सुरू झाला. त्यात १०० मुले व तरुणांनी भाग घेतला. आजूबाजूच्या खेड्यांमधील जनता त्यात हजारोंच्या संख्येने हजर राही. या चातुर्मास्यात महाराजांनी प्रचारकांच्या सर्वांगीण मार्गदर्शनासाठी ४०० श्लोकांची 'आदेश–रचना' लिहिली. याच सुमारास जत संस्थानच्या निमंत्रणावरून महाराज तिकडे गेले, तसे पुणे, सातारा येथे गणेशोत्सवानिमित्य भजनाचे कार्यक्रम करून आले. इगतपुरी, जबलपूर, शिवणी, यवतमाळ, अकोला, पारवा येथेही भजन–भाषणांचे प्रभावी कार्यक्रम झाले. पिंपळा चातुर्मास्यात परतल्यावर त्यांनी प्रचारकांसाठी पंचमहोत्सव साजरे करण्याची पद्धती समजावून दिली. वर्षप्रतिप्रदा (उद्योगदिन), विजयादशमी (स्नेहसंमेलन दिन), कार्तिक पौर्णिमा (प्रार्थना दिन), गीताजयंती (बुद्धिविकास दिन) व श्री शिवाजी जयन्ती (बलोत्कर्ष दिन) हे सेवामंडळाच्या घटनेत आवश्यक ठरवले गेलेले उत्सवदिन होत.

याचवर्षी विजयादशमीच्या निमित्ताने अष्टमी–नवमीस दिल्या जाणाऱ्या बळीप्रथेला बंदी घालण्यावर विशेषत्वे भर दिला गेला. बलिदानाने रोगराई जाते हा समज भ्रामक असल्याचे गळी उतरवून पशुबळीऐवजी नारळांनीच देवीदेवतांची पूजा करण्याची प्रथा पाडली. सुमारे ६ हजार गावांमधून दसऱ्याला रेडा बळी देण्याचा प्रकार बंद करण्यात सेवामंडळला यश आले.

समर्थ आडकोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवाला प्रार्थनादिनाचे स्वरूप येऊन सुमारे ५००० सेवकांनी त्यात भाग घेतला. गाडगे महाराजांचे कीर्तन झाले. ४ सप्टेंबर रोजी अमरावती येथे झालेल्या राष्ट्र सेविका समितीच्या महिला संमेलनात महाराजांनी प्रभावी व्याख्यान दिले. अकोट (अकोला) च्या चातुर्मास्य काळात तुकारामजी गीताचार्य यांना श्रीगुरुदेव सेवामंडळाचे विराटरूप दर्शन घडले आणि त्यांनी प्रचारकार्यासाठी स्वतःला वाहून घेण्याचा निर्धार केला. दिगंबरराव हिरपुरकर

हे भातकुलीला १९४४ अखेरीस झालेल्या प्रचार सप्ताहादरम्यान सेवामंडळात आले. जयतापूरचे श्री.जयकृष्णपंत तायडे हेही त्याच सुमारास आले. मात्र मोझरीचे रामराव ठोसर हे आधीपासूनच प्रचारकार्यात गती असलेले कार्यकर्ते होते. नांदुऱ्याच्या रामभाऊ नारखेडे यांचाही संबंध महाराजांशी याच सुमारास आला. खेड (ता.मोर्शी) च्या सप्ताहात श्री.रामराव ठाकरे व उत्तमराव कंकाळे हे महाराजांना अनुसरले. १९४४ च्या ७ डिसेंबर ला श्यामरावदादा मोकदम यांनी श्रीगुरुदेव सेवामंडळाची खास अशी सामुदायिक प्रार्थना सुमारे ९०० कार्यकर्त्यांसह म.गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात प्रत्यक्ष करून दाखवली. त्यावर गांधीजी अतिशय प्रभावित झाले. वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांत महाराजांना प्रवेशबंदी असल्यामुळे ते मात्र यावेळी अनुपस्थित राहिले.

महाराजांनी नित्यक्रमाव्यतिरिक्त १९४५ या वर्षापासून 'आदर्श खेडे बक्षीस योजना' जाहीर केली : ज्या खेड्यात सा.प्रार्थना, सूतकताई, वाचनालय, व्यायामशाळा, साक्षरताप्रसार, स्वच्छता, व्यसनमुक्ती आदि गोष्टी विशेष स्वरूपात दिसून येतील अशा सर्वोत्तम खेड्यासाठी फिरत्या ढाली ठेवण्यात आल्या. वर्षभरातील कार्य लक्षात घेऊन समर्थांच्या पुण्यतिथी उत्सवात ही बक्षिसे जाहीरपणे देण्यात येत. परीक्षक समिती मध्यवर्ती कार्यालयातर्फे नेमली जाई. 'श्रीगुरुदेव' मधून तसेच वृत्तपत्रांमधून या योजनेला व्यापक प्रसिद्धी देण्यात आली. या विधायक स्वरूपाच्या अभिनव स्पर्धेत शेकडो खेडी उत्साहाने भाग घेऊ लागली. शारीरिक शिक्षण वर्गातून यशस्वी झालेल्या उमेदवारांस सुद्धा पारितोषिके देण्यात आली व महाराजांच्या सहीची प्रशस्तीपत्रकेही देण्यात आली.

महिला जागृती संदर्भातही १९४१ पासूनच महाराजांनी विधायक पावले उचलण्यास प्रारंभ कला असली तरी महिलामंडळे स्थापण्यास खरोखरी सुरुवात १९४३ मध्ये 'विश्वशांति नामसप्ताहा'पासून झाली : महिलांची आरतीमंडळे, भजनमंडळेही स्वयंस्फूर्तीने अनेक गावी (मुंडगाव, आकोट, चांदुरबाजार, अचलपूर, पिंपळखुटा, मोझरी, वरखेड, चिमूर, वर्धा, वणी, जरूड, नागपूर, भंडारा, अकोला) आकारास आली होती. मात्र गावोगावच्या या महिलामंडळ शाखांमध्ये एकसूत्रता थेट १९४५ पर्यंतही स्थापन झाली नव्हती; कारण महाराजांचा कटाक्ष होता की महिलांच्या संस्था स्वतंत्र असाव्या आणि त्यात कार्य करणाऱ्याही

महिलाच असाव्या. १९४५ च्या ऑगस्टमध्ये जरूडच्या महिला मंडळाने प्रभाताई देशमुख यांच्या संयोजनाने मुली व प्रौढ महिलांचा वर्ग घेऊन त्यात आरोग्यरक्षण, प्रथमोपचार, गृहकाम, सूतकताई, गीतापठण आदि विषयही समाविष्ट केले. प्रभाताईंनी स्वतःची २५ तिफण जमीन आणि घरदारही या कामी लावण्याचा संकल्प केला. त्याच सुमारास कु.विमलाताई ठकार या विदूषी महाराजांच्या संपर्कात आल्या व भंडारा येथील अध्यापिकेची नोकरी सोडून सेवामंडळाच्या कार्यात लागल्या.

सप्टेंबर १९४५ मध्ये 'श्रीगुरुदेव महिलामंडळ' नावाची स्वतंत्र संस्था महाराजांनीच स्थापन केली. तिचे तत्त्वज्ञान सेवामंडळाचेच असले तरी सेवामंडळापासून ती वेगळी अशी स्वायत्त संस्था होती. आसरा येथे केंद्रीय कार्यालय असलेल्या त्या संस्थेचे नेतृत्व सौ.राधादेवी गोएनका (अकोला) यांचेकडे सोपविले, अधिक जबाबदारी श्रीमती प्रभाताईंनी स्वीकारली तर प्रचारकांची जबाबदारी कु. विमलाताई ठकार (अकोला) आणि परित्यक्ता वेणूबाई वानखडे (वरखेड) यांनी स्वीकारली. सुमारे दोन डझन कार्यकारी सदस्य महिलांनी अहमहमिकेने सर्व स्वयंस्फूर्त शाखांशी संपर्क साधून तसेच नवनव्या शाखा उघडून शेकडो शाखांची नोंदणी मध्यवर्ती कार्यालयात रीतसर केली. शिबिरे नि वर्ग सप्ताहांची रेलचेल झाली! त्यांच्या किती तरी शिबिरांचं उद्‌घाटन नि वर्गांचा समारोप खुद्द महाराजांनीच केल्यामुळे महिलांचा आत्मविश्वास अधिक वाढत गेला.

विदर्भातील नागपूरसहित शेकडो गावे, मध्यप्रदेशातील इंदूर व कितीतरी खेडी तसेच गुजरातेत अहमदाबाद येथील ३ दिवस दासनवमीच्या निमित्ताने महाराजांची खंजरीभजने व स्फूर्तिप्रद भाषणे यांची लयलूट अखंड सुरूच होती. दि.२० जानेवारी १९४५ च्या कार्यक्रमाला सावंगी पेरका (यवतमाळ) येथे जाताना महाराज कळंबच्या चिंतामणीला भेट देऊन श्री.मांडवकर नि श्री.टिपणवार यांना घेऊन हजर झाले. तेथून २१ जानेवारीला घुईखेड व २२ जानेवारीला चांदसुऱ्याच्या यात्रेत भव्य कार्यक्रम झाले. २५ जानेवरीला भजनी मुले घेऊन महाराज ग्रॅण्ड ट्रंक एक्सप्रेसने इटारशीला जात असता डब्यात महाराज चढताच मुसलमान प्रवाशांनी त्यांना शिवीगाळ केली व एकाने तर त्यांचेवर सुरा उगारला. महाराज अगदी शांतपणे गाडीतून उतरले. सोबतच्या मंडळींनीही सहनशीलता दाखविली. पुढे स्टेशनवरील

पोलीसास बोलावून त्याच डब्यात जागा करून देण्यात आली व अनर्थ टळला. जबलपूरला कार्यक्रम झाल्यावर सर्वजण नागपूरला परत आले. दि.३१ जानेवारी १९४५ रोजी सप्ताहसमाप्ती निमित्ते पवनीला महाराजांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ५ मे १९४५ ला शारीरिक शिक्षणवर्ग घेण्यात आला.

बुवाबाजीचे सुप्रसिद्ध विरोधक श्री.ज.सी. अकर्ते वकील, जमाल पक्षाचे श्री.जी.बी.वऱ्हाडे व श्री के. गो. जोध वकील, वीर उत्तमराव मोहिते, श्री.अं.वा.नवाडे, श्री.नानासाहेब गवई, अकोल्याचे श्री.जी.के. वाघमारे अशी काही निवडक नावे आलटून पालटून 'उदय', 'अग्रणी' या वृत्तपत्रांतून या संदर्भात झळकत होती व तुकडोजी महाराजांवर खटला भरावा या बाबतही कांही मंडळी दुरून दुरून आव्हान करीत होती. तरी महाराज डौलाने पुढेच जात होते. कोल्हेकुईची त्यांनी पर्वा केली नाही. 'कर नाही त्याला डर कसली?' अशी त्यांची वृत्ती होती. मध्यान्हीच्या सूर्यावर थुंकणारांना वेगळे उत्तर देण्याची गरज तरी काय?

२६ नोव्हेंबर १९४५ रोजी वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांसाठी श्रीगुरुदेव सेवामंडळाचे मध्यवर्ती कार्यालय अमरावतीस ठेवून महाराजांनी मध्यप्रांताच्या अठरा जिल्ह्यांकरिता नागपूर येथे नवीन कार्यालय सेवाश्रमातच उघडून दिले. श्री.द.वा.तायडे यांची नियुक्ती करून श्री.पु.गो सिरास वकीलांना अमरावतीच्या मध्यवर्ती कार्यालयाचे प्रमुख चिटणीस नियुक्त करण्यात आले. जिकडे तिकडे कार्यानंद दिसत होता. रामटेक (नागपूर) येथे २५, २६ डिसेंबर १९४५ ला भंडारा व नागपूर जिल्ह्यांतील सेवामंडळाच्या प्रचारकांचे संमेलन घेण्यात आले. श्री गुरुदेव धर्मग्रंथ प्रकाशनाचे कार्य देखील जोरात सुरू होते. 'जीवन जागृती' (हिंदी,मराठी) हे १५४ भजनांचे संकलन १९४५ वर्ष अखेरीस २० हजार प्रतींसह प्रसिद्ध करण्यात आले.

वर्ष १९४६ चा शुभारंभ आर्वी येथील परमगुरु संत मायबाई यांच्या समाधि मंदिरातील महाराजांच्या अभूतपूर्व स्वागताने नि महोत्सवातील भव्यदिव्य कार्यक्रमाने झाला. तो ऐकून व पाहून लोक थक्क झाले.

खानदेश व मध्यप्रदेशातही महाराजांचे लोकजागृतीचे कार्य सुरूच होते. नाशिक, चाळीसगाव, मालेगाव नंतर ते तिविरखेड, चिंचखेड, जुन्नर देव येथील कार्यक्रम महाराजांनी संपन्न केले. चिमूरच्या स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार महाराजांचे

अध्यक्षेखाली पिंपळनेरी येथे पार पडला. दि.३ जून १९४६ रोजी आष्टी येथे सत्याग्रही वीरांचे स्वागत श्रीतुकडोजी महाराजांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने पार पडले. महाराजांचा दिव्य स्वर त्यांच्या आवाजात त्यांची भजने रेकॉर्ड करण्यातून स्थायीस्वरूपात संग्रहित करता आला तो १९४४ साली 'धी ग्रामोफोन कंपनी'त चार भजनांच्या केलेल्या ध्वनिमुद्रणातून. ही भजने म्हणजे 'अवताराचे कार्य करा या', 'हिंदभूच्या लेकरा' (मराठी), 'मुझे प्यारा भारत मेरा' आणि 'बजा दे बजा दे' (हिंदी).

भारतीयांच्या हाती सत्ता सोपविण्याच्या वाटाघाटींसाठी खुद्द भारतमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली उच्च दर्जाचे शिष्टमंडळ लंडनवरून भारतात मार्च १९४६ मध्ये आले. सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांशी व म.गांधींशी विचार विनिमय झाला. लीग व संस्थानिक यांचे प्रश्न नडत होते. लॉर्ड वेव्हेल अल्पसंख्यकांचे घोडे पुढे दामटून कॉंग्रेसला शह देऊ पाहात होते. 'हंगामी सरकार' निर्माण करण्याचा मुद्दा जिनाच्या राष्ट्रीय मुस्लिमांबाबतच्या विरोधी दुराग्रहामुळे बारगळला नि जून अखेर शिष्टमंडळ परत गेले. १६ ऑगस्ट १९४६ ला मुक्तिदिन ठरवून लीगने बंगालात सुऱ्हावर्दी सरकारच्या छत्राखाली डायरेक्ट ॲक्शन सुरू केली. म्हणजे अन्याय, पक्षपातच नव्हे तर हिंदूंची जाळपोळ, बलात्कार, खून, यांचा धडाका सुरू केला. तीन दिवस अहोरात्र कत्तल चालली. जिनांवरून लंडनचा विश्वास उडाला.

इंग्लंडच्या हुकुमाने व्हाइसरॉयने २४ ऑगस्टला महामंत्री पं. नेहरूचे हंगामी सरकार उद्‌घोषित केले. महात्मा गांधी त्यावेळी ७६ वर्षांचे झाले होते. नौखालीच्या खेड्यापाड्यांत फिरून ते शांतीचा नारा देत होते. दुःखितांचे अश्रू पुसत होते. काळ पुष्कळच बदलला होता. ब्रिटनच्या निवडणुकीत चर्चिलपक्ष पराभूत होऊन आता मजूरपक्ष पदावर आला होता. इंग्रज सत्ताधाऱ्यांनी 'निवडणुका' आयोजित केल्या. भारताच्या ११ पैकी ८ प्रांतांमध्ये कॉंग्रेसचा विजय झाला. एप्रिल १९४६ मध्येच वऱ्हाड–मध्यप्रांताच्या कॉंग्रेस मंत्रीमंडळाने सूत्र हाती घेताच २४ तासांत आष्टी, चिमूर, यावली, रामटेक येथील राजबंदी तुरुंगातून मुक्त केले; त्यावेळी अनेक नेते महाराजांच्या दर्शनासाठी अक्षरशः धावले.

आषाढी–एकादशीला श्री संत तुकडोजी महाराज पंढरपुरात गेले असता

हरिजनांना विठ्ठल मंदिर मोकळे नसल्यामुळे त्यांनीही विठोबारायाचे दर्शन घ्यायचे नाकारले. तिथे संत चोखामेळाच्या पायरीजवळ बसून त्यांनी हरिजनांच्या मनात गांधीजींविषयी वाटत असलेले किल्मिष कमी करण्याचा प्रयत्न केला. आषाढीच्या यात्रेनिमित्त पंढरपुरात महाराजांचा पाच दिवस मुक्काम होता. त्यावेळी त्यांनी हरिजनांसाठी विहिरी व मंदिर खुले करण्याचा नारा दिला. दि.७ ऑगस्ट १९४६ या दिवशी हरिजनांना मंदिर खुले केले गेले, पण पंढरपूरचे नव्हे तर श्रीक्षेत्र वरखेडचे! पंढरपूरच्या विठोबाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हायला आणखी जोमाने जनमत परिवर्तन करणे आवश्यक होते.

✻ ✻ ✻ ✻ ✻

## सहा : नवनिर्माण

श्रीगुरुदेवाच्या अधिष्ठानाशी सेवामंडळाची घटना-संघटना आता आता काहीशी नीट बसू लागली होती. विस्कळित झालेल्या आरती मंडळ-भजन मंडळ आणि सामूहिक उपक्रम या कार्यप्रवृत्ती पुन्हा एकात्म होऊ लागल्या. गुरुदेवप्रेरित विविध उपक्रम अंमलात आणताना महाराजांनी तसेच कार्यकर्त्यांनी देशभर नवनिर्मितीचा ध्यास घेतल्याने एकप्रकारचे आगळे चैतन्यवलय महाराजांच्या भोवती निर्माण होऊ लागले. मध्यप्रांत-वऱ्हाड नि झाडीमंडळातच नव्हे तर मुंबई-पुणे-पश्चिम महाराष्ट्र-कोल्हापूर-कोकण परिसरापर्यंत या श्रीगुरुप्रेरित कार्यप्रवृत्तीची लाट पसरत गेली. सनातन्यांच्या जाणिवांना धक्के देत व सोबतीने बहुजनांना समृद्ध करीत नवचैतन्याची ही लाट व्यायाम, बलिदानबंदी, अस्पृश्यता-निवारण तथा मंदिर-प्रवेश, उद्योग तथा कृषिविकास, आयुर्वेद चिकित्सा तथा औषधनिर्माण, महिला जागृती, विवाह संस्कार तथा अंत्यसंस्कार, आदर्श ग्राम योजना, आदिवासी विकास, सुराज्याची पायाभरणी, संस्थानांचे विलीनीकरण, यात्राशुद्धी, शांतिसंमेलन तसेच समाजशिक्षण-आंदोलन या विविध रूपांत साकार होत पुढे निघाली होती. महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमामार्फत ती एकप्रकारे देशाच्या नवनिर्माणाशीही नाते सांगू लागली होती. अशा या गुरुदेवप्रणित नवनिर्माणाच्या लाटेने विविध क्षेत्रांत प्रसृत केलेले नवचैतन्य अवलोकणे उद्‌बोधक ठरेल.

मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री.स.का.पाटील यांचेकडून मुंबईला महाराजांचा नागरी सत्कार करण्यासाठीचे निमंत्रण मिळाले. दि.१६ जुलै १९४६ रोजी रात्रौ मुंबईच्या जिना हॉल मध्ये सर्व पक्षांच्या वतीने महाराजांचा जाहीर सत्कार करण्यात आला. अध्यक्ष श्री.स.का.पाटील प्रास्ताविक भाषणात म्हणाले- ''धर्म व राजकारण यांचा अभंग संबंध आणि संत तुकडोजी महाराज यांनी आपल्या वाणीत व वागणुकीत त्यांचा केलेला संगम त्यांच्या कार्यात स्पष्ट दिसतो. जनतेत मिसळून तिला कार्य करायला लावणे, इतकेच नव्हे तर कार्य करीतच जनतेला आपल्याबरोबर नेणे हा कर्मयोग त्यांनी सातत्याने चालविला आहे. आष्टी-चिमूरमधील सैनिक-अत्याचारांनंतरही असंख्य लोकांना शिक्षा

झाल्या. त्यावेळी वादळी जनजागृती करून त्यांच्या बचावासाठी प्रथम पुढे येणारे हे वीरसंत तुकडोजी महाराज... मुंबईच्या नागरिकांतर्फे आज मी त्यांचे स्वागत करतो.'' श्री.गोपाळराव वाघ यांनी परिचयपर भाषणात सांगितले– महाराज हे व्यक्तिपूजेविरुद्ध तसेच बुवाबाजीविरुद्ध असून खेड्यापाड्यांत विधायक कार्यासाठी त्यांनी असंख्य संस्था चालविल्या आहेत. उत्तरादाखल महाराज म्हणाले– ''देवळात मला देव दिसला नाही; तो मला जनताजनार्दनात दिसला. म्हणूनच मी जनतेची सेवा करतो. धर्म आणि राजकारण यांची ताटातूट होऊ शकत नाही... मानवता आणि स्वतंत्रता यांचा संगम झाला तरच धर्म टिकेल; मानवतेचा अंश नाही अशा मुडद्यांच्या देशात राष्ट्रतेज निर्माण होणार नाही... परमेश्वर आपणा सर्वांना स्वराज्य व सुराज्य स्थापन करण्यास शक्ती देवो!...'' कार्यक्रमाच्या समारोपानिमित्ते झालेल्या महाराजांच्या भजनांनी मुंबईकरांना अक्षरशः वेड लावले.

सामुदायिक प्रार्थनापाठ व पद्धती अधिक सुटसुटीत करून महाराजांनी वरखेड येथे २५ जुलैपासून प्रमुख कार्यकर्त्यांचा प्रशिक्षण वर्ग घेतला. दि.५ ऑगस्टला गुरुकुंजात 'श्रीगुरुदेव उद्योग मंदिरा'चे उद्घाटन केले. याप्रसंगी विदर्भाचे शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख तथा दे.भ.रघुनाथमल कोचर आदि उपस्थित होते. मोझरी व निमकर्डा (अकोला) येथेही विशेष प्रचारकांचे वर्ग श्रीगुरुदेव धर्मसेवा मंडळाच्या कर्त्याधर्त्या कार्यकर्त्यांनी यशस्वीपणे पार पडले.

महाराज पंढरपुराहून वरखेडला परत आल्यावर दरसालप्रमाणे सद्गुरु श्री आडकोजी महाराजांच्या मंदिरात तीर्थपूजनाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी महाराजांनी पंढरपूरला पांडुरंगाच्या देवालयात प्रवेश कां केला नाही– हा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना महाराज म्हणाले– ''गेल्या कार्तिक एकादशीपासूनच मी नियम केला आहे की सर्व मानव ज्या ठिकाणाहून दर्शन घेतात, तेथूनच मीही दर्शन घेईन. मंदिर सर्वांना खुले असायला हवे. उद्धार पतितांचा करायचा असतो, पावनांचा नाही.'' पण वरखेडलाही महाराजांनी असेच आचरण ठेवले, ते लोकांना बरे वाटत नव्हते. आपल्यासाठी महाराजांना होणारा त्रास वाचवण्याचे त्यांनी ठरविले. आणि पुढे दि.७ ऑगस्ट १९४६ या दिवशी वरखेडवासियांनी हरिजनांसाठी मंदिर खुले केले. व्याख्यान संपल्यावर सर्व स्पृश्य व अस्पृश्यांना घेऊन महाराज मंदिरात गेले आणि गावातील एकेका प्रतिष्ठितासोबत

एकेका हरिजनाने जाऊन एकंदर सर्वांनी देवदर्शन घेतले. सत्ताबळाने किंवा केवळ राजकारणी दृष्टीने नव्हे; तर लोकांचे मतपरिवर्तन करून आणि कोणावरही आघात न करता केवळ मानवधर्म आचरणातून एका धर्मनिष्ठ सत्पुरुषाने केलेला हा निःसंशय पहिलाच उपक्रम असल्याचे 'राष्ट्रदूत' (११-८-४६) आणि 'अग्रणी' (२३-८-४६) या वृत्तपत्रांनी जाहीर केले.

दि.२० ते २६ ऑगस्ट १९४६ पर्यंत महाराजांचा दौरा जतसंस्थानात झाला. मंदिरप्रवेशाबाबत त्यांनी धरलेल्या आग्रहापायी तसेच मानवधर्माच्या पुरस्कारापायी लक्ष्मणबुवा इगतपुरीकर यासारख्या वारकरी नेत्यांनी व अन्यही कांही लोकांनी महाराजांवर टीकाही केली. 'बुवाबाजी विद्ध्वंसक संघ' स्थापन करून महाराजांवर टीका सुरू केली. पं.दिवेकर शास्त्रींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत श्री.अकर्ते वकिलांसारखेच श्री.वाघमारे यांनी आपल्या भाषणात महाराजांबद्दल असभ्य शब्द वापरल्यामुळे अमरावती नगरपालिकेचे शिक्षक श्री. मेटकर गुरुजी यांनी वक्त्याच्या तोंडावर जोडा फेकून मारला. अध्यक्षांनी हस्तक्षेप करून वक्त्याला संयम पाळण्याची सूचना केली. दुसरा वक्ता चव्हाण सुद्धा महाराजांविषयी पांचट भाषेत बोलू लागला तेव्हा डॉ. गोपाळराव निस्ताने खवळले. त्यांनी स्टेजवर जाऊन वक्त्याचे श्रीमुखात भडकावली. तेव्हा पूर्वतयारीत बसलेल्या जहाल कार्यकर्त्यांनी डॉ. निस्ताने यांचे पाठीवर दोन काठ्यांचे दोन तडाखे हाणले. श्री.बलदेवशेठजी मध्ये पडले. स्टेजवरील बाकी लोक सुरक्षित जागी निघून गेले. चव्हाण, वाघमारे, जोध, अकर्ते आदींनी तर आधीच पोबारा केला होता. पं. दिवेकर शास्त्री यांनी सभेच्या नीतीची पायमल्ली केली. दुसऱ्या पक्षाची बाजू ऐकून घेण्याऐवजी त्यांनी सभाच बरखास्त केली.

१ सप्टेंबर १९४६ रोजी महाराजांनी पुलगाव मिलमध्ये श्री गणेशोत्सवप्रीत्यर्थ भजनादि कार्यक्रम केले. अस्पृश्यता निवारणाची त्यांचीं भूमिका सर्वांना पटली होती. मात्र सनातन्यांचा विरोध सुरूच होता. महाराज म्हणाले, ''स्वराज्य मिळाल्यानंतर सुराज्य मिळविण्यासाठी व ते टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी सेवाधर्म स्वीकारला पाहिजे.''

अमरावती येथे राजापेठ मधील राष्ट्रीय युवक संघाने नागपूर येथील कॉंग्रेस सेवादलाचे प्रसिद्ध मुस्लीम कार्यकर्ते श्री.सुलेमान पठाण यांचे हस्ते शुक्रवारी

सायंकाळी श्री गणेशमूर्तीची स्थापना करून एक नवीन उपक्रम सुरू केला. अध्यक्षस्थानी संत तुकडोजी महाराज होते. त्यांनी या उपक्रमाला पाठिंबा जाहीर केला. नगर काँग्रेसच्या अध्यक्ष सौ. कान्ताबेन वर्मा देखील हजर होत्या. या उपक्रमाबद्दल सनातन्यांनी निषेधपर प्रतिक्रिया दिल्या. तुकडोजी महाराजांनी विरोधकांना खडसावून निवेदन केले की ''राष्ट्रीय उत्सवाप्रीत्यर्थ स्थापना करण्यात आलेल्या हिंदूंच्या देवतेला मुसलमानाने राष्ट्रीयवृत्तीने हार घालून आदर व्यक्त केल्यास आमच्या धर्मात भ्रष्टाचार होतो- असे समजण्याइतका हिंदूंचा धर्म असमंजस व कमकुवत असेल याची मला कल्पना नव्हती. गणपतीपुढे वेश्यांचे नाचगायन, अश्लील नकला, जुगार व दारूची पार्टी चालू शकते; मांस-मासे खाणारे गणपतीला हार घालू शकतात. तेव्हा हे सनातनी हाकाटी करीत नाहीत, हे आश्चर्य नव्हे काय ? मग 'सर्वं खल्विदं ब्रह्मम्।' या उच्च तत्त्वज्ञानाचा व 'देवा सख्याय वृद्धानुवंत' (देवांनी सर्वांशी मित्रता करण्यासाठीच मोठेपण पत्करले) किंवा 'कृण्वतो विश्वमार्यम्।' (जग आर्यमय करा) अशा उदार भावनेच्या ग्रंथांना आपले धर्मग्रंथ तरी आपण कां समजावे? सनातन्यांनी याचा विचार करावा व निराग्रही वृत्तीने आपली चूक दुरुस्त करावी असे मी सुचवू इच्छितो.'' असा खुलासा वृत्तपत्रांतून देखील केला होता. या खुलाशामुळे काहींना अधिकच राग आला व ते अद्वातद्वा लिहू लागले. देशभक्त सुलेमान पठाण हे मूर्तिभंजक व गोमांसभक्षक मुळीच नव्हते. ते सोज्ज्वळ वतर्णुकीचे राष्ट्रीय पुढारी होते, काँग्रेस सेवादलाचे आदरणीय नेते होते. मूर्तिपूजा मान्य नसलेल्या कट्टर इस्लाम धर्मीयांचा आपल्यावर रोष होईल, याची पर्वा न करता त्यांनी इथे गणेशमूर्तीला प्रेमाने पुष्पमाला वाहिली होती ती हिंदु-मुसलमानांत एकात्मता वाढावी याच विशुद्ध हेतूने ! अशांना 'दैत्य' म्हणणारे हे कोणत्या योग्यतेचे ठरतील? समाजातील हा रूढीवादी दुराग्रह दूर करण्यासाठीच महाराजांनी हा प्रयत्न केला होता. विवेकी सज्जनांना यात काहीच गैर वाटले नाही. त्यांनी चौदा मंडळांद्वारे आयोजिलेला संयुक्त कार्यक्रम ३० सप्टेंबर १९४६ रोजी रात्री खापर्डे मैदानात अत्यंत शांततेने पार पडला, कारण यावेळी शामरावदादा मोकदम आणि डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांनी उत्कृष्ट बंदोबस्त ठेवला होता. महाराजांच्या भजनाला त्यावेळी खूपच गर्दी होती.

इंदूर संस्थानातील प्रभावी चातुर्मास इंदूरचे राजे यशवंतराव होळकर

यांचेकडे झाला. कीर्तनात श्रीमंत राणीसाहेब व मोठमोठे अधिकारी उपस्थित होते. विमलाबाई ठकार यांना राणीसाहेबांनी खास करून बोलावले होते. इंदूरलाच श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या विद्यमाने १६ सप्टेंबर पर्यंत महाराजांच्या नेतृत्वाखाली चातुर्मास्याचा कार्यक्रमही पार पडला. त्याच दरम्यान विमलाताईंनी चार प्रमुख सेविकांना सोबत घेऊन संस्थानातील महिलांमध्ये जागृती निर्माण करून प्रार्थना-प्रवचनादि कार्यक्रम प्रभावीपणे संपन्न केले. उज्जयिनी, कोटा आदि ठिकाणीही ताईंचे कार्यक्रम गाजले. इंदूर संस्थानात या चातुर्मास्याने नवीच चैतन्यलहर निर्माण केली.

अमरावतीलगतच्या ओसाड तपोवनात श्री.शिवाजीराव पटवर्धन यांना कुष्टधामाचा शुभारंभ करायचा होता. त्याचे भूमिपूजन वं. महाराजांच्या हस्ते झाले.

२६ सप्टेंबर ४६ ला अखिल महाराष्ट्र व्यायाम परिषदेचे १५ वे अधिवेशन अमरावती येथे सुरू झाले, तेव्हा महाराजांनी उद्‌घाटनपर भाषणात व्यायामाचे महत्त्व सांगितले. 'हिंद सेवा दला'चे सरसेनापती आमदार डॉ. गोपाळराव खेडकर यांनी चांदूरच्या व्यायाम वर्गाच्या समारोपाचे अध्यक्षपद भूषविले. ''श्रीगुरुदेव सेवामंडळ केवळ हे धार्मिकच आहे असे मी आजवर समजत होतो. महाराजांच्या या राष्ट्रहितैषी कार्याबद्दल जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच होतील''- असे ते म्हणाले. पूज्य साने गुरुजींनाही मंदिर प्रवेश सत्याग्रहात महाराजांचे संपूर्ण पाठबळ होते. साने गुरुजींनी पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजन बांधवांना खुले व्हावे म्हणून प्राणांतिक उपोषणाचा संकल्प केला. त्यासाठी महाराजांनी त्यांच्या पाठीशी राहून त्यांच्या समर्थनात ५ लाख सह्या मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी स्वतः महाराष्ट्रभर दौरे केले व लोकजागृती केली. विदर्भ तथा मध्यप्रदेशातील दौरा आटोपून पूर्व खानदेशात महाराज दि.२८ जानेवारी १९४७ रोजी अस्पृश्यता निवारणाच्या प्रचारार्थ आले. 'गावोगावची मंदिरे हरिजनांसाठी खुली करा!' असा त्यांनी प्रचार केला. बोदवडचे हनुमंत मंदिर महाराजांनी हरिजनांसाठी खुले केले तेव्हा सुमारे २५ हजार लोक हजर होते. महाराजांच्या प्रयत्नांनी व शासनाच्या अनुकूलतेने पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजनांसाठी १० मे १९४७ रोजी खुले केले गेले. सेवामंडळाच्या तसेच अन्यही संघटनेच्या प्रयत्नांना यश येऊन साने गुरुजींचे १०

दिवसांचे उपोषण सफल झाले.

पुरुषांप्रमाणेच महिला जागृतीतही महाराजांनी लक्ष पुरविले. १ फेब्रुवारी १९४७ ला मंजुळामातेच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्ते त्यांनी महिलांचा सूतकताई वर्ग काढला. कित्येक शाखांमध्ये साक्षरता प्रसारवर्ग चालविले जात होते. हस्तकौशल्य, सूतकताई, भजन–गायन, ग्राम सफाई, मंदिरात हरिजन महिलांसह हळदीकुंकू, सहभोजन इ. कार्यक्रमच केवळ महिला करीत नव्हत्या; तर श्रीगुरुदेव महिला मंडळाच्या विद्यमाने 'महिला व्यायाम मंदिरे' सुरू करण्यात आली. श्रीगुरुदेव सेवामंडळ प्रचारकांद्वारा अनिष्ट रूढींचे उच्चाटन व आदर्श ग्रामयोजनाही सुरू करण्यात आली.

महाराज अन्यधर्मीयांशीही समप्रेमानं वागत असले तरी गुंडप्रवृत्तीला नियंत्रणात ठेवण्यासाठी मात्र तत्पर होते. प्रचारकार्यात अहिंसा कडकपणे पाळल्या जात असे. एका हिंदू बाईला एक मुसलमान हैद्राबादेस नेत होता, तिची सेवामंडळाच्या सेवकांनी सुटका केली. सावळापूर–अचलपूर येथील पार्वती नावाच्या बाईला चार गुंडांनी एका घरात कोंडून ठेवले होते व शेख ताज शेख गुलाब या पिंजारी मुसलमानाबरोबर निका लावण्यासाठी त्यांनी तिच्यावर बळजबरी केली, पण गुरुदेव सेवामंडळाचे श्री राम सगणे, सेक्रेटरी सुकदेव फाटे व सेवक संपत निघोट यांनी मोठ्या शिताफीने तिला सोडविले आणि नंतर त्या गुंडावर खटला भरला. हिंदू समाज अशा अपहृत स्त्रियांना पतित मानी; पण महाराज या सनातनी वृत्तीला धक्का देऊन निर्भयपणे नवा आदर्श स्थापन करीत होते. विवाहादि संस्कारांमध्ये घुसलेल्या अनिष्ट रूढींना फाटा देऊन संस्कारांना सुटसुटीत नि खऱ्या अर्थाने मंगल स्वरूप देण्याचा प्रयत्न महाराजांच्या प्रेरणेने सेवक–प्रचारक देखील करू लागले होते. अंतीम संस्कारांच्या बाबतीतही श्रीगुरुदेवाच्या जयघोषात अंत्ययात्रेच्या प्रसंगी महाराजांनी सुरू केलेली नवीन चालीची पद्धत म्हणजे अंत्ययात्रेत सामील होणाऱ्या प्रत्येक नवीन माणसाने थोडा वेळ खांदा देणे : ही इस्लामधर्मीयांची पद्धत आहे.

हरिजनांपेक्षाही महाराजांचे लक्ष गिरिजनांकडे अधिक होते. आदिवासी जनतेत विशिष्ट गुणवत्तेच्या प्रचारकांची महाराजांनी नियुक्ती केली होती. त्यांच्यात सुधारणा घडविल्या होत्या. त्यामुळे ते महाराजांचे भक्त होऊन सामुदायिक प्रार्थना,

रामधून आदि कार्यक्रम शिस्तीत करीत होते. गोंड, कोरकू, बंजारा इ. समाजात उत्तम स्नेहज्योत त्यांनी पेटविली होती आणि तिचे अनुसरण आता त्यांचे सक्षम प्रचारक करीत होते. आदिवासींच्या तांड्यांपासून विज्ञानवाद्यांच्या शहरांपर्यंत महाराजांचा संचार सतत चालू होता. प्रत्येक जिल्ह्यात दौरे करून गावागावात तुफानी धर्मचक्रप्रवर्तन करणे सुरू होते. निजामस्टेट हैद्राबाद म्हणजे जनतेवर वरवंटा फिरविणारी मोगलशाही! ‘हम करे सो कायदा’ –अर्थात् बेबंदशाही. म्हणूनच प्रचारकांसाठी हैद्राबाद ही फार मोठी कसोटी होती. मध्यप्रदेशात सहेकी (बालाघाट), मोहझरी, पालडोंगरी, इटोरा आदि गावांत महाराजांचे विविध कार्यक्रम झाले.

मार्च १९४७ मध्ये नागपूरला भंग्यांनी संप पुकारला. तो चिघळला आणि जनतेचे हाल हाल होऊन आरोग्याला धोका होऊ लागला. तेव्हा महाराजांनी पत्रक काढून मंडळ, प्रेमीजन व सेवकांना नगर सफाईचं आवाहन केलं. स्वतः महाराजांनी मळाचं टोपलं उचलून नेऊन नाल्यात ओतलं. त्यामुळे सारे पुढे सरसावले. त्यानंतर ‘भंगीमुक्ति संडास’ बनू लागले.

गुरुकुंजातील सेवाश्रमाचे पुनरुद्घाटन १९ जून १९४७ रोजी झाले. आश्रमात मानवाच्या सर्वांगीण उन्नतीस आवश्यक असलेले बौद्धिक, औद्योगिक, सामाजिक, ग्रामसुधारविषयक, आयुर्वेदिक, शारीरिक व संगीतकलेचे शिक्षण दिले जाऊ लागले. सेवामंडळाच्या व्यवस्थेत आवश्यकतेनुसार वारंवार परिवर्तन सुद्धा होऊ लागले. श्रीगुरुदेव नागपूर नगर संमेलन सुद्धा त्याच सुमारास झाले. हिंदू–मुसलमान–पारसी–ईसाई इत्यादी भारतातील बहुधर्मी जनतेची समबुद्धीने सेवा करण्याचे व्रत सेवामंडळाने घेतले.

स्वराज्य मिळण्यापूर्वीच बहुसूत्री सुराज्य निर्मितीचे उपक्रम महाराजांनी सुरू केले होते. यासाठी सरकारने भरपूर मदत करावी अशी खुद्द नामदार डी.पी.मिश्र या मंत्र्यांची अपेक्षा होती. परंतु प्रांतिक सरकार व आधुनिक संस्थांना जे ५० वर्षांत करता आले नाही, ते महाराजांनी केवळ उत्स्फूर्त लोकसहभागाद्वारे थोड्या अवधीत करून दाखविले. प्रत्येकाच्या मनात राष्ट्रोद्धाराची महत्त्वाकांक्षा त्यांनी जागविली. भारतभर विखुरलेले वारकरी पंथाचे भक्त महाराजांकडे श्रद्धेने ओढले गेले. भजनी टोळी व महाराजांची अद्‌भुत खंजरी यांवर लोक मोहित झाले होते.

भारतीय स्वातंत्र्य नजरेच्या टप्प्यात आले होते. ब्रिटिश राज्यकर्ते भारत आणि पाकिस्तानकडे सत्ता सोपविणार होते. संस्थानिकांना मुभा देण्यात आली होती. त्यामुळे निजामाच्या मर्जीने विदर्भाचे भविष्य ठरणार होते. तसे होऊ नये म्हणून स्वातंत्र्य बिलाविषयी महाराजांनी मि. ॲटली, मौंटबॅटन व निजाम आदींना तारा पाठवून स्वातंत्र्यबिलात दुरुस्ती करण्याची विनंती केली.

स्वतंत्र भारतासाठी 'घटना' तयार करण्याचे काम ज्या समितीकडे दिले होते तिचे अध्यक्ष देशरत्न डॉ. बाबू राजेन्द्रप्रसाद हे होते. दि.१५ ऑगस्ट १९४७ शुक्रवार रोजी भारत स्वतंत्र झाला. महाराजांनी सेवामंडळाद्वारे गावोगावी फिरून व रामधून, सामुदायिक प्रार्थना, सूतयज्ञ, कुस्त्यांचे दंगल, मर्दानी खेळ यांचा प्रचार करून अस्पृश्यांसाठी विहिरी-देवळे खुली केली. १५ ऑगस्टच्या बरोबर मध्यरात्री दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तोफांच्या गडगडाटात, रोषणाईच्या झगमगाटात नि भारतमातेच्या बुलंद जयघोषात अशोकचक्रांकित तिरंगा राष्ट्रध्वज डौलाने फडकू लागला. त्याला पंडित नेहरूंनीच नव्हे तर मौंट बॅटननी सुद्धा सलामी दिली होती. अशाप्रकारे दीडशे वर्षांच्या गुलामगिरीच्या लोहशृंखला दि. १४ ऑगस्टच्या रात्री १२ वाजता निखळून पडल्या.

१५ ऑगस्टच्या रात्री वं. महाराजांचा कार्यक्रम श्रीक्षेत्र पंढरपूरला होता. डॉ.राजेन्द्रप्रसाद हे पहिले राष्ट्रपती व पंडित नेहरू हे पहिले पंतप्रधान झाले. जनतेच्या न्याय्य विकासाची जबाबदारी मात्र कुणालाच कळली नाही. म्हणून वं.महाराज रात्रंदिवस फिरून जनतेला स्वातंत्र्याचा अर्थ सांगत होते; ''आजच्या स्वातंत्र्याचा उपयोग करून चारित्र्यवान, शीलवान, बलवान असा नवा समाज निर्माण करण्याची स्वप्ने तुम्ही उराशी बाळगली पाहिजे... तुम्ही राष्ट्राचे भावी भाग्यविधाते आहात ही गोष्ट लक्षात असू द्या ! तुमच्या राष्ट्राची कीर्ती तुमच्या चारित्र्यावर आणि तुमच्या राष्ट्राचे स्वातंत्र्य तुमच्या बळावर-कर्तव्यावर अवलंबून आहे !.. अत्याचार करणे हे जसे पाप आहे तसे अत्याचार सहन करणे व दुर्बलावर होत असलेले अत्याचार उघड्या डोळ्यांनी पाहात बसणे हे महापातक आहे !.. जातीयता आणि अस्पृश्यता या गोष्टींना संपूर्ण मूठमाती दिल्याशिवाय भारताचा भविष्यकाल उज्ज्वल होणार नाही !.. माणूस ही आमची जात आहे, माणुसकी हा आमचा धर्म आहे व अन्यायाचा नि अत्याचाराचा प्रतिकार करून अखिल जगतात सुखशांती निर्माण

करणे हे आमचे कर्तव्यकर्म आहे...''

२६ ऑगस्ट १९४७ ला महाराज नागपुरात आले ते अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली ५ दिवसांपासून सुरू असलेल्या समाजवाद्यांच्या अ.भा. मेळाव्यात भाषण देण्यासाठी गेले. तुकारामांचे 'दया तिचे नाव भूतांचे पालन । आणिक निर्दालन कंटकांचे।।' हे वचन उद्धृत करून महाराज म्हणाले, ''स्वातंत्र्य मिळाले तरी देशाचा राज्यकारभार जोपर्यंत गरीब कास्तकार व मजुरांच्या तंत्राने चालणार नाही, तो पर्यंत खरेखुरे स्वराज्य आले असे म्हणता देणार नाही... धर्म हा समाजाची धारणा करणारा असतो. धर्म नसला तर न्याय, नीती, चारित्र्य, सेवाबुद्धि आदि राष्ट्र उन्नत होण्याकरिता आवश्यक असणारे सद्‌गुण समाजात प्रसृत होणार नाहीत... देशाचा बहुजनसमाज उन्नत होऊन मानवताप्रधान होवो''–अशी आशा व्यक्त करून महाराजांनी आपले भाषण समारोपिले.

नागपूरच्या श्रीमंत व्यापाऱ्यांच्या सभेत बोलताना महाराज म्हणाले– ''आज प्रत्येकाने स्वत:चे रक्षण करण्याची हिंमत दाखविणे आवश्यक आहे, आणि हेच प्रयत्न सामुदायिकरीत्या होतील तेव्हा आपले स्वराज्य बळकट होईल. त्यासाठी श्रीमंतांनी खेड्यापाड्यातील गरीब जनतेचा चरितार्थ चालवून त्यांना व्यायामाचे शिक्षण दिले तर त्यांच्या संपत्तीचे व त्याचबरोबर राष्ट्राचेही रक्षण होणार आहे. मोठ्या माणसाने मजुराचे पोट व इज्जत सांभाळली पाहिजे व मजुरांनीही राष्ट्राच्या इज्जतीसाठी इमानाने काम केले पाहिजे. अशानेच आमचे खरे जिवंत व समृद्ध राष्ट्र निर्माण होईल !'' 'श्रीगुरुदेव' व 'सुराज्य' मधून लिहिताना महाराज म्हणतात– ''शेतकरी हा तर स्वतंत्र भारताचा कणाच ! त्यांची स्थिती सुधारावी आणि अधिक धान्योत्पादन व्हावे याची आज अधिकच आवश्यकता आहे.''

दि.१६ सप्टेंबर १९४७ रोजी महाराजांचे वडील बंडोपंत यांचा यावली येथे मृत्यू झाला. बंडोजीच्या अस्थी वरखेड येथील वसिष्ठेत शिरविण्यात आल्या व तेरवीचा कार्यक्रमही वरखेडलाच झाला.

दि. २९ सप्टेंबर १९४७ रोजी मध्यप्रात व वऱ्हाडचे गव्हर्नर ना. मंगलदासजी पक्वासा यांनी निवडणुका व राजनीतीच्या संदर्भात मार्गदर्शनासाठी महाराजांना आमंत्रित केले होते. २ ऑक्टोबर १९४७ रोजी गांधीजयंती निमित्ते नगर काँग्रेसने नागपूर येथे हत्तीवरून त्यांच्या पुतळ्याची मिरवणूक काढली. त्यावेळी

जसे महाराजांचे भाषण झाले, तसे दि.११ ऑक्टोबर रोजी गुरुकुंजातही जिल्हाध्यक्ष बहाल साहेब यांच्या उपस्थितीत महाराजांचे भाषण झाले. दोन्ही भाषणांमध्ये राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने महाराज बोलले–''खेडी सामर्थ्यशाली करा, देश बलशाली व उद्योगशील करा.''

मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर हे नागपूरचे ॲड. के. के.ठाकूर यांचे व्याही होते आणि श्री ठाकूर हे महाराजांचे भक्त होते. त्यामुळे खेरांचाच नव्हे तर मुंबई राज्याचे राज्यमंत्री गुलझारीलाल नंदा यांचा सुद्धा महाराजांशी चांगला परिचय झाला. तसेच मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री.एस.के.पाटील यांचेमार्फत भारत सरकारचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचेशीही महाराजांचा चांगलाच परिचय झाला. आचार्य अत्रे व भालजी पेंढारकरांशीही महाराजांचा चांगला संबंध होता. कोल्हापूरच्या छत्रपतींनी महाराजांना आमंत्रण पाठवून बोलावले होते. कोल्हापूरचे राजे राजारामसिंह भोसले यांचे सासरे देवासचे राजे, तेच पुढे कोल्हापूरचे 'शाहू महाराज' बनले होते. महाराजांचे प्रथम पदार्पण कोल्हापूरला दि. २८ ऑक्टोबर १९४७ रोजी झाले होते. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी विराट जनसमूहात महाराजांची रसाळ व स्फूर्तिदायी भजने प्रसिद्ध लेखक वि.स.खांडेकर यांनी ऐकली. ते भावनाशील असले तरी त्यांच्या मनात धार्मिकतेला स्थान नव्हते. तरीही त्यांच्या मनावर त्या भजनाचा गहिरा ठसा उमटला व त्यांनी महाराजांना घरी नेले. १५ नोव्हेंबर १९४७ रोजी कोल्हापूर संस्थानात लोकसत्ताक राज्यपद्धतीचा श्रीगणेशा झाला. त्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांनी महाराजांचा कोल्हापूर दौरा खास विलीनीकरणासाठी घडवून आणला होता. महाराजांच्या योजनेनुसार श्रीगुरुदेवाची प्रतिभावंत प्रचारिका सुश्री विमल ठकार यांनी या संदर्भात अत्यंत मौलिक कार्य केले. (प्रत्यक्ष विलीनीकरणाचा शासकीय सोहळा पुढे १ मार्च १९४९ रोजी पार पडला असला तरी त्याचे श्रेय महाराजांना जाते.)

रामटेकच्या मंदिर प्रवेशाला राजे बहादूर श्री. रघुजीराव भोसले यांनी संमती दिल्यावर दि.११ नोव्हेंबर १९४७ रोजी रामटेकमधला राम सर्वांसाठी मोकळा झाला. नरकचतुर्दशीला गडावर प्रवेशाचा विधी पार पडला. तसेच नागपूर येथे दि.२४ नोव्हेंबर ४७ रोजी श्री जागृतेश्वर मंदिरात हरिजनांसमवेत देवपूजा करण्यात आली.

साप्ताहिक 'सुराज्या'त श्री.लक्ष्मीकांत गायकवाड यांनी लिहिले होते– 'महाराष्ट्राचा म्होरका मावळ्यांचा सेनानी व आझाद हिंद सेनेचा प्रति नेताजी कर्नल जगन्नाथराव भोसला दक्षिणेत आपल्या निद्रिस्त महाराष्ट्राला खडबडून जागा करीत आहे; तर महाराष्ट्राचा संत शिरोमणी वंदनीय तुकडोजी महाराज गावागावात, घराघरात व कानाकोपऱ्यात नवचैतन्याचे, स्फूर्तीचे व शक्तीचे वारे आपल्या खंजिरीच्या मधुर नादाने आणि वीरोचित प्रभावी वाणीने संचरवीत आहे. या दोघांची भेट दि.२३ नोव्हें. १९४७ रोजी झाली. या भेटीच्या निमित्ताने ''सद्धर्माप्रमाणे जे लोक आपल्याला धार्मिक समजून वागत नाहीत त्यांना मी भेकडधर्मी किंवा इंद्रियांचे गुलाम समजतो.''– असे वक्तव्य महाराजांनी केले.

पाकिस्तानच्या द्वेषमूलक कारवायांचा विरोध हा केलाच पाहिजे– असे महाराजांना वाटत असे. स्वतंत्र भारताने प्रगतीची पावले टाकणे सुरू केले हे अनेकांना पाहवत नव्हते. महाराजांनी निजाम स्टेट मध्येही १९४५ पासूनच मंडळाच्या शाखा गावोगावी उभारून व व्यायामवर्ग घेऊन तो भाग मजबूत करून ठेवला होता. परंतु तिकडचे नागरिकच काय, पोलीसही अत्याचार करून अनेक गावांतल्या प्रार्थना बंद पाडत. १९४६ मध्ये आदिलाबाद व बोथगाव येथे महाराजांचे कार्यक्रम आयोजिले होते. बोथगावी तर जोरदार सप्ताहच घेतला होता. महाराजांच्या भजनांवर मात्र सारेच मुस्लिम अधिकारी खुष होते. कवाली ठुमरी–दादरा–गजल आदि चालींची मस्त गीते ऐकताना साऱ्या तुर्की टोप्या पुनःपुन्हा डोलत होत्या. 'वाहवा ! बहोत खूब! माशा अल्ला! वली है वली'– इत्यादि उद्‌गार अधिकाऱ्यांच्या मुखांतूनही बाहेर पडत होते. १९४७ पर्यंत निजामस्टेट मध्ये सेवामंडळाने बरेच कार्य सातत्याने केले होते. पण १५ ऑगस्ट १९४७ पासून तर निजाम स्वतःला सार्वभौम समजू लागला होता. जुनागड संस्थानने पाकिस्तानात जायचा निर्णय जाहीर केला. तेच निजामालाही करायचं होतं. त्याने राज्यात रझाकारांना सूट दिली व 'जैसे थे' कराराचा भंग चालविला. महाराजांनी पत्रके काढून होमगार्ड सेना उभी करण्याचा सल्ला दिला. त्याला प्रधानमंत्री नेहरूंनीही दुजोरा दिला. महाराजांनी तरुणांना त्यात शिपाई बनण्याचे आवाहन केले. इकडे पूर्व–पश्चिम पाकिस्तानात हिंदूंच्या इस्टेटी व मुली–स्त्रिया लुटून हिंदूंचे खून पाडण्याचा धडाका सुरू होता; आणि सरदार वल्लभभाई जनमताचा कौल घेण्याची घोषणा करीत

होते. भारताच्या फौजा हैद्राबादेत होत्या. हिंदू जनतेची लूटपाट करून तिला संस्थानाबाहेर घालविले जात होते. मंत्री व अधिकारी यांचा उन्मत्त उच्छाद, दडपलेल्या जनतेवरील अनन्वित अत्याचार, बलात्कार, सक्तीचं धर्मांतर, लुटालूट यांना ऊत आला होता. निजामी सरहद्दीचा दौरा महाराजांनी १३ डिसेंबर ४७ पासून सुरू केला. दि. ४ जाने. १९४८ ला वं. महाराजांनी भजन-भाषणाद्वारे फारच सखोल व व्यापक परिणाम केला. १५ गावांना भेटी देऊन समाजाचे धैर्य वाढविले. आर्णीला येऊन महाराजांनी भागवत समारोप करून महिला संमेलन घेतले. त्यानंतर अक्षरशः तुफानी असा दौरा केला व जनतेला नवी स्फूर्ती दिली. श्रीमंत भक्तांनी 'क्ष'नावाने हजारो रुपये देणगी गोळा करून दिली असता महाराजांनी स्वराज्याच्या मदतीसाठी तिचा उपयोग केला.

नाशिकला 'अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदे'चे सोळावे अधिवेशन जानेवारी १९४८ मध्ये ना. दादासाहेब मावळंकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असता वं. महाराजांना साग्रह निमंत्रण देण्यात आले होते. १९ जानेवारी १९४८ ला मालखेड बु.(यवतमाळ) येथे महाराजांचे अनेक संस्थांनी भव्य स्वागत केले. २३ जानेवारी १९४८ रोजी वर्धा येथे नेहरू चौकात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतिनिमित्ते महाराजांनी भाषण दिले. तेथून चिमूर, रामटेक, पारशिवणी व नवेगाव बांधचे बहुविध कार्यक्रम संपन्न करून महाराज नागपूरला आले.

दि.३० जानेवारी १९४८ रोजी पूज्य महात्मा गांधींचा एका माथेफिरू तरुणाने गोळ्या घालून खून केल्याची बातमी रेडिओ वरून प्रसारित झाली. तो शुक्रवार दिवस होता व महात्मा गांधी प्रार्थनेला गेले होते. त्याआधीही दि.२० लाच गांधीजींच्या प्रार्थनास्थळी बॉंब टाकण्यात आला होता. त्या प्रकरणी मदनलाल नामक निर्वासिताला सोडून देऊन वर गांधीजींना शासकीय संरक्षण देण्यालाही नकार दिला होता. ६० लाख निर्वासितांना ५५ कोटी रुपये भारताने दिले म्हणून हा राग होता. राष्ट्रपिता गांधीजींच्या मासिक श्राद्धाप्रीत्यर्थ महाराज दि. २९ फेब्रुवारी १९४८ ला नाशिक दौऱ्यावरून मेलने वर्ध्याला आले.

दि.६ मार्च १९४८ रोजी सकाळी १० वा. डॉ. राजेन्द्रप्रसाद व संत तुकडोजी महाराज यांची भेट झाली. त्याचवेळी महाराज राष्ट्रभक्त संत असल्याचा पडताळा डॉ. राजेन्द्रप्रसाद यांना आला. आप्पासाहेब पटवर्धन, मोरारजी देसाई, आचार्य कृपलानी, देवदास गांधी, जयप्रकाश नारायण, पं. सुंदरलालजी आदींशी

महाराजांच्या भेटीगाठी व चर्चा झाल्या. त्यांनी महाराजांच्या कार्याची प्रशंसा केली. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. बाळासाहेब खेर मुद्दाम महाराजांना भेटले. जयप्रकाशजींनी बिहारला आणि देवदास गांधीनी दिल्लीला येण्याचे तसेच गोव्याचे श्री बोरकर यांनी गोव्याला येण्याचे निमंत्रण दिले. उत्तर हिंदुस्थानातून महाराजांना अनेक निमंत्रणे येऊ लागली. राष्ट्रप्रेमाने रसरसलेली, भक्तिरसाने व वीररसाने थबथबलेली भजनांची एक अखंड मालाच महाराज गुंफत. त्यांच्या भजनी कळेच्या प्रभावाने लोकांना ते तासन्तास खिळवून ठेवत असत.

दि.१० मार्चला कोपरगाव व १२ ते १५ मार्च दरम्यान वर्धा जिल्हा असे सारखे महाराजांचे परिभ्रमण सुरू होते. ३० मार्च १९४८ रोजी गांधीजींच्या द्वि-मासिक श्राद्धदिनी ऑल इंडिया रेडिओवरून महाराजांचा भजन कार्यक्रम प्रसारित व ध्वनिमुद्रित करण्यात आला. महाराजांनी गांधीजींना आदरांजली अर्पण केली. बिर्ला भवनात देखील महाराजांचे भजन झाले.

शिक्षण महर्षि डॉ.पंजाबराव देशमुख, सरदार वल्लभभाई पटेल आणि पं.जवाहरलाल नेहरू यांचेशी स्वतंत्र विदर्भ की संयुक्त महाराष्ट्र? वगैरे विषयांवर महाराजांची चर्चा झाली आणि भजनाचा कार्यक्रम झाला. विविध संमेलने नि परिषदा महाराजांनी त्यांच्या प्रतिभापूत भजन-भाषणांनी भूषविल्या. अस्पृश्यता निवारण व यात्रा-शुद्धिकार्य सुद्धा महाराजांनी जोमाने चालविले होते. १० मे ला छत्रपती शहाजी राजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नाशिकला अ.भा. मराठा शिक्षण परिषदेचे २८ वे अधिवेशन झाले. सेवामंडळाने प्रौढ स्त्री-पुरुषांच्या समाज शिक्षणाचे वर्ग खेड्यापाड्यात सुरू केले. काँग्रेस, कामगार व पत्रकारादींच्या अधिवेशनांना महाराज जातीने हजर राहात असत. राष्ट्रीय सरकारच्या लोकहितैषी योजनांना महाराज पदोपदी उचलून धरीत होते. दि. ६ जुलै रोजी डॉ. गुमास्ता यांच्या आग्रहावरून महाराज नागपुरास गेले आणि अतिप्रवासातून महाराजांना भयानक आजार झाला. लोककल्याणाची ज्वलंत तळमळ असल्यामुळे महाराजांना स्वत:च्या प्रकृतीपेक्षा जनतेचेच दु:ख सलत होते. १२ ऑगस्ट पासून ८ सप्टेंबर १९४८ पर्यंत निजामस्टेट व मुंबईत सेवामंडळाच्या कार्यकर्त्यांना पाठवून महाराजांनी प्रभावी प्रचार सुरूच ठेवला होता. प्रत्येक ठिकाणी गुरुदेव सेवामंडळाच्या नवीन शाखा स्थापन करणे सुरूच होते. अखेर निजामाच्या कचाट्यातून जनता मुक्त झाली. निजामी जनता मुक्त करण्यात महाराजांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यात

वऱ्हाडप्रांताच्या होमगार्डनेही अतिशय प्रभावीपणे कार्य केले होते. हैद्राबाद संस्थान मुक्त केल्यामुळे लोकांना आनंद झाला. १८ सप्टेंबरला निजामाने रेडिओवर पश्चात्तापाचे भाषण केले. निजाम स्टेटच्या मुक्तिदिनानिमित्ते दि. २६ सप्टेंबर १९४८ रोजी गावोगावी सामुदायिक प्रार्थना व ग्रामसफाई, रामधून इ. कार्यक्रम झाले. दि.१० ऑक्टोबर १९४८ रोजी वरखेड क्षेत्री येऊन आजारी असतानाही स्फूर्तिदायक लेख लिहून महाराजांनी लोकांना स्फूर्ती दिली.

१६ नोव्हेंबर १९४८ रोजी श्रीसमर्थ आडकोजी महाराजांच्या देवस्थानच्या स्थावर-जंगम मालमत्तेचे व्यवस्थापन महाराजांनी कार्यकारिणी नेमून तिच्या स्वाधीन केले आणि स्वत: निवृत्ती स्वीकारली. दि.८ डिसेंबर ला नाशिकवरून अखिल मराठी शारीरिक शिक्षण परिषदेचा ध्वज नागपुरात आला, त्यावेळी महाराजांचे आशीर्वादपर भाषण झाले. जयपूर येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनातही महाराजांची दि.१७ व १८ डिसेंबर १९४८ ला भाषणे झाली.

अहिरी वनातील माडिया गोंडांत इंद्रावती, गाम व गहादि नद्यांच्या संगमावर भामरागडचा डाकबंगला डौलात उभा होता. तेथे महाराजांचे भूमिगत ध्यानयोग मंदिर निर्माण करण्यात आले. तेथे तीन दिवस सतत कार्यक्रम करण्यात आले. रामटेकच्या पावन परिसरातील अंबाळा तलावाशेजारील नारायण टेकडी येथे योगीराज श्री नारायणस्वामी यांच्या पुण्यतिथीच्या सात्त्विक सोहळ्याला व गुरुदेव सेवामंडळाच्या सेवकांच्या शिबिराला दि.२० डिसेंबर १९४८ रोजी महाराज हजर होते. दि.२५ डिसेंबरपासून सुश्री विमलाताई ठकार यांनी मुंबईत महाराजांचे नाव गाजविले होते.

दि.१ जानेवारी १९४९ रोजी गुरुकुंजात 'गांधी स्मृति दिना'चा पहिला भव्यदिव्य सोहळा पार पडला. महाराजांनी आपल्या पत्रकातून जनतेला अवाहन केले होते. महोत्सवाच्या बातम्या अनेक वृत्तपत्रांत झळकल्या. ३० जानेवारी १९४९ पासून १३ दिवसांचा अखंड 'सूत्रयज्ञ' सुरू झाला. दि.११ फेब्रुवारी १९४९ रोजी गृहमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या अध्यक्षतेखाली या मेळाव्याचे शानदार उद्घाटन करण्यात आले. मुख्य पाहुणे होते देशरत्न बाबू राजेन्द्रप्रसाद. दि.१२ फेब्रुवारी १९४९ रोजी रात्री ५॥ शेर सुतांचे हार अर्पून त्यांचे स्वागत करण्यात आले. नंतर महाराजांचे भजन आणि संत श्री गाडगे महाराजांचे कीर्तन झाले.

फेब्रुवारी प्रमाणेच मार्चमध्ये कोलंबी (ता. चोपडा) वगैरे गांवी महाराजांचे कार्यक्रम झाले.

गांधी स्मृतिदिनानंतर मंगरूळनाथ-रामटेक आदि क्षेत्रांतील अविश्रांत कार्यक्रमांचा परिणाम होऊन सतत धावपळ, जागरणं, प्रवास आदिमुळे तरुण भजन साथी देखील दहापंधरा दिवसांहून अधिक काळ महाराजांबरोबर टिकेनात. त्यामुळे आळीपाळीने त्यांना सोबत घ्यावे लागे. सेक्रेटरी बदलावे लागत.

दि.५ ते १५ मे पर्यंत मंडला क्षेत्री योगीराज स्वामी सीतारामदास महाराजांच्या प्रेमाग्रहाने महाराजांनी त्यांचे आश्रमात निवास केला होता. दि. १५ ला स्वामीजीसोबतच महाराज नागपूरला रवाना झाले. दि.३ ते ८ जुलै १९४९ दरम्यान श्रीक्षेत्र पंढरपुरात संत संमेलन आटोपून महाराज जालना शहरात चातुर्मास्यापर्यंत राहिले. २१ पासून चातुर्मास्य सुरू झाला. १५ ऑगस्ट १९४९ ला निजाम स्टेटमध्ये पाहिला स्वातंत्र्यदिन महोत्सव अत्यंत प्रभावीपणे महाराजांच्या अध्यक्षतेखाली सुसंपन्न झाला. दि.२२ ला महाराज जालन्यावरून नाशिक, पुणे, मुंबईच्या गणेशोत्सवासाठी रवाना झाले.

दि.२८ ऑगस्ट रोजी पुण्याला काँग्रेस हाऊस, तिलक भुवन, खडकी भाजीमंडी याठिकाणी आपल्या भजन-भाषणांनी महाराजांनी जनतेला डोलविले. दि.६ सप्टेंबर रोजी चौपाटीवर भारतीय विद्याभवनात काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्यातले शेवटचे भजन महाराजांनी गाजविले.

दि.१९ सप्टेंबर १९४९ रोजी 'वडी बाजार' येथे श्रीगुरुदेव सेवाश्रमाचा पाया घातला गेला. तिथे श्री.रामराव ठाकरे हेच कोषाधिकारी व केंद्रप्रमुख नियुक्त केले गेले होते. ३० सप्टेंबर ला एक कार्यकारी समितीही नेमण्यात आली. दि.१ ऑक्टोबर रोजी आमगाव (जि.भंडारा) येथे सेवाश्रम निर्मिती करण्यात आली, त्यावेळी महाराजांचे भव्य स्वागत झाले.

दि.२९ ऑक्टोबर १९४९ ते ५ नोव्हेंबर १९४९ पर्यंत वरखेडला श्रीसद्गुरुंचा पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात आला. दि.१५ नोव्हेंबर ला निजामस्टेटमधून तिवसा येथे येऊन महाराज होमगार्ड तर्फे आयोजित भजन भाषणाच्या कार्यक्रमासाठी हजर झाले. दि.२१ ला नागपूर चिंतेश्वर मंदिरापुढील भव्य पटांगणात काला, सहभोजन, प्रार्थना, भजन आदि कार्यक्रम झाले. दि.२६ ला बहिरम यात्रेत विशाल सामुदायिक प्रार्थना, भजन व भाषणाचा कार्यक्रम झाला.

दि.२९ ला नागपूर नभोवाणीवरून महाराजांनी 'उत्तम नागरिक कसा बनेल' यावर सुश्राव्य भजन केलं. दि.१ डिसेंबर १९४९ रोजी नागपूरच्या सिटी हायस्कूलच्या गीताजयंती निमित्ते महाराजांनी ओजस्वी संदेश दिला. दि.९ ते १४ पर्यंत नाशिक जिल्ह्याचा दौरा केला. १५ ला नागपूर व १८ ला वर्धा येथे महाराजांनी डॉ. राजेन्द्रप्रसाद यांची भेट घेऊन तासभर राजकीय व अन्य विषयांवर चर्चा केली. दि. २९ डिसेंबर १९४९ रोजी आर्वी येथे काल्याचा प्रभावी कार्यक्रम झाला.

अहेरी वनातील माडिया गोंडांनी सेवाश्रमात पाकगृह, विहीर नि तिला लागूनच महाराजांचे भूमिगत ध्यान– योगमंदिर निर्माण केले. त्या निमित्ताने आदिवासी माडिया गोंडांच्या जीवनाचा नि संस्कृतीचा उत्तम अभ्यास सादर केला गेला. त्यांचा साधेपणा, विश्वासूपणा, सत्यप्रियता, आतिथ्यशीलता, शूरत्व आदि गुणांचा आवर्जून उल्लेख करून त्यांच्यातील भ्रामकता, मागासलेपणा, क्रूरपणा, अनाठायी भित्रेपणा आदींचाही महाराजांनी शोध घेतला. भामरागडला महाराजांनी तीन दिवस कार्यक्रम केले. रामटेकचे शिबीर आटोपल्यावर २५ डिसें. ला सुश्री विमलाताई ठकार यांनी मुंबईत महाराजांच्या साहित्याचा व कार्याचा प्रचार केला. मुंबईत भारतीय संस्कृतीच्या शिक्षणासाठी भारतीय विद्याभवन तयार करण्यात महाराजांनी सहभाग दिला.

दि.२४ डिसेंबर १९४९ रोजी जगातील ५८ राष्ट्रांचे शंभर शांतिवादी प्रतिनिधी सेवाग्रामला एकत्र आले होते. सेवाग्राम आश्रमात झालेल्या त्यांच्या विश्वशांति संमेलनाचे अध्यक्ष डॉ. राजेन्द्र प्रसाद होते. प्रार्थनासत्राच्या एक तासात अन्य देशांच्या प्रतिनिधींनी आपापल्या राष्ट्रीय प्रार्थना सादर करून अध्यक्षांना भारताची राष्ट्रीय प्रार्थना प्रस्तुत करण्याची विनंती केली असता डॉ. राजेन्द्र प्रसाद पेचात पडले. पण लगेच त्यांनी महाराजांना विनंती केली–''महाराजजी! श्रीगुरुदेव सेवामंडल की प्रार्थना का दिग्दर्शन करवा दीजिए। यही हमारी राष्ट्रीय प्रार्थना होगी।'' त्यावर महाराजांनी हजारोंच्या जनसमूहाला ताबडतोब ओळीओळीत बसवून शिस्तीत सामुदायिक प्रार्थना सुरू केली. सामुदायिक नमस्कार, प्रार्थनागीत व ध्यानपाठानंतर नामधून व शांतिपाठ होऊन प्रार्थनेचा कार्यक्रम संपला. प्रार्थनेनंतर भजनासाठी महाराज व्यासपीठावर बसले. खंजरीवर थाप पडताच उपस्थित परदेशी मंडळी आनंदाने बेहोष झाली...डोलू लागली. काही प्रतिनिधी तर नाचूच लागले. अमेरिकेचा एक प्रतिनिधी डॉ. राजेन्द्र प्रसाद यांना म्हणाला– ''यह तो सारे विश्व

की प्रार्थना बननी चाहिये।'' काही प्रतिनिधी पत्रकारांना म्हणाले-''आज हमने उस भारत के दर्शन किये हैं जिस का परिचय हमें स्वामी विवेकानंद से प्राप्त हुवा था।... ऐसे महापुरुष का दर्शन हुवा जिस ने पाँच मिनट सारी दुनिया को अपने सामने नचाया।'' दि.३१ डिसेंबर १९४९ रोजी 'अखिल भारतीय युवक परिषदे'चे अधिवेशन नागपूरला सुरू झाले. त्यात १ जानेवारी १९५० रोजी पं. जवाहरलाल नेहरू आले होते. नागपूरच्या पटवर्धन ग्राऊंडमध्ये जमलेल्या पाऊण लाख श्रोत्यांमध्ये पं. नेहरू या लाडक्या राष्ट्रीय नेत्याच्या आगमनाने त्यांच्या भाषणाच्या प्रारंभीच प्रचंड गोंधळ झाला. पोलीस वा सेवादल यांना आवरेनासा तो गोंधळ महाराजांच्या पाच मिनिटांच्या नियंत्रणाने जादूसारखा शांत झाला, हे पाहून पं.नेहरू देखील स्तंभित झाले.

जानेवारी १९५० मध्ये वरखेडला दि.१४ ते १६ दरम्यान महिला संमेलन झाले. दुसरा गांधी स्मृति दिन दि. ३०, ३१ जानेवारी व १ फेब्रुवारीला नागपूरला होणार होता. तो महाराजांनी भंगीवस्ती-लेंडीतलाव परिसरात जाणीवपूर्वक घेतला; स्वतः मळाचे टोपले वाहून कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले व 'गांधीबाग' म्हणून त्या परिसराचा कायापालट केला.

स्वतंत्र भारताचा पहिला प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी १९५० रोजी आला. त्या दिवशी सार्वभौम लोकसत्ताक भारताची घटना लागू झाली. समाजशिक्षणाच्या अंतर्गत अनिष्ट रूढींचे निर्मूलन करण्याचे कार्य महाराज सतत करीत असत.

'श्रीगुरुदेव विवाह पद्धती' या पुस्तकात वैदिक विवाह पद्धतीचा तात्त्विक भाग कायम ठेवून वेळ, पैसा व श्रम वाचविणारी समयोचित पण संस्कारपूर्ण अशी विवाहरीती, अनमोल विचार, नवी-जुनी मंगलाष्टके, वेदस्मृतिवचने 'सुदाम' सावरकर यांनी समाविष्ट केली होती. त्यानुसार हुंडाविरोधी नि सुटसुटीत कर्मकांडरहित असे विवाह अनेक ठिकाणी संपन्न झाले. मिश्रविवाह एवढेच नव्हे तर विधवा-विवाह सुद्धा त्याच रीतीने लावले गेले.

* * * * *

## सात : राष्ट्रोन्नती

संत तुकडोजी महाराज म्हणायचे-''विश्वाची रचना हाच एक बृहद्ग्रंथ आहे. मानव व विश्व यांच्या मूलस्वरूपाचे दर्शन हेच सर्व अनुभवांचे उगमस्थान आहे. मानवी जीवनाचा हेतू जाणून विश्वाच्या चिरसत्यात समरस होणे म्हणजे अनुभवाचे दर्शन घेणे होय... वेदान्ताचे हे धन जीवनात संग्रहित करण्यायोग्य असले तरी त्यासाठी अन्य (ऐहिक) धनांचा त्याग मला आवश्यक वाटत नाही.''

भारतीय स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय आंदोलनातील चिमूर-आष्टी स्वातंत्र्य संग्रामाचे सर्व श्रेय जसे संत तुकडोजी महाराजांना आहे, तसेच सर्व अनिष्ट प्रथा नि अमानुष रूढ्यांविरुद्ध लढण्याची शक्ती जनतेत आपल्या समाज-शिक्षणाने निर्माण करण्याचेही श्रेय महाराजांना आहे.

विवाहादि संस्कारांत आशयगर्भ मंगलाष्टके नि विवाह सुधारणेसंबंधी १९४८ मध्येच एक लेख त्यांनी लिहिला. 'श्रीगुरुदेव' मासिकाचे संपादक 'सुदाम'जींनी त्यांच्या सूचनांनुसार 'श्रीगुरुदेव विवाह पद्धती' सप्टेंबर ४९ मध्ये प्रसिद्ध केली. हुंडाविरोधी अशा या विवाह पद्धतीप्रमाणे भंडारा, सुसुंद्रा, कोकणा, आरमोरी, मोझरी, आष्टी, सावनेर इत्यादि गावी महाराजांच्या उपस्थितीत मोठ्या आकर्षक रूपात श्रीगुरुदेव चळवळींच्या कार्यकर्त्यांचे नि इतरांचे विवाह संपन्न झाले होते. 'आई-वडिल मुलीचे लग्न मुलीला न विचारता लावत असतील तर मुलींने स्वेच्छेने आपला पती निवडावा; जीवन खराब करून घेऊन जन्मभर दुःखात राहू नये'-असा संदेश त्यातून महाराजांनी जाहीर केला.

महाराजांनी श्रीगुरुदेव सेवामंडळ व श्रीगुरुदेव महिला मंडळांद्वारे गावागावातील स्त्री-पुरुषांना संस्कारित करण्याचा सपाटा चालविला होता. हजारो स्त्री-पुरुष महाराजांचे विचार घराघरात पोहोचवीत होते आणि कुशलतेने समाजात विविध सुधारणा घडवीत होते. भारतातील राज्यांतच नव्हे तर आफ्रिका, इटली व जपानमध्ये देखील तुरळक शाखा तरुणांनी स्थापन केल्या होत्या. बंगालमध्ये स्वामी हरिहरानंदजी ब्रह्मचारी, कर्नाटकमध्ये श्री शंकरनारायण कोडंच हे प्रामुख्याने प्रचारकार्य करीत होते. गावोगावी तर उत्स्फूर्तपणे वर्ग घेतले जात होतेच; शिवाय महिला विभागाने सन् १९५० पर्यंत ५१ प्रमुख वर्ग घेऊन त्याद्वारे २५०० महिलांना

विविध विषयांचे प्रशिक्षण दिले होते. मध्यप्रदेश, खानदेश व निजामस्टेट मधील १०१ गावी महिला संमेलने घेतली होती. आणि आता तर शेकडो नव्हे– हजारो स्त्रीपुरुष महाराजांचे विचार घराघरात पोहोचवू लागले होते.

महाराजांनी १९ ते २४ मार्च मध्ये आयोजित सेवामंडळाच्या घटना– सप्ताहात संस्थेत महत्त्वाचे बदल केले व इतरांना कामात हस्तक्षेप करता येणार नाही, अशा स्वरूपासह 'श्री गुरुदेव' मासिकाची नि ग्रंथप्रकाशन मंडळाची देखील जबाबदारी तीन वर्षांसाठी 'सुदाम'जींकडे सोपविली. पूर्वीपेक्षा अधिक खर्च होऊ नये, याकडे लक्ष दिलं जावं–अशा अटीही घातल्या गेल्या. त्याप्रमाणे अंकाची पृष्ठसंख्या न वाढवता अंक संग्राह्य वाटावा अशी विविध सदरे त्यात 'सुदाम'जींनी निर्माण केली. त्यामुळे लवकरच ग्राहकसंख्येत लक्षणीय वाढ झाली. श्री तात्या वऱ्हाडपांडे व श्री.मो.सी.चौधरी यांनी पदत्याग केल्यामुळे जुलै–ऑगस्ट पासून डी.पुरुषोत्तमदास 'बालकवी' व श्री.रघुनाथराय पत्तरकिने यांनी हिंदी पाक्षिक पत्र 'श्री गुरुदेव सेवक' गुरुपौर्णिमेलाच सुरू केले. मासिकाद्वारे होणाऱ्या प्रचारकार्याबरोबरच पुढे वं. राष्ट्रसंताचे 'विश्वशांतियोग', 'युगप्रभात', 'गीताप्रसाद' यांसारखे महत्त्वपूर्ण गद्य ग्रंथ 'सुदाम'जींनी जनतेच्या हाती दिले. नंतर डिसेंबर १९४९ मध्ये 'श्रीगुरुदेव'चा 'व्यायाम विशेषांक' देखील प्रसिद्ध केला.

अहेरी, भांबरागड, बाबुलाई, चंद्रपूर, नवरगाव येथील आदिवासींमध्ये महाराजांनी १६ ते २६ फेब्रुवारी दरम्यान भजनाचे तथा वर्गांच्या उद्घाटनाचे अनेक कार्यक्रम करून प्रचार केला. चंद्रपूरला भजने व भाषणाचे कार्यक्रम करण्यात आले. भंडारा जिल्ह्यात आयुर्वेद वर्गाचा समारोप झाल्यानंतर मुंबईवरून महाराज अहमदाबादला गेले. तेथेही सामुदायिक प्रार्थना, भजने व भाषणे यांनी हजारोंना त्यांनी मंत्रमुग्ध केले. बालाघाट, बिहार, काशी व हरिद्वारचे दौरे करून महाराज भजनांद्वारे सद्धर्म प्रचार करीत होते.

२६ जानेवारी १९५० रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ.राजेन्द्र प्रसाद यांची निवड झाली. त्यापूर्वी सेवाग्रामच्या शांतिसंमेलनात महाराजांचा विदेशी पाहुण्यांवर झालेला प्रभाव राजेन्द्रबाबूंनी प्रत्यक्ष अनुभवला होता. मोझरीला झालेल्या पहिल्या गांधी स्मृतिदिनी लाखो लोकांवरील विलक्षण प्रभाव देखील त्यांनी प्रत्यक्ष अनुभवला होता. त्यातून महात्माजींचे राष्ट्रनिर्माण कार्य

आगळ्यावेगळ्या शैलीने पुढे नेण्याचे महाराजांचे सामर्थ्य त्यांना उत्कटतेने जाणवले होते. म्हणूनच त्यांनी बिहारमध्ये दौरा करण्याचे आमंत्रण महाराजांना दिले. त्यानुसार १८ मार्च रोजी महाराजांनी भजनी मंडळीसोबत नागपूरहून बिहारसाठी प्रयाण केले. पाटण्याला मोटार ठेवून जहाजातून त्यांनी गंगाप्रवाह ओलांडला. २१ मार्चला रेल्वेने गोपालगंजला गेले. तिथून बनकटाला गेले. अमर शहीद श्रीरामसुंदर यांच्या समाधीपुढे सार्वजनिक प्रार्थना, भजनादि कार्यक्रम करून व तिथे सेवामंडळाची स्थापना करून भोजनानंतर ते गोपालगंजकडे निघाले. तिथेही प्रभावशाली कार्यक्रम करून २३ मार्चला सिंधवलिया गावी गेले. तिथून प्रयागमार्गे जलालपूरला मिल कर्मचाऱ्यांपुढे भाषण व मिडलस्कूल मध्ये भाषण-भजन-प्रार्थनादि कार्यक्रम संपन्न केले. दि.२४ मार्चला मेरवा गावी आणि जीरादेई या राजेन्द्रबाबूंच्या जन्मगावी कार्यक्रम केले. नंतर चैनपूर, शीतलपूर, मशरक या गावांचा भरीव दौरा करून दाऊदपूरला हत्तीवरून काढलेल्या मिरवणुकीत सामिल झाले. महाराजांसारखा लोकहृदयात शिरणारा नेता, सेवामंडळासारखी सर्वांगीण उन्नतीचा मार्ग क्रमणारी संस्था, त्यांचा प्रत्यक्ष सेवामय आदर्श आणि सहज लोकसहभागाची सुविधा- यांच्यामुळे मुग्ध झालेली बिहारी जनता महाराजांना सोडायलाच तयार नव्हती. तरीही राज्यपाल लोकनायक अणे यांच्या भेटीला पाटणा येथे जाऊन तेथून ते सारे थेट वऱ्हाडकडे परत निघाले कारण दादासाहेब बोके हे वरखेडला मृत्युशय्येवर असल्याची तार आली होती...

मात्र हरिद्वारच्या गोसेवा संमेलनासाठी ९ एप्रिलला महाराजांना पुन्हा दिल्लीला जावेच लागले. महाराज दुपारीच तेथे आले. गाडगेबाबांची वऱ्हाडातील सर्व दिनचर्या तुकडोजी महाराजांनी लोकांना सांगितली तेव्हा संमेलनात सहभाग देणारे लोक भारावून गेले. नंतर 'गोपाला-गोपाला-देवकीनंदन गोपाला' च्या गजरात त्यांचे भजन व कीर्तन झाले. तेथे गोरक्षण व गोमातेचा महिमा यावर भाषणे झाली. तेथेच स्वामी गंगेश्वरानंद व भदंत आनंद कौशल्यायन आदींच्या भेटी झाल्या. त्यानंतर सनातनी विचारांच्या स्वामी करपात्रीजीच्या दरबारात तुकडोजी महाराजांचे भजन झाले. भजनानंतर परततेवेळी महाराजांनी त्यांना परिवर्तनाचा पाठ शिकवला. नागासाधूद्वारा त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर महाराज शिवानंदांच्या आश्रमात गेले. तिथून सारे नावेने हरिद्वारला गेले.

कुंभस्नान करून तेथून मथुरेला गेले. दि.१४ मे १९५० रोजी वृंदावनातील गुरुकुलात भजन-भाषणाचा कार्यक्रम झाला. 'गोकुळ' नगरीतील लोकांना महाराजांच्या भक्तिपूर्ण तसेच चेतनादायी भजनाने अक्षरशः वेडे केले होते.

संतश्रेष्ठ तुकारामाच्या ३०० व्या जयंतीचा नागपूरला मोठा उत्सव झाला. त्यात महाराजांनी वारकरी मंडळींना आपल्या खंजरी भजनाने तृप्त करून टाकले. भक्तिमार्ग व देशाचे कार्य या दोन्हीवर त्यांनी सारखाच जोर दिला. नंतर तेथून बस्तर संस्थानातील आदिवासींचा अभ्यास करण्यासाठी दौरा सुरू केला. ईसाई लोक त्यांच्या अडाणीपणाचा व गरिबीचा फायदा घेऊन त्यांना धर्मांतर करण्याचा सल्ला देत असत. झारखंड ऐवजी 'ईसाई खंड' प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अशा त्या सरगुजा प्रांतात महाराजांनी दौरा केला. आदिवासींना जागे करणारे भाषण दिले; तसेच त्यांना माणसासारखे जगण्याचे-जगवण्याचे वचनही दिले.

३ मे पासून यवतमाळ जिल्ह्यात वं. महाराजांचा दौरा झाला. नंतर त्यांनी मराठवाड्यात दौरा केला. १६ मे १९५० ला ते परळी वैजनाथला गेले. २७ ते २९ मे च्या अवधीत औरंगाबाद, अंतरवाडी, गुंडेवाडी येथे त्यांचे प्रभावी कार्यक्रम झाले. अंतरवाडी व गुंडेवाडी येथे श्री.घनश्याम पाटलांनी १८ एकर जमीन प्रचारकार्यार्थ समर्पण केली. ३१ मे ५० रोजी महाराज इंदौरकडे रवाना झाले. त्यांच्या भजन-भाषणांनी त्या प्रदेशात चैतन्याची लाट पसरली. १३ जून पासून गुरुकुंजात पुनश्च परत येऊन त्यांचे कार्यक्रम सुरू झाले. गुरुभक्त पांडुरंगदास 'रामायणी' आणि मातृहृदयाचे साहित्यिक श्री.सानेगुरुजी यांचे त्याच सुमारास निर्वाण झाले.

हैद्राबाद संस्थान मधील अनेक जिल्हे ओलवीत नि महाराष्ट्रातील संततीर्थे उजळीत अनेक गावी महाराजांनी कार्यक्रम केले. प्रत्येक गावात त्यांच्या पदक्षेपाबरोबर एक आगळं चैतन्य संचरत होतं. गुरुकुंजात शिक्षणगंगा आणून व मोझरी येथे १ ऑगस्ट १९५० पासून विविध विषयांचे शिक्षण बालकांना देण्याचे ठरवून तेथे 'श्रीगुरुदेव विद्या मंदिरा'चीही स्थापना केली. विद्यामंदिराचे पहिले मुख्याध्यापक श्री. मो. सी. चौधरी हे होते.

तिसऱ्या स्वातंत्र्यदिना प्रीत्यर्थ त्यांची अमोघ वाणी अनेक राष्ट्रीय भजनांना जन्म देऊन गेली. ''आली काय दशा या भारतदेशाला !'' म्हणून महाराज हळहळत

होते. ''साधुही भोगी बनेगा । तब कैसे देश जियेगा?'' हा ज्वलंत प्रश्न महाराजांपुढे उभा होता. महाराजांनी आजारपणात 'युगप्रभात' नावाचा महत्त्वाचा गद्य ग्रंथ लिहून काढला. भजन-भाषणादिकांनीच नव्हे तर आपल्या साहित्याद्वारे नि प्रचारकांद्वारे देखील राष्ट्रोत्थानाचे असीम महत्त्वाचे कार्य ते अव्याहत करीत होते. १९५० च्या ऑक्टोबर मध्येच महाराजांचे 'विश्वशांतियोग', 'गीताप्रसाद' आणि 'समाजसंजीवनी' हे ग्रंथ प्रकाशित करण्यात आले.

मध्य भारत, निजाम स्टेट व पुणे परिसरातही प्रचारकार्याची विशेष लाट उठविण्यात आली होती. अनेक प्रचारक पदयात्रा करीत गावोगावी जनजागृती करीत होते. भागवत प्रवचन, शंका समाधान, प्रार्थनोत्तर भाषण आदि कार्यक्रमांसाठी आसमंतातील जनता जणू तुटून पडत होती. महाराजांच्या मार्गदर्शनखाली शेकडो लोकांनी आपापल्या परंपरागत अनुचित चालीरीती आणि मांस-दारू सारखी व्यसनेही सोडण्याच्या शपथा घेतल्या.

*''भजनाची वाजली खंजरी । थाप पडली मृदंगावरी ।।*
*झाली जनता वेडी बावरी । ऐकावया भजनासी ।।''*

नासिक, इगतपुरी, ठाणे, दौंड नंतर पुण्याला कार्यक्रमांचा धूमधडाका चालू झाला. विदर्भानंतर इटारसी, जबलपूर, सतना, कटनी, दमोह, सागर, खुरई, बीना या हिंदी प्रदेशातही महाराजांनी नवचैतन्याची लाट उठवून दिली. पुसद कडील बंजारी समाजातही महाराजांनी नवीन ज्योत जागविली. बोकडबळीची प्रथा यवतमाळ जिल्ह्यात जास्त होती. उमरी-पोहऱ्याला सुरू असलेली ही प्रथा आधी तुकारामदादा गीताचार्यांनी थांबवली. महाराजांनी पुढे ती नेहमीसाठी बंद पाडली. बहिरम यात्रेतही पशुबळीच्या रक्ताचे पाट वाहणे महाराजांनी व सेवामंडळ कार्यकर्त्यांनी सामोपचाराने बंद केले व यात्रेला व्यवस्थित शिस्त लावली.

५ डिसेंबर १९५० ला महान क्रांतिवीर योगी अरविंद घोष आणि १५ डिसेंबर १९५० ला भारताचे गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी इहयात्रा संपविली. त्या शोकाकुल अवस्थेत महाराजांनी गीतेतून जनतेला जागृत करण्याचे उद्योग केले. महाराजांचे कार्यक्रम म्हणजे चालतंबोलतं 'जनता विद्यापीठ' असे. चिमूरला महाराजांनी 'श्रीगुरुदेव विद्या मंदिरा'ची स्थापना केली, तसेच गावोगावी वाचनालयांना चालना दिली. ३० डिसेंबर १९५० रोजी भारताचे राष्ट्रपती गुरुकुंज

मोझरीला येऊन गेले तेव्हा 'श्रीगुरुदेव अध्ययन मंदिरा'चे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते संपन्न झाले. त्याच दिवशी शिक्षणमहर्षी डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांच्या 'श्रीशिवाजी लोकविद्यापीठा'चेही त्यांनी अमरावती येथे उद्‌घाटन केले.

डॉ.के.जी. जयस्वाल हे मूळ अचलपूरचे असून नेत्रतज्ज्ञ म्हणून मराठवाड्यात प्रॅक्टीस करीत. महाराजांचे भजन ऐकून ते गुरुकुंजात आले. त्यांना सेवाकार्याची जणू नशाच चढली. ते नेत्र चिकित्सा तर गुरुकुंजात करीतच; शिवाय गावोगावी प्रसंगी पायी जाऊनही आजाऱ्यांची सेवा करीत. अशा कार्यकर्त्यांच्या सेवेने गुरुकुंजाचे वैभव दिवसेंदिवस वाढत होते.

सार्वजनिक निवडणुकांसाठी जनजागृती करण्यासाठी महाराजांनी आपल्या 'लोकशाहीच्या पोवाड्यां'मधून 'ऐका ऐका राज्याचे धनी!' असे संबोधन योजिले व नागरिकांना लोकशाहीचा खरा अर्थ सांगून मतांचा महिमा सुद्धा विशद केला होता. " लायक उमेदवारालाच 'वोट' देऊन सरकारला सुधारणे हे जनतेच्या हाती आहे"– असे महाराज नागरिकांना समजावून सांगत असत. तसेच ते गावात स्वच्छतेचे धडे देत. व्यसनांपासून कामगार आणि गरीब वर्गाने दूर राहावे याचे प्रबोधन करणारी कवने आपल्या धारदार आवाजात खंजरीच्या तालावर गायला त्यांनी सुरुवात केली की श्रोतृवर्ग जागेला खिळून राहायचा आणि नागासारखा डोलू लागायचा. त्यांनी विदर्भ कार्यकर्ता शिबिर व कुष्ट निवारण वर्गही सुरू केले. मोठमोठ्या कृतिशूर व्यक्तींनी त्यांच्या कार्याबाबत प्रसन्नता प्रकट केली.

दिल्लीत राष्ट्रपती नि आचार्य तुलसीजींची महाराजांनी भेट घेतली, त्यावेळी राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांचेशी त्यांनी दि. १६ आणि १७ ऑगस्ट १९५१ रोजी प्रत्यक्ष सुसंवाद साधला. साथी जयप्रकाश नारायण इत्यादींशी त्यांचा संपर्क झाला. तसेच जैनाचार्य कुमारस्वामी यांचेशी झालेले संभाषण देखील ऑल इंडिया रेडिओवरून प्रसारित झाले. सेनापती बापट यांनी गुरुकुंजातील विधायक कार्ये पाहून फार समाधान व्यक्त केले. पुणे, मुंबई, वाई, परभणी, सातारा, कऱ्हाड, अमळनेर येथे त्यांचे अनेक शाखांच्या संस्था चालकांनी स्वागत केले. सुश्री विमलाताई ठकार यांचेशी महाराजांनी विशेष विचारविमर्श केला, कारण त्या अमेरिकेहून नुकत्याच परत आल्या होत्या. न्यूयॉर्कच्या 'जागतिक युवक परिषदे'साठी अ.भा.युवक परिषदेतर्फे त्या भारत सरकारच्या वतीने अमेरिकेत

गेल्या होत्या.

मध्यभारत, मराठवाडा व सद्‌गुरुक्षेत्र वरखेड येथे महाराजांचे वरचेवर कार्यक्रम सुरूच होते. इ.स. १९५२ मध्ये वरूड येथे सामूहिक विवाहात हजर राहून त्यांनी अकरा नवदाम्पत्यांना आशीर्वाद दिले. १० ते २५ जानेवारी १९५२ दरम्यान महिलांचा सर्वांगीण शिक्षणवर्ग व भजनवर्ग घेऊन श्रीमंजुळा माता पुण्यतिथी महोत्सव श्रीक्षेत्र वरखेड येथे संपन्न केला.

महाराजांना वात प्रकोपाने आजार आला तरी १ जुलै १९५२ ला ते पंढरपुरात संत संमेलनाला हजर राहिले आणि तेथून देहू-आळंदीला गेले. गावोगावी भजनाचे कार्यक्रम सुरूच होते. लभाणी तांड्यांपासून तो शासनाधिकाऱ्यांपर्यंत तुकडोजी महाराजांचा वावर सहजस्वभावे सुरू होता. भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख केन्द्र सरकारात कृषिमंत्री झाल्यानंतर दि.१९ फेब्रुवारी १९५२ रोजी आश्रमाला भेट देण्यास ते आवर्जून आले होते. त्यांच्या स्वागत प्रसंगी दोघांनीही परस्परांच्या अलौकिक समाजकार्याची प्रशंसा केली.

दि.२ ऑक्टोबर १९५२ पासून महाराजांनी 'श्री गुरुदेव दुर्व्यसन निर्मूलन समिती' स्थापन केली. तिच्या शाखा गावोगावी निघू लागल्या. दारुबंदीची लाटच त्यातून सर्वदूर पसरत गेली. त्याचवेळी हैद्राबाद निझामच्या रझाकार गुंडांनी जनतेत दहशत निर्माण करण्यासाठी गैरप्रकार सुरू केले. गुरुदेव सेवामंडळाच्या कार्यकर्त्यांवर सामुदायिक प्रार्थनेच्या वेळी ते दगडगोटे मारायचे, जनतेला दुष्टपणाने त्रास द्यायचे. त्या गुंडप्रवृत्तीचे निवारण करण्यासाठी गुलाबराव वाघांच्या अध्यक्षतेखाली 'अन्याय प्रतिकार समिती' स्थापन करण्यात आली. वर्धा जिल्हा सेवाधिकारी धुंडिराज पाटील यांनी साऊरला जी सेवामंडळ शाखा निर्माण केली होती, तेथील गुंड प्रवृत्तीच्या मुस्लिमधर्मी लोकांचा उपद्रवही वाढतच होता. तो थांबविण्याचे सर्व प्रयत्न थकले तेव्हा सात्त्विक प्रवृत्तीच्या अब्दुल गनी सावकारावरील अन्यायाला चोख उत्तर देत लोकांनी २५ जुलै १९४९ रोजी हफीज अलीसह तीन अत्याचारींना कापून काढले होते. नागपूरच्या हायकोर्टात त्यांपैकी तिघांना फाशी व १४ जणांना जन्मठेप झाली. सुप्रिम कोर्टात अपील केल्यानंतर भीमराव कडू यांना फाशी तर इतरांना जन्मठेप दिली गेली. अखेरीस महाराजांच्या मध्यस्थीने राष्ट्रपतींनी ती फाशी देखील रद्द केली. नांदगाव पेठ येथेही मुस्लिम

नबाबाने गुंडांच्या मदतीने स्थानिक आगाजानी नबाबाचा खून केला. त्यात डॉ.गोपाळराव निस्ताने आणि लालसिंग यांना पकडण्यात आले होते. ते महाराजांच्या साक्षीनुसार निर्दोष सुटले. १९५२ मध्ये 'अन्याय प्रतिकार समिती' स्थापण्यामागे वरील पार्श्वभूमी होती–

*ये धर्मगुंडे, राजगुंडे, लोकगुंडे बढ गये।*
*घुसखोर गुंडे, चोर गुंडे, सावगुंडे चढ गये।।*
*बेपार गुंडे, प्यार गुंडे, बात गुंडे अड गये।*
*सब जगह गुंडागिरी से, राज ठंडे पड गये।। (लहर की बरखा भाग-२)*

पुढे ३० ऑक्टोबर १९५२ पासून ३ दिवस वरखेड येथे पुण्यतिथी उत्सवानिमित्त 'सेवामंडळ संमेलन' घेण्यात आले. त्यातून बार्शी टाकळीचे कलावंत व भजनी युवक कलापथकांद्वारे जनतेपुढे आले. त्याच सुमारास 'प्रार्थनादिन महोत्सव' वर्धा, चंद्रपूर, बुलडाणा, नांदुरा, खामगाव, बहिरम तसेच हैद्राबाद संस्थानातील वडी, येदलापूर, सेवगा इ. ड्झनपर गावांमधून साजरा करण्यात येऊन चिखली, आर्वी, रामटेक, पवनी इ. ठिकाणीही महाराजांचे भजनाचे कार्यक्रम घेण्यात आले. आमगावात त्यांनी गांधी स्मृतिदिन साजरा केला. त्यात गोवत्सप्रदर्शनी, कुस्तीदंगल, महिला संमेलन व शिक्षक-अधिवेशनादि कार्यक्रम सुरू असत. भंडारा, चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यांच्या सरहद्दीवरील अतिमागास आमगाव या १०० घरांच्या चिमुकल्या खेड्याला आदर्श बनवून गांधी स्मृतिदिन महोत्सव घडवून आणण्याची कार्ययोजना महाराजांनी दोन वर्षांआधीच हाती घेतली होती. नारायण साबळे या प्रमुख प्रचारकाद्वारे रुक्मिणीबाई गोस्वामी यांनी अर्पण केलेल्या घरासह ४० एकरांच्या जागेवर प्रार्थनामंदिर तयार केले व तिथे सप्ताह सुरू केले. तिथल्या झोपड्या पाडून मातीची कौलारू घरे सामुदायिक श्रमांनी तयार करविली. मार्गांची आखणी-मोजणी केली. मालगुजारानेही वाडा नव्याने बांधला. दोन महिन्यांतच लोकसहभागाने साधे सुंदर शिस्तबद्ध गावगोकुळ उभे राहिले. १८ डिसेंबर १९५२ पासून रोज ८-१० गावांना वेगवेगळे कार्यक्रम करून महाराजांनी परिसरातील सुमारे १०० गावे जीवनाच्या प्रत्येक दालनात जागविली. तिसऱ्या गांधी स्मृतिदिनानिमित्ते दि.२९ जानेवारी १९५३ रोजी आमगावात केन्द्रीय रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री, गांधीजींचे पुत्र रामदास गांधी आदि ३० हजार स्त्रीपुरुष आले;

तर ३० रोजी केन्द्रीय नियोजनमंत्री गुलझारीलाल नंदा, गृहमंत्री कैलासनाथ काटजू, मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ला यांच्या उपस्थितीत सर्व राष्ट्रीय नेत्यांचे संदेश वाचून दाखविण्यात आले. सतत ३ दिवस हजारो लोकांचा विभिन्न विधायक कार्यप्रवृत्तींचा मेळावाच आदर्श आमगावात सुरू होता. आमगावाचा कायापालट झाला होता, शिवाय अनेक योजनांचे उद्घाटन सुरूच असे. नामदार लालबहादूर शास्त्री व वैराग्यपूर्ती श्री गाडगेबाबांशी वारंवार संपर्क साधला जात असे.

तुमसर येथे महाराजांच्या हस्ते ५०० फडांच्या तमाशा-संमेलनाचे उद्घाटन पार पडले. तसेच मराठी-हिंदी शाहिरांच्या अधिवेशनाचे उद्घाटनही पार पडले. गुरुकुंजात विदर्भ साहित्य संमेलनाचे अधिवेशन दि.१३ ते १५ मार्च १९५३ रोजी पार पडले. त्यात 'श्रीगुरुदेव'चा विशेषांकही 'सुदाम'जींनी काढला. आदर्श आमगाव उभारताना सामुदायिक शेती, सामुदायिक धान्यभंडार यांच्या बरोबरच भूमिवितरणाचाही प्रश्न त्यांना पडला. भूदान यज्ञाचे बीज राष्ट्रसंतांच्या हृदयात असे सतत वाढत होते. त्यामुळे त्यांनी भूदान यज्ञाला पाठिंबा दिला-
'शेती जो करतो कष्टुनि अपुल्या हाते । भूमी त्याची खरी, त्यासचि देऊ परते !'
म्हणून बिहारमधील चांडिलचे सर्वोदय संमेलन महाराजांनी जबाबदारी घेऊन पार पाडले. उत्तर प्रदेशातील जेलच्या बंदीजनांत भाषण देऊन त्यांना इज्जतदारीने जगण्याचा उपदेश केला. विदर्भात सर्वत्र भूदान यज्ञाची मोहीम काढली. १ मे १९५३ पासून ११ दिवसांच्या दौऱ्यात १५०० मैल फिरून ४० सभा व १० भजन कार्यक्रम करून महाराजांनी एकंदर (२६८ लोकांकडून) ६० गावांमधून ११ हजार ४१० एकर भूमी मिळविली. भूदानयज्ञाच्या निमित्ते गावोगाव त्यांचे भजन-भाषणांचे दणदणीत कार्यक्रम होत होते. आजार असतानाही बैतूल ते निजाम स्टेट मध्ये दौरा काढून २६ ते २९ मे दरम्यान एकरातोली (हैद्राबाद) येथे विठ्ठलराव कळसकरांच्या हस्ते त्यांनी ५०० व्यायाम सेवकांचे भव्य व्यायामसंमेलन घेतले. दि.३१ मे रोजी गुरुकुंजातील श्रीगुरुदेव आयुर्वेद वर्गाचा दीक्षान्त समारंभ संपन्न केला. श्री.जयप्रकाश नारायण व पत्नी सौ. प्रभावतीदेवी यांनी आमगाव व गुरुकुंज आश्रमाला भेट दिली. त्यावेळी जयप्रकाशजींनी ग्रामनवनिर्माण कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

पंढरपुरात महाराजांनी आयोजित केलेले महाप्रभावी 'संत संमेलन'

झाल्यावर आषाढी एकादशीला चंद्रभागेतीरी चिंतन करताना त्यांना 'ग्रामगीता' लेखनाची प्रेरणा झाली. नंतर त्यांनी खंजरी भजनाने गुजरात हलवून सोडला; तर उत्तर प्रदेशात चैतन्याची लाट निर्माण केली. १२ दिवसांच्या या भूदान दौऱ्यात बांदा जिल्ह्यात त्यांच्या भजनांना बांदा, अतरा व नरैनी येथील जनता हजारोंच्या संख्येत ओसंडून आली होती. आध्यात्मिक व राष्ट्रीय चेतनेची लाटच त्यातून उसळून आली. अलाहाबादेच्या २ दिवसांच्या वास्तव्यात त्यांची डझनभर भाषणे व मुलाखती झाल्या. 'बनारस हिंदू विद्यापीठा'त कीर्तन व भाषण झाले तेव्हा तद्दन बेशिस्त मानल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी २।। तासपर्यंत मुग्ध झाल्याप्रमाणे ते ऐकले. गंगा ओलांडून ६ मैलांवरील फाकामाऊ गावात महाराजांच्या हस्ते भूमिवाटप करण्यात आले. प्रतापगड आणि रायगड जिल्ह्यानंतर राजामऊ आणि अखेरीस महाराजांनी चित्रकूटचा दौरा केला व ते नागपुरास परतले. या दौऱ्यात श्रीरामपूर, सुलनातपूर, फत्तेपूर आदि गावीदेखील भजन-भाषण-शंकासमाधान लोकांना प्रचंड भावले.

तुमसरचा भव्यदिव्य चातुर्मास्य सोहळा अपूर्व असाच झाला. अ.भा.राष्ट्रभाषा प्रचार संमेलनात अमोल संदेश व पत्रके वाटण्यात आली. सद्गुरु महोत्सवाची महनीयता व जीर्णोद्वार करून महाराजांनी 'शांतिदूतांची' सभा घेतली. मुंबईत संत सप्ताह साजरा करून राष्ट्रपुरुषांच्या भेटी घेतल्या. गाडगेबाबाची हार्दिक इच्छा पूर्ण करण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमधील वाद मिटविला. दि.२७ जानेवारी १९५४ रोजी पंजाबमेलने महाराज दिल्लीला रवाना झाले. २९ ला सकाळी विकासमंत्री गुलझारीलाल नंदांना भेटून यात्राशुद्धीवर चर्चा केली. राजघाटावर झालेल्या प्रार्थनेत महाराजांनी भजन व नामधून गाइली. ३० जानेवारीला बिर्ला भवनात राष्ट्रपती व पंतप्रधानांच्या उपस्थितीत नामधून व प्रार्थनागीते गाइली व गांधीजींच्या समाधीवर पुष्पमाला अर्पिली. दुपारी ११ वाजता राष्ट्रपती भवनात देश-विकासदृष्टच्या उपयुक्त चर्चा केली. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या निवासस्थानी महाराजांचे स्वागत करून नेहरूजींनी सेवामंडळ व सरकार यांदरम्यान सहकार्याचा प्रश्न उपस्थित केला असता महाराजांनी त्यांना आपल्या योजना सांगितल्या. राष्ट्रपती भवन येथे सायंकाळी ६।। वाजेपासून अत्यंत प्रभावी असे भजनभाषण झाले. त्यांच्या अद्भुत खंजरी वादनाने सर्वांना वेड लावले. 'अब तो

आँखे खोल बन्दे!' व 'चारित्र्य फना ही होगा तो कैसे देश जियेगा?'– ही जहाल भजने म्हटली. ह्या कार्यक्रमाला प्रारंभी नेहरूही उपस्थित होते, पण ते विदेशी पाहुण्यांच्या स्वागतास जाणे आवश्यक म्हणून निघून गेले. मार्गातच 'प्यारा हिंदुस्थान है'– हे महाराजांचे मार्चिंग साँग रेडिओवर ऐकून ते विलक्षण भारले जाऊन परत आले आणि स्वागतास स्वतःऐवजी श्री.महावीर त्यागींना पाठविले. याच प्रसंगी राष्ट्रपती डॉ.राजेन्द्रप्रसादांनी संत तुकडोजींना 'राष्ट्रसंत' पदवीने संबोधित व सन्मानित केले. डॉ. राधाकृष्णन् आदि धुरीणांशी महाराजांनी चर्चा केली व ते परतले.

वरखेड येथे दि.२ फेब्रुवारीला श्रीमंजुळादेवींचा 'मातृदिन' होता. पावापुरी (बिहार) येथील 'भारत सेवक समाज संमेलना'त महाराजांची तीन भाषणे झाली. नंतर ९ फेब्रुवारीला ते प्रयागक्षेत्राकडे रवाना झाले. तेथे कुंभमेळ्यात विभिन्न आखाड्यांचे महंत व त्यांचे शिष्य यांच्या त्यांनी भेटी घेतल्या.

जयप्रकाश नारायण व विनोबा भावे यांच्या आग्रहाने राष्ट्रसंतांनी पुन्हा बिहार दौरा केला. दि.१७ फेब्रुवारी १९५४ रोजी ते गयेस पोहोचले. १७ रोजी बाराचट्टीला गेले. तिथले त्यांचे भजन व धाराप्रवाही भाषण ऐकून राज्याचा मंत्री अनुग्रहबाबू चकित झाले. गयेच्या विष्णुपद मंदिरातही महाराजांनी भजन केले. वारदगाव, यदुपूर, दोनाया गावांमध्येही महाराजांनी ग्रामीण श्रोत्यांना पुरते मोहित केले. बिहार मध्ये भजनाचा कार्यक्रम करून नंतर ते गुरुकुंजात परत आले.

बस्तर येथे रायपूरपासून तर रांची पर्यंतच्या वन्य आदिवासींच्या जागृतीसाठी ४० प्रचारक त्यांनी अगोदर पाठविले होते. आदिवासींमध्ये सुधारणा करण्यासाठी अन्यही प्रयत्न सुरूच होते. महाराजांनी तेथे भजनाद्वारे उपदेश केला. तसेच मराठवाड्यात ग्राम विकासकार्य व बंजारा लोकांची परिषद भरविली. आमगावात दि.४ एप्रिल ५४ रोजी प्रचार प्रशिक्षण केंन्द्र सुरू केले. सातपुड्यातील आदिवासी लोकांत सुधारणा घडविण्यासाठी सावलमेढा येथेही 'श्रीगुरुदेव सेवाश्रम' स्थापन केला. बैतुल जिल्ह्यातील उदामा येथेही आश्रम उभारला.

राष्ट्रपतींच्या हस्ते दि. २४ एप्रिल १९५४ रोजी नागपुरातील शुक्रवारी तलावाच्या दक्षिण किनारी 'श्री गुरुदेव सेवाश्रम'चा कोनशिला समारंभ झाला. त्यावेळी राष्ट्रपतींनी महाराजांची तोंडभरून स्तुती केली. नंतर दि.२६ ला गुरुकुंजात

राष्ट्रपतींच्या हस्ते 'श्रीगुरुदेव चिकित्सा मंदिरा'चा उद्घाटन समारंभ होणार होता. मात्र अचानक त्यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्यामुळे तो रद्द करण्यात आला. दि.२९ एप्रिल १९५४ ला सायंकाळी महाराजांचे मुंबई आकाशवाणी केंद्रावरून 'रामराज्य' शीर्षकाचे कीर्तन प्रसारित झाले. दि.७ मे ला नागपूर येथे स्वामी विद्यानंदांच्या भव्य 'गीता मंदिरा'चे उद्घाटन थाटामाटात पार पडले. गुरुकुंजात दि.९ मे १९५४ रोजी वैष्णवाग्रणी प्रा. मामासाहेब दांडेकर यांना महाराजांनी आमंत्रण देऊन बोलावले होते. त्यानुसार २५ एप्रिल रोजी येऊन त्यांनी आश्रमाचे निरीक्षण करून कार्यकर्त्यांना स्वावलंबन व जीवनशिक्षणावर मार्गदर्शन केले.

सह्याद्रीच्या खोऱ्यातील आदिवासींमध्ये मानवता जागविण्यासाठी महाराज सतत परिभ्रमण करायचे. नासिक विभागातील हरसूल, गिरिनारपेठ, दलपतपूर, वायघोळ येथे गेले असता त्यांच्या भजनाचे कार्यक्रम झाले. आदिवासींनी स्वच्छ राहावे, शिक्षणाचा दर्जा सुधारावा–अशी महाराजांना मनापासून तळमळ होती. दि.१२ जून ५४ रोजी मध्य प्रदेशातील सावलमेंढा येथील श्रीगुरुदेव सेवाश्रमालाही महाराजांनी अचानक भेट दिली व तिथल्या बालकांसोबत ते बालक बनून खेळले.

भारताचे अर्थमंत्री सी.डी. देशमुख व त्यांच्या पत्नी दुर्गाबाई यांनी दि. ३० जून १९५४ रोजी गुरुकुंजास भेट दिली व मंडळाचे सेवासहकारी कार्य यांबद्दल धन्योद्गार काढले. पंढरपुरात चौथे विशाल 'संत संमेलन' भरले. त्यात महाराजांनी पाऊण लाख लोकांसमोर भजने गाऊन त्यांना नवीन दृष्टि दिली व आश्रमीय गतिविधी, 'मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी...' तसेच साक्षरता प्रसार, ग्राम सफाई, आयुर्वेदीय औषधोपचार, दुर्व्यसन निर्मूलन, सामुदायिक प्रार्थना नि नमस्कार पद्धती–इत्यादी विषयांवर भाषणे झाली. श्री.बबनराव बडवे, मामासाहेब दांडेकर, भागवत बुवा देहूकर व देगलूरकर, कैकाडी महाराज, तनपुरे महाराज, शंकरमहाराज वंजारी, श्रीसंत गाडगे महाराज इत्यादींनी महाराजांची कल्पना उचलून धरली आणि त्यानुसार आषाढी एकादशीला पंढरपुरात अभिनव पद्धतीने कार्यक्रम पार पडले.

दि.१ ऑगस्ट १९५४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीला मोझरी येथे महाराजांचे अविस्मरणीय भाषण व भजनाचे कार्यक्रम झाले. नंतर 'समाजसेवा बोर्ड' व 'भारतसेवक समाज' कार्यासाठी त्यांनी दौरे काढले. तुफानी वेगाने शेकडो

मैल प्रवास करीत संस्मरणीय कार्य केले. भंडारा शहरी भव्य चातुर्मास्यात भागवत-प्रवचनानंतर राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामैया यांनी भेट देऊन इंग्रजीत भाषण दिले. दारूबंदीवर भाषणे झाली. तसेच दि.१२ ऑक्टोबर १९५४ पासून वर्धा जिल्ह्यात वायगाव व खरांगणा येथे अनुक्रमे चातुर्मास्याचा व प्राथमिक शाळेच्या कोनशिलेचा कार्यक्रम पार पडला. तसेच गुरुकुंज येथील विद्यामंदिरात स्नेहसंमेलन पार पडले. दर्यापूरच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाल्यानंतर बार्शी-टाकळी येथे ज्ञानसप्ताह समारोपाप्रीत्यर्थ प्रचंड समूहात महाराजांचे भजन व भाषण झाले.

गुरुकुंजात ६ डिसेंबर १९५४ रोजी गीताजयंतीच्या सुमुहूर्तावर वं. महाराजांनी प्रार्थना मंदिरासमोर 'श्री गुरुदेव अस्थिविसर्जन कुंडा'चे खोदकाम करवून भूमिपूजन करून गीतापाठ घेतला. या कुंडाला त्यांनी 'स्वर्गधाम' नाव दिले व नंतर ते ब्रह्मपुरीला गेले.

डिसेंबर १९५४ अखेरीस कलकत्त्याला अ.भा.शारीरिक शिक्षण महामंडळाचे तिसरे अधिवेशन भरायचे होते. अधिवेशनास केवळ आठच दिवसांचा अवधी होता. गोपाळराव पाठक नावाच्या नागपूरच्या महामंडळाच्या प्रधानमंत्र्याने अध्यक्ष म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव आग्रहाने सुचविले होते. राष्ट्रसंतांची महती त्या भागात फारशी पसरली नसल्याने महामंडळाचे कार्याध्यक्ष काकासाहेब पुराणिक यांनाच अध्यक्ष बनविण्यासाठी उलटी चक्रे फिरली. परिणामी कलकत्त्यात महाराजांच्या स्वागताला चिटपाखरूही आले नाही. त्यांची राहाण्याची व्यवस्थाही झोपडीत करण्यात आली. पण तरीही उमद्या प्रकृतीच्या राष्ट्रसंतांनी उद्घाटन करण्यास संमती दिली. उद्घाटनपर भाषण अस्खलित हिंदीत-तेही राष्ट्रपातळीवरील शारीरिक शिक्षणाचे सर्व पैलू उलगडत- राष्ट्रसंतांनी जेव्हा दिले तेव्हा चमत्कार घडून आला. सारे अधिवेशन तर संमोहित झालेच; पण महामंडळाचे बंगाली उपाध्यक्ष मिस्टर सेन स्टेजवर गेले, त्यांनी राष्ट्रसंतांपुढे साष्टांग लोटांगण घातले आणि त्यांचे विभूतिमत्व न ओळखल्याबद्दल सपशेल क्षमा मागितली. दुसऱ्या दिवशी सायंकाळी महाराजांच्या खंजरी भजनानंतर तर सारे उपस्थितही नतमस्तक होऊन गेले. दि.१ जानेवारी १९५५ मध्ये नागपुरात व्हावयाच्या अ.भा. राष्ट्रीय मजदूर संमेलनासाठी व विश्वपुनर्निमाणाच्या कार्यक्रमासाठी म्हणून महाराज परत आले.

हैदराबाद स्टेटच्या आधिपत्त्याखाली असलेल्या वडी बाजार (जि.औरंगाबाद) येथे २८ ते ३० जानेवारी १९५५ दरम्यान 'चौथा गांधी स्मृतिदिन समारोह' घेण्याचे महाराजांनी योजिले होते. त्यासाठी वडीचे केन्द्रप्रमुख श्री.रामरावजी ठाकरे यांनी प्रचारकांच्या मदतीने १९४९ पासूनच परिसरातील गावोगावी वर्ग घेऊन जनजागृती केली होती. १९५२ पासून महाराजांनी गुलाबगीर गोस्वामींकडे वडी सेवाश्रमाची जबाबदारी सोपविली होती. डिसेंबर १९५४ पासूनच वडी भोवतालच्या ६० गावांमध्ये श्री.रामराव ठाकरे आदिंमार्फत शोषखड्डे, नाल्यामोऱ्या, शेणखत खड्डे, आरोग्य मंदिर, व्यसनमुक्ती, सहकारी भांडार, साक्षरता प्रसार, मार्गसुधार आदि कामे महाराजांनी चालविली होती. श्री. सांब चव्हाण यांच्या सोबतच आमगाव ते वडी दरम्यानचे सारे प्रमुख कार्यकर्ते त्यांनी विविध समित्यांवर नेमले होते. आदिवासींच्या व्यवस्थेचीही स्वतंत्र समिती होती. दि.२६ जानेवारी १९५५ पासून महाराज वडी सेवाश्रमात ठाण मांडून बसले व समारंभाची व्यवस्था मनाजोगी करून घेतली. दि.२८ रोजी जयप्रकाश नारायण यांनी उद्घाटन करताना महात्मा गांधींचे कार्य उन्नत स्वरूपात व्यापक प्रमाणावर केल्याबद्दल सेवामंडळाच्या कार्यकर्त्यांचा गौरव केला व ''जेव्हा जेव्हा भारताचे पतन झाले तेव्हा संतमहात्म्यांनीच त्याला वाचविले. त्या इतिहासाचेच हे नवे रूप आहे.''– असे उद्गार काढले. दि.२९ ला उपगृहमंत्री नामदार दातारांचे आगमन झाले. ना.बिंदू, ना.रंगारेड्डी, ना. गाढे, स्वामी रामानंद तीर्थ आदि पाहुणे आले. ''दिल्लीला अचूक मार्ग दाखवणारे ग्रामचैतन्य''– या शब्दांत ना. दातारांनी महाराजांचा गौरव केला; तर 'संसार नश्वर असला तरी तो चांगल्या रीतीने जगण्यासाठी निःस्वार्थपणे सेवाकार्य करण्यासाठी आहे– हे शिकवणारा आध्यात्मिक भावनाप्रवाह महाराजांच्या कार्य प्रवाहातून वेगाने उठाव घेत आहे'– म्हणून स्वामी रामानंद तीर्थांनी समाधान व्यक्त केले.

दि.२९ ला देवी मंजुळामाता यांच्या पुण्यमहोत्सवासाठी महाराजांना श्रीक्षेत्र वरखेडला जावे लागले. त्यावेळी ग्रामोद्योग सहकारी सोसायटीचे उद्घाटनही त्यांनी केले. दि. २६ जानेवारी १९५५ ला गणतंत्र दिनाच्या महोत्सवानंतर सर्व व्यवस्था करून ते जालन्यास गेले. तेव्हा बीड–औरंगाबाद मार्गावरील वडी गावात जणू 'गुरुदेव नगर'च वसले होते.

नांदेडचे स्वामी रामानंदतीर्थ, खामगावचे संत पाचलेगावकर व श्रीगाडगेबाबा इत्यादींच्या सहकार्याने आदिवासी संमेलन, भूदान वितरण व यात्रा सुधार इत्यादी कार्यक्रम महाराजांनी राबविले.

विंध्य प्रदेशात हरिजन संमेलन व भंगी निवासाचे महाराजांचे कार्यक्रम सुरूच असत. 'अखिल भारतीय भारत सेवक समाजा'चे अधिवेशन १३-१४ मार्च १९५५ मध्ये नागपूरला आयोजित करण्यात आले असून पं. जवाहरलाल नेहरू हे त्यांचे उद्‌घाटक होते. सौंसर, अहमदाबाद, बडोदा व सोलापूर येथेही वारंवार भेटी देऊन महाराज तेथील मंडळाच्या कार्याची पाहणी करीत असत.

५ वे 'सर्वोदय संमेलन' ओरिसा मधील पुरी येथे २५ मार्च १९५५ पासून आयोजिले होते. त्या अधिवेशनानंतर जगन्नाथपुरीचे निरीक्षण करून तिथूनच राष्ट्रसंत २८ मार्च १९५५ मध्ये बिहारच्या दौऱ्यावर गेले. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत सारन, जिरादेही आदि गावांत भव्य कार्यक्रम संपन्न झाले. जीवघेण्या तापातही महाराजांनी हैद्राबाद व नारायणपेठ सह आंध्र प्रदेशाचा दौरा केला. तशातच त्यांना जपानच्या विश्वधर्मपरिषदेचे निमंत्रण आले. दि.३ ते ११ मे १९५५ मध्ये ते व्हायचे होते. परन्तु जपान दौऱ्यासाठी निधी जमा करताना दगदगीमुळे झालेल्या प्रकृति अस्वास्थ्यामुळे महाराजांना होकार कळवूनही जपानला जाता आले नाही. त्यानंतर जपानचे दुहेरी आमंत्रण ७ जून १९५५ ला आले. त्याप्रीत्यर्थ १० जून ला नागपुरास त्यांचे नेत्रदीपक स्वागत झाले. त्यावेळी न्यायमूर्ती के.टी.मंगलमूर्ती म्हणाले– ''ज्यांनी विश्वशांतीची तत्त्वे प्रत्यक्ष अंमलात आणली तो प्रतिनिधी भारतातून जात आहे ही गोष्ट अभिमानास्पद आहे.'' स्वागतसभेचे अध्यक्ष न्यायमूर्ती हिदायतुल्ला म्हणाले–''श्रीतुकडोजी महाराज भारतीय सद्‌भावना, स्नेह एवं सुसंवादी जीवन का संदेश ले जापान जा रहे हैं... महाराज भारत का प्रतिनिधित्व करने में समर्थ हैं।''

* * * * *

# आठ : संघटन

जपानमधील 'पाचव्या विश्वशांति परिषद' (शिमिझू) व 'जागतिक धर्मपरिषद' (टोकिओ) यांमध्ये सहभागी होण्यासाठी महाराजांचा जपान दौरा १७ जुलै ते २५ ऑगस्ट १९५५ दरम्यान निश्चित झाला. त्यासाठी शासनाकडून नव्हे; तर लोकांकडून त्यांनी आर्थिक सहयोग घेतला. ते १७ जुलैला कलकत्त्याहून विमानाने रंगूनला, तेथून बँकॉकला व बँकॉकहून १८ जुलै रोजी सकाळी हाँगकाँगला पोहोचले. तिथून पुढच्या विमानाने रात्री टोकिओला पोहोचले. तिथून मोटारीने २० मैलांवरील याकोहामाला व १९ रोजी सकाळी ट्रेनने शिमिझू येथे पोहोचले. प्रत्येक स्टेशनवर धर्मसंघटनेच्या अध्यक्षांच्या वतीने त्यांचे आत्मीयतेने स्वागत करण्यात आले. दि.२० रोजी प्रार्थना मंदिरात मौनपूर्व सामुदायिक नृत्यावर महाराजांनी विवेचन केले. ''भारतातील अनेक धर्मपंथांमुळे अंदाधुंदी माजत नाही का?'' या प्रश्नावर प्रतिकूल मत देऊन महाराजांनी वाद्याचे अनेक तार एका स्वरात लागले असता उमलणाऱ्या सुरेल संगीताचा दृष्टान्त दिला. दि.२३ रोजी सिमिझ्यू येथे महाराजांच्या प्रभावी भाषणाने 'विश्वशांति परिषदे'चे उद्घाटन झाले. दिनांक २४ रोजी 'ऐ विश्व के चालक प्रभू! मुझमें समझ दे विश्व की'– या खंजरी भजनाने परिषदेला आरंभ झाला. संस्थापक नाकानो यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर मूळ विषयावर महाराजांचे प्रभावी भाषण व रात्री पुन्हा भजनही झाले. दि.२५ रोजी 'जागतिक धर्म परिषदे'चा आरंभ देखील महाराजांच्या भजनाने झाला.

दि.२५ रोजी परिषद संपताच सर्व देशांच्या प्रतिनिधींसह महाराज ३०० मैलांवरील कियुशु बेटावर 'धर्मश्रेष्ठांच्या अधिवेशना'साठी जायला निघाले. ''अध्यात्म म्हणजे काय?'' या प्रश्नावर महाराज म्हणाले– ''तुझको तू प्यारा है जितना सब पर प्रेम किया कर उतना।।– ही आहे अध्यात्माची परिभाषा. '' याच संभाषणादरम्यान ते म्हणाले– ''अगर देश–देश के सारे महन्त, नेता, शासक तथा संशोधक अपनी नीति को सेवा के रास्ते पर ला सके तो यह संसार स्वर्ग बन सकता है। युद्ध सामग्री में लगी अपार शक्ति अगर विधायक कार्यों में लगायी जाय तो यह दुनिया देवनगरी बन सकती है।''

दि.३१ जुलै रोजी क्युटो शहरात पोहोचून त्यांनी बुद्धमंदिर व कुनान

देवतेच्या मंदिरास भेट दिली आणि नंतर इतरांबरोबर मीनो शहराकडे निघाले. १ ऑगस्टला तिथे महाराजांचे जंगी स्वागत झाले आणि महाराजांच्या भजन–भाषणाचा कार्यक्रम झाला. रात्री दोनलाच ते टोकियोकडे जाण्यास निघाले. दिनांक ३ ऑगस्ट रोजी टोकिओला परिषदेसाठी आलेल्या प्रतिनिधींची भेट घेऊन महाराजांनी दि. ४ च्या 'जागतिक धर्मपरिषदे'त धर्मसहकार या मुद्यावर अप्रतिम भाषण दिले. परिणामी विषय नियामक समितीवर त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यातील ११ प्रतिनिधींसोबत रात्री उशीरापर्यंत विचारविनमिय करण्यात आला. जनरल मीटिंगमध्ये ठरावांचे वाचन झाले व महाराजांचे आशीर्वादपर उत्कृष्ट भाषण झाले. १८ देशांमधून आलेले ७० प्रतिनिधी व शेकडो जपानी श्रोते मंत्रमुग्ध होऊन गेले. दि.४ ऑगस्ट रोजीच 'हर देश में तू। हर भेष में तू'– हे अप्रतिम भजन महाराजांनी लिहिले. जनरल मीटिंगमध्ये एका भारतीय तरुणाने बांडुंग परिषदेत २९ राष्ट्रांनी संमत केलेला 'पंचशील' प्रस्ताव पुढे आणला. परन्तु 'हा राजनैतिक ठराव धर्मपरिषदेत नको' म्हणून गोंधळ उसळला. महाराजांनी तो हिकमतीने शांत केला; आणि 'पंचशील' मधले एकेक तत्त्व घेऊन–बंधुप्रेम, विश्वशांती, स्वातंत्र्य आदि जीवनमूल्यांवर मार्मिक विवेचन करून उपस्थित धर्मप्रतिनिधींचे मत परिवर्तन करून पंचशीलाचा तोच ठराव परिषदेत सर्वानुमते मान्य करण्यास भाग पाडले. त्यानंतर महाराजांच्या रात्रीच्या भजनाने तर कळस चढविला.

धर्मसहकारितेच्या विषयावर महाराजांनी सर्वधर्मीयांचा अहंकार अक्षरशः वितळवून टाकला होता. जगातील निरनिराळ्या धर्मांचे एकत्व प्रतिपादन करून त्यांच्यात सलोखा निर्माण करण्याचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजींइतक्या समर्थपणे कोण करू शकणार?–''आओ कोई भी धर्मी। आओ कोई भी पंथी। देशी विदेशियों का मंदीर यह हमारा।।'' ही तर त्यांची सहजस्फूर्त भूमिकाच होती ! दिनांक ५ ऑगस्ट रोजी विश्वधर्म परिषदेचे समारोपीय भाषण देखील सर्वांच्या आग्रहाखातर राष्ट्रसंतांनीच केले. दिनांक ७ ऑगस्ट रोजी जपानमधल्या जनजीवनाची पाहणी करण्यासाठी दौरा काढला असता छोटी छोटी गावेसुद्धा त्यांना सुबक व शिस्तशीर दिसली. बेघर वा झोपडीवासी तर तेथे एकही नव्हता. दवाखाने, शाळा आणि धर्मसंस्थाही त्यांनी पाहिल्या. दि.८ ऑगस्ट रोजी १८ राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय धर्मसंघटनेची स्थापना करण्यात आली आणि संघटनेच्या कार्यकारिणीचे मार्गदर्शक

म्हणून महाराजांना रीतसर विनंती करण्यात आली. महाराजांनी ती स्वीकारली.

दि.९ रोजी क्युटो येथील होंगाजी मंदिर आणि १० रोजी ओसाका येथील अतिउंच कॅसल पाहून महाराज दि.११ रोजी पर्ल आयलँड हे पवित्र स्थळ पाहून आले. दि.१२ रोजी उष्ण झरे असलेल्या अटामी येथे स्नान उरकून आल्यानंतर महाराजांच्या भजनाद्वारे सभेचे उद्घाटन करण्यात आले. त्यांच्या खंजरी भजनावर लोक बेहद्द खुष झाले. नंतर ते होकानो म्युझियम पाहून आले. दि.१३ रोजी होकानो हॉटेल सोडून ते टोकिओ वरून निको येथे आले. दि.१४ रोजी वकिलातीत कार्यक्रम करून १५ ऑगस्ट रोजी त्यांनी सहकारी श्री.तुकारामदादांसह टोकिओचा निरोप घेतला.

दि.१६ ऑगस्टला हाँगकाँग, १७ ला थायलंड मधील बँकॉक, १९ ला विमानतळावर भजन, २० रोजी गुरुद्वारात भजन, २१ रोजी रंगूनला हिंदुसंघात भजन, २२ रोजी साधुसिद्धांची पर्वतगुहा पाहून झाल्यावर भजनादि कार्यक्रम व २३ रोजी बडाफैया पाहून जैन मंदिरात भजन करून आणि २४ ऑगस्ट रोजी श्री. रामचंद्रनकडे भोजन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व तुकारामदादा गीताचार्यांनी थेट विमानतळ गाठले. ४० दिवसांची १० हजार मैलांची ही ऐतिहासिक विदेश यात्रा आटोपून दि.२४ ऑगस्ट रोजी दुपारी महाराज डमडम विमानतळावर उतरले. जपानमध्ये या दोन्ही जागितक परिषदांचे यशस्वी आयोजन करणारी आयोजक संस्था 'अनानाई-क्यो'चे संस्थापक जपानी संत योनोसुके नाकानो राष्ट्रसंतांच्या व्यक्तित्वाबद्दल म्हणाले- ''जगात शाब्दिक विद्वान अनेक मिळतात; पण आध्यात्मिक व स्वयंप्रेरणेचे पुरुष विरळाच! धार्मिकतेच्या अधिष्ठानावर सर्वांगीण संशोधित विचारांचे दर्शन आम्हाला या राष्ट्रसंतांचे ठायीच घडले.'' अशाचप्रकारे आंतरराष्ट्रीय धर्मसभेचे अध्यक्ष शिन निगामी म्हणाले- ''पाचव्या विश्वधर्म परिषदेत आलेल्या सर्व प्रतिनिधींमध्ये संत तुकडोजी महाराज यांनी त्यांच्या उच्च शीलाने, अप्रतिम बुद्धिमत्तेने आणि श्रेष्ठ विचारांनी लोकांवर विशेष छाप पाडली. माझ्या मते ते भारताचे खरे उद्धारक व महात्मा गांधींप्रमाणे महाप्रभावी ठरतील!''

त्यांच्या या यात्रेबद्दल बंगालचे मंत्रीगण, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री, दिल्लीचे नियोजनमंत्री गुलझारीलाल नंदा, अर्थमंत्री सी.डी.देशमुख, कृषीमंत्री पंजाबराव देशमुख, रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री, उपगृहमंत्री दातार, आरोग्यमंत्री अमृत कौर,

काँग्रेस अध्यक्ष ढेबरभाई, उपराष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन् इतकेच नव्हे तर– राष्ट्रपती आणि पंतप्रधान या सर्वांनीच भारताची मान उंचावणाऱ्या राष्ट्रसंतांच्या या जपान दौऱ्याबद्दल धन्योद्गार काढले. शहरोशहरी महाराजांचे स्वागत–सत्कार होत गेले.

दिल्लीच्या रामलीला मैदानात पं. नेहरूंनी महाराजांच्या आदर्श ग्रामयोजनेचा 'उद्याच्या रामराज्याची योजना' म्हणून जाहीरपणे पुरस्कार केला. महाराजांनीही साधुवृत्तीच्या संघटनाद्वारे देशात विधायक नीतिसुधार करण्याचा दृढसंकल्प याचवेळी प्रकट केला. ''राष्ट्र के नवनिर्माण में सहयोग नहीं दे सकता वह धर्मही नहीं हो सकता''– हे त्यावेळचे महाराजांचे ठाम उद्गार होते.

जपानहून परतल्यानंतर महाराजांनी 'मेरी जापान यात्रा' हे अप्रतिम प्रवासवर्णन लिहून काढले. त्याचप्रमाणे संपादक 'सुदाम' सावरकरांनी 'श्रीगुरुदेव' मासिकाचा नोव्हेंबर १९५५ चा विशेषांक जपानयात्रेवर उत्कृष्ट प्रकारे काढला. भारतात ठिकठिकाणी जपानयात्रेने भारलेले कार्यक्रम संपन्न होऊ लागले. गावोगावचे श्रोते जपानशी संबंधित प्रश्न व शंका विचारू लागले आणि त्यांच्या उत्तरांतून महाराजांची आगळीवेगळी विश्वदृष्टी आणि जीवनदृष्टी प्रकट होत गेली. महाराजांचे भजन–भाषणाचे कार्यक्रम प्रांतोप्रांती अति वेगाने सुरूच होते आणि त्यांमधून 'प्रत्येक प्रांत माझा' ही त्यांची भूमिकाही स्पष्ट होत गेली होती. दि.२५ ते २९ ऑगस्ट दरम्यान बिलमोरा, नडियाद, अहमदाबाद या गुजरातेतील नगरांमध्ये आणि वऱ्हाडातील बुलडाणा सारख्या गावांमध्येही त्यांचे अनेक महत्त्वपूर्ण कार्यक्रम गाजले. दिल्ली व नागपूर सारख्या राजधान्यांमध्ये तर श्रोत्यांनी अभूतपूर्व जिज्ञासेचा परिचय दिला.

५०० वर्षांपासून पोर्तुगीजांच्या गुलामगिरीत जगणाऱ्या गोमंतक या नंदनवनाच्या मुक्तीचा प्रयास जून १९४६ पासूनच डॉ.राममनोहर लोहियांनी आरंभला होता. पोर्तुगीजांनी तो उधळून लावल्यानंतर १९५४ मध्ये एकाच वेळी अहिंसक व सशस्त्र अशा दोन्ही प्रकारे नव्याने लढा उभारण्यात आला होता. १९५५ मध्ये ना.ग.गोरे, सेनापती बापट, मधू लिमये, मधू दंडवते आदींनी तो क्रांतिलढा पुढे चालविला. सन् १९५७ मध्ये भूदान आयोजन सप्ताहांच्या निमित्ताने साथी जयप्रकाश नारायण यांनी बिहारमध्ये महाराजांचे कार्यक्रम आयोजिले. त्याच सुमारास महाराजांनी व त्यांच्या अनुयायांनी गोमंतक प्रदेश स्वतंत्र करण्याच्या

प्रयत्नात लक्ष घातले. राष्ट्रसंतांनीही गोवामुक्ति लढ्याला प्रोत्साहन देत तरुणाईमध्ये क्रांतिबीज रुजवून-वाढवून त्यांच्यात गोवामुक्तीची धुंदी निर्माण केली.

अलिकडे दरवर्षीच पंढरपूरला 'संतसंमेलन' आयोजित करून महाराजांनी संतशक्ती जागविण्याचा प्रयास चालविला होता. त्याच्या पुढचे पाऊल म्हणून आता अखिल भारतीय संत संघटनेची मुहूर्तमेढ रोवण्याचे त्यांनी ठरविले. १८-१९ फेब्रुवारी १९५६ रोजी दिल्लीच्या बिर्लामंदिरात ना.गुलझारीलाल नंदा यांनी त्याच उद्देशाने सभा आयोजित केली. या सभेत राष्ट्रसंतांच्या अध्यक्षतेखाली भारतातील महत्त्वाचे ५० संतमहात्मे उपस्थित होऊन स्वामी अखंडानंद, सर्वानंदजी, रामानंदतीर्थ या महात्म्यांनी विचार मांडून 'भारत साधु समाज' निर्माण करण्याविषयी ठराव आणला. त्याचे कार्यकारी मंडळ ठरविण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अध्यक्षपद देण्याच्या प्रस्तावावर अनेक महामंडलेश्वरांनी आक्षेप घेतले. सर्वानंद, दयानंद सरस्वती यांनी मात्र ठोस युक्तिवादाअंती महाराजांना अध्यक्षपद देण्याकरिता सभागृह अनुकूल करून घेतले. महाराज अध्यक्ष होताच त्यांनी दोन सचिव घेतले व कार्यालय दिल्लीतच ठेवून तिथल्या कार्यसुविधेसाठी चित्रे गुरुजींना नियुक्त केले.

आंध्र प्रदेशातील निजामाबाद येथे 'अ.भा.भारत सेवक समाजा'चे अधिवेशन भरविण्यात आले. त्याचे कर्तेधर्ते गुलझारीलाल नंदा यांना पंडित नेहरूंनी आग्रहपूर्वक सुचविल्यानंतर महाराजांनाही भजनी दलासह उपस्थित राहावे लागले. महाराजांनी प्रभावी भाषणाद्वारे सेवेचे मर्म आणि ग्रामीणांचे मानसशास्त्र उत्तम प्रकारे प्रकट केले. समस्त भारतातून आलेल्या तरुणाईला ती वैचारिक-भावनिक मेजवानीच होती !

इंदौरला यशवंतराव राजे होळकर यांची आत्या श्रीमती शकुंतलाबाई सरकार आणि न्यायमूर्ती रेगे यांच्या आत्मीयतेतून महाराजांचे अनेक प्रभावी कार्यक्रम झाले. देशभरातल्या पुरोगामी उपक्रमांना महाराज तिथूनच संदेश नि अभिप्राय देत, तसेच पत्रांची उत्तरे स्वतः महाराज देत. याखेरीज शोकसंदेश आणि कामकाजी पत्रेही कितीतरी लिहिली जात. गुरुकुंजाच्या दर्शनासाठी म्हणून अमेरिकेतील कॅन्सास विद्यापीठाच्या प्राध्यापिका मिस् फ्रांसिस काझार्ड नागपुरास आल्या असता ना.ब्रिजलाल बियाणींनी त्यांचे आदरातिथ्य केले व त्यांच्यासोबतच

गुरुकुंजास भेट दिली. त्यावेळी त्यांनी गुरुकुंजात गौरवपर भाषणही दिले.

सन् १९५५ च्या दिवाळीत महाराज अमृतसरच्या अ.भा.वेदान्त परिषदेसाठी पंजाबात गेले. तेथील निसर्गरम्य वेदान्त भवनात कितीतरी संतमहंत आणि हिमालयातील तपस्वी, मौनी, योगी व महात्मे उपस्थित झाले होते. पहिल्या दिवशी महाराजांना मुख्य व्यासपीठावर जागाच देण्यात आली नव्हती. पण खालच्या व्यासपीठावर भजनी मंडळाला सोबत घेऊन महाराजांचे भजन झाले आणि दुसऱ्या दिवशी त्यांना आग्रहपूर्वक सर्वोच्च स्थानी बसविण्यात आले. त्यांच्या भाषणावर तर टाळ्यांचा वर्षाव झाला. ''मनुष्याचे चारित्र्य, समाजाचे सुख-समता-शांती यांचा विचार प्रत्येकात असायला हवा. वेदान्ताची चर्चा आणि मंदिराची उंची अवश्य वाढावी; पण गरिबांना शिक्षण, घरदार यांची व्यवस्था होणे हे त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. समाजाचे पतन थांबले पाहिजे. नामदेवाने कुत्र्याला भाकरीसोबत तुपाची वाटीही दिली- हीच खरी वेदान्ताची व अध्यात्माची उंची व खोली आहे. ग्राम स्वच्छ व सुशिक्षित झाले तरच देश पुढे जाईल. यासाठी साधू, संन्यासी, वेदान्ती यांनी पुढे यायला पाहिजे''- असा महाराजांच्या त्या भाषणाचा सार होता. वेदान्त परिषदेत दि.१० नोव्हेंबर १९५५ रोजी सुद्धा असेच प्रभावी भाषण झाले. ते म्हणाले- ''आजच्या काळात देशाला मुर्दाड बनविणारा वेदान्त मला नको. आपली दुःखे निवारण्याचे तुमच्याकडे व्यावहारिक चातुर्य नसेल; व्यवहारातच तुम्ही अयशस्वी होत असाल तर तुम्हास वेदान्ताचा अधिकार तरी काय?'' त्या वेदान्त परिषदेवर महाराजांचा सर्वाधिक प्रभावी ठसा उमटला. परतताना पंजाबातील पूरपीडित भागांना भेट देऊन त्यांनी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते शहादरा विभागातील आपद्ग्रस्त खेड्यांना घोंगड्या तथा अन्य जीवनावश्यक वस्तू वाटल्या.

सहज एकात्मतेची दृष्टी देऊन आपत्कालात सहकार्य देण्यास जनतेला प्रवृत्त करणारे राष्ट्रसंतांचे हेच आगळेवेगळे संतस्वरूप पंडित नेहरूंना चकित करीत असे. विशेषतः

*मानवता ही पंथ मेरा। इन्सानियत है पक्ष मेरा।।*
*सब की भलाई धर्म मेरा। दुविधा को हटाना कर्म मेरा।।*

हा त्यांचा सद्विचार प्रवाह त्यांना अतिशय भावत असे. जवाहरलाल नेहरूंचा

वाढदिवस प्रसंग, चेरीयनकडील विवाह प्रसंग– अशा प्रसंगी त्याचे प्रत्यंतर हमखास येत असे. कारण पंडितजी भावनेत वाहवणारे नाहीत, हे देखील सारे जाणून होते. त्यामुळेच तर जपान यात्रेनंतर नामदार दातार आणि कमिश्नर श्रीकांत यांनी दिल्लीच्या लोकसभेत सेवामंडळाच्या ४० हजार शाखांचा उल्लेख केला असता पंडित नेहरूंनी आदेश देऊन अहवाल मागविले होते. त्यावर मध्यवर्ती कार्यालयाने पहिला हप्ता म्हणून जेव्हा २० हजार शाखांची यादी दिली– तेव्हा कुठे पंडितजींचे समाधान झाले. त्या काळात 'सेवामंडळ' हा शब्दप्रयोग इतका लोकप्रिय झाला होता की आदिवासी सेवामंडळ, वनवासी सेवामंडळ, कुष्टरोगी सेवामंडळ, मराठा सेवामंडळ इत्यादि शेकडो संस्थांनी तो अनुसरला. सेवामंडळ, ग्रामसेवक–सहायक, जिल्हा सेवाधिकारी, सर्व सेवाधिकारी हे राष्ट्रसंतांनी सर्वप्रथम योजिलेले शब्दही पुढे सरकारी पातळीवर वापरले जाऊ लागले. सेवामंडळाचे विधायक सेवाकार्य हेच त्यांचे वैशिष्ट्य बनले होते. दि.२७ ते २९ नोव्हेंबर १९५५ रोजी सेवामंडळाच्या मध्यवर्ती सभेत महाराजांनी समारोप प्रसंगी एक अभूतपूर्व संकल्प जाहीर केला– ''२५०० व्या बुद्धजयंती निमित्त्य एक कोटी तासांचे श्रमदान वर्षभरात बुद्धचरणी समर्पित करणे!''– हा तो संकल्प होय.

दिनांक २५ डिसेंबर १९५५ ला गीताजयंतीच्या मुहूर्तावर एकाच दिवशी एक हजार गावी 'ग्रामगीता' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ साजरा करण्यात आला! विदर्भ साहित्य संघाच्या तुमसर येथील १८ व्या संमेलनाचे उद्‌घाटन तर महाराजांच्या हस्ते झालेच; शिवाय २५ डिसेंबर १९५५ रोजी खुल्या अधिवेशनात राष्ट्रसंत विरचित 'ग्रामगीता' या ग्रंथाबद्दल अभिनंदनाचा ठरावही पारित करण्यात आला. तसेच ज्येष्ठ–श्रेष्ठ साहित्यिकांचा सत्कार करताना अग्रपूजेचा मानही राष्ट्रसंतांनाच देण्यात आला. ज्ञानेश्वरीचे संशोधक व प्रसिद्ध विद्वान डॉ.शं.दा.पेंडसे हे 'ग्रामगीता' ग्रंथाच्या त्या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष होते. तसेच गावोगावच्या प्रकाशन सोहळ्यांमध्येही अत्यंत तोलामोलाचे अध्यक्ष जाणीवपूर्वक योजले गेले होते. नागपूर विद्यापीठानेही 'ग्रामगीते'बाबात प्रस्ताव पारित केला होता. त्यात म्हटले होते– 'ग्रामगीता ही सर्वसाधारणांची भगवद्गीता झाली आहे.' मार्च ५६ च्या लोकसभेत अंदाजपत्रकी चर्चेवर उत्तर देताना भारताचे अर्थमंत्री ना.चिंतामणराव देशमुख यांनी 'ग्रामगीता' या ग्रंथाचे विविध प्रादेशिक भाषांमध्ये

भाषांतर होणे गावागावाच्या विकासासाठी आवश्यक असल्याचे घोषित केले होते. त्यानुसार पुढे नॅशनल बुक ट्रस्ट द्वारा १४ भारतीय भाषांमध्ये 'ग्रामगीते'चे भाषांतर करण्याचे ठरविण्यात सुद्धा आले होते.

दि.१६ जानेवारी १९५६ रोजी 'आदिवासी प्रशिक्षण केन्द्रा'चा शुभारंभ गुरुकुंजात केला. त्यानंतर २६ जानेवारी रोजी गणराज्य दिनानिमित्ते गुरुकुंजात ध्वजारोहणादि कार्यक्रमानंतर विशाल जनसमूहाला महाराजांनी मोठा ओजस्वी संदेश दिला. दि.१ फेब्रुवारी १९५६ रोजी सकाळी भोपाळच्या बेसिक ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यांचे भाषण झाले; तर दुपारी ४ वाजता सिहोर येथे भजन व भाषण झाले. भूकंपाच्या धक्क्यांनी घाबरलेल्या जनतेला त्यांनी त्यावेळी धीर देला. पं. मैथिलीशरण गुप्त, आचार्य श्रीराम शर्मा आणि काका कालेलकर यांचेशी २ फेब्रुवारी रोजी महाराजांची भेट झाली. तेथे भजनादि कार्यक्रम झाले. तेथून दिल्लीला श्री.ढेबरभाईंसह महाराज 'विधायक कार्यकर्ता संमेलना'त गेले. ९ फेब्रुवारीला बुद्धाच्या सारनाथ येथे आणि १० फेब्रुवारी रोजी जयप्रकाश नारायणांच्या जन्मभूमीत महाराजांचे अद्‌भुत स्वागत झाले. राष्ट्रपती भवनात साधुसंतांच्या सत्कारसभेत 'भारत साधू समाजा'च्या योजनेवर अंतीम विचार करण्यात आला. पुढे राजस्थानातील दौऱ्यात विशेषतः हरसूदच्या सर्व प्रजेला त्यांनी मोहित केले.

अ.भा.कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री.ढेबरभाई व काही केन्द्रीय मंत्रीगण यांनी २४ फेब्रुवारीला गुरुकुंजास भेट देऊन महाराजांच्या कार्याची प्रशंसा केली. हरिजन सप्ताह, महिला शिक्षण वर्ग आदि उपक्रमांच्या उद्‌घाटन गतिविधी नागपूरच्या चिटणीस पार्कवर पार पडल्या. गुरुकुंजास १९ मार्च १९५६ रोजी प्रियदर्शिनी इंदिरा गांधी यांनी भेट दिली. त्या म्हणाल्या ''हम सब लोग जिस नवनिर्माण को रातदिन चाहते हैं, उसी का कार्य यहाँ हो रहा है। यहाँ नये जीवन का रास्ता दिखाया जा रहा है।''

'भारत साधू समाजा'चे पहिले अधिवेशन ऋषिकेश येथे दि.९ एप्रिल १९५६ रोजी सुरू झाले. त्याच्या हरिद्वार येथील ११ एप्रिलच्या खुल्या अधिवेशनात महाराजांची पुढील वर्षाकरिता अध्यक्ष म्हणून पुन्हा निवड झाली. आद्य शंकराचार्यांच्या जयंती महोत्सवात थोर थोर संतमहंतांची भाषणे झाली; 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या सूत्रावर राष्ट्रसंतांनीही चर्चा करून सर्व उपस्थितांचे समाधान

केले. गोवध बंदीपासून नशाबंदीपर्यंत व्यवहार्य चर्चा होऊन प्रचारकार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. भगवान बुद्धाच्या पंचवीसाव्या शताब्दीमध्ये वर्षभरात एक कोटी सेवातासांच्या यज्ञाची महाराजांनी चर्चा केली. या अभिनव 'समयदान यज्ञा'मुळे जनजागृतीस गती मिळाली. नागपूरला शिवजयंतीनिमित्ते राष्ट्रसंतांचे भाषण आयोजिले होते; ते आटोपून महाराज चिमूरला गेले. दि.१७ ते २४ पर्यंत चिमूरलाच महाराजांनी कार्यकेन्द्र बनविले. दि.२१ मे १९५६ ला 'जनजागृती समयदान सेवासंमेलना'चे उद्घाटन ना.दातार यांच्या हस्ते झाले. या संमेलनाचा भव्य कार्यक्रम महाराजांनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने घडवून आणला. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी चिमूरच्या तलावाजवळ श्रमदानाचे भव्य प्रात्यक्षिक झाले. त्या तलावाची पाळ श्रमदानाने एका तासात तीन फूट उंच झाली.

नाशिक, मुंबई व नंतर पंढरपूर येथे आयोजिलेल्या संत संमेलनात महाराजांनी भजने व भाषणांनी लोकांना प्रसन्न केले. धार्मिकतेच्या अवगुंठनातून येणारे त्यांचे पुरोगामी विचार धक्के देणारे असूनही सर्व संबंधितांना ते सहज पटत असत. नाशिकच्या कुंभमेळ्यात ऑगस्ट अखेरीस 'भारत साधू समाजा'चे संमेलन महाराजांच्या अध्यक्षतेखाली व्हायचे होते. त्यासाठी महाराज २८ ऑगस्टलाच नाशिकला पोहोचले. अन्य आखाडेबाज साधूंनी ठरवून त्यांच्या अध्यक्षतेला विरोध केला खरा; पण राष्ट्रसंतांनी मात्र त्यांच्या त्या विरोधावर सहज विजय मिळविला.

*'मैं पक्ष का नहि पंथ का नहिं धर्म का परधर्म का।*
*मैं हूँ निरामय साक्ष का है सत्य मार्गी वर्म का।।*
*पोथी मुझे नहिं ज्ञान दे, है ज्ञान मेरी अनुभुति।*
*जो साँच हो जहाँ भी मिले, करता हुँ मैं उसकी स्तुति।।'*

अर्थात् मी कोणत्याही धर्म-पंथाला बांधील नाही. 'आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। मत्स्येन्द्र त्याचा मुख्य शिष्य।'- अशा श्रीज्ञानेश्वरांच्या मालिकेतील समर्थ आडकोजी महाराजांच्या सत्संगात मी वाढलो आहे असे महाराजांनी सांगितले. संमेलनाला देशभरातील पाचशेच्या वर साधू हजर होते. दि.२९ ऑगस्ट पासून ४ सप्टेंबर १९५६ पर्यंत चाललेल्या या 'भारत साधू संमेलना'ची यशस्वी सांगता महाराजांच्या अध्यक्षतेखाली झाली.

विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणींची स्वतंत्र विदर्भाची मागणी सर्वश्री

आबासाहेब खेडकर, पंजाबराव देशमुख, प्र.के.अत्रे आदींच्या पुढे कमजोर पडली. त्यामुळे दिनांक १ मे १९६० रोजी मध्यप्रदेश राज्यातून विदर्भ वेगळा काढून महाराष्ट्राला जोडला गेला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल महाराजांच्या हृदयात फार प्रेम होते. त्यांनी केलेल्या सामूहिक धर्मांतराबद्दल महाराजांचे मत होते– ''हमारी मानवता कम पडने के कारण ही यह धर्मांतर का सत्र बढ चुका है।... उन्होंने अस्पृश्य समाज को बौद्ध बनाया, यह बडीही उँची समझदारी और दूरदृष्टि की बात की।'' त्यांनी लिहिलेल्या दि.७ डिसेंबरच्या श्रद्धांजली लेखात व २४ ओळींच्या डॉ.आंबेडकरांवरील श्रद्धांजली गीतात देखील हेच व्यक्त झाले आहे.

आधी दिल्ली, वरखेड आणि तिथून कौंडण्यपूर असे महाराजांना वारंवार कार्यक्रमानिमित्ते जावे लागे. श्रीगाडगेबाबांच्या उपस्थितीत महाराजांचा भजन–कीर्तनाचा कार्यक्रम कौंडण्यपूरला संपन्न झाला. पुढे दि.५ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीला 'युनेस्को परिषद' सुरू झाली. श्री.अनंतशयनम् अय्यंगार हे परिषदेचे अध्यक्ष असून देशोदेशींचे प्रतिनिधी परिषदेस उपस्थित होते. या ३ दिवसांच्या परिषदेच्या समारोप प्रसंगी अध्यक्षांनी राष्ट्रसंतांच्या विश्वबंधुत्व विचारांचे 'युनिव्हर्सल ब्रदरहूड' हे पुस्तक वितरित करून त्यांचे हार्दिक स्वागत केले. त्याप्रसंगी राष्ट्रसंतांनी शांततापूर्ण सहअस्तित्व आणि निःशस्त्रीकरणावर भर देऊन त्यासाठी भारतीय जीवनादर्श व तत्त्वज्ञान अतिशय उपयुक्त असल्याचे विवेचन केले. ते म्हणाले–''आजच्या जगात त्याग आणि सेवा याची उणीव असल्याचे पदोपदी जाणवते. आत्मभाव निर्माण झाल्याशिवाय कुणी कोणावर प्रेम करणार नाही; दुसऱ्यांना भिवविण्याच्या नादात प्रत्येक राष्ट्रच भयभीत झाले आहे; भौतिक उन्नती जीवनाला सहायक होत असली तरी आध्यात्मिक उन्नतीविना तिला परिपूर्णता मिळू शकणार नाही; आजच्या स्फोटक वातावरणास शांत व मंगलमय करायचे असेल तर सद्विचार आणि मानवतेची निर्मिती आवश्यक आहे.''

दि.१५ ते १७ डिसेंबर १९५६ दरम्यान नाथद्वारा (राजस्थान) येथे 'भारत साधू समाजा'चे प्रभावी संमेलन झाले. अनेक साधू–संत व मंत्री–श्रेष्ठींच्या उपस्थितीत ते उत्तम प्रकारे पार पडले. पहिल्याच दिवशी 'भारत साधु समाज की सेवा साधना' या राष्ट्रसंत लिखित आणि 'सुदाम' सावरकर संपादित पुस्तकाचे

प्रकाशन ना.गुलझारीलाल नंदांच्या हस्ते संपन्न झाले. परतताना २० डिसेंबर रोजी श्रीसंत गाडगे महाराजांचे निर्वाण वृत्त कळताच भुसावळ रेल्वे स्टेशनवरच महाराजांनी ३४ ओळींचे श्रद्धांजली गीत लिहून टाकले. दि. २१ रोजी अमरावती येथे गाडगेबाबांची समाधी उभारण्याबाबत त्यांच्या भक्तांदरम्यानच्या उद्भवलेल्या अटीतटींच्या संघर्षावर राष्ट्रसंतांनी हिकमतीने पण सहज स्वाभाविकपणे मात केली.

दि.२ मे १९५७ रोजी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर प्रचंड जनसमुदायाच्या साक्षीने गुरुकुंज आश्रमाच्या वस्तुमंदिराचे, सेवाश्रमाच्या महाद्वाराचे आणि श्रमदानाने निर्मिलेल्या 'सर्वतीर्थ कुंडा'चे उद्घाटन योगी सीतारामदास महाराजांच्या हस्ते करण्यात आले. जीवनातील सर्व सोळा धर्मसंस्कारांपैकी अंत्यसंस्काराशी संबंधित अशी ही योजना राष्ट्रसंतांनी गुरुकुंजात थेट प्रार्थना मंदिराच्या पुढ्यातच स्थापन करून एक महत्त्वाचे क्रांतिकारी पाऊल टाकले होते. भारत देशातील सर्व तीर्थकुंडांमधून पवित्र जल आणून ते हवनविधिपूर्वक या तीर्थकुंडात स्वामीजींच्या हस्ते ओतण्यात आले होते. 'कुठल्याही तीर्थकुंडापेक्षा आपल्या गावाचेच तीर्थकुंड श्रेष्ठ'-अशी ही महाराजांची मूर्तस्वरूपात साकार झालेली भूमिका असून पंड्याबडव्यांनी देशभर अंत्यसंस्कारांच्या नावे चालविलेले शोषण थांबवण्याची शक्तीच जणू महाराजांनी या तीर्थकुंडाद्वारे जनतेच्या हाती दिली होती!

दि.३ मे ते ६ मे १९५७ रोजी होणाऱ्या 'भारत साधू समाजा'च्या संमेलनासाठी श्रीक्षेत्र उज्जैनच्या सिंहस्थ मेळाव्यात महाराज गेले होते. संमेलनाचे उद्घाटन ना.गुलझारीलाल नंदा यांनी केले. त्या संमेलनात महाराजांचे अप्रतिम भजन ऐकून तेथे २५-३० आखाड्यांची निमंत्रणे महाराजांकडे आली.

मद्रास येथे महाराज कार्यकर्त्यां मंडळीसह गेले ते सर्वप्रथम ॲनी बेझंटच्या आश्रमात. तिथून ते केरळ राज्यात ९ ते १० एप्रिलला संपन्न होणाऱ्या 'सर्वोदय संमेलना'त सहभागी होण्यास गेले. तिथे त्रिवेन्द्रमपासून १२ मैल अंतरावरील गांधी आश्रमात आचार्य विनोबांशी त्यांची भेट झाली व 'ग्रामदान' विषयावर उपयुक्त चर्चाही झाली.

परतल्यावर मेळघाटातील धारणी येथे श्री. रामू पटेल व त्यांच्या तीर्थरूपांनी घेतलेल्या ३ दिवसांच्या सेवा संमेलनाच्या समारोपाकरिता महाराज गेले. महाराजांचा कार्यव्यस्त दौरा सतत सुरूच होता. अलिकडे तर दिल्ली, पंजाब, हिमाचल प्रदेश व म्हैसूरकडेही दौरे सातत्याने करावे लागत होते.

१ ते ४ नोव्हेंबर दरम्यान अहमदाबाद (गुजरात) येथे 'भारत साधू संमेलन' संपन्न झाले. त्याच्या खुल्या अधिवेशनाचे उद्घाटन महाराजांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपती डॉ.राजेन्द्र प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आले. सायंकाळी महाराजांचे प्रभावी भजन-भाषण झाले. दि.२ व ३ लाही माणिक नगर, माणिक चौक, बापू नगर येथे भजनादि विविध कार्यक्रम संपन्न झाले.

भूदानाद्वारे संपूर्ण क्रांती घडून येण्याची आचार्य विनोबांची अपेक्षा पूर्ण झाली नाही; म्हणून भूदानाचे रूपान्तर विनोबांनी १९५७ मध्ये ग्रामदानात केले. ग्रामदान म्हणजे संपूर्ण गावाचे स्वामीत्व-विसर्जन. पण तेही सहज मिळणार नाही हे जाणून ग्रामदानाबरोबर 'ग्रामनिर्माणा'ला विनोबाजी विशेष महत्त्व देऊ लागले. 'ग्रामनिर्माण' म्हणजे सहकार्याने गावात आदर्श राज्य निर्माण करणे. या त्यांच्या 'ग्रामनिर्माणा'च्या कल्पनेला महाराजांच्या 'समयदान यज्ञा'तून विशेष गती मिळाली असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते, आणि 'ग्रामनिर्माण' हे तर सेवामंडळाचे कार्यकर्ते कधीपासूनच करीत आले होते! 'ग्रामदान शिबिरे' देखील सेवामंडळाने कान्पा (चंद्रपूर), यावली, मोझरी, नवेगाव (चंद्रपूर), पांजरेपार, चिचफैल, राजुरवाडी येथे संपन्न केलेली होती. मराठवाड्यातील नांदेडला खा.स्वामी रामानन्द तीर्थांच्या अध्यक्षतेखाली तसेच मुखेड गावीही महाराजांनी २४ व २५ डिसेंबर १९५७ रोजी ग्रामदान व ग्रामनिर्माण संदर्भात जाहीर कार्यक्रम केले होते.

दि.२९ जानेवारी ५८ रोजी सकाळीच उपराष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन् यांनी गुरुकुंज आश्रमाला लवाजम्यासह भेट दिली. त्यावेळी त्यांच्या हस्ते 'ग्रामसहायक प्रशिक्षण सत्रा'चे उद्घाटन झाले. त्यानंतर महाराजांनी १ ते ६ फेब्रुवारी दरम्यान उत्तरप्रदेशात व दि.७ पासून १२ फेब्रुवारी पर्यंत बिहार प्रांतात दौरा केला. ऋषिकेश क्षेत्रात २० एप्रिल ते २० मे च्या साधूंच्या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन महाराजांनी केले; तर समारोप अर्थमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते झाला.

पदोपदी महाराजांच्या कार्याचा बहर वाढतच होता. त्यांच्या भजन-भाषणांनी लोक तल्लीन होऊन डोलत. मध्यंतरी हिमालयाच्या कुशीत मीराबेन कडे भेटीसाठी गेले असता मीराबेनने महाराजांचे आत्मीयतेने स्वागत केले. मात्र याच भेटीत साधूंबद्दल त्यांना आलेले वाईट अनुभव देखील त्यांनी सांगितले.

८ मे १९५८ रोजी कळंबच्या चिंतामणी हायस्कूलला भेट देऊन राळेगावच्या 'शांतिसेवा प्रचार सभे'च्या निमित्ते महाराजांनी भजनाचा कार्यक्रम

केला. दि.९ मे रोजी मुख्यमंत्री वसंतराव नाइकांच्या बंगल्यावर त्यांची भेट घेऊन पुसदला ज्येष्ठ श्री.फुलसिंग नाईक या 'डोळस आंधळ्या'ची स्नेहभेट घेतली. अमरावतीच्या हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आलेल्या आनंदराव लोणे या यावलीच्या क्रांतिकारी शेतकऱ्याचीही त्यांनी अखेरची भेट घेतली.

लाखांदूरचे शेठ मदनगोपाल भैया यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत श्री. कन्नमवारांसोबत भाग घेऊन नंतर स्वतःची कितीतरी शेती व संपत्ती लोककल्याणासाठी दान केली होती. गुरुकुंजात आयुर्वेद महविद्यालय व्हावे म्हणून २० हजार रुपये दिले होते. त्यांनीच ब्रह्मपुरीला चातुर्मास्य आग्रहपूर्वक मागून घेतला आणि चातुर्मास्याचा सर्व खर्चही त्यांनी स्वतःहूनच केला. महाराजांनी नवेगाव पांडव विभागातील २५ गावे आदर्श करण्याचा जो उपक्रम १९४६ पासून सुरू केला होता त्याचा हालहवाल ते या चातुर्मास्यादरम्यान पाहून आले. दि.१५ सप्टेंबरला या चातुर्मास्याचा समारोप झाला. दि.२३ ऑक्टोबर १९५८ ला विजयादशमीच्या मुहूर्तावर हजारो गावांमधून एकात्मता, स्वावलंबन व विधायक कार्यांतून ग्रामनिर्माण तसेच सेवामंडळाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार एखाद्या लाटेसारखा उसळून देण्याचा संकल्प प्रत्यक्षात आणण्यास प्रारंभ करण्यात आला.

जानेवारी १९५९ मध्ये नागपूर येथे अ.भा.काँग्रेसचे ६४ वे अधिवेशन भव्य स्वरूपात आयोजिण्यात आले. त्यात महाराजांचे प्रभावी भाषण झाले. पंतप्रधान नेहरूंसकट सर्व राष्ट्रनेत्यांनी विशेष अवधान देऊन ते ऐकले. काँग्रेस अध्यक्ष श्री.ढेबरभाईंनी महाराजांचा उचित गौरव केला; इतकेच नव्हे तर रचनात्मक कार्यात त्यांना गांधी-विनोबांच्या पंक्तीत बसवीत महाराजांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. दि.१३ जानेवारीला 'विदर्भ आयुर्वेदिक बोर्ड' ची सभा महाराजांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. ३० जानेवारी रोजी नागपूर येथे गांधीजींचा स्मृतिदिन संपन्न करून १ फेब्रुवारी १९५९ रोजी गुरुकुंजात 'अस्पृश्यता निर्मूलन शिबिरा'ला महाराजांनी अध्यक्षपदावरून मार्गदर्शन केले.

दिनांक १८ एप्रिल १९५९ रोजी यवतमाळ येथे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत भूदानात प्राप्त झालेल्या 'लक्ष भूमी वाटपाचा सोहळा' पार पडला. मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक, राज्यपाल श्रीप्रकाश, श्री. बापूजी अणे आदि मान्यवरांच्या उपस्थितीत १ लक्ष एकर जमीन पंडितजींच्या सुपूर्द करण्यात आली व ७३ रजिस्टर्ड कृषिसंस्थांना ती पंडितजींच्या हस्ते देण्यात आली. भूमी

संपादनातील महाराजांचा सिंहाचा वाटा मान्य करून पंडितजींनी त्यांचा जाहीर गौरव केला.

राष्ट्रसंतांच्या अध्यक्षतेखाली १ मे १९५९ पासून दिल्लीच्या रामलीला मैदानात 'भारत साधू समाजा'च्या तिसऱ्या अधिवेशनास सुरुवात झाली. त्यात पं. जवाहरलाल नेहरू, राष्ट्रपती राजेन्द्र प्रसाद आदि नेते देखील सहभागी झाले होते. देशभरातून असंख्य संतमहंत या अधिवेशनात उपस्थित झाले होते. 'भारत साधु समाजा'चा शुभ दृष्टिकोन प्रकट करणारे महाराजांचे अध्यक्षीय भाषण मननीय होते.

महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान येथे महाराजांचे दौरे सतत होत असत. दि.१२ ते १६ जानेवारी १९६० दरम्यान महाराज प्रयागच्या कुंभमेळ्यास जाऊन आले व लगेच बालाघाट, छिंदवाडा भागात जाऊन तेथील मागासवर्गीय जनतेत जागृतीची लाट सोडून आले.

मुंबईत भाई डांगे, समतानंद आदींनी तुकारामबीजेनिमित्त्य घेतलेल्या सप्ताहात महाराजांचा ध्यान-प्रार्थना-भजन- भाषण कार्यक्रम १५ मार्च ते २० मार्च १९६० दरम्यान आयोजिला होता. मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तो सुसंपन्न झाला; तर भाई डांगे यांचे हस्ते त्याचा समारोप झाला. नर्दूल्ला टँक मैदानावरील या समारोपाच्या वेळेस १० हजार लोकांची भव्य सामुदायिक प्रार्थना महाराजांनीच संचलित केली. यावेळी मुंबईचे राष्ट्रसंतप्रेमी श्री. पांडुरंगजी बोबडे यांनी मुंबईत श्रीगुरुदेव सेवमंडळाच्या १०१ शाखा स्थापन करण्याचा संकल्प घोषित केला.

दि.२२ जानेवारी १९६० ला श्रीगुरुदेव सेवाश्रम आमगाव येथे 'महिला स्पृश्यास्पृश्य शिबिरा'चे उद्घाटन महाराजांच्या हस्ते झाले. भंडारा जिल्ह्यातील तसेच झाडीमंडळ विभागांमधील ग्रामसेविका, उपग्रामसेविका, दाई यांच्याशिवायही अनेक प्रतिष्ठित महिलांनी या शिबिरात भाग घेतला. दि.२५ मार्च १९६० रोजी सिरोंचा (चंद्रपूर) येथील कमलापूर येथे महाराजांच्या हस्ते आदिवासी जनांसाठी उभारावयाच्या पहिल्या 'श्रीगुरुदेव आश्रमशाळे'चे भूमिपूजन राजे विश्वेश्वरराव आदींच्या उपस्थितीत महाराजांच्या हस्ते संपन्न झाले.

* * * * *

# नऊ : परिवर्तन आणि क्रांती

राष्ट्रसंतांच्या मते– 'परिवर्तनशीलता हा जगाचा स्वभावधर्म आहे. मात्र जगाच्या या आंदोलनात मध्यबिंदू कोणत्यातरी एका बाजूला सरकतोच; आणि हे अधिक-उणेपण घालवून जगाचा तोल सुवर्णमध्यावर आणण्यासाठी क्रांती करावी लागते.ज्यांना हा मध्यबिंदू ओळखून कार्य करण्याची दृष्टी आलेली असते तेच समाजाचे खरे पुढारी !–मग ते संत, नेते वा राज्यकर्ते कोणीही असोत. या क्रांतीचे व राष्ट्राचे सूत्र सम्यक् दृष्टी असलेल्या लोकांच्या हातात असेल तर ती क्रांती बरेच दिवस टिकेल; आणि पुढारी दूरदृष्टीचे नसतील तर तेही यात सरतील व दुसरे मार्ग निघतील. तेव्हा ही क्रांती सत्याच्या, न्यायाच्या, उज्ज्वल भारतीय संस्कृतीच्या मार्गाने डोळसपणे वाढो–आणि आपल्या देशाच्या जीवनाचा मध्यबिंदू तरुणांना कळो एवढीच माझी अपेक्षा आहे.'

त्यांच्या या भूमिकेमुळेच ते तरुणांना संपूर्ण क्रांतीकरिता सहभागाचे आवाहन करतात– ''आजच्या जगात तुम्हाला जो क्रांतिध्वज उभारायचा आहे. तो चार व्याख्याने झोडून उभारता येणार नाही, केवळ लेख लिहून होणार नाही,–तर त्यासाठी तुम्हाला आदर्श प्रचारकाचीच भूमिका स्वीकारावी लागेल.'' अर्थात् ज्या समाजात आपण उभे आहोत त्याचे अंतर्बाह्य स्वरूप ओळखून आपण आपला मार्ग आखला पाहिजे. समाजाच्या बुद्धीत व हृदयात परिवर्तन घडवून आणल्याशिवाय त्याची टिकाऊ प्रगती करता येणार नाही : आणि समाजाच्या बुद्धीत आणि हृदयात बदल करावयाचा तर समाजाशी पूर्णपणे प्रतिबद्ध होऊन कार्य केले पाहिजे.

१९६१ मध्ये महाराजांनी विशाल अशी 'चारो धाम किसान रेल यात्रा' योजिली ती कृषक जनतेतील सज्जनांनी प्रत्यक्ष देशस्थितीचे–तीर्थस्थानांचे वास्तव जाणून घ्यावे, यासाठी. त्याला उदंड प्रतिसाद लाभून साडेसहाशे यात्रेकरू स्त्रीपुरुष त्या यात्रेस गेले. सुमारे पावणेदोन महिने महाराज आणि त्यांचे निष्ठावंत कार्यकर्ते या सर्व यात्रींच्या सोयीसुविधांसाठी झटत होते. पहिली तीन धामे तर सुरळितपणे पार पडली. स्वतः महाराज देखील अनेक स्थानकांवर योजनापूर्वक भजन, भाषण, चर्चा, संवाद आदि द्वारा सेवामंडळाचे तत्त्वज्ञान सर्व संबंधितांना पचेल-रुचेल व

भावेल अशाप्रकारे प्रकट करीत सामान्य यात्रींमध्ये मिसळत होते. यात्रा सुरू होण्याच्या १ महिना आधी ऋषिकेशच्या प्लॅटफॉर्मवर दि.१६ जूनला, अमृतसर मुक्कामी सायंप्रार्थनेच्या प्रवचनात, तसेच हरिद्वार, पठाणकोट येथेही त्यांनी चौथे धाम टाळून परतण्याची सूचना सर्व यात्रींना दिली होती; पण दरवेळी यात्रींच्या उदंड आग्रहापुढे त्यांनाही माघार घ्यावी लागली. सारे यात्री दि.१७ रोजी गढवालला, १८ रोजी जोशीमठला आणि १९ रोजी पदयात्रा करीत २० रोजी दुपारी बद्रीनाथला पोहोचले. बद्रीविशालजीच्या मंदिरात प्रार्थना व भजन-भाषण झाले. २१ रोजी सकाळी निघून पुन्हा २२ रोजी जोशीमठला पोहोचले. २३ रोजी सकाळी बसेसने निघून सारे यात्री श्रीनगरला पोहोचले. २४ रोजी सकाळी निघालेल्या गाड्यांपैकी दोन्ही तुकड्या देवप्रयागपर्यंत नीट पोहोचल्या. मात्र त्यापुढच्या १६ मैलांवर तोता घाटीत एक बस एक हजार फूट खोल अशा दरीत कोसळली आणि प्रचारक, कार्यकर्ते, महाराजांचे प्रेमीजन इतकेच नव्हे तर खुद्द महाराजांच्याही प्रयत्नांना न जुमानता त्यांतले ३३ यात्री मरण पावले. हाहाःकार माजला.

या ‘चारोधाम भारत किसान यात्रे’द्वारा घडले हे की क्षेत्राचे स्वरूप, निसर्गाची रचना, लोकांचे राहणीमान, खाद्यपेय, भाषाभूषा, उद्योग, पंडेपुजारी, मंदिरमूर्ती अशा विविध बाबींचे डोळस अवलोकन यात्रींना घडले. भव्य हिमालय, पवित्र तीर्थस्थळे, पावन नद्या, जिवंत निसर्ग, अफाट शहरे, स्फूर्तिदायी संतमठ, भव्य धरणे, वास्तुशिल्प इत्यादींची प्रत्यक्ष अनुभूती प्राप्त झाली. आणि सर्वांहून थोर म्हणजे राष्ट्रसंतांचा अखंड सहवास तथा सत्संग साऱ्या यात्रींना विनासायास लाभला. यात्रींपलीकडे जनसामान्यांमध्येच नव्हे तर क्षेत्रोक्षेत्रीच्या विद्वान-पंडेपुजारी यांच्यामध्येही या यात्रेच्या माध्यमातून महाराजांनी सेवेचे-सेवामंडळाचे तत्त्वज्ञान त्यांच्या खास विवेचन शैलीद्वारा रुजविले.

श्रीक्षेत्र पंढरपूरची यात्रा आली तेव्हा महाराज १४ जुलै १९६१ ला गुरुकुंजाहून रवाना झाले आणि दि.२१ ला भजन मंडळीसह चंद्रभागेच्या तीरी पोहोचले. चंद्रभागा दुथडी भरून वाहात होती. सारे जण नावेने पैलतीरी गेले. दर्शनार्थींची मोठी गर्दी जमा झाली. दशमी व एकादशीला हनुमान मैदानात भजन व भाषणाचा विशाल कार्यक्रम झाला. नंतर द्वादशी सोडून ते पुण्याला रवाना झाले.

पुण्यात महापुरामुळे जलप्रलय उसळला होता. आपद्ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मदतीचा ओघ वळविण्याची योजनाही महाराजांनी लगेच बनविली.

पुण्याला पूरपीडितांना मदत करण्यासाठी गठित झालेल्या रिलीफ कमिटीच्या अध्यक्षांशी महाराजांनी महत्त्वाची चर्चा केली. तेथून ते नाशिकला श्री.जयरामभाई बिटको यांचेकडे मुक्काम करून भुसावळच्या कार्यक्रमास हजर झाले. नंतर विदर्भाचा दौरा करून भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती येथे वादळ व अतिवृष्टीमुळे जी अनेकानेक कुटुंबे बेघर झाली त्यांच्याही पुनर्वसनासाठी मदतीचे आवाहन करणारी पत्रके महाराजांनी दि.२१ सप्टेंबर १९६१ रोजी प्रसृत केली. आरोग्यमंत्री, सर्वोदयमंत्री यांचेसह समाजशिक्षण वर्ग घेऊन भजन, व्यायाम, प्रार्थना, ग्रामगीता इत्यादि कार्यक्रम संपन्न केले.

दि.१ सप्टेंबर १९६१ रोजी दिल्लीला 'अखिल भारतीय नशाबंदी संमेलन' अर्थमंत्री ना.मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखली संपन्न झाले. त्यात महाराजांचेही महत्त्वपूर्ण भाषण झाले. अमरावती व वर्धा जिल्ह्यांमध्ये गणेशोत्सवात महाराजांचे जनप्रबोधनपर कर्यक्रम गाजत होते. राष्ट्रीय एकात्मतेचे तर ते अध्वर्युच होते. सप्टेंबर १९६१ अखेरीस दिल्लीला निवडक विचारवंतांचे 'राष्ट्रीय एकता' संमेलन आयोजिले होते. पंडित नेहरूंनी सुद्धा अलिकडे राष्ट्रसंतांच्या एकात्मता विचारात विशेष लक्ष घातले होते. त्यामुळे त्यांनी त्या संमेलनात 'राष्ट्रीय एकात्मता समिती' निर्माण करून तिची अध्यक्षता राष्ट्रसंतांकडेच सोपविली. एकदा तत्कालीन गृहमंत्र्यांनी महाराजांपुढे 'भारत सेवक समाज' हे संघटन 'श्रीगुरुदेव सेवामंडळा'शी विलीन करण्याचा प्रस्ताव ठेवून पंडितजींचे नाव पुढे केले. मात्र महाराजांनी त्या संदर्भात पंडितजींना भेटून त्यांचे मनोगत विचारले तेव्हा पंडितजींनी स्पष्ट शब्दात सांगितले– ''मैं भारत सेवक समाज को अच्छी तरह जानता हूँ। थोडा सा राष्ट्रकार्य जो अभी श्रीगुरुदेव सेवामंडल द्वारा हो रहा है, वह भी बंद हो जायगा। ऐसी गलत सलाह मैं कभी नही दूँगा।''

श्रीगुरुदेव सेवा मंडळाद्वारे या वर्षीचा चातुर्मास्य छिंदवाडा जिल्ह्यातील सौंसर येथे घेण्याचे ठरले. त्यानुसार संत दामोदर महाराजांच्या हस्ते दि.२५ सप्टेंबर १९६१ रोजी सामुदायिक प्रार्थनेने त्याचे उद्‌घाटन करण्यात आले. मध्यप्रदेश, महाराष्ट्र, नागविदर्भ, मराठवाडा, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश या प्रदेशांतून आलेल्या

१०० कार्यकर्त्यांनी त्यात भाग घेतला. राष्ट्रीय एकता, आदर्श ग्रामनिर्माण, कृषिसुधार, सहकार, गोसेवा, आरोग्य, पंचायतराज, सामुदायिक प्रार्थना, भजन, व्यायाम, ग्रामगीता आदि विषयांचे प्रशिक्षण दिले जात होते. महाराज स्वतः ७ ऑक्टोबर १९६१ पासून अखेरपर्यंत या चातुर्मास्यात थांबले व प्रबोधनाने सर्वांना प्रेरणा दिली.

दि.४ फेब्रुवारी १९६२ रोजी अष्टग्रहांचे अनिष्ट स्थानी येणे जगाला महाभयंकर फलदायी ठरणार अशी भविष्यवाणी बुवापंडितांनी केली, तेव्हा यज्ञाद्वारे ग्रहशांती करण्याचे ठरले. महाराज गावोगावी फिरून जनतेला धीर देत होते. आणि यज्ञयाग, दान-अनुष्ठान आदि सांगून जनतेचे शोषण करणाऱ्यांना शह देत होते. यज्ञयागासारख्या कर्मकांडाच्या रूढी त्यांना बिलकुल पसंत नव्हत्या. परंतु आपले विचार कोणावर लादणे मात्र त्यांना योग्य वाटत नव्हते.

दि.१५ नोव्हेंबर १९६१ ला वरखेड येथे सद्गुरुंच्या स्मृति महोत्सवाला आरंभ झाला तेव्हा भिन्न भिन्न संप्रदायांची भजनी मंडळे एकत्र बोलावून जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात आले. या महोत्सवातील 'ग्रामसुधार शिबिरा'चे उद्घाटन श्रीशिवाजी रुरल इन्स्टिट्युटचे संचालक श्री. मामासाहेब लोंढे यांचे हस्ते झाले. याप्रसंगी राष्ट्रसंतांनी सद्गुरु आडकोजी महाराजांच्या परमहंस दशेवर विशेष प्रकाश टाकला. आडकोजी महाराजांची महाराजांनी नुकतीच आणलेली मूर्ती कार्तिक शुद्ध पौर्णिमेला बसविण्यात यायची होती. तेव्हा भगावन श्रीकृष्णाची आधीच प्रतिष्ठापित झालेली मूर्ती काढून टाकून तेथे सद्गुरुची मूर्ती बसविण्यास महाराजांनी सांगितले. भक्तगण कच खाऊ लागले. त्यावेळी ''गुरुपेक्षा देव मोठा नाही; सर्व देव गुरुदेवात आले आहेत''- असे सांगून त्यांनी बिथरलेल्या भक्तांचे समाधान केले.

दि.२५ ते ३० नोव्हेंबर १९६१ दरम्यान पाटणा येथे 'भारत साधू समाजा'चे चौथे अधिवेशन स्वामी अखंडानंद यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्याचे उद्घाटन लोकसभेचे सभापती अनंतशयनम् अय्यंगार यांनी केले. संमेलनास एक हजार साधू उपस्थित होते. राज्यपाल श्रीप्रकाशांच्या उपस्थितीत २५ व २६ रोजी महाराजांनी प्रभावी मार्गदर्शन केले. या अधिवेशनाचे वेळी महाराजांनी बिहारच्या पाटणा विभागाचा व दिल्ली प्रदेशाचा दौरा केला व प्रभावी मार्गदर्शन

केले. नंतर यवतमाळ येथे आझाद मैदानावर भजनाचा कार्यक्रम भव्य स्वरूपात झाला. दि.६ डिसेंबर १९६१ रोजी लाखांदूर येथे श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवात काल्याचे प्रसंगी महाराजांचे भाषण झाले. अमरावती येथे 'लघुउद्योग व गृहोद्योग' या विषयावर तज्ज्ञांची चर्चा झाली, त्यात राष्ट्रसंतांनी प्रत्येक घरी एक तरी गृहोद्योग सुरू करण्याची निकड स्पष्ट केली.

दि.२८ डिसेंबर रोजी किरमिट (चंद्रपूर) येथे 'आदर्श ग्रामनिर्माण कार्यकर्ता शिबिरा'मध्ये महाराजांनी कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. दि.३० व ३१ डिसेंबर १९६१ ला नागपूरला भव्य प्रचार शिबीर घेण्यात आले, त्यासाठी महाराजांनी संदेश दिला. ३० लाच नवेगाव पांडव येथील १० दिवसांच्या श्रीगुरुदेव 'ग्रामनिर्माण प्रशिक्षण वर्गा'चा समारोप महाराजांनी केला. सततचे दौरे आणि कार्यक्रमांची दगदग यामुळे महाराजांची प्रकृती साथ देईनाशी झाली होती. त्यामुळे शरीराला निसर्गोपचार व विश्रान्ती देण्याचे ठरले. दि.४ जानेवारी १९६२ पासून उरळी-कांचन (पुणे) येथे महाराजांच्या ११ दिवसांच्या निसर्गोपचाराला आरंभ झाला.

महाराष्ट्राचे राज्यपाल श्री.श्रीप्रकाश दि.१९ जाने. १९६२ ला गुरुकुंजात आले तसेच माजी केन्द्रीय वित्तमंत्री श्री.सी.डी. देशमुख गुरुकुंजास भेट देऊन गेले; व त्यांनी संतोषपूर्वक विचार व्यक्त केले. दि.२८ ते ३१ जानेवारी मध्ये श्रीगुरुदेव सेवामंडळाची षण्मासिक मध्यवर्ती प्रतिनिधी सभा गुरुकुंजात संपन्न झाली. त्यात महाराजांनी सर्वाधिकाऱ्यांकडून ठरावांची अंमलबजावणी करवून घेण्यासाठी विशाल सभाध्यक्ष हे पद नव्याने निर्माण केले. दि.२९ जानेवारी रोजी गुरुकुंजात श्रीगुरुदेव विद्यामंदिराच्या स्नेहसंमेलन प्रसंगी ''बालकांना विश्वव्यापी धर्माची शिकवण देणे हेच विद्यामंदिराचे कार्य आहे''-असे महाराजांनी सांगितले.

दि.१३ फेब्रुवारी नंतर मराठवाड्यात घटनांदूर आदि गावी कार्यक्रम करून दि.१६ पासून महाराजांनी कोल्हापूर विभागात दौरा केला. विश्रामगृहात मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचेसोबत त्यांची चर्चा झाली. १९ फेब्रुवारी पर्यंत कोल्हापूर विभागात महाराजांचा हा दौरा होता. त्यानंतर कोल्हापूर, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, मुंबई वगैरे ठिकाणी भ्रमण करून वं. महाराजांनी महिला व समाजशिक्षणाचा प्रचार केला. दि.४ मार्चला सालबर्डी व बागापूर येथे कार्यक्रम झाले. दि.७ रोजी कमलापूर

या आदिवासी भागातील आश्रमाची व्यवस्था लावून दि.११ मार्चला पांढरकवडा येथे महाराजांनी खंजरी भजनाचा कार्यक्रम केला, तर २० मार्चला दिल्लीस प्रयाण केले. नंतर हरिद्वारच्या कुंभमेळ्यात २७ मार्च ते १३ एप्रिल पर्यंत महाराजांचे अनेकविध कार्यक्रम संपन्न झाले.

आंध्र प्रदेशातील 'ग्रामजयंती' महोत्सव १ एप्रिल ते ६ मे पर्यंत होता. विठ्ठलराव कळसकर हे त्याचे प्रमुख आयोजक होते. यावेळी महाराजांचा ५३ वा वाढदिवस आदिलाबाद जिल्ह्यात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्यतः आंध्रप्रदेश जागृत नि संस्कारित करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला होता, त्यानुसार २२ एप्रिल ते ३० एप्रिल मध्ये तुफानी दौरा करून शेकडो गावांना त्यांनी भेटी दिल्या. तेव्हा १५० प्रचारक महिनाभर जिल्ह्यात सर्वत्र फिरत होते. ६ मे १९६२ रोजी ग्रामजयंतीचा मोठा कार्यक्रम आदिलाबाद व निजामाबाद येथे पार पडला. अहमदाबाद (गुजरात) येथेही ना.भाई अदाणींच्या अध्यक्षतेखाली २९ एप्रिल रोजी ग्रामजयंती महोत्सव साजरा करण्यात आला.

दि. ८ मे १९६२ ला गुरुकुंजात संत संमेलन व ग्रामजयंतीचा कार्यक्रम झाला. ९ मे रोजी 'पारिवारिक शिबिरा'चे उद्घाटन केले. त्यावेळी 'विदर्भ हरिजन सेवक संघा'चे अध्यक्ष श्री रामकृष्ण बेलसरे वकील यांनी शिबिराला भेट दिली. वं. महाराजांनी संतोष प्रगट करून मार्गदर्शन केले. नंतर मुंबईस पाठविण्याच्या दृष्टीने गुरुकुंजातील विविध योजनांचा आराखडा करून दिला. स्वर्गीय महाराजा जिवाजीराव शिंदे हे ग्वाल्हेरचे धुरंधर, दानशूर राजकारणी होते, त्यांच्या स्मृति महोत्सवाला दि.५ जुलै १९६२ ला महाराज हजर राहिले. राजमाता विजयाराजे यांनी महाराजांचा भावपूर्ण सत्कार केला. ग्वाल्हेर मध्ये तीन दिवस महाराजांचे भजन गाजले.

दि. ६ ऑगस्ट १९६२ ला भजनी संचासह महाराज अयोध्येला गेले. तेथे त्यांचा मुक्काम १४ ऑगस्ट पर्यंत होता. ''श्रीरामाचे संपूर्ण जीवन मानवजातीच्या सेवेस्तव व्यतीत झाले. सामाजिक मर्यादांचे पालन त्यांनी केले. म्हणूनच त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हणून आपण संबोधतो.'' महाराजांनी फैजाबाद येथील सैनिक छात्रांना व सैनिकांना सेवाधर्माचा संदेश दिला. तेथून महाराज प्रयाग, प्रतापगड, बैतुल, मुंबई इत्यादि ठिकाणी गेले व दि.१९ ऑगस्टला गुरुकुंजात परत आले.

वैनगंगेच्या पलिकडे मेहेंदीवाडा, छिंदवाडा, बैतुल, बालाघाट व द्रुग विभागात चातुर्मास्य आयोजित केला होता, तिथे महाराजांचा संदेश ग्रहण करण्यासाठी अमाप जनता व नेते सुद्धा आले होते. कोल्हापूरचे छत्रपती शहाजी राजे यांनी भोसले घराण्यातील शाहुराज (दिलीपकुमार) यांना दत्तक घेतले व गादीचे वारस केले. त्यावेळीही सत्कार समारंभाला महाराज हजर होते.

१९५६ मधील भारतभेटीत चीनच्या चौ-एन-लाय नी पड घेऊन मॅकमोहन रेषा मान्य केली होती. १९६० मध्येही दिल्लीला ६ दिवस बोलणी झाली. त्यातील चीनचा ५० हजार चौरस मैलांचा दावा खोटा असल्याचे १९६१ मध्ये सिद्धही झाले. तरीही जुलै १९६२ मध्ये गलवान खोऱ्यातील ठाण्याला चिनी सैनिकांनी वेढले आणि २० ऑक्टोबरला इशान्य सरहद्द एजन्सी भागात व लडाख भागात चिनी सैन्याने मोठी चढाई केली. पंडित नेहरूंनी वाटाघाटीची तयारी दाखविल्यावरही चीनने निर्लज्ज आक्रमण करून भारताच्या अस्मितेलाच आता आव्हान दिले होते. 'भाऊ भाऊ' म्हणून चीनने असा विश्वासघात केला व पंचशील तत्त्वांचा धुव्वा उडविला. लडाख व नेफावर हल्ले केले. तेव्हा महाराज म्हणाले, ''राष्ट्र रक्षण हा आमचा आद्यधर्म होय!'' त्यांनी तरुणांना सैन्यात भरती होऊन राष्ट्राचे रक्षण करण्याचे आवाहन केले. त्यांच्या 'चीन-निषेध-गीत' मधील कितीतरी भजनांद्वारे महाराज भारतीय जनतेत जागृतीची लाट निर्माण करीत होते- 'सांभाळुनि घे पाय, पुढे बघ धोका आहे तुला। भारता! धुंद कसा जाहला?'... ''आमचा देश शांततावादी असला म्हणून आम्ही शेळ्या-मेंढ्याप्रमाणे राहाता कामा नये. शत्रूंशी आम्ही सर्व शक्तीनिशी मुकाबला करू.''-असे नागपूर येथील पटवर्धन मैदानावर महाराजांनी भर सभेत घोषित केले.

दि.८ नोव्हेंबर ६२ रोजी वृंदावन क्षेत्री झालेल्या 'भारत साधु समाजा'च्या सभेत विदेशीयांचे आक्रमण निरस्त करण्याचा प्रस्ताव मंजूर केला गेला व या कार्यात सर्वांनी मदत करण्याचा निश्चय व्यक्त करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज त्या समितीचे अध्यक्ष झाले होते. त्यांनी जनजागरण करण्यासाठी साधुमहात्म्यांच्या नावे पत्रक काढून जनतेत आत्मविश्वास वाढविला. याच सुमारास भारताचे पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांनी ना. यशवंतराव चव्हाण यांना संरक्षणमंत्री नियुक्त केले, त्याबद्दल महाराजांनी संतोष व्यक्त केला. दि.२ डिसेंबर

१९६२ रोजी लोखंडी जत्था येथे सेवामंडळाच्या ५०० कार्यकर्त्यांच्या रक्तदानाचा शुभारंभ करताना स्वत:ही रक्तदान करून त्यांनी प्रभावोत्पादक भाषण केले : ''चीनने शस्त्रसंधी केली तरी त्यावर विश्वास ठेवू नका''– अशी स्पष्ट भूमिका मांडली. 'चीन निषेध गीत' हे पुस्तक १५ डिसेंबर १९६२ ला प्रसिद्ध करून महाराजांनी त्यातून प्राप्त होणारा निधी राष्ट्रीय संरक्षण कोषाला समर्पित केला होता.

१६ डिसेंबर १९६२ रोजी सेवाग्राम येथे विशाल 'शांती संमेलन' संपन्न झाले. त्यात सेवासंघ, हरिजन सेवक संघ, गांधी स्मारक समिती, सर्वोदय समिती आदींचे प्रमुख प्रतिनिधी संमीलित झाले होते. आयोजक डॉ.आर्यनायकम् यांनी सर्वश्री ढेबरभाई, जयप्रकाश नारायण, दादा धर्माधिकारी, श्रीमन्नारायण अग्रवाल यांच्याबरोबरच महाराजांनाही त्यात आमंत्रित केले होते. चीनने केलेल्या आक्रमणाविरुद्ध गांधीवादी विचारकांनी कोणते पाऊल उचलावे यासंबंधी खूप विचार विनमय होऊन 'सत्याग्रह', 'शांतिसेना' हे विषय घोळले गेले; पण कोणताही ठोस कार्यक्रम पुढे आला नाही. शेवटी महाराजांनीच निर्णय केला–''गांधीवाद हे काही भित्र्या अशक्ततेचे नाव नाही. गांधीजींची शक्ती घ्या पण भ्याड बनून नव्हे, तर साहसी बनून !.. तुम्हाला शांती प्रकट करायची आहे, तर ज्याने आक्रमण केले त्या चीनला प्रथम शांती शिकवा. शत्रू छातीवर बसला असताना आम्ही 'शांति शांति' चा कण्ठशोष करू तर देश गर्तेत जाणार नाही का?... जगाला शांतीचा संदेश आम्ही देऊ, पण केव्हा?– आमच्या देशावरील संकट टळेल तेव्हा! आज शांति जिवंत ठेवायची असेल तर आमच्या प्रधानमंत्री नेहरूंचे हात आपल्याला आधी बळकट करावे लागतील.''

या युद्ध परिस्थितीत 'भारत साधू समाजा'ने महाराजांचा जनजागृती दौरा बिहार आणि आसामात आखला होता. सेवाग्रामनंतर दि.१७ ला इटारसीचा कार्यक्रम करून महाराज रेल्वेने अलाहाबादला व तिथून सायंकाळी पाटण्याला पोहोचले. बिहारच्या सदाकत आश्रमात डॉ. राजेन्द्रप्रसाद आजारी होते. दि.१९ डिसेंबर १९६२ ला त्यांना राष्ट्रसंत भेटले. ते देशाच्या चिंतेने व्याकुळ झाले होते. त्यांना महाराजांनी धीर दिला. दि.२० डिसेंबर १९६२ ला ते सिलीगुडीला पोहोचले. तेथून चीनची सीमा ६ मैलांवरच होती आणि पाकिस्तानची सीमा १० मैलांवर होती. सिलीगुडीत महाराजांनी वीरगर्जना केली. सायंकाळी ५ वाजता विशाल

मैदानावर प्रचंड समुदायासमोर भजन-भाषणाचा स्फूर्तिप्रद कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर रंगला. त्याच दिवशी सायंकाळी ते गोहाटीला पोहोचले व २१, २२ डिसेंबर १९६२ रोजी रोमांचकारी भजन-भाषणाने त्यांनी श्रोत्यांना व छात्रांना मुग्ध केले. ''हम भारत की शान हैं। वीरों की सन्तान हैं।'', ''लड जायेंगे बढ जायेंगे हम हिंमत के साथ, भारत से टकराओगे, मिट्टी में मिल जाओगे ।'', ''आओ चीनियों मैदान में, देखो हिंद का हाथ।''- अशी महाराजांची धगधगती खंजरी ऐकून सर्व सैनिक उत्साहित झाले. गोहाटीनंतर कटिहार, समस्तीपूर, तेजपूर, पातेपूरमठ, जयनगर, पुपरी, सीतामढी, तुर्कीमठ, मुजफ्फरपूर, मोतीहारी, रक्सोल या नेफा युद्धसीमेजवळच्या गावांमध्येही राष्ट्रसंतांची खंजरी धगधगली व सैनिकांना लढण्याचे स्फुरण चढले. दि.२ जानेवारी १९६३ रोजी पाटणा शहरी राज्यपालांनी विशाल कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात महाराजांच्या खंजरी भजनांनी किसान मजुरापासून तर कारखानदार, व्यापारी, कलाकार, शासनाधिकारी आदि सर्वांनाच प्राप्त कर्तव्याची जाणीव करून दिली.

राष्ट्रसंतांची तपोभूमी गोंदोडा (चंद्रपूर) येथे गुरुदेव सेवामंडळाची मध्यवर्ती प्रतिनिधी सभा संपन्न झाली. दि.६ ते ८ जानेवारी पर्यंत वं. महाराजांनी सभेला वेळोवेळी मार्गदर्शन केले. भारताच्या संरक्षणमंत्र्यांशी महाराजांनी दि.१५ जानेवारी १९६३ रोजी भेटून चर्चा केली. म्हणाले- ''आपली प्रतिकारक्षमता, परराष्ट्रांची मदत आणि जगभरात झालेली त्यांची नाचक्की यांमुळे चीनने युद्धविरामाची घोषणा केली खरी; पण ती फसवी आहे. आपण आपली संरक्षणव्यवस्था उत्पादनाच्या जोरावरच मजबूत करू शकू.'' ना.श्री.यशवंतराव चव्हाण यांना महाराजांनी भजन ऐकविले-

*दिलवर के लिए दिलदार हैं हम । शत्रू के लिए तलवार हैं हम ।।*
*मानव के लिए परिवार हैं हम। दानव के लिए अंगार हैं हम।।*

गुरुकुंजातील १३ वा गणराज्यदिन २६ जानेवारी १९६३ ला साजरा झाला. त्या प्रसंगी महाराजांनी तिरंगा ध्वज फडकविला व बँडवर राष्ट्रगीत वाजले. इस्राईलचे भारतातील व्हाईस कॉन्सुलर सिमॉन अवीझमायर यांनी परिसंवादाचे उद्‌घाटन केले. याप्रसंगी 'ग्रामरक्षक दलाची आवश्यकता' या विषयावर महाराजांनी उद्‌बोधक भाषण दिले. दि.२८ जानेवारी १९६३ रोजी वं. महाराजांच्या दिल्लीतील

भेटीत पं. जवाहरलाल नेहरू व श्री. गुलझारीलाल नंदा यांनी दारुबंदीविषयी विचार मांडले. राष्ट्रसंत म्हणाले– ''सरकार, साधूसमाज आणि समाजसेवक यांना संयुक्त अभियान चालवावे लागेल,– तरच दारुबंदी होऊ शकेल.'' त्यासाठी राष्ट्रसंतांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली गेली.

दि.७ फेब्रुवारी १९६३ रोजी मराठवाड्यातील दौरा संपवून महाराज अमरावतीस आल्यावर जोशी हॉलमध्ये मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार व ग्रामीण विकास मंत्री डॉ. गोपाळराव खेडकर यांच्या उपस्थितीत वं. महाराजांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय संरक्षण निधी व पंचायत घर' या विषयावर भव्य सभा संपन्न झाली. त्यात राष्ट्रीय संरक्षण निधीस अनेक लोकांनी देणग्या दिल्या. दि १० फेब्रुवारीला श्री.ढेबरभाई यांच्या हस्ते गुरुकुंज येथे 'आदिवासी प्रशिक्षण केन्द्रा'चे उद्घाटन महाराजांचे अध्यक्षतेखाली झाले. दि.१३ ला मंगरूळनाथ (अकोला) येथील तीन दिवसांच्या स्वावलंबन शिबिराचा महाराजांनी समारोप केला, त्यावेळी तरुणांना सैन्यात भरती होण्याचे आवाहनही केले. दि.१४ ला नांदुरा येथे 'श्री गुरुसमाज शिक्षण वर्ग' एक महिनाभर चालवून श्रमदानाद्वारे गावातील रस्ते, नाल्यामोऱ्या, खतखड्डे आदिंनी गावाची सुधारणा केली. २५ गावांच्या महिला प्रतिनिधींची एक संघटना निर्माण केली. व्यापारी, सरकारी अधिकारी, डॉक्टर इत्यादींनी प्रामाणिकपणे आपापले संकल्प पार पाडले पाहिजेत, अशी शिकवण दिली.

दि.२८ फेब्रुवारी १९६३ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा मृत्यू झाला. त्यावेळी महाराज मांगली (चंद्रपूर)च्या धावत्या दौऱ्यावर होते.

गुजरातमधील दौऱ्यात डाकोर येथे १६ मार्च ६३ रोजी महाराजांनी 'सहकार'विषयावर भाषण दिले व करोलबागच्या महंतांशी विशेष चर्चा केली. तसेच प्राणीसंग्रहालयाचे निरीक्षण केले. मध्यप्रदेशातील खैरलांजी (बालाघाट) येथे त्यांनी सांस्कृतिक वर्ग घेतला. चांदामेटा येथे नव्या शाखेचे उद्घाटन केले व सेवा सहकारी संस्था निर्माण केली. एप्रिल महिन्यात ग्रामजयंतीनिमित्ते श्रमदान करून शाळा, दवाखाने, नाल्या, खतखड्डे यांची स्वच्छता करून त्यांनी गावात नवचैतन्य निर्माण केले. १ एप्रिल १९६३ ला रामनगर (खापा) येथे रामजन्मोत्सवा

प्रीत्यर्थ सार्वजनिक प्रार्थनादि विविध कार्यक्रम पार पडले. त्यात नशाबंदी शिबिराचे उद्घाटन महाराजांनी केले. महाराष्ट्राचे महसूलमंत्री श्री. वसंतराव नाईक यावेळी हजर होते. हेटी (सावनेर) येथे कोंबड्या-बकऱ्यांचे बलिदान देणेही महाराजांनी याचा दौऱ्यात बंद पाडले.

आंध्र प्रदेशात इंद्रवली गावात ग्रामजयंतीनिमित्ते दि. १५ एप्रिल रोजी महाराजांनी स्वागत स्वीकारून दर्शनी संदेश दिला व भजनादि कार्यक्रम पार पाडले. दि.१७ एप्रिल रोजी त्यांनी आरमूर येथे लक्ष्मीनारायण मंदिरात प्रवचन व शंकासमाधानादि कार्यक्रम केले. महाराजांच्या प्रेरणेने पारिवारिक शिबिराची योजना १९६० पासून सुरू करण्यात आली होती. सेवाग्राम, वाशिम, गुरुदेवनगर येथे अशी शिबिरे संपन्न झाली.

पंढरपुरात दि.१ व २ जुलैला महाराजांचे प्रभावशाली कार्यक्रम झाले. व्यंकटस्वामींच्या मठाजवळ धर्मशाळेचे भूमिपूजन श्री.दादासाहेब कन्नमवार यांच्या हस्ते झाले. तेव्हा वं. महाराज अध्यक्षस्थानी होते. त्यांनी जनतेला आपल्या भाषणातून मदतीचे आवाहन केले. महाराजांनी महाराष्ट्र तीर्थयात्रा समितीसोबत सातारा, कोयना, पुणे, आळंदी, देहू, मुंबई, नाशिक आदि स्थळांना भेटी दिल्या. चार्तुमास्यानिमित्त गुजरात व सौराष्ट्राचा दौरा केला व भजनादि कार्यक्रम केले. मुंबईत १ ऑगस्ट ६३ रोजी 'शिवशक्ती'ला महाराजांनी भेट दिली तेव्हा आचार्य अत्रे यांनी त्यांचे स्वागत केले.

गुजरात राज्याच्या नशाबंदी विभागाने राष्ट्रसंतांचा दि. १५ ते २१ ऑगस्टपर्यंत दौरा आयोजित केला होता. त्यावेळी महाराजांनी राष्ट्रनेत्यांना कर्तव्याची जाणीव करून दिली, तसेच नशाबंदीवर जोर दिला. रात्री महात्मा गांधींच्या पोरबंदर येथील जन्मस्थानी- कीर्तिमंदिरात भजनाचा कार्यक्रम झाला. द्वारका, मिठापूर व सुरेंद्रनगरला त्यांनी भेट दिली.

महाराष्ट्रातील गणेशात्सवात मुंबई, नाशिक, अमळनेर, कुर्डुवाडी, छिंदवाडा व नागपूर येथे कार्यक्रमाला हजर राहून महाराज ओजस्वी संदेश देत राहिले. भडोचच्या शिवेवर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षांनी त्यांचे भव्य स्वागत केले. बडोदा येथे भजनाचा कार्यक्रम झाला. तेथे त्यांना ५० बंदुकींची सलामी देण्यात आली. रणांगणातील वाद्याप्रमाणे बँडचा ध्वनी सुरू होता. नंतर करजण

गावात एका हायस्कूलमध्ये वं. महाराजांचा भजन-भाषणाचा प्रभावी कार्यक्रम दि.१० व ११ सप्टेंबर १९६३ रोजी झाला. पुढे दि.१२ सप्टेंबर १९६३ ला वडोदरावरून डाकोरला व उमरेडला सहकारी मंदिरात स्वागत झाले. तेथे राष्ट्रधर्म जागृतीचा संदेश महाराजांनी दिला व प्रचारयात्रा आरंभली. दि.१३ ला ध्यानाचा कार्यक्रम झाल्यावर भागवत प्रवचनाद्वारे वं. महाराजांनी गुजरातमधील लोकांना थक्क करून सोडले. तसेच दि.१४ सप्टेंबर १९६३ ला साबरमती येथे प्रवचन व भजनाचा कार्यक्रम करून त्यांनी तरुणाईमध्ये नवे चैतन्य ओतले.

दि.२ ऑक्टोबर १९६३ रोजी गांधी जयंतीच्या मुहूर्तावर 'राष्ट्रधर्म जागृती समिती'चे प्रमुख या नात्याने राष्ट्रसंतांनी मुंबईस कीर्तन-प्रवचनकार संमेलन आयोजित केले. नवे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी 'कीर्तन-प्रवचनकार सम्मेलना'चे उद्घाटन केले. अध्यक्ष मुख्यमंत्री कर्मवीर दादासाहेब कन्नमवार होते. महाराजांचे त्यावेळी भाषण झाले. कीर्तनकारांना राजश्रय मिळाला. अनेक नामांकित कीर्तनकार यावेळी उपस्थित होते. श्रीमहामंडलेश्वर, श्रीमंतस्वामी कृष्णानंद यांनी भाषणातून महाराजांच्या कीर्तनाची प्रशंसा केली.

दि.२८ डिसेंबर १९६३ रोजी महाराजांनी अमरावतीच्या नेहरू मैदानावर महाराष्ट्र वीरशैव परिषदेचे उद्घाटन करून भाषण दिले. त्याच सुमारास जपानहून 'अनानाई क्यो'चे संस्थापक संत श्री योनोसुको नाकानो यांनी पत्राद्वारे विचार व्यक्त केले होते की, ''जगात धार्मिक-सामाजिक उन्नतीसाठी कार्य करणारे जितके काही महानुभाव आहेत त्यांच्यातील श्रेष्ठ विभूती तुकडोजी महाराज असून ते भारतात सामाजिक व आध्यात्मिक उत्थानाचे उत्कृष्ट कार्य करीत आहेत.''

दि.६ जानेवारी रोजी डॉ. हिरालालजी जैन यांनी 'जबलपूर साहित्य संघा'तर्फे वं. राष्ट्रसंतांचे अभिनंदन केले. त्यावेळी महाराजांनी 'राष्ट्रीयता हाच आजचा खरा धर्म' या विषयावर भाषण केले. 'महाराष्ट्र मुद्रण परिषदे'चे तेरावे अधिवेशन नागपूर येथे झाले. त्याचे उद्घाटन सुद्धा महाराजांनी दि.१२ जानेवारी १९६४ रोजी केले.

दि.२१ जानेवारी ते १ फेब्रुवारीपर्यंत महाराजांची निरनिराळ्या ठिकाणी भाषणे झाली व त्यांनी पावलोपावली जगाला नवा प्रकाश दिला. नागपूरच्या श्रीगुरुदेव सेवाश्रमामार्फत महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर 'श्रीगुरुदेव पशुपतिनाथ यात्रा'

आयोजित केली गेली होती, ती दि.४ फेब्रुवारी ला नागपूरहून खास रेल्वेने सुरू झाली. भेडाघाट, जबलपूर, प्रयाग, काशी, अयोध्या, गया, पाटणा व नेपाळ मधील काठमांडूचे पशुपतिमंदिर अशी क्षेत्रमंदिरे आटोपून विश्वकवी रविंद्रनाथांचे शांती निकेतन (बंगाल), कलकत्ता, जगन्नाथपुरी वरून टाटानगर व भिलई आदि झाल्यावर नागपूरला पुनरागमन-असा हा यात्रेचा कार्यक्रम होता. निरंतरच्या दगदगीमुळे राष्ट्रसंत पुन्हा आजारी पडले. गावोगावची जनता चिंताग्रस्त झाली. दारू-गांज्यासारख्या दुर्व्यसनाविरुद्ध महाराज प्रचार करीत होते. पण त्यांचे प्रसिद्ध निंदक-टीकाकार ॲड्.अकर्ते वकिलांनी महाराजांची निन्दा करून ''तो मंत्र्याचे पाय चाटणारा, सरकारचा दलाल आहे; तो काय दारुबंदीविरुद्ध बोलेल?''-असे उद्‌गार काढले होते. महाराजांना जेव्हा ते कळले तेव्हा त्यांनी स्वत: पत्रक लिहून ते लगेच वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध केले. त्यामुळे अकर्ते वकिलाची नामुष्की झाली. त्याच सुमारास दारुबंदीविषयी अनेक भजने व पोवाडेही महाराजांनी लिहिले होते.

वर्षप्रतिपदेला घुसर (अकोला) येथे दि.२८ मार्च १९६४ रोजी महाराजांनी 'श्रीगुरुदेव महिला शिबिरा'च्या समारोपाप्रीत्यर्थ भजन-भाषणादि कार्यक्रम केले. जीवन प्रचारिका श्रीमती देवकाबाई खंडारे यांनी हे शिबीर उत्तम प्रकारे संपन्न केले होते. नंतर बालाघाट, छिंदवाडा व सौंसर आदि सेवाश्रमांच्या मार्गदर्शनासाठी दि.८ व ९ एप्रिल १९६४ ला महाराजांनी दौरा काढला. दि.११ एप्रिलला मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या उपस्थितीत रूरल इन्स्टिट्यूटच्या खुल्या रंगमंचावर श्री. मामासाहेब लोंढे याचा अपूर्व सत्कार पार पडला, तेव्हा समारंभाचे अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख हे होते. महाराजांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. ग्रामजयंतीनिमित्ते महाराजांनी जनजागृतीसाठी मराठवाड्यातील जांब येथे दि.१९ एप्रिल रोजी कार्यक्रम केला. महाराजांच्या ५५ व्या जयंतीचा हा कार्यक्रम महाराष्ट्रभर गाजला. दि.१ एप्रिल ते २९ एप्रिल या दिवसांपैकी पश्चिम महाराष्ट्रातील दि.१३ ते १७ या दरम्यान ठाणे, पुणे, बारामती, फलटण, सातारा, सांगली, कोल्हापूर येथे महाराजांचे कार्यक्रम झाले.

गोव्यात जनजागृती करण्यासाठी 'स्वामी विवेकानंद समिती'ने आग्रह केला म्हणून महाराज गोव्यात गेले. दि.८ मे १९६४ रोजी फोंडा येथील विठ्ठल

मंदिरापुढे त्यांच्या भजन व भाषणाचा कार्यक्रम झाला. ९ मे ला दुपारी साखळी गावी व डिचोली गावी कार्यक्रम झाला. १० मे ला पेडणे येथे रात्री जाहीर भजन-भाषण झाले. त्यावेळी महाराज म्हणाले- ''भजन म्हणजे माणूस बनविण्याचा कारखाना. देशभक्ती व देवभक्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.'' दि.११ रोजी महाराज म्हापशाला गेले. मंगेशी (जुना गोवा) व कळंगुट येथेही महाराजांचे कार्यक्रम झाले. म्हापशालाही कार्यक्रम झाला. दि.१२ व १३ मे रोजी ख्रिश्चनांच्या खेड्यांत गेले असता पणजीचे मुख्यमंत्री श्री भाऊसाहेब बांदोडकर यांच्या वाड्यात त्यांचा मुक्काम झाला. पणजी येथील आझाद मैदानात समारोपीय समारंभात गोव्यात केलेल्या प्रभावी जनजागृतीबद्दल विविध संस्थांनी महाराजांचा सत्कार केला. दीव-दमण-गोव्याचे राज्यपाल सचदेव यांचे अध्यक्षीय भाषण व महाराजांचे भजन झाले.

दि. २७ मे १९६४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे अकस्मात निर्वाण झाले, तेव्हा महाराज दिल्लीलाच गेले होते. पंडितजींना भावपूर्ण श्रद्धांजली देऊन महाराजांनी त्यांचे शेवटचे दर्शन घेतले. दि.८ जून रोजी गुरुकुंजात महाराजांनी भव्य प्रमाणावर पंडितजींची तेरवी साजरी केली.

पंडितजींचं व्यक्तित्व आणि कर्तृत्व यांबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ओजस्वी भाषण देऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले- ते एकदेशी कधीच राहिले नाहीत हेच त्यांच्या थोर व्यक्तिमत्वाचे यथार्थ गमक आहे... ''ईश्वरच नाही तर शपथ कोणाची घेऊ?''- असा न्यायाधीशांना सवाल करणारे आणि उद्योगशीलता हाच सुखाचा झरा आहे- असे पृच्छकांना निःशंकपणे सांगणारे पं. जवाहरलाल नेहरू यांचे ईश्वरी शक्तीबाबतचे विचार अलिकडे पार बदलून गेले होते... मनुष्याच्या भवितव्यामागे शेवटी कोणत्या तरी सुप्त शक्ती काम करीत असतात असे त्यांना वाटू लागले होते. प्राचीन सुधारकांत आत्मज्ञानासाठी सर्वांची धडपड दिसून येते. अंतर्मुख होऊन आपण स्वतःविषयीचे ज्ञान करून घेण्याला महत्त्व आहे. कारण त्यामुळे नव्या-जुन्याचा सुवर्णमध्य गाठून जीवनात उत्कृष्ट संगम साधता येतो हे त्यांनी जाणले होते. म्हणूनच बुवाबैराग्यांची 'बांडगुळे' म्हणून चीड असणाऱ्या पंडितजींना वाटू लागले होते की ''विकास योजना को सफल बनाने की शिक्षा प्राप्त करने के लिए कार्यकर्ताओं को संतश्री तुकडोजी

महाराज और उनके श्रीगुरुदेव सेवामंडल के पास जाना चाहिए।''

केन्द्रीय गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा यांनी आग्रहाने निमंत्रित केल्यावरून दि.१५ ते १८ जुलै १९६४ दरम्यान दिल्ली येथील 'भारत साधु समाजा'च्या कार्यालयात तसेच सत्संग भवनात महाराजांची प्रभावशाली प्रवचने झाली. संरक्षण मंत्र्यांसकट महत्त्वाच्या केन्द्रीय मंत्र्यांशी महाराजांच्या भेटी व महत्त्वपूर्ण चर्चा झाल्या. 'भारत साधू समाज', 'भारत सेवक समाज' व 'संयुक्त सदाचार समिती' यांच्या एकत्रित महासभेचे उद्‌घाटन उपराष्ट्रपती डॉ.जाकिर हुसेन यांनी १८ जुलै १९६४ रोजी केले; तर केन्द्रीय गृहमंत्री श्री.गुलझारीलाल नंदांनी १९ जुलै रोजी समारोप केला. त्यावेळी राष्ट्रसंतांचेही मौलिक चिंतन भ्रष्टाचार निर्मूलनाच्या संदर्भात प्रकट झाले– ते सदाचार व चारित्र्यनिर्माणाच्या अनुरोधाने.

दि.२० ते २५ जुलै दरम्यान महाराज पंढरपुरास होते. गोवधबंदी, धर्मशिक्षण, नशाबंदी, मंदिर व्यवस्थापन या संदर्भात 'सदाचार समिती'ची कृतिरेषा स्पष्ट करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ठाकुरबाबांच्या मठात म्हणाले–''ही कामे मंत्र्यांच्या हातून होणार नाहीत; ती साधू मंडळीलाच करावी लागतील.''

२७ जुलैपासून गुरुकुंज आश्रमात 'श्रवणभक्ती चातुर्मास्य' सुरू झाला. प्रवचन, शंकासमाधान, सद्ग्रंथवाचन यांसाठी भिन्न भिन्न प्रांतांतील साधुसंतांना महाराजांनी निमंत्रित केले होते. २८ जुलै पासून महाराजही गुरुकुंजातच होते.

सरसंघचालक श्री.गोळवलकर गुरुजींच्या वतीने श्री.दादासाहेब आपटे यांनी १७ मार्च १९६४ रोजी गुरुकुंजात महाराजांना भेटून विश्व हिंदू परिषदेची कल्पना सांगितली तेव्हा महाराज म्हणाले– ''भारत साधु समाजानं हे करणं आवश्यकच होतं; मी साथ देईन पण पदाधिकारी होणार नाही. हे सेवामंडळ सुद्धा मी सोडणारच आहे. सल्लागार म्हणून अवश्य राहीन.'' त्यानुसार, धोरण ठरविण्यासाठी जी सूत्रसंचालन समिती गठित करण्यात आली तिच्या सल्लागार मंडळात राष्ट्रसंतांचा समावेश करण्यात आला.

गणेशोत्सवाप्रीत्यर्थ महाराजांचा दौरा १४ सप्टेंबर १९६४ ला मेहकर पासून सुरू झाला. त्यात महाराजांचा संदेश होता–''अधिक धान्य पिकवा हाच श्रीगणेशाचा संदेश.'' तसेच ''देव देवळात किंवा जंगलात नाही, समाजसेवेत आहे.''

दि.६ ते १४ ऑक्टोबर दरम्यान नागपूरला संतांचे स्नेहसंमेलन (नामसंकीर्तन सप्ताह) आयोजित करण्यात आले. त्यात महाराजांनी संदेश दिला– ''शेतकऱ्यांच्या व्यवस्थेशिवाय देशाची व्यवस्था झाली असे होणार नाही.'' दि.१६ ऑक्टोबर रोजी एका बड्या सरकारी अधिकाऱ्याला पत्र लिहून त्यांनी शेतकऱ्याच्या व्यवस्थेबद्दल परखडपणे मुद्दे मांडले. शेतमालाचे भाव शेतकऱ्यांच्या सल्ल्याने ठरवावे, जमिनीला लागणाऱ्या सर्व सामुग्रीची किंमतही धान्याच्या भावावरच आकारावी, विक्रीस्थान व साठवणुकीची व्यवस्था सुद्धा गावातच असावी, दलाल, व्यापारी व सरकारचा नफा योग्यरीतीने ठरवला जावा– हे ते मुद्दे होते. हे पत्र दि.१७–१०–६४ च्या नागपूर पत्रिकेत प्रसिद्धही झाले होते.

दि.१ डिसेंबर १९६४ रोजी महाराज वडोदरा शहरी होते. तेथे 'भारत साधु समाजा'चे सदाचार सम्मेलन होते. महाराजांच्या भजन–भाषणाद्वारे हे सम्मेलन संपन्न झाले. दि.६ डिसेंबर १९६४ रोजी महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक आचार्य प्र.के.अत्रे गुरुकुंज येथील प्रार्थनेत हजर होते. त्यांचे यावेळी भाषण झाले. दि.३१ डिसेंबर १९६४ रोजी केरळ मधील वर्कला स्टेशनजवळच्या श्री नारायणगुरुंच्या पुण्यक्षेत्रात त्यांच्या समाधिस्थानी जाऊन महाराजांनी श्रद्धांजली अर्पण केली.

केरळातील 'भारत साधु समाजा'च्या पाचव्या वार्षिक अधिवेशनाच्या विषय नियामक समितीची सभा दि.३ जानेवारी १९६५ ला झाली, तेव्हा महाराजांचे भाषण झाले. दि.४ जानेवारी ६५ रोजी चँगनाचेरी येथे केरळचे राज्यपाल व्ही.व्ही.गिरी यांनी या संमेलनाचे उद्घाटन केले.

गोंदुडा क्षेत्र म्हणजे वं. राष्ट्रसंतांची बाल्य काळातील निसर्गरम्य तपोभूमी. तेथे दि. १५ ते १७ जानेवारी पर्यंत वार्षिक यात्रा होती. राष्ट्रसंत तेथे तीन दिवस हजर होते. आर्वीच्या प्रसिद्ध 'लोकमान्य वाचनालया'च्या शताब्दी महोत्सवास राष्ट्रसंतांनी आजारी अवस्थेतच दि.१३ फेब्रुवारी १९६५ रोजी संदेश पाठविला. दि.२६ फेब्रु. ६५ रोजी दिल्लीला जाऊन महाराजांनी 'विश्व धर्म परिषदे'ला मार्गदर्शन केले. दि.२८ च्या समारोपीय भाषणात महाराज म्हणाले– ''विश्वधर्म परिषदेचे हेच कार्य असेल की सर्व धर्म, देश या संकुचित विचारांना बाजूस सारून एक विश्वधर्म निर्माण करावा. धर्मपुरुषांना हे पाऊल विज्ञानपेक्षाही जलदगतीने उचलावे लागेल... परस्परांच्या धर्माचे अध्ययन व परस्पर धर्मांचा सन्मान करणे– यातून

जनसामान्यांच्या प्रत्ययास आणून देणे की सर्व धर्मांचे अंतीम तत्त्व आणि अंतीम लक्ष्य एकच आहे.'' पुढे महाराज म्हणाले–''मैंने मेरा जीवन इसी तत्त्व के प्रचार व प्रसार के लिए व्यतीत किया और मैं समझता हूँ कि आज की दुनिया में इस से बढकर कोई काम–न देशसेवा का, न विश्वसेवा का ही हो सकता है।'' दि. २४ मार्च नंतर त्यांनी मराठवाड्यातील भव्य कृषि व पशु प्रदर्शनांचे उद्घाटन केले व तेथून वडी येथील सेवाश्रमात आश्रमीय कार्यकर्त्यांनी व विद्यार्थ्यांनी दि.२६ मार्च रोजी केलेले हार्दिक स्वागत स्वीकारले.

एप्रिलमधील ग्रामजयंती मास म्हणजे कार्याचा महापूर. या महिनाभरात महाराज महाराष्ट्रभर फिरून ग्रामजयंतीचे महत्त्व आपल्या भजन व भाषणातून स्पष्ट करीत.

महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे १० एप्रिल १९६५ रोजी रामनवमीला निर्वाण झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करून महाराजांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. 'तुकड्या म्हणे पंजाबराव श्री–यश–किर्ती पावला। विसरी ना भारत तव शक्तीला।।' दि.१२ ला नाशिक परिसरात व मराठवाड्यात दि.१६ ला ग्रामजयंती कार्यक्रमात महाराजांचे स्वागत झाले. आदिवासी खेड्यांत व आधुनिक शहरांतही महाराजांनी ग्रामजयंतीचा संदेश दिला. वरळी (मुंबई) येथील जांभुरी मैदानावर राष्ट्रसंतांच्या जन्मदिनी ग्रामजयंतीचा समारोप करण्यात आला. या समारोप सोहळ्याचे अध्यक्ष ना.बाळासाहेब देसाई म्हणाले, ''गुरुकुंज आश्रम माणसाला खऱ्या अर्थाने माणूस बनविण्याचा थोरला कारखाना आहे.''आचार्य अत्रे यांनी 'मराठा' या वृत्तपत्रामध्ये राष्ट्रसंतांच्या जीवन–कार्यावर दि.३० एप्रिल १९६५ रोजी अग्रलेख लिहून त्यांच्या कर्तृत्वाचे श्रद्धापूर्वक गोडवे गाइले होते– ''महाराजांनी 'शेतकरी सुखी तर देश सुखी– हे सूत्र सांगून ईश्वराची भक्ती ही केवळ वैयक्तिक मोक्षप्राप्तीची साधना नसून ती समाज सेवेचे आणि राष्ट्रोद्धाराचेही उत्तम हत्यार होऊ शकते हे आपल्या कृतीने दाखवून दिले : अद्भुत भजनभक्तीच्या जोरावर प्रचंड समाजकार्य यशस्वी केले. म्हणूनच त्यांना 'राष्ट्रसंत' ही पदवी लोकांनी दिली आहे''– हा त्या अग्रलेखाचा सार होय.

दि.१ मे १९६५ रोजी चंद्रपूर येथील लोकमान्य टिळक प्राथमिक शाळेसमोरील पटांगणात राष्ट्रसंतांचा भजनाचा कार्यक्रम झाला. महाराष्ट्र राज्याच्या वर्धापन दिनी ''राष्ट्रभाषा व महाराष्ट्राला इतिहासात वेगळे स्थान आहे. सर्वांनी

जातिभेद विसरून आम्ही भारतीय आहोत, या एकाच भावनेने प्रेरित होऊन देशरक्षणाच्या कार्यासाठी सरकारच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे''–असा संदेश महाराजांनी दिला. दि.२७ मे रोजी म्हैसूर येथे तिसऱ्या महासभेत 'विश्व हिंदू परिषदे'ने त्यांचे हार्दिक स्वागत केले. योगीराज गोरक्षनाथाच्या पावन स्थळी महाराजांचे भजन झाले. नंतर पाटणा, दिल्ली, नागपूरला महाराज आले आणि चंद्रपूर, पवनार व मुंबईचे दौरे त्यांनी केले. ब्रह्मवादिनी विमलाताई ठकार यांनी आबूच्या निसर्गरम्य वातावरणात महिला आश्रम स्थापन केला होता. तेथे त्यांनी भेट दिली. राष्ट्रसंतांचा हिन्दुधर्माभिमान संकुचित नव्हता तर तो स्वामी विवेकानंद किंवा महात्मा गांधींप्रमाणे व्यापक नि सात्त्विक होता. त्यांनी 'विश्व हिंदू परिषदे'च्या कार्याला त्याच सात्त्विक भूमिकेतून सहकार्य केले होते. कारण भारताचा खरा रोग समाजस्वास्थ्य नष्ट करणारे भेदभाव व व्यक्तिस्वार्थ आहेत, हे ते पुरते जाणून होते.

पाकिस्तान म्हणजे भारताच्या पोटातून बाहेर पडलेला रोग! युद्धबंदी रेषेवर सैन्याची जमवाजमव करून युद्धरेषा तोडण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न अधूनमधून डोके काढीत असे. स्वतःच कुरापती काढून वर भारतविरोधी प्रचाराचे गरळ सतत ओकीत असे. हजारो अल्पसंख्यक रोज भारतात घुसवले जात असत. आधीच भारतात अवषर्णामुळे अन्नधान्याचा प्रश्न बिकट झाला होता; दारिद्र्य व महागाई वाढलेली होती. तशात दि.५ ऑगस्ट १९६५ ला पाकिस्तानने भारताच्या सीमेवर सर्व शक्तीनिशी आक्रमण केले. दि.१२ सप्टेंबर १९६५ ला राष्ट्रसंतांनी राष्ट्राला आवाहन करणारे एक जाहीर पत्रक सर्वत्र प्रसारित केले; तसेच आपल्या राष्ट्राला ऑगस्ट महिन्यातील पूर्ण दौऱ्यात विशेषत: भारताच्या तरुणवर्गाला महाराजांनी ज्वलंत संदेश दिला की–

*'अग्नि भडकला युद्धाचा, अन् तू आळशी होऊन बसे*
*तरुण असोनी रक्त न उसळे, नौजवान तुज म्हणो कसे ?*
*तत्त्वासाठी जगा, लढा अन् लावा अपुला प्राण पणा*
*देह जाई पण देश न जावो, नरवीरांचा हा बाणा ।।'*

अर्थात् महाराजांना देवभक्तीपेक्षा देशभक्ती प्रिय होती, हेच खरे !

* * * * *

# दहा : जनजागृती

वयाच्या १८ व्या वर्षापासून भारतीय समाजजीवनाचा आलोक घेत व त्यातील तृटींच्या पूर्तीसाठी सुगठित प्रयत्नांची आखणी करीत महाराज अनेक सामाजिक-धार्मिक संस्थांशी जुळत आले होते. 'श्रीगुरुदेव सेवामंडळा'ची तर जडणघडणच त्यांनी केली. मात्र या सेवामंडळाकडून त्यांच्या अपेक्षा वेगळ्याच होत्या. ते लिहितात-''कोणतीही वस्तू नेहमीसाठी एकच एक-अर्थात् जुनी दिसणं मला भावत नाही. नित्य नवे पाहाणे हा माझा निसर्गदत्त स्वभाव आहे- माझाच कशाला, निसर्गाचाही स्वभाव असाच आहे-परिवर्तनच निसर्ग होय. रोज नवी फुलेफळे उमलतात. श्रीगुरुदेव सेवामंडळासारख्या संस्थेत प्रार्थना, ध्यान, श्रमदान, रामधून हे उपक्रम तर सदैव असतीलच, पण वेळोवेळी त्यांत एक नवा प्राण-एक नवी चेतना यावी. कधी गांधी स्मृतिदिनाच्या रूपात, कधी बुद्धजयंती निमित्ते समयदान यज्ञाच्या रूपात, तर कधी विविध उत्सवांच्या संदर्भात मंडळात नवा प्राण भरण्याचा प्रयत्न मी सदैव केला आहे. 'सेवामंडळ' हे एखाद्या 'पंथा'सारखे एकाच स्थितीत कायम राहाणारे बनू नये; काळाच्या निकडीनुसार स्वतःमध्ये इष्ट फेरबदल करीत राहावे हीच माझी धारणा आहे... स्वतंत्र भारतात स्वातंत्र्याची प्रभा खेडूत व गरिबांच्या झोपड्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सेवामंडळाने आजवर केला; नाही असे नाही. पण तेवढ्यावर माझे समाधान कसे होणार? मी तर म्हणेन, मंडळाने आज पुन्हा स्वतःत परिवर्तन आणून नव्या उत्साहाने काळानुरूप नवनवे कार्य उचलायला हवे; आळस, आसक्ती व जडता झटकून पुन्हा पुढे जायला हवे !.. प्रेरणा आतून नसेल तर केवळ 'प्रचारका'चा शिक्का मारलेले प्रचारक काय कामाचे?... 'साधू' हे नाव कोणा शिक्क्याचे नाही तर एका विशिष्ट वृत्तीचे आहे. ह्या वृत्तीची मंडळी प्रत्येक क्षेत्रात मिळू शकते. 'सेवामंडळ' हे कोणा पंथाचे वा संकुचित संस्थेचे नाव नव्हे. सेवामंडळाचे तत्त्वज्ञान सर्वांचे आहे; सर्वांसाठी मुक्त आहे. संस्थेचा अर्थच व्यवस्थित रूपात चालणारी संघटना !''

दि.५ ऑगस्ट १९६५ रोजी भारतावर पाकिस्तानचे आक्रमण झाले. त्याकाळी गावोगावची मनोऽवस्था जाणून घेण्यासाठी १८ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या काळात 'श्रीगुरुदेव सेवामंडळा'ने राष्ट्रजागृती दौरा काढला. अमरावती

जिल्ह्यापासून सुरुवात करताना नांदगावच्या मुस्लिम जनतेचा अंदाज घेतला तेव्हा त्यांचे म्होरके म्हणाले– ''आम्ही सुद्धा या देशाचे रहिवासी आहोत; हम पर विश्वास रखिये, आमची मदत पाकिस्तानला होईल ही गोष्ट शक्य नाही.'' कुरूम आणि मधापुरी येथे भजन व भाषणातून महाराजांनी खऱ्या धर्माचे स्वरूप लोकांना समजावून दिले. चीन आणि पाकिस्तान यांच्या आक्रमणाच्या स्थितीत प्रत्येकाने आपली संपत्ती व तरुण मुले सैन्यात भर्ती करवून देशाला निर्भय करावे असे आवाहन केले. परळी वैजनाथ तथा गंगाखेड येथे 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे'... तसेच 'तुकड्यास सदासर्वदा सेवेत कसू दे।'– अशी भजने जनतेपुढे गाऊन महाराजांनी त्यांची मने तयार केली. गावोगावी प्रवचन देत तरुणांना आवाहन केले– 'उठो जवानो कर के दिखाओ, कहने के दिन गये ।।'...''हे युद्ध मुसलमानांच्या विरुद्ध नसून असत्याच्या विरुद्ध आहे. आम्ही कुणावरही आक्रमण करू इच्छित नाही व कुणाचे आक्रमण सहन सुद्धा करणार नाही.''

दि.१६ ऑक्टोबर १९६५ रोजी दुपारी 'गेट वे ऑफ इंडिया' जवळच्या सैन्यभर्ती शिबिराला महाराजांनी भेट दिली त्यावेळी आश्रमचे संगीत विभागप्रमुख श्री. माहुलकर गुरुजी व प्रसिद्ध पत्रकार-लेखक-वक्ते आचार्य अत्रे हे महाराजांसोबत होते. मध्यंतरी ऐन दिवाळीत मात्र आजारापायी महाराज गुरुकुंजात थांबले– व आजारानंतर दुप्पट वेगाने जनजागृती कार्यास लागले. मध्यवर्ती सभा काळात तसेच सद्गुरु पुण्यतिथी महोत्सवात महाराज केवळ उपस्थितीने सुद्धा सर्व कार्यकर्त्यांच्या बॅटरी चार्ज करून देत असत. नागपूरच्या हरिहर मंदिरात १४ नोव्हेंबर चा बालकदिन साजरा करताना महाराज म्हणाले– ''जो आपल्यावर निष्कारण हल्ला करीत असेल, अशा आततायी माणसाचा प्रतिकार केलाच पाहिजे– असेच भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला बोध करताना म्हटले आहे... बालकांना योग्य शिक्षण दिले तरच राष्ट्राची उन्नती होऊ शकते. बालके हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. त्यांना बलवान, बुद्धिमान व चारित्र्यसंपन्न नागरिक बनविले पाहिजे.''

मुंबईच्या 'विश्व हिंदु परिषदे'च्या सभेला भारतातून अनेक प्रतिनिधी आले होते. महाराजांनी दोन दिवस सभेला मार्गदर्शन केले. नंतर दिल्ली येथे 'अखिल भारतीय साधुसमाजा'ला मार्गदर्शन करताना ते म्हणाले, ''साधुसमाज को अपनी बिखरी हुई शक्ति को संगठित कर, सारे साधकों को देश के नैतिक और आध्यात्मिक

विकास के क्षेत्र में लगाना चाहिये।'' 'अखिल भारतीय साधु समाजा'चे कार्यकारी अध्यक्ष स्वामी गुरुचरणदासजी यांनाच संमेलनाचे अध्यक्ष निवडण्यात आले.

याच महिन्यात लोकसंपर्क व सेवाकार्य अनवरत करता यावे म्हणून राष्ट्रसंतांनी अनेक राष्ट्रीय संस्थांच्या पदांचा व मानद सदस्यत्वाचाही राजीनामा दिला; त्याचसोबत त्यांनीच स्थापिलेल्या श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या संचालक पदाचाही राजीनामा त्यांनी दिला आणि नव्या संचालक मंडळाच्या अध्यक्षपदी महाराष्ट्राचे गृहमंत्री ना.बाळासाहेब देसाई यांना नेमले व नवनियुक्त संचालक मंडळाचा शपथविधी दि.३ डिसेंबर १९६५ रोजी त्यांनी उरकून घेतला. महाराष्ट्राचे गृहमंत्री ना.बाळासाहेब देसाई आपल्या सहकाऱ्यांसह संचालक मंडळाची सूत्रे हाती घेत आहेत असे कळताच सारेच कार्यकर्ते भारल्यासारखे झाले. आजीवन प्रचारक श्री.तुकारामदादा 'गीताचार्य' हे भारतभर प्रचार करण्याचे काम करतील असे ठरले. अशाप्रकारे त्यांना सन्मानाने संस्थेच्या मुख्यालयाबाहेर काढण्यात महाराजांचे कौशल्यच दिसून येते. महाराज म्हणत, ''मंदिर कांही देवाचे डोके दाबण्याचे ठिकाण नव्हे की घंटा हलवून केवळ डोळे मिटण्याचे स्थान नव्हे; ते तर धर्म व देशरक्षणाचे स्थान आहे.''

त्याच सुमारास भारत देशाच्या राजकीय पटावर पुन्हा एक वज्राघात झाला. दि.१० डिसेंबर १९६५ रोजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींचे आकस्मिक निधन झाले. त्यांचे जागी सुश्री इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या.

नागपूर येथील श्री.मानकर यांनी कुमार साहित्यनिर्मितीसाठी 'विद्यालंकार' नावाचे मासिक काढले. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी २६ डिसेंबर १९६५ ला त्याचे प्रकाशन केले. तेव्हा 'तरुण भारत'चे प्रमुख संपादक भाऊसाहेब माडखोलकर हे अध्यक्षस्थानी होते आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मासिकाला आशीर्वाद दिला.

संरक्षणमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांची परवानगी घेऊन सीमा क्षेत्रांतील सैन्यांत राष्ट्रसंताचा संचार दौरा आयोजिला होता. त्यासाठी दि. २९ डिसेंबर १९६५ ला महाराज दिल्लीला रवाना झाले. तिथून फ्रंटियर मेलने अमृतसरला डोग्रा रेजिमेंटच्या सुभेदारासोबत गोविंदगड किल्ल्यात गेले. तिथून सीमा विभागाच्या डोंगरओळीत जीपने गेले. जीवघेण्या थंडीत महाराजांनी भजने गाइली; भाषणही

दिले. दुसऱ्या दिवशी सावंत साहेबांनी त्यांना मराठा रेजिमेंटकडे नेले. तिथे महाराजांनी जोषपूर्ण शैलीत राष्ट्रीय भजने गाइली, मराठा पलटणची सलामी घेतली व दीर्घ प्रवासातून परतल्यानंतर महाराजांनी दि.३ जानेवारी १९६६ ला नागपूरला पत्रकार परिषद घेतली.

तीर्थराज प्रयागातील कुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर 'विश्व हिंदु परिषदे'च्या अधिवेशनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम दि.२३ जानेवारी १९६६ ला राष्ट्रसंत तुकडोजींच्या अध्यक्षतेखाली झाला व समारोप श्री सुधीर फडके यांच्या गायनाने झाला. पुरीचे शंकराचार्य निरंजनतीर्थ सभेस हजर होते. त्यांना भाषण देण्यास अध्यक्ष तुकडोजी महाराजांनी विनंती केली. ते कर्मकांडावर भर देणारे होते. त्यामुळे त्यांना धर्मांतरितांना पुन्हा स्वधर्मात घेण्याचा महाराजांचा विचार पटत नव्हता. तरी महाराज म्हणाले, ''आपल्या सौभाग्याने जग्‌द्‌गुरु श्रीमत् शंकराचार्य येथे येऊन बोलणार आहेत. थोरांचा विरोध सुद्धा आपण आशीर्वादच मानला पाहिजे.'' या वाक्याने वातावरणात साखर पेरली गेली; पण आचार्यांना मात्र त्यामुळे डिवचल्यासारखे झाले. त्यांनी भाषणाला सुरुवात केली खरी, पण अनेक कारणांमुळे आचार्यांचे भाषण नको तेवढे वाईट झाले. सभेतून ''भाषण थांबवा''-अशा आरोळ्या उठल्या. त्यामुळे आचार्यांना आपले भाषण थांबवावे लागले. जगद्‌गुरुंच्या विरोधानंतरही महाराजांनी दिलेल्या स्पष्टीकरणामुळे धर्मांतरितांना पुन्हा धर्मात घेण्याचा परिषदेचा प्रस्ताव पारित झाला. हाच राष्ट्र संतांचा विजय होता. त्यावर टाळ्यांची जणू प्रचंड गारपीट झाली.

महाराजांचे प्रयाग, अयोध्या, शहाजहानपूर, दिल्लीचे बिर्ला मंदिर असे दौरे होऊन भजन-भाषणाचे अप्रतिम कार्यक्रम झाले. 'मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास'-अशी महाराजांची कीर्ती होती. दि.२८ जानेवारी च्या सायंकाळी त्यांनी राजघाटवरील प्रार्थनेत भजन व धून म्हटली. ३० जानेवारीच्या सकाळी बिर्ला भवनच्या आवारात १० मिनिटांची आणि राजघाटवर २ तासांची प्रार्थना झाली. दिल्लीतील प्रार्थनेत सारे भारत सरकार हजर होते. ३० जानेवारी १९६६ ला गांधी स्मृतिप्रीत्यर्थ भव्य कार्यक्रम झाला.

स्वामी सीतारामदास महाराज यांचा १५५ वा जन्मदिन दि.१९ मार्च १९६६ रोजी नागपूरच्या अग्रसेन भवनात महाराजांच्या उपस्थितीत पार पडला.

चंडिकापूर (अमरावती) येथे शिवाजीराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली व प्रो. भंसाली यांच्या उपस्थितीत राष्ट्रसंतांच्या हस्ते संत गाडगे महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण प्रचंड लोकसमुदाया समक्ष दि.२७ मार्च १९६६ रोजी पार पडले.

एप्रिल महिन्यात महाराष्ट्रभर सर्वत्र ग्रामजयंतीचे पर्व साजरे झाले. या काळात महाराजांना विश्रांती मिळण्याची सोय नव्हती. चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, वर्धा, बुलडाणा, अकोला हे विदर्भातील जिल्हे, मार्गातील आदिवासींची गावे-पाडे, पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावे व पुणे-मुंबईची उपनगरे येथील ग्रामजयंती बरोबरच अन्य आयोजनांमध्ये देखील महाराजांना कार्यक्रम करावेच लागत. त्यांच्या खंजरीवरील भजनांत श्रोते हरवून जात. 'श्रीगुरुदेव सेवामंडळ' मुंबई शाखेने ग्रामजयंती व शिवजयंतीचा कार्यक्रम २२ एप्रिलला आयोजित केला होता. अध्यक्ष होते आचार्य अत्रे आणि प्रमुख पाहुणे ना.बाळासाहेब देसाई. रात्री ८ वाजता राष्ट्रसंतांच्या ५७ व्या वाढदिवसाचा हा कार्यक्रम वरळी येथील जांबोरी मैदानावर झाला. त्यानंतर गावोगावच्या सेवक-प्रचारकांनी एप्रिल महिनाभर ग्रामजयंती प्रचार यात्रा महाराष्ट्रभर काढल्या.

श्रीक्षेत्र उज्जयिनी येथे दि.२ मे रोजी राष्ट्रसंतांचे भव्य स्वागत झाले. तेथून दि.५ व ६ मे रोजी गुरुकुंज आश्रमात 'अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळा'च्या प्रतिनिधींच्या संमेलनात राष्ट्रसंतांची उपस्थिती होती. नंतर भंडारा येथे आमगाव आश्रमात महाराजांनी दि.१० मे ला भेट दिली. ग्रामजयंती निमित्ते गावोगांवी कार्यक्रम सुरू होते. जनता उत्कंठेने त्यांचा संदेश ऐकत होती. इतक्यात महाराजांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांच्या दुःखद निधनाची वार्ता कळली. त्यांचे वय ८२ वर्षांचे झाले होते. त्या महापुरुषाला राष्ट्रसंतांनी जड अंतःकरणाने श्रद्धांजली वाहिली. नंतर ते दि.२ मे ला म्हैसूरच्या 'विश्व हिंदु परिषदे'ला हजर झाले. तेथे सामूहिक भजने व इतरही कार्यक्रम झाले.

म्हैसूरहून महाराज अमरावतीस आले ते 'स्टुडंट काँग्रेस' च्या उद्घाटनानिमित्ते जोशी हॉलमध्ये डॉ. पंजाबराव देशमुखांचे अमृत महोत्सवात हजर झाले. दि.२१ मे रोजी श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्यरत्न डॉ. आनंदराव बोरखडे यांचे निर्याण झाले. त्यांची विशाल शोकसभा घेण्यात आली. नागपूर येथील सुवर्णकार समाजात नवदुर्गा उत्सवाच्या वेळी दि.७ जून

१९६६ रोजी महाराजांनी 'देशधर्मापुढील समस्यां'वर विचारप्रवर्तक भाषण केले. त्यानंतर महाराज 'उरळी कांचन' येथे प्रकृती स्वास्थ्यासाठी निसर्गोपचार घेण्यासाठी चिंतन व लेखन करण्यास म्हणून १५ दिवस राहिले आणि दि.२३ जूनला गुरुकुंजात आले. तेथे लोकांना ''पुजाऱ्यांनी निर्माण केलेला देव आपण बदलून टाकला पाहिजे'' असा नवीन संदेश त्यांनी दिला.

दि.२४ जूनला श्री क्षेत्र वरखेडला जाऊन गुरु माऊलीचा निरोप घेऊन ४२५ मैल प्रवास करून महाराज पंढरपूरला गेले. 'स्वधर्मे निधनं श्रेय:' या गीतेच्या शिकवणीच्या अर्थाचे मर्म तिथे त्यांनी उकलून सांगितले. त्यावेळी पंढरपुरात मुसळधार पाऊस सुरू असूनसुद्धा श्रोत्यांची गर्दी कमी झाली नाही. महाराज म्हणाले, ''श्रीकृष्ण झाला तेव्हा ख्रिश्चन व मुसलमान धर्म जन्मालाच आला नव्हता. त्यामुळे 'परधर्म' शब्द लागू पडत नाही. येथे धर्म म्हणजे कर्तव्य. माणसाने स्वत:चे कर्तव्य करीत मोक्ष मिळवावा किंवा अकर्तव्याने अधोगतीला जावे''– असा अर्थ घेणे भाग आहे.

दि.१ जुलैला वसंतराव नाईकांचे वाढदिवसाला वं. महाराज यवतमाळला १५–२० मिनिटे थांबून मुंबईला आचार्य अत्रे व शाहू मोडक यांचे सहवासात गेले. तेथे ते दोन दिवस होते. तेथून ५ जुलैला महाराज नाशिकला गेले आणि सोमनाथशास्त्री आदि सद्भक्तांच्या विविध कार्यक्रमांना हजर राहिले. नंतर दि.६ जुलैला महाराज नागपूरला आले व त्यांनी ''शंभो! अजब है सच यहाँ।'' हे भजन लिहिले. त्यानंतर विटेगावला वं.महाराजांचे भव्य स्वागत झाले. तेथे चरणदास महाराज यांनी चालविलेल्या 'ग्रामगीता पारायण' समारोहाची समाप्ती महाराजांनी केली. अमरावती येथे दि.२१ जुलैला जोग चौकात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली वीरचक्र विजेता लेफ्टनंट शरच्चंद्र देशपांडे या सैनिकाच्या सत्कार समारंभात महाराजांचे आशीर्वादात्मक भाषण झाले.

दि.१३ ऑगस्ट १९६६ रोजी भंडारा शहरातील मुस्लीम फकिराच्या थडग्यावर वं. महाराजांनी स्वत: चादर टाकली. त्यामुळे हिंदू समाज नाराज झाला. त्यांना महाराज म्हणाले,''गडे हो ! संत ते संतच. त्यात हिंदू नि मुसलमान हा प्रश्नच कुठं येतो? 'जात न पूछो साधुकी, जब पूछो तब ज्ञान। मोल करो तलवार का, पडी रहन दो म्यान।।...' एकाच झाडाची मुळे एक असून त्यांच्या फांद्या

म्हणजे मज़हब किंवा धर्म होय.'' त्यांच्या या स्पष्टीकरणामुळे लोकांचे समाधान झाले.

महाराजांनी दि.२१ सप्टेंबर रोजी चांदूर बाजार येथील गणेशोत्सवात मार्गदर्शन केले; दि.११ ऑक्टोबर १९६६ रोजी नागपूरच्या गणेशोत्सवात आणि दुर्गापूजा उत्सवातही भजन व भाषण केले. ते म्हणाले, ''माणूस हा माणूसच राहावा, तो पशु बनू नये–हाच तर उत्सवांचा मूळ हेतू असतो.'' गोपाल अष्टमीच्या मुहूर्तावर नागपूर येथे महाराजांनी 'गोवध बंदी'वर आपल्या भाषणातून विचार मांडले तसेच नशाबंदीवरही जोर दिला.

दि.२१ डिसेंबर १९६६ रोजी गीता जयंतीचा कार्यक्रम नागपूरला पार पडला. तेव्हा त्यांनी 'प्रचारक हाच खरा प्रतिसृष्टिकर्ता आहे'–हा सिद्धान्त मांडला. दि.२८ डिसेंबर रोजी गुरुकुंजात 'प्रशिक्षण वर्गाची नियमावली' प्रसारित झाली आणि दि.१० एप्रिल १९६७ रोजी वर्ष प्रतिपदेला त्यांनी दासटेकडीच्या दक्षिणेकडील कुटीला 'वासुदेव कुटी' व उत्तरेकडील कुटीला 'नर्मदा कुटी' नाव दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या भक्तजनांत व मुसलमानांत नागपूर येथे अचानक दंगा झाला. त्यावेळी महाराजांनी तातडीने जाऊन शांती प्रस्थापित केली. महाराज म्हणाले, ''परंपरेला कवटाळून आपण पथभ्रष्ट होऊ नये.'' महाराजांचा ५८ वा जन्मदिवस 'ग्रामजयंती' स्वरूपात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्र, बिहार, गुजरात, राजस्थान, गोवा आदि सर्व प्रांतांतून धार्मिक, सामाजिक व शासकीय स्तरांवरून साजरा करण्यात आला. दि.३१ जुलै १९६७ ला महाराज ब्रह्मपुरीजवळील अड्याळ टेकडीवर दुसऱ्यांदा गेले होते. सुमारे पाच हजार लोकांच्या सत्संगात महाराज सांगत होते ''संताच्या चरणधुळी ऐवजी संताची बोधधुळी । लागो या देहकुळी ।।'' दि.१५ ऑगस्ट १९६७ ला स्वातंत्र्याचा २० वा वर्धापन दिन. त्यावेळी महाराज म्हणाले, ''अपना देश बचाने हम, अणूॲटम भी करे । किसी के हाथों क्योंकर मरे? स्वातंत्र्यदिन हा चांगल्या कर्तव्याचा आरंभ आणि वाईट गोष्टींचे निर्मूलन करण्याचा प्रतिज्ञादिन आहे.'' दि.१७ ऑगस्ट १९६७ रोजी 'युगांतर शिक्षण संस्थे'चे आद्य संस्थापक नि दलितांचे कैवारी स्वर्गीय रा. ब. ठवरे यांचा स्मृतिदिन नागपूर येथे वं. राष्ट्रसंतांच्या उपस्थितीत साजरा झाला.

दि.१ सप्टेंबर १९६७ रोजी दिल्लीत बिर्ला मंदिरात महाराजांचे भजन व भाषण झाले. त्यावेळी त्यांनी योजनापूर्वक प्रधानमंत्री निवासाकडे जाऊन पंतप्रधान इंदिरा गांधींची परखड शब्दात कानउघडणी केली. महाराज म्हणाले, ''किसी की पर्वा न करते हुए तुम्हें जनता के लिए हिम्मतसे कदम बढाना चाहिए।'' मंत्र्यांनाच नव्हे तर महामंत्र्यांना सुद्धा महाराज असे स्पष्टपणे बोलायचे. मागे एकदा पं. नेहरू म्हणाले होते-''महाराज, मैं दिल से चाहता हूँ कि आज की शिक्षाप्रणाली में आमूल परिवर्तन हो जाय। लेकिन वह तुरंत हो नही सकता, इस में बहुत दिन लगेंगे।'' तेव्हा महाराज म्हणाले होते-आमच्या देशाचा कर्णधारच जेव्हा 'बहुत दिन' म्हणतो तेव्हा 'यह काम हम अभी करेंगे'-असे कोण म्हणेल? हे काम राष्ट्राच्या पायाभरणीचे आहे, तर 'कल करे सो आज कर'-अशा तातडीने व्हायला पाहिजे. ''आप जैसे चोटी के अधिकारी भी अगर यह नहीं कर सकते, तो स्वर्ग में जब घंटियाँ बजेगी तब होगा क्या?'' 'सत्ताधीशों को इशारा' यासारख्या आपल्या लेखात महाराजांनी शासनकर्त्यांवर परखड टीका करून मंत्री तसेच अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली आहे.

दि.३ सप्टेंबर १९६७ ला महाराज नासिक येथे सिंहस्थ पर्वानिमित्ते पोहोचले. तिथूनही अनेक ठिकाणी जाऊन ते भजन-भाषण व सत्संगाद्वारे जनतेला स्वर्गीय आनंद देतच होते. ७ ला पुणे, ८ ला ठाणे, ९ ला पालघर; १०-११ ला मुंबई, १२ ला भुसावळ, १३ ला खामगाव येथे गणेशोत्सवात महाराजांचे कार्यक्रम गाजले. १४ ला चांदूर बाजार, १५ ला लक्ष्मीवाडी, १७-१८ ला नासिक येथे कार्यक्रम संपन्न केले. दि.१७-१८ सप्टेंबर १९६७ ला नासिकला कुंभमेळा भरला. त्यात भक्तिसंमेलन १८ ला भरले. तेथे २०-२५ लाख साधूंच्या उपस्थितीत महाराजांच्या हस्ते महापूजा करण्यात आली व नंतर त्यांच्या भजनाचा कार्यक्रम झाला.

दि.१ ऑक्टोबर १९६७ रोजी महाराजांनी खरसोली (पांढुर्णा) गावी श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या इमारतीचे उद्घाटन केले. आजारी असतानाही महाराजांनी 'लहर की बरखा भाग-२'ची निर्मिती केली. ३५ वर्षांपूर्वीचा हरिगीति छंद हाताळून राष्ट्रसंतांनी लिहिलेला अकराशे छंदांचा हा दुसरा भाग म्हणजे वर्तमान देशदशेच्या भयाण दर्शनाने त्यांचे हृदय पिळवटून टाकणारे ज्वलंत दुःख व त्याच्या निराकरणाचे

महत्त्वपूर्ण चिंतन. संपादक 'सुदाम'जींनी त्यातील ६३ छंद वेगळे काढून ठेवून १६१ शीर्षकांसह बरखा विभागली; जी भाग २ पुढच्या कार्तिक पौर्णिमेला प्रसिद्ध केली. दि.२ ऑक्टोबर रोजी गुरुकुंजात नशाबंदी सप्ताह नि कुष्ठरोगी संमेलन महाराजांचे अध्यक्षतेखाली पार पडले. दि.७ ऑक्टोबर रोजी दासटेकडीवर कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षतेखाली श्रीगुरुदेव प्रचार वर्गाचा शुभारंभ पार पडला. त्यावेळी स्वामी सीतारामदास महाराज हजर होते. महाराजांनी श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे अनावरण केले.

ऑक्टोबर १९६७ मध्ये गोहाटी मध्ये १२ दिवसांचे एक कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर 'विश्व हिंदू परिषदे'तर्फे घेण्यात आले. त्यात ३३ कार्यकर्ते उपस्थित होते. समारोपादाखल परिषदेच्या अध्वर्यूंचे एक संमेलनदेखील झाले होते. त्यात हिमाचल प्रदेशातील अनेक कार्यकर्ते उपस्थित झाले होते. द्वारकापीठाच्या शंकराचार्यांनी 'हिंदू'ची व्याख्या करताना आहाराबाबत असहिष्णू वृत्ती प्रकट केली, त्यावर लोक चिडून उठले. पण महाराजांनी त्याहीवेळी कौशल्याने वेळ सांभाळली. त्यांनी असे विचार मांडले की इकडे शंकराचार्य वरमले व तिकडे क्षुब्ध लोकही शांत झाले.

दि.१९ ऑक्टोबर १९६७ ला अड्याळ येथील आत्मानुसंधान टेकडीवर निसर्गरम्य अशा प्रशांत जागेवर महाराजांनी सत्संग भवन भूमीपूजन समारंभ पार पाडला. तसेच ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर दरम्यान विराट धार्मिक सांस्कृतिक प्रदर्शनाचे आयोजन केले होते. दि.५ ते ७ नोव्हेंबर १९६७ ला गुरुकुंजात 'अ.भा.आयुर्वेद महासंमेलन' आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रसंतांची तपस्या, लोकप्रियता आणि मानवनवनिर्माणाची साधना यांच्या अप्रतिम बलामुळे आयुर्वेद विज्ञानाची धूमिल कीर्ती उजळली जाईल या सदिच्छेने विदर्भ आणि महाराष्ट्राचे वैद्यजगत सर्व शक्तीनिशी एकसूत्री बनले होते व त्याने हे ४५ वे महासंमेलन आयोजिले होते. या महासंमेलनाचे अध्यक्ष पं. शिवशर्मा होते तर उद्घाटक उपपंतप्रधान मोरारजी देसाई होते. या संमेलनात उपस्थित झालेले ५ हजार प्रतिनिधी, एक लाखावर लोक, शिवाय १५-१६ मंत्री, उपप्रधानमंत्री- सर्व तृप्त झाले. सर्वांनी म्हटले- 'ऐसा संमेलन ८० सालों में कहीं नही हुवा, न कभी होगा।' या आयुर्वेद महासंमेलनात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, स्वास्थ्यमंत्री, शिक्षणमंत्री,

उपपंतप्रधान आणि आयुर्वेद चक्रवर्ती पं. शिवशर्माजी यांचे भाषण झाले. त्यातच आयुर्वेद विद्यापीठाचे स्नातक संमेलनही झाले.

दि.६ नोव्हेंबर १९६७ रोजी प्राथमिक शिक्षक संमेलन गुरुकुंजात संपन्न झाले. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी हे त्याचे अध्यक्ष होते. ११ व १२ नोव्हेंबर रोजी सेवा मंडळाची विशाल सभा गुरुकुंजात वं. महाराजांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या सभेला राष्ट्रसंतांनी स्वतःचे हृदय उकलून मार्गदर्शन केले. त्यात सेवामंडळाच्या संस्थापक सदस्यांचा गौरव करून गुरुदेवाचा हा सुंदर बगीचा सत्य, प्रेम आणि सेवेने सदैव हिरवा ठेवण्याची जबाबदारी त्यांनी विद्यमान कार्यकर्त्यांवर सोपवली. गुरुकुंजाने विश्‍वतीर्थाचे रूप धारण करावे अशी अपेक्षाही जोरकसपणे व्यक्त केली. श्रीक्षेत्र वरखेड येथील समर्थ आडकोजी महाराजांचा कार्तिक उत्सव संपन्न झाला. रामधून नंतर स्वामी सीतारामदास महाराजांसोबत राष्ट्रसंत उन्हात बसले असता ते स्वामींना म्हणाले–''दुनिया तो परिवर्तनशील है। मेरे बाद मेरा क्या अमर रहेगा स्वामीजी?''... स्वामीजी चट्कन म्हणाले– ''तेरी ध्यानप्रार्थना, तेरा भजन और तेरी ग्रामगीता।... क्यों कि इसके एक एक लब्ज में तूने अपनी पूरी ताकत लगा दी है। प्रार्थना तो तेरा तत्त्वज्ञान है। भजन में तेरी जान है। और ग्रामगीता तो बेजोड शान है ही।''... या सद्‌गुरु स्मृति महोत्सवात महाराजांच्या 'लहर की बरखा'–खंड २ चे प्रकाशन संपन्न झाले. दि.१६ नोव्हेंबर १९६७ ची कार्तिक पौर्णिमा हा सद्‌गुरू आडकोजी महाराजांचा यात्रा सोहळा. त्यात अनेक संत वरखेडला जमले होते. व्यासपीठावर राष्ट्रसंत बसले असता पुंडलिक बाबा त्यांचे मांडीवर जाऊन बसले. वं. महाराजांनी छाया चित्रकाराला खूण करून फोटो घ्यावयास सांगितले. प्रार्थनादिनाचा संदेश देताना महाराज म्हणाले, ''सामुदायिक प्रार्थनाच मनुष्याला वास्तविक मनुष्य बनविण्याची खुली पाठशाळा आहे, बौद्धिक प्रगती, भावनांची प्रगती याशिवाय मानव विश्‍वशांती व आत्मोन्नती करू शकत नाही.''

अलिकडे महाराजांना प्रकृतीची क्षीणता व इतरही त्रास जाणवत होते. त्यामुळे सेवामंडळाचे प्रचारकार्य अव्याहत चालावे म्हणून नवे प्रचारक घडविण्यासाठी २ वर्षांचा 'राष्ट्रधर्म प्रचार प्रशिक्षण वर्ग' सतत सुरू राहील अशी योजना त्यांनी केली व २० नोव्हेंबर ६७ रोजी गुरुकुंजाजवळच्या दास टेकडीच्या

पायथ्याशी असलेल्या गोरक्षाभूमीवर पहिला प्रचारप्रशिक्षण वर्ग सुरू करून दिला. उपसर्वाधिकारी श्री.नीळकण्ठ नाकतोडे हे या केन्द्राचे प्रथम व्यवस्थापक होते आणि मुख्य शैक्षणिक व्यवस्था श्री. केशवदास रामटेके पाहात होते. गुरुकुंजाच्या सभोवतीचा ८४ मैलांचा परिसर समृद्ध करण्याचा निर्धार गांधी जन्मशताब्दी निमित्ते करण्यात आला होता. या परिसराची परिक्रमा करून निर्धारित प्रकल्पाची पूर्तता करण्याचा प्रयत्न अनेक विधायक कार्यक्रमांद्वारा प्रचारकांनी आरंभला देखील होता. महाराज या वर्गाला जिवाभावाच्या सत्संगाने उपकृत करीत असतानाच प्रांतोप्रांतीचा प्रचारदौराही सांभाळत होते.

मधल्या काळात सेवामंडळाचे आजीवन प्रचारक श्री. रामराव ठाकरे यांनी शासकीय अनुदान, भूमिदान व जनतेचे श्रमदान यांतून जानेफळ (जाफराबाद) येथे आश्रम निर्माण केला, त्याच्या उद्घाटनास १३ डिसेंबर १९६७ ला महाराज गेले असता 'प्रति गुरुकुंज' अशी त्या आश्रमाची त्यांनी संभावना केली.

११ डिसेंबर १९६७ रोजी पहाटेस भीषण धरणीकंप होऊन पुण्याजवळचे कोयनानगर आणि पंचक्रोशातील माळरानाचा २० मैलांचा परिसर उद्ध्वस्त झाला. जमीन दुभंगली, टेकडी तडकली, दगड-दरडी कोसळू लागल्या. घरे पडली आणि त्यांच्याखाली शेकडो मुलेमाणसे चिरडली गेली. ६०० खेडी हादरली. कराड, महाबळेश्वर, प्रतापगड, पाचगणी या भागात सारी पडझड झाली. सुदैव हे की कोयना धरणाला फारसा धक्का बसला नाही. कोयनानगरीत मात्र प्रलयंकारी तांडव होऊन वीज, पाणी, निवारा उद्ध्वस्त होऊन बाहेरच्या जगाशी संपर्क तुटला. तरी भूकंपाचे हादरे पुनःपुन्हा बसत होते. हे वृत्त ऐकताच महाराजांचे हृदय कळवळले. बरीचशी मंडळी सोबतीला घेऊन आणि कपड्यांच्या वीस गाठी तसेच बरीचशी जीवनोपयोगी सामुग्री घेऊन महाराज २ जानेवारी १९६८ रोजी नागपूरहून रेल्वेने निघाले. पुणे-कराड मार्गे दुपारी ४ वाजता ते पाटणच्या रेस्ट हाऊसला 'विदर्भ सहायक समिती'सह पोहोचले. शासनाकडून जीप, ट्रक आणि एक मामलेदार मिळवून ते पूरग्रस्त भागाच्या दौऱ्यावर निघाले. रत्नागिरीपर्यंत घरे, सडका, पूल यांचा धुव्वा उडालेला, भयकंपित लोकांच्या झुंडी अगतिकपणे इतस्ततः आधार शोधणाऱ्या-राष्ट्रसंतांभोवती गोळा व्हायच्या. महाराज त्यांच्या दुःखावर फुंकर घालायचे. सोबत नेलेल्या घोंगड्या, सतरंज्या, कपडे, कंदिल इत्यादि सामुग्री

पीडितांमध्ये वाटून देऊन ताफा दुसऱ्या गावाकडे निघायचा. तिथल्या दुःखितांना मग राष्ट्रसंत कवटाळायचे आणि त्यांना दिलासा द्यायचे. ‘कोण दिवस येई कसा कोण जाणतो’- या सारख्या भजनांनी त्या भेटीचा समारोप व्हायचा. हा परिसर गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांचा असल्यामुळे त्यांनी सरकारी यंत्रणेला आणि धनिकांना सुद्धा वेठीस धरले होते. रात्री ठिकठिकाणी महाराजांची भजने होत. दिवसभर मदत वाटपाचे कार्यक्रम चालत. असा हा दौरा आटोपून सुन्न मनाने महाराज ७ जानेवारी १९६८ ला नागपूरला परत आले. सर्वाधिकारी विनायकराव वाघ यांनी महाराजांच्या प्रेरणेने ‘भूकंपग्रस्तांना सढळ हाताने मदत करा!’ असे पत्रक काढले.

आल्याबरोबरच महाराजांना ‘प्राथमिक शिक्षक संघ दिना’च्या कार्यक्रमास उपस्थित राहावे लागले. सायंकाळी इंदोऱ्याला भजनाचा प्रभावी कार्यक्रम घ्यावा लागला. त्या कार्यक्रमामध्येही कोयना-भूकंपाच्या सावल्या जनसागराची हृदये हेलावून टाकत होत्या.

दि.१२ फेब्रुवारी १९६८ रोजी पवनार येथील विनोबांच्या सर्वोदय संमेलनास महाराज उपस्थित होते, त्यात गांधी जन्मशताब्दी विषयी विचारविनिमय झाला. दि.१४ ला धानोऱ्याच्या सुंदरनारायणाच्या यात्रेला तर दि.१५ ला चंडिकापूर येथील संतसंमेलनात उपस्थित होऊन महाराजांनी उद्घाटन केले. याचवेळी तेथील नळ योजनेचे उद्घाटन तसेच वाठोडा-म्हैसपूर रोड निर्माणाचेही उद्घाटन महाराजांच्या हस्ते करण्यात आले.

दि.२३ ते ३० मार्च दरम्यान गुरुकुंजात गांधी जन्मशताब्दी शिबिर घेण्यात आले. त्यात सर्व प्रांतांमधून ९४ प्रतिनिधी आले होते. या ‘राष्ट्रीय लोकगीत व भजन-प्रशिक्षण शिबिरा’त महाराजांनी लिहिलेल्या १०१ नव्या भजनांची ‘सुदाम’ सावरकरांनी संपादित केलेली ‘गांधी-गीतांजली’ प्रकाशित करण्यात आली.

दि.२८ मार्चला नागपूर येथे योगीराज स्वामी श्री सीतारामदास महाराज यांच्या १५९ व्या वर्धापन दिनानिमित्ते आयोजित केलेल्या महोत्सवात माजी केन्द्रीय योजनामंत्री गुलझारीलाल नंदा यांचे भाषण झाले. त्यांनी स्वामीजींचा हार्दिक गौरव केला. ग्रामजयंती महोत्सव दरवर्षीप्रमाणे संपूर्ण एप्रिल महिन्यात पार पाडून सर्वत्र संदेश दुमदुमला होता. त्यावेळी महाराजांनी अनेक गावांना भेटी दिल्या.

त्यात त्यांनी १३५ गावे जागृत केली होती. त्याप्रसंगी महाराज म्हणाले होते– ''प्रचार हेच माझे जीवन आहे. संपूर्ण आश्रम प्रेरणेचे व प्रचाराचे केंद्र झाला पाहिजे.''

दि.१४ एप्रिल रोजी गुरुकुंजातील सेवाश्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जयंती दिन साजरा झाला. त्याप्रीत्यर्थ केलेल्या भाषणात राष्ट्रसंत म्हणाले– ''बाबासाहेब सच्चे धर्मपुरुष थे। राग–द्वेष के वश होकर उन्होंने निर्णय नहीं किया। बहुत सोच–समझकर उन्हों ने बुद्धधर्म को चुन लिया, जो हिंदुधर्म का ही एक पहलू है और मानवता पर अधिष्ठित !''

दि.२८ मे १९६८ रोजी गुरुकुंजाजवळच्या पिंपळ विहिरा या गावात ग्रामसेवक काकडे व मुख्यसेविका मानकर यांनी आयोजित केलेल्या 'ग्रामसेवक शिबिरा'च्या समारोपाकरिता महाराज गेले. दि.२ जून ला गुरुकुंजातील स्मृति भवनात एकाचवेळी अनेक विवाह सामुदायिक पद्धतीने लावण्यात आले– तेही 'श्रीगुरुदेव विवाह पद्धती' चा अवलंब करून. त्यांत जातीपातीचा देखील भेद करण्यात आलेला नव्हता. महाराज आशीर्वादपर भाषणात म्हणाले होते– ''अशा जीवनसंलग्न उपक्रमांमधून आपण राष्ट्रीय एकात्मता टिकवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकशाहीचेच हे प्रात्यक्षिक आहे.''

दि.४ एप्रिल १९६० रोजी महाराजांनी आदिवासी बालकांसाठी पहिल्यांदा स्थापन केलेल्या कमलापूर (सिरोंचा) च्या आश्रमशाळेत ते ५ जून ते ६ जून पर्यंत मुक्कामी राहिले. याव्यतिरिक्तही अमरावती जिल्ह्यात मेळघाट तहसिलीत चिखली (माणिकग्राम), बैतूल जिल्ह्यात उदामा, छिंदवाडा जिल्ह्यात सौंसर, आदिलाबाद जिल्ह्यात उतनूर येथे त्यांनी आदिवासी आश्रमशाळा निर्माण केल्या.

दि.१५ व १६ जून १९६८ रोजी चिमूर (चंद्रपूर) येथे सेवामंडळाची सहामाही मध्यवर्ती प्रतिनिधी सभा श्री.दीनदयाल गुप्त यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. तिचा समारोप संचालक मंडळाचे नवे अध्यक्ष ना. बाळासाहेब देसाई यांच्या भाषणाने झाला. दि.२९ एप्रिल ६९ रोजी महाराज वयाची ६० वर्षे पूर्ण करणार असल्याने त्यांचा षष्ठ्यद्ब्पूर्ती समारोह करण्याचे सुचवून त्या उत्सवाच्या विधायक स्वरूपाची रूपरेषाही त्यांनी स्पष्ट केली. परन्तु त्यांच्यानंतर राष्ट्रसंतांनी

केलेल्या कळसाच्या भाषणात सेवामंडळाच्या कार्यविकासाच्या दृष्टीने बहुमोल विधायक सूचना केल्या.

तळेगाव (श्यामजीपंत) येथे महादेवराव व दौलतराव खेरडे बंधूंच्या घराचे उद्‌घाटन 'ग्रामगीता' प्रवचनाने करण्याचे ठरवून श्री 'सुदाम' सावरकर यांच्यासह महाराज दि.२८ जून १९६८ रोजी गेले. 'सुदाम'जींचे प्रवचन ऐकून महाराजांनी आनंद व्यक्त करणारे १५ मिनिटांचे भाषण दिले. तिथे त्यांचे पूजन झाले व परतताना त्यांनी स्वतःच्या गळ्यातील बहुमोल दुपट्टा मित्र 'सुदाम'जींच्या गळ्याभोवती लपेटून दिला. त्यांच्या हृदयातील कौतुकाचे नि आशीर्वादाचे ते प्रतीक 'सुदाम'जींनी आजीवन सांभाळून ठेवले.

* * * * *

# अकरा : महानिर्वाण

सन् १९६८ च्या एप्रिल अखेरीस म्हणजे राष्ट्रसंतांच्या ५९ व्या जयंतीपासून ग्रामजयंती समारंभाअन्तर्गत श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या ग्रामनवनिर्माण कार्यक्रमांना सुरुवात झाली. त्यानिमित्ते राष्ट्रसंतांना गावोगावी भ्रमंती करावी लागली. शेवटचा ग्रामजयंतीचा महिना तर खूपच क्लेषदायक ठरला. आजपर्यंत झाला नसेल एवढा कडक प्रवास यावर्षी घडत होता. दौरा सारखा चालूच असायचा. प्रकृती साथ देत नव्हती, तरी महाराज तिला जुमानत नव्हते. अशा प्रकृती अस्वास्थ्यातही मे मधील उज्जैनचा कुंभमेळा त्यांनी गाठलाच. भजन-भाषणांनी निर्णायक रंग खूप उधळून दिला. गुरुकुंजात परत आले तेव्हा सततच्या कार्यक्रमांमुळे प्रकृती अत्यंत क्षीण झाली होती. डॉक्टर श्यामसुंदरांनी तपासले तेव्हा निक्षून म्हणाले- ''यापुढे दौरा एकदम बंद !''

तरीही आजारी असतानाच महाराजांनी आषाढीला पंढरपूर वारी केली. साडेतीनशे मैलांचा प्रवास करण्याइतकी त्यांची प्रकृती सक्षम नव्हती. प्रथम त्यांनी वरखेड येथे सद्‌गुरुचे दर्शन घेतले. गुरुदेवाच्या फोटोकडे पाहातानाच त्यांच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. पोटात जळजळ व पाठीत वेदना वाढल्या होत्या. चार महिन्यांपासून सारेच शरीर ठणकत होते. पंढरपुरात महाराजांनी भजन म्हटले- 'कशाला काशी जातो रे बाबा, कशाला पंढरी जातो?' त्यानंतरही तासभर महाराजांची भजने चालली. दि.६ जुलै १९६८ रोजी आषाढी एकादशीचे महाराजांचे भजन ऐकण्यासाठी वारकरी श्रोते आतुर झाले होते. शेवटचे भजन झाल्यावर 'हरदम बना रहे दरबार'- ही भैरवी म्हणून त्यांनी खंजरी खाली ठेवली ती पुन्हा न उचलण्यासाठीच! त्यांच्या डोळ्यात अश्रू चमकत होते. उलट्या व उचक्या अधिक प्रमाणात सुरू झाल्या होत्या.

दि.२० जुलै १९६८ रोजी त्यांना मुंबईच्या बाँबे हॉस्पिटलमध्ये भर्ती करण्यात आले. कर्करोगाच्या आशंकेमुळे १२ ऑगस्ट रोजी छोटीशी शस्त्रक्रिया (बायप्सी) करण्यात आली. वेदना मात्र काही केल्या कमी होईनात. तेव्हा २३ ऑगस्ट रोजी महाराजांना गुरुकुंजात परत आणण्यात आले. गुरुकुंजाचे दर्शन होताच महाराज उद्‌गारले-

*'क्यों मरने घबडाता बंदे । मरना एक खुशाली है*
*सुखकी नींद लगेगी इसमें । दुनिया मरनेवाली है ।।'*

तशातच विदर्भाला कृषि विद्यापीठ मिळावे म्हणून विद्यार्थीवर्गाने सुबुद्धतेने आंदोलन छेडले होते. ते सर्व विद्यार्थी नेते महाराजांना भेटले. महाराज म्हणाले, ''स्वत:च्या हक्कासाठी लढणे हे युवकांचे कर्तव्यच आहे. परंतु मी कष्टाने बांधलेल्या या आश्रमाची मोडतोड करू नका.''

महाराजांनी सर्वांशी प्रेमळपणे वागून आपले मोठे कुटुंब निर्माण केले होते. महाराज जनतेला सांगत, 'सच काम किया जगमें जिसने । उसने प्रभुनाम लिया न लिया ।।' असा त्यांचा विवेकनिष्ठ अध्यात्मवाद होता. त्यांना आतातायीपणा, अविचार मुळीच मान्य नव्हता. दि.५ सप्टेंबर १९६८ रोजी नागपूर आकाशवाणीवर त्यांनी ''आपल्या चारित्र्याने देशाची किंमत राखली पाहिजे''– असा संदेश दिला.

प्रकृती ठीक नसताही ते ध्यान, प्रार्थना नि नित्यक्रम अवलंबीत होते. भक्तगण व नर्सेस महाराजांच्या शुश्रूषेसाठी खूप कष्ट घेत होत्या. श्री रामभाऊ पुंडलिकराव पांडे यांना महाराजांनी फेटा दिला. पद्मश्री डॉ. पटवर्धन एकदा महाराजांना भेटायला गेले. तसेच साहित्यिक श्री. ना. रा. शेंडे दि.६ सप्टेंबर १९६८ रोजी भेटले. सरसंघचालक श्री गोळवलकर गुरुजी व तीन प्रमुख संघकार्यकर्ते महाराजांना भेटून गेले. पद्मश्री बाबा आमटे यांनी दि.८ सप्टेंबरला पत्राने महाराजांची चौकशी केली. श्री.सावजी महाराजांनी दि.८ सप्टेंबरलाच आपल्या कीर्तनातून महाराजांची भारावलेल्या शब्दांत प्रशंसा केली. महाराजांची प्रकृती सुधारावी म्हणून लोकांनी अखंड नामयज्ञ सुरू केला. मुसलमान बांधवांनी नमाज पढून दुवा मागितली. दि.२५ व २६ ऑगस्ट रोजी स्मृति भवनात 'संकल्प शिबिर' सफलतापूर्वक संपन्न करण्यात आले. दि.१० सप्टेंबर ला सकाळी नागपूर येथील होमिओपॅथीचे तज्ञ डॉ. जोशी आदि आले होते. तसेच ह.भ.प.श्री.रामचंद्रबाबा पिंपळगावकर हे तीन चार वारकरीवृंदासह महाराजांच्या दर्शनासाठी आले होते.

दि.११ सप्टेंबर रोजी श्री. रतनचंद डागाजी बरोबर हिंदु, बौद्ध, जैन, पारशी, ख्रिस्ती, इस्लामी, शीख आदि सर्व धर्मांचे व पंथांचे आचार्य गुरुकुंजात भेटीसाठी आले होते. मात्र अभ्यागतांमुळे महाराजांना आत्मचिंतनात व्यत्यय येत

असे. योगीराज सीतारामदास महाराज यांनी 'रामचरितमानस' मधील प्रार्थना म्हणून कलशातील पाणी महाराजांच्या डोक्यावर व डोळ्यांवर शिंपडले. त्यावेळी महाराजांना शंभर विंचवांनी नांग्या मारल्यासारख्या वेदना सुरू होत्या. आश्रमात दिवसभर अन्नदान, रक्तदान या गतिविधी व पार्श्वभूमीला मंद संगीताचे स्वर सुरूच असत. दि.१६ सप्टेंबर १९६८ रोजी नागपूरचे कुलगुरु डॉ. भाऊसाहेब कोलते कार्यकर्त्यांसह भेटीस आले. डॉ.जयस्वाल व डॉ.भिवापूरकर यांचे नागपुरात कॅन्सर हॉस्पिटल काढण्याचे बहुवांच्छित स्वप्न असल्यामुळे महाराजांना 'कर्करोग हॉस्पिटल'च्या मुहूर्तासाठी न्यायचा त्यांचा आग्रह होता. परंतु महाराजांनी श्री सीतारामदास स्वामींचे हस्ते त्या हॉस्पिटलचे भूमिपूजन करविले.

दि.१५ सप्टेंबर १९६८ रोजी आग्र्याचे धन्वंतरी पं. ब्रह्मानंदजी यांनी महाराजांची प्रकृती तपासली तेव्हा सर्वांना आनंद झाला. आर्वीचे वैद्यरत्न डॉ. दिवे यांना ब्रह्मानंदजींनी मुद्दाम बोलावून घेतले होते. त्यांचेही शर्थीचे उपचार सुरू होते. संचालकांनी दि.१५ सप्टेंबर रोजी उपाध्यक्ष श्री. दीनदयालजी गुप्ता यांचेकडून वं. महाराजांचे मृत्युपत्र लिहून तयार केले व त्यावर महाराजांच्या सह्या घेतल्या. त्यात लिहिले होते– 'सेवामंडळाच्या इस्टेटीची मालकी संचालक मंडळाची राहील.' या मृत्युपत्राशी सर्वाधिकारी विनायकराव वाघ, डॉ.जयस्वाल, श्री.मोतीरामजी पुनसे आदि मंडळीही पूर्ण सहमत होती. आयुर्वेद धन्वंतरी पं. ब्रह्मानंदांनी तीन दिवसांतच वं. महाराजांच्या प्रकृतीत आशादायक परिवर्तन घडवून आणले होते. पंडित शिवशर्माजी हे ब्रह्मानंदजींशी सहमत होते. त्यांना परत आग्र्याला औषधी तयार करण्यासाठी जायचे होते. दि.२२ सप्टेंबर १९६८ ला सर्वपित्री अमावस्या व त्यातच सूर्यग्रहण होते. यादिवशी महाराज दिवसभर आपल्या धारणेतच मग्न होते. त्यांच्या पाठीतील व पोटातील वेदना कमी झाल्या होत्या. वांती थांबली होती. पायाची सूजही उतरली होती. 'रामकृष्ण हरि मंदिर' आणि भागवत मंदिर निर्माण करून राष्ट्रधर्म प्रचार प्रशिक्षण केन्द्राला अधिक समृद्ध– समर्थ बनवायचे कार्य अजून शिल्लक होते. ही संधी महाराजांना त्यांच्या जवळच्याच कांही महाभागांनी लाभू दिली नव्हती. तरी महाराज आपल्या विनाशकांचाही द्वेष करीत नसत.

दि.२८ सप्टेंबरला आग्र्याचे वैद्य शिरोमणी ब्रह्मानंदजी गुरुकुंजात परत

आल्यावर त्यांनी महाराजांचे दर्शन घेतले व त्यांची प्रकृती तपासून उपचार केले. महाराजांची अशक्तता कमालीची वाढली होती. दि.४ ऑक्टोबरला महाराजांनी पं. ब्रह्मानंदजींना वरखेडला श्री समर्थ आडकोजी महाराजांच्या दर्शनासाठी पाठविले. स्वामी सीतारामदासजी सुद्धा त्यावेळी रामटेकला गेले होते.

दि.७ ऑक्टोबर १९६८ रोजी मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक महाराजांच्या भेटीसाठी आले होते. त्यावेळी प्रा.मा.ल. व्यवहारे व पंडित ब्रह्मानंदजींची धडपड सुरू होती. पंडितजींना आग्र्याला जाऊन औषध तयार करण्यासाठी जाणे अनिवार्य होते. त्यासाठी ''जाऊन एक आठवड्यात परत येतो'' म्हणून ते निघून गेले.

अशा अवस्थेतही महाराज दास टेकडीजवळ नेण्याचा सतत आग्रह धरीत होते. त्याप्रमाणे तेथील 'रामकृष्ण हरि मंदिरा'ला शेवटचा नमस्कार करून ध्यानमंदिरात महाराज परत आले. राष्ट्रसंत आता मृत्यूच्या पदार्पणाची वाट पाहात होते. त्यांची चर्या पाहून सीतारामदास स्वामीजींवर जणु वज्राघात झाला! त्यातच एक अनिष्ट घटना घडली. वं. महाराजांच्या पोटातील नळीचा बूच कसा निघाला ते कोणालाच कळले नाही. त्यामुळे पाणी नळीतून वर आले आणि महाराजांना एकाएकी असह्य वेदना होऊ लागल्या. त्यावेळी श्री 'सुदाम'जी अकोल्याला शिबिर समारोपासाठी गेले होते. ना. बाळासाहेब देसाई महाराजांची अवस्था पाहून वैद्यांवर अतिशय संतापले होते. ते संचालक मंडळाचे अध्यक्ष असल्यामुळे जाणत्यांनीही त्यांच्या त्या संतप्त आविर्भावाकडे डोळेझाक केली. डॉक्टरांचा आयुर्वेदाच्या सात्त्विक इलाजांवर विश्वास नव्हता. दि.९ ऑक्टोबर १९६८ रोजी ५ वाजता जेव्हा महाराजांना घरघर लागली तेव्हा सीतारामदास स्वामींनी सर्वांना 'ॐ ऱ्हाँ रामाय नमः ।' जपायला सांगितले.

दि.११ ऑक्टोबर १९६८ रोजी पहाटेस ३.३० ते ५.३० चे दरम्यान महाराजांना रक्ताची गुळणी झाली. शुक्रवार दिवस उजाडणार होता. त्यांचे डोक्यावर श्रीआडकोजी महाराजांचा फोटो होता. स्वामीजींचे शिष्य हरदासजी यांना त्यातून एकदम 'प्रकाशझोत' बाहेर आलेला दिसला. इकडे महाराजांची स्थिती आटोक्याबाहेर गेलेली होती. त्याच दिवशी दुपारी ४ वाजून ५८ मिनिटांनी एकदा महाराजांनी डोळे उघडून सभोवती पाहिले व हळूच डोळे मिटले, ते पुन्हा उघडलेच नाही ! कर्पूराच्या ज्योतीप्रमाणे त्यांचा प्राण अनंतात विलीन झाला.

राष्ट्रसंतांची मूर्ती प्रार्थना मंदिरासमोर तक्तपोसावर फुलांच्या शय्येवर विसावली होती. ना. बाळासाहेबांनी कलेक्टर वगैरेंना आदेश दिले– ''सर्वत्र तारा करा. जनतेसाठी मोटारी सोडा. ट्रकमधून सुद्धा खुशाल लोकांना येऊ द्या.'' आकाशवाणीवरून भारतभर शोकवार्ता पसरली होती. पत्रकारांनी फोटो घेतले. महाराज होते त्याच ठिकाणी सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. महाराजांच्या अध्यात्मशक्तीवर अखेर मृत्यूने मात केली होती !

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय ग्रामांच्या नवनिर्मितीचा मंत्र व तंत्र साध्याभोळ्या भारतीय जनतेच्या हृदयात पेरणारा कलाकुशल व्यक्तित्वाचा हा ग्रामोद्धारक तत्त्वज्ञ संत पंचतत्त्वांत विलीन होत होता.

* * * * *



## डॉ. सुभाष सावरकर

डॉ. सुभाष सावरकर (जन्म–अमरावती दि.२३–१–१९४६) हे विद्युत अभियांत्रिकीचे प्राध्यापक २००४ मध्ये सेवानिवृत्त झाले. 'अस्तित्ववाद व मराठी कादंबरी' या प्रबंधावर विक्रम विद्यापीठ, उज्जैन येथून आचार्य पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी साठोत्तर मराठीतील 'जनसाहित्य विचारप्रवाह' विकसित केला व त्याला कथा, कादंबरी, कविता, नाटक व चरित्र – या ललितवाङ्मय निर्मितीसोबतच वैचारिक गद्य तथा सैद्धान्तिक व उपयोजनात्मक समीक्षाग्रंथांची जोड दिली. १९८४ पासून जनसाहित्य चळवळीला वाहिलेले 'अक्षरवैदर्भी' हे मराठी मासिक सातत्याने चालवून महाराष्ट्रातील उदयोन्मुख साहित्यप्रतिभेला जननिष्ठेची दिशा दिली. इतकेच नव्हे तर अमरावती, नागपूर, नांदेड, औरंगाबाद व पुणे येथील विद्यापीठांच्या एकूण २३ शोधछात्रांना आचार्य पदवीकरिता मार्गदर्शनही केले.

२० व्या शतकातील वैदर्भीय जननायक राष्ट्रसंत तुकडोजी यांच्या व्यक्तित्व, कर्तृत्व व वाङ्मय यांचे मूल्यदर्शन घडविणारी ५ स्वतंत्र पुस्तके व २ संपादित ग्रंथ निर्माण करणारे डॉ. सुभाष सावरकर हे गेली १२ वर्षे 'राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा' अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून अमरावती येथील विद्यापीठात कार्यरत आहेत.